# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि. ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| | |
|---|---|
| विषय | मा. महासभा<br>दि. १६/०२/२०१३ स. ११:०० वा.<br>प्रकरण क्र. ४७ ते ५१ |

प्रकरण सुरु झाल्याची तारीख : व. शुध्दीपत्र

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | दि. २०/२/२०१३ स. ११:०० वा. |

## अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१/ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/१६८ /२०१२-१३ दिनांक :- ०७/०२/२०१३.

## // शुध्दीपत्र //

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ____________________
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय/महोदया,

या शुध्दीपत्राद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, महानगरपालिकेची मा. महासभा शनिवार दि. १६/०२/२०१३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा काही अपरीहार्य कारणास्तव बुधवार दि. २०/०२/२०१३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता सभा सुचना क्र. ६ मधील कामकाज चालविण्याकरीता आयोजित करण्यात येत आहे. ह्यांची कृपया सर्व सदस्यांनी नोंद घ्यावी ही विनंती.

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महापौर सो., यांच्या मान्यतेने

# मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०६/०२/२०१३.

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- ०६, दिनांक ०६/०२/२०१३.**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ------------------------------------

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शनिवार दि. १६/०२/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६, दि. ०६/०२/२०१३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. महासभा सुचना क्रमांक ०६, दि. ०६/०२/२०१३ सोबतची विषय पत्रिका

### सभा शनिवार दि. १६/०२/२०१३

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे –** |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| ४७ | दि. ०१/१२/२०१२ व दि. १४/१२/२०१२ (दि. ०१/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका –** |
| ४८ | श्रीम. सिमा जैन यांनी मा. स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनाम दिल्याने रिक्त झालेल्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम २३ अन्वये एका सदस्याची उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करणे. |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज –** |
| ४९ | मिरा भाईंदर शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ उभारण्याकरीता चर्चा करुन महासभेमध्ये निर्णय घेणेबाबत. |
| ५० | श्री. भारत जगताप, सहाय्यक नगररचनाकार यांना महानगरपालिका सेवेतून कमी/बडतर्फ करणेबाबत. |
| ५१ | महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकाम यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राकरीता पोलीस पथक निर्माण करणे व पोलीस स्टेशन स्थापन करणेबाबत. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे –** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०६ फेब्रुवारी २०१३

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. १६/०२/२०१३ रोजी आयोजित केली आहे.**
**सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **०३ श्री. नरेंद्र एल. मेहता मा. सदस्य यांनी दि. २१/११/२०१२ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिकेने सन २०१०-११ मध्ये घरपट्टी व पाणी पुरवठामध्ये करवाढ केली होती. ती शासनाने रद्द केली. घरपट्टी कर वाढ केलेल्या कालावधीत महानगरपालिकेकडे नागरीकांनी जास्तीचा रक्कमेची भरणा केलेली आहे ती किती आहे? |
| अ) वाढीव घरपट्टी कराची रक्कम परत देण्याचा निर्णय झाला होता. तेव्हा जास्तीची भरणा केलेल्या किती रक्कमे पैकी किती रक्कम नागरीकांना परत देण्यात आली आहे. |
| ब) पाण्याचे दर वाढ देखील सन २०१०-११ मध्ये करण्यात आले होते. ती देखील रद्द करण्यात आली असता सोसायटी व नागरीकांनी किती जास्तीचा रक्कमेची भरण्या केलेली आहे? |
| क) शासन निर्णयानंतर किती जास्तीच्या पाणी बिलाची रक्कमेचा परतावा करण्यात आलेला आहे? |
| ड) सन २०१०-११ मध्ये नळ जोडण्याचे ½ इंचासाठी १५००० ऐवजी २५००० व १ इंचासाठी २५००० ऐवजी ३५००० रुपये करण्यात आले होते. त्यानुसार वाढीव रकमेची आकारणी करुन किती जोडण्या करण्यात आल्या त्याचे नांव व पत्ता देण्यात यावा? |
| इ) त्याचप्रमाणे शासन निर्णय झाल्यानंतर जास्तीच्या रककमेचा किती सोसायट्यांना परतावा करण्यात आला त्याचे नाव व पत्ता देण्यात यावा व किती रक्कम परत देण्यात आली आहे यांचे उत्तर द्यावे? |
| **०४ श्री. नरेंद्र एल. मेहता मा. सदस्य यांनी दि. ०५/०१/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मौजे नवघर सर्व्हे क्र. ४३५,४३६,४३७,४३८ या जागेत आरक्षण आहेत का? व कोणती आहेत? |
| अ) सदर जागेत असलेली आरक्षणे फेरबदल करुन स्थलांतरीत केली आहेत का? |
| ब) सदर जागेतील डी.पी. प्रमाणे असलेली आरक्षणे सी.आर.झेडने बाधित होत आहेत का? |
| क) बदलून दुसरीकडे स्थलांतरीत केलेली आरक्षणे सी.आर.झेडने बाधित आहेत का? |
| ड) सी.आर.झेडने बाधित असलेले आरक्षण नॉन सी.आर.झेड. असलेल्या जागेत स्थलांतरीत केले आहे ते कोणत्या नियमानुसार? |
| इ) एखाद्या वेळी एकाच मालकांची सलग्न जागा असल्याने तेथिल रहिवास भाग सी.आर.झेडने बाधित व आरक्षण नॉन सी.आर.झेडने बाधित असल्यास आपण सदर रहिवास भाग आरक्षणामध्ये व आरक्षण रहिवास भागामध्ये बदल करुन देणार का? जर नाही तर का? व हो तर कोणत्या नियमानुसार? |
| ई) सदर बदल केलेल्या आरक्षणांची शासनाकडून परवानगी घेतली आहे का? |
| **०५ श्री. नरेंद्र एल. मेहता मा. सदस्य यांनी दि. ०५/०१/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) नगररचना विभागाने प्रभाग क्र. ३१ मध्ये विकासक रवि डेव्हलपर्स यांना ज्या परवानग्या दिल्या आहेत त्या संदर्भातील प्रश्न. |
| अ) परवानगी नुसार इमारती बांधल्या आहेत का? |
| ब) परवानगीनुसार इमारती न बांधता वाढीव बांधकाम केलेले असलेल्या इमारतीवर कारवाई करण्यात आली आहे का? |
| क) वाढीव बांधकाम केलेल्या इमारतींवर कारवाई करण्यास विलंब का लागत आहे? |
| ड) वाढीव बांधकाम केलेल्या इमारतींवर कधी कारवाई करणार? |
| इ) अशाप्रकारे वाढीव बांधकाम करणारे विकासक रवि डेव्हलोपर्स यांच्यावर एम.आर.टी.पी. अंतर्गत कारवाई का करण्यात आली नाही? |
| ई) सुधारीत परवानगी देताना सदर विकासकाकडून ओपन लॅन्ड टॅक्स घेण्यात आला आहे का? |
| **०६ श्री. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ११/०१/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| 1) Details of Fire Safety measure suggested by fire department in building used/ owned by MBMC state and Central government in MBMC Juridiction area with details of their implication status. |
| A) Details of Notice & Penalty against contractor/ institution who are responsible for maintenance of electrical polls in last 9 years. |
| B) List of defaulters in paying taxes on open land with principle and penalty details why this taxes are not recovered so far. |

| | |
|---|---|
| **०७ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** | |
| १) महानगरपालिकेने सन २००४ ते २०१२ ह्या कालावधीत मे. टंडन असोसिएट ह्या तांत्रिक सल्लागारास देण्यात आलेल्या कामाची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे देण्यात यावी.<br>(अ) कामांची नावे (ब) कामाची अंदाजपत्रक रक्कम (क) कार्यादेश तारीख (ड) काम पूर्ण करण्याची मुदत (तारीखसह) | |
| अ) कामाची मुदत पूर्ण होऊनही बरीच कामे पूर्ण झाली नाहीत हे खरे आहे काय? | |
| ब) असल्यास अपूर्ण असलेल्या कामाचा तपशिल द्यावा? | |
| क) कामे मुदतीत पूर्ण न केल्याने त्याचे विरुध्द कोणती कारवाई केली? | |
| ड) कामे मुदतीत न केल्याने महानगरपालिकेचे किती नुकसान झाले? | |
| **०८ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. ०४/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** | |
| १) भूमिगत गटार योजना कामाची एस्टीमेंट रक्कम किती आहे? | |
| अ) कामाचा कार्यादेश दिनांक कोणता आहे? | |
| ब) कामाची मुदत काय आहे? | |
| क) महानगरपालिकने ठरविलेल्या वेळापत्रकानुसार (Bar Chart) काम झाले नाही हे खरे आहे काय? | |
| ड) असल्यास, काम वेळापत्रकानुसार किती होणे आवश्यक आहे? प्रत्यक्षात आजपर्यंतच्या कामाची स्थिती काय आहे? | |
| इ) काम वेळेवर न झाल्याने ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली आहे? | |

मा. महासभा

दि. ०१/१२/२०१२

रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा महासभा दि. ०१/१२/२०१२**

आज शनिवार दि. ०१/१२/२०१२ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र.३ दि. २०/११/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | महापौर |
| २) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | उपमहापौर |
| ३) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ४) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ५) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ६) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ७) | कांगणे यशवंत धगाजी | सदस्य |
| ८) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| ९) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १०) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| ११) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १२) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १३) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १४) | निलम हरिश्चंद्र ढवण | सदस्या |
| १५) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १६) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १७) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १८) | अरविंद दत्ताराम ठाकुर | सदस्य |
| १९) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २०) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २१) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २२) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २३) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २४) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २५) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| २६) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २७) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २८) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| २९) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३०) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३१) | मुन्ना सिंग | सदस्य |
| ३२) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३३) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३४) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३५) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३६) | जैन गिता भरत | सदस्या |
| ३७) | जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३८) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३९) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४०) | तांगडे प्रतिभा प्रकाश | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४१) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४२) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४३) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | सदस्य |
| ४४) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४५) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ४६) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ४७) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ४८) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ४९) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५०) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५१) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५२) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ५३) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ५४) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५५) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ५६) | इनामदार जुबेर | सदस्य |
| ५७) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ५८) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ५९) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६०) | जैन सिमा महेंद्र | सदस्या |
| ६१) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६२) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६३) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६४) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६५) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ६६) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६७) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६८) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६९) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७०) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७१) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७२) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७३) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ७४) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ७५) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| २) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ३) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ४) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ५) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ६) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ७) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ९) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| १०) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ११) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १२) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| १३) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| १४) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| १५) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| १६) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १७) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| | **रजेचा अर्ज –** | |
| १) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |

**प्र. नगरसचिव :-**

सर्वांनी राष्ट्रीय गित "वंदे मातरम्" साठी जागेवर उभे राहायचे आहे.

("वंदे मातरम्" या राष्ट्रीय गिताने सभेची सुरुवात करण्यात आली.)

**प्र. नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शनिवार दि. ०१/१२/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०३, दि. २०/११/२०१२ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**जुंबेर इनामदार :-**

काल दि. ३०/११/२०१२ रोजी या देशाचे माजी प्रधानमंत्री श्री. इंदरकुमार गुजराल साहेबांचे गुडगाव येथे आजारामध्ये निधन झालेले आहे. तर मी या सभागृहाला विनंती करते की, दोन मिनिटे उभे राहून त्यांना श्रध्दांजली वाहावी.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, माजी पंतप्रधान आय.के.गुजराल यांचे काल निधन झाले आणि पूर्ण देशात राष्ट्रीय दुःखवटा घोषित करण्यात आला. पूर्ण सभागृहाला विनंती आहे की, आजची सभा आपण तहकुब करुन त्यांना आदरपूर्ण श्रध्दांजली देऊ.

**बर्नड डिमेलो :-**

माजी पंतप्रधान श्री. इंदर कुमार गुंजराल यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी काल दि. ३०/११/२०१२ रोजी दुःखद निधन झाले असल्याने आज दि.०१/१२/२०१२ रोजी आयोजित करण्यात आलेली मा. महासभा तहकुब करण्याचा मी ठराव मांडत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सर्वांच्या अनुमतीने मी आजची ही सभा तहकुब करीत आहे. तुम्हाला तारीख नंतर कळविण्यांत येईल.

**ठराव क्र. ०८ :-**

माजी पंतप्रधान श्री. इंदर कुमार गुजराल यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी काल दि. ३०/११/२०१२ रोजी दुःखद निधन झाले असल्याने आज दि.०१/१२/२०१२ रोजी आयोजित करण्यात आलेली मा. महासभा तहकुब करण्याचा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सभा तहकुब झाल्याची वेळ - सकाळी ११.४० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मा. महासभा

# दि. १४/१२/२०१२

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा महासभा दि. १४/१२/२०१२**

आज शुक्रवार दि. १४/१२/२०१२ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची दि. ०१/१२/२०१२ रोजीची तहकुब मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र.३ दि. २०/११/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | महापौर |
| २) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ३) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ४) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ५) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ६) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ७) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ८) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ९) | कांगणे यशवंत धगाजी | सदस्य |
| १०) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| ११) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १३) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १४) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १५) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १६) | निलम हरिश्चंद्र ढवण | सदस्या |
| १७) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १८) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १९) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २०) | अरविंद दत्ताराम ठाकुर | सदस्य |
| २१) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २२) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २३) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २४) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २५) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २६) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २७) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २८) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| २९) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३०) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ३१) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| ३२) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३३) | मुन्ना सिंग | सदस्य |
| ३४) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३५) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३६) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३७) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३८) | जैन गिता भरत | सदस्या |
| ३९) | जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ४०) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४१) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४२) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४३) | मेन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४४) | तांगडे प्रतिभा प्रकाश | सदस्या |
| ४५) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४६) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ४७) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४८) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४९) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ५०) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ५१) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | सदस्य |
| ५२) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ५३) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ५४) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ५५) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५६) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५७) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५८) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५९) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ६०) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ६१) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ६२) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ६३) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ६४) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६५) | इनामदार जुबेर | सदस्य |
| ६६) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६७) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६८) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६९) | जैन सिमा महेंद्र | सदस्या |
| ७०) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ७१) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ७२) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७३) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ७४) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७५) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७६) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ७७) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७८) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ७९) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ८०) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ८१) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ८२) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ८३) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ८४) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ८५) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ८६) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ८७) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८८) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ८९) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ९०) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ९१) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | उपमहापौर |

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत दि. १/१२/२०१२ रोजीची तहकुब सभा आज दि. १४/१२/२०१२ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, सदरची मा. महासभा खेळेमेळीच्या वातावरणात पार पाडावी. सचिव साहेब, कामकाजाला सुरुवात करा.

**प्र. नगरसचिव :-**

मा. महासभा शनिवार दि. ०१/१२/२०१२ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरहू सभा तहकूब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषय क्र. ६ ते २६ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा **शुक्रवार दिनांक १४/१२/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता** मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे. सभेच्या कामकाजाला सुरुवात करण्यांत येत आहे. आजच्या सभेसाठी मा. उपमहापौर श्रीम. सैय्यद नुरजहाँ नझरहुसैन यांनी रजेचा अर्ज दिलेला आहे. तो. मी मा. महापौरांकडे देतो.

**मा. महापौर :-**

सर्वांना एक सुचना आहे, सभागृहामध्ये जे कोणी सदस्य आमची परवानगी न घेता चर्चा करतील, ती चर्चा इतिवृत्तांतामध्ये नोंद करण्यात येणार नाही याची दखल सर्व सन्मा. सदस्यांनी घ्यावी. नगरसचिवांनी अशी चर्चा इतिवृत्तांमध्ये घेऊ नये.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. मॅडम, मंगळवारपासून जन्म-मृत्यू दाखले देणे बंद आहेत. सॉफ्टवेअरमध्ये बिघाड आहे. तर ते कधीपासून सुरु होतील? आणि यांचा ठेकेदार कोण आहे? माझे दोन-तीन प्रश्न आहेत. पहिला मी हा क्लीअर करुन घेतो.

**मा. महापौर :-**

मी तुम्हाला नंतर बोलण्याची संधी देईन. पहिले आपण मा. महासभेला सुरुवात करु.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, गेल्या वेळेला मी आपल्याला गटनेता केबीनसाठी विनंती पण केली होती. पहिल्या वेळेला नऊ सदस्य असताना आम्हाला जेवढी गटनेता केबीन दिलेली होती, तीच केबीन आता आम्हाला दिलेली आहे. आणि आमचे २९ नगरसेवक आहेत, ते त्याच्यात बसू शकत नाहीत. याच्यावर विचार करुन आम्हाला बसण्यासाठी केबीन उपलब्ध करुन दयावी. कारण आता मिटींग असताना आम्हाला सदस्यांना बोलवताना कुठे बसवायचे हा विचार पडतो.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम, याच विषयाला धरुन मी बोलेन की, शिवसेनेचे सध्या संख्याबळ १४ आहे. त्यानुसार जी केबीन गटनेत्यांना देण्यात आलेली आहे, ती केबीन अपुरी आहे. तिथे १४ नगरसेवकांची आसने बसू शकत नाहीत. तर माझी अशी विनंती आहे की, बसण्यासाठी गटनेत्यांची केबीन थोडी मोठया स्वरुपात देण्यात यावी. धन्यवाद.

**प्र. नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. अकरा वाजून पंचवीस मिनीटे झालेली आहेत. प्रश्न क्र. १; श्री. नरेंद्र एल. मेहता यांचा प्रश्न आहे.

**मा. महापौर :-**

श्री. मेहता साहेब, मी तुम्हाला पाच मिनिटांची वेळ देते.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, अर्धा तास दयावा लागेल.

**मा. महापौर :-**

अर्ध्या तासाचे एक तास होते. पाच मिनिटे ते तुमची पंधरा मिनिटे होतील.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, त्या दिवशी आपण जी स्पिकींग ऑर्डर केली, त्यामध्ये थोडी दुरुस्ती करायची आहे की, आपण जे संख्याबळ म्हटले आहे की, सत्ताधारी ५० आणि विरोधकांचे ४३ ते ४९ आणि ४४ आहे. मनसेचा पाठिंबा

शिवसेनेला आहे आणि त्या तौलानिक संख्येप्रमाणेच आपण पुढचे कामकाज केलेले आहे. तर ती सुधारणा करण्यात यावी.

**मा. महापौर :-**

पण त्यावेळी जेव्हा इलेक्शन होते तेव्हा आमचे पन्नास होते.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, तसे नाही. जेव्हा स्टँडींग कमिटीची निवडणुक झाली, त्यावेळी पण ते संख्याबळ आपल्याकडे आलेले ते सुधारणा करुन घ्यावे. That is small mistake. तर सचिव साहेब, त्या ऑर्डरमध्ये सुधारणा करुन घ्या. मा. महापौर मॅडम, आजचा जो विषय आहे, इलेक्शनच्या काळात ज्यावेळी पोटनिवडणुक होती त्यावेळी महापालिकेतर्फे नवीन भरतीसाठी जाहिरात काढण्यात आली होती. याच्यात नवीन भरतीसाठी जाहिरात काढण्यात आली होती. याच्यात नवीन भरतीसाठी दोन-तीन मुद्दे आहेत. पहिले, एकंदर महापालिकेचे ॲडमिनिस्ट्रेशन एक्सपेन्स ३५ % असेल तर आपल्याला कुठलीही भरती करता येत नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेला आम्ही वारंवार विचारले की, तुमचे एक्सपेन्स किती आहे? तर अजून याच्यात कुठे खुलासा केलेला नाही. तर मला ॲडमिनिस्ट्रेशन ऑफीसरने माहिती दिली, आस्थापना विभागाने की, आपला एकुण खर्च किती आहे तर पुढचे जरा इजी होईल.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मार्च २०१२ अखेर प्रत्यक्षात उत्पन्न आणि खर्च आणि शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार आपला आस्थापनेवरील खर्च ३२.३ % आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आपण ३२% ही चुकीची माहिती सभागृहाला देत आहात. आम्ही अनेक वर्षापासून या महापालिकेत आहोत. जोपर्यंत माझा अनुभव आहे, आपला खर्च ४०% पर्यंत आहे. मॅडम, आपण थोडे लक्ष दया. म्हणजे नक्कीच हे जे प्रश्न आहेत ते आम्ही किती महान, तुम्ही किती छोटे या संदर्भात नाही. या महापालिकेमध्ये जे नियमाप्रमाणे कामकाज चालते, त्याबाबत आहे. ३५% पेक्षा जास्त खर्च असेल तर आपल्याला नवीन भरती, हा शासनाचा नियम आहे. आपला एक्सपेन्स ४०% पेक्षा जास्त आहे. आपणही या सभागृहात होते. मागच्या वेळेला आपल्याला आठवण असेल तर श्री. चंद्रकांत वैतीजी या सभागृहात होते. आपण ज्यावेळी विषय आणलेला, त्यावेळी आक्षेप घेतला की, तुमचा एक्सपेन्स किती आहे? डॉक्टरला सस्पेन्ड करा. श्री. परब साहेब आज इकडे असतील तर श्री. प्रफुल्ल पाटील यांनी सुचना मांडलेली की, ३५% पेक्षा जास्त आहे तर तुम्ही हा प्रस्ताव इकडे कसा आणला. त्याला निलंबीत करा. सभागृहाने विनंती करुन श्री. प्रफुल्ल पाटील यांनी नंतर मागे घेतले होते. आता मी जी माहिती घेतली, आपण जी साफसफाई करतो, पूर्वी महानगरपालिका करत होती, तो ॲडमिनिस्ट्रेशनचा एक्सपेन्स. आता आपण ठेका पध्दतीने दिले. It has gone for the 38 crore. म्हणजे ३८ करोडच्या वरती गेलेले आहे. ते तुम्ही याच्यात समाविष्ट केले आहे का?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मग मला सांगा, तो आस्थापना खर्चाचा भाग नाही का?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

साफसफाई कामांसाठी आपण त्यांची यंत्रसामुग्री, वाहने, हत्यारे, अवजारे व मनुष्यबळ वापरण्यासाठी आऊटपुट बेसीसवर जे साफसफाईचे काम दिलेले आहे. त्याचा आस्थापना खर्चामध्ये समावेश करता येणार नाही.

**नरेंद्र मेहता :-**

श्री. ढगे साहेब, आपण उपायुक्त आहात. बरोबर बोला. उदया तुम्ही बोलणार की, ड्रायव्हर येणार नाही, उदया बोलणार की, आपण पाणी पुरवठयामध्ये जे मजुर घेतले ते येणार नाही. वृक्ष प्राधिकरणला कर्मचारी घेतले, ते येणार नाहीत. म्हणजे हे कोणी ॲडमिनमध्ये येणार नाही का? आपल्याकडे स्टाफ अपुर्तता आहे. म्हणजे आपल्याकडे फुल प्लेज स्टाफ नाही म्हणुन आपण कॉन्ट्रॅक्टवर, पण It is the part of admin. म्हणजे खर्चाचा भागच आहे. हे सगळे वगळून टाकले. यांचे फक्त भरत्या समाविष्ट करायचे. बिलो ३५% दाखवायचे म्हणून ते कट केले. ज्यावेळी महापालिका साफसफाई करते, त्यावेळी तो ॲडमिनचा भाग. माझ्याकडे स्टाफ कमी आहे म्हणून मी बाहेरुन हायर करतो, तर तो ॲडमिनचा भाग नाही असे कसे होऊ शकते? Corporation is paying the payment. मग यापूर्वी श्री. परब साहेबांनी आम्हाला २००७ ची जी लेखी माहिती दिली ती चुकीची आहे का?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

परंतु, फिजीकल आऊटपुट बेसीसवर दिल्यानंतर आऊटसोर्सिंग केले तर ते शासनाच्या निर्णयानुसार आस्थापना खर्चामध्ये समाविष्ट होत नाही. किंवा त्याचे विश्लेषण इथे दिलेले आहे. परंतु Skilled non-skilled manpower जर आपण मानधनावर प्रोक्युर केली, आऊटसोर्सिंग केले, मनुष्यबळ पुरवठयाबाबतचे आदेश दिले, तर तो आस्थापना खर्चामध्ये समाविष्ट करतो आणि तो तसा समाविष्ट केलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, मी तुम्हाला दुसरे सांगू इच्छितो की, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये आस्थापनेवर एकुण कर्मचाऱ्यांची जी पदे मंजुर आहेत ती २३८२ आहेत. आणि आजच्या दिवशी जे कार्यरत आहेत ते १५७४ आहेत. म्हणजे जवळपास ९०० पदे रिक्त आहेत. आणि त्यापैकी शासनाने भरतीवर बंदी आणली होती. शासनाचे असे म्हणणे होते की, सहावे वेतन आयोग सुरु झालेले आहे. म्हणून जी भरती केली तर जो रिव्हेन्यु आहे, त्याच्यामध्ये फरक पडणार. यावर्षी शासनाने बंदी उठवलेली आहे आणि बंदी उठवताना शासनाने असे सांगितले की, फक्त ३% पदे भरा. म्हणजे यावर्षी आम्ही ९०० पदे भरत नाही. आम्ही फक्त पन्नासच पदे भरत आहोत. आणि जसे मा. उपायुक्तांनी सांगितले की, आजच्या दिवशी ३२ ते ३३% खर्च आस्थापनेवर होत आहे. त्याच्यामध्ये जे आऊटसोर्स केलेले आहेत, जसे तुम्ही म्हणता, साफसफाईचा जो विषय आहे, तो याच्यामध्ये आम्ही आऊटपूट बेसीसवर आऊटसोर्स केलेला आहे. म्हणजे तुम्ही जे ३८ कोटी म्हणता, त्यामध्ये वाहन येत आहे, त्यांची स्वतःची आस्थापना येत आहे, त्याच्यामध्ये त्यांची हत्यारे, अवजारे येत आहेत, त्याच्यामध्ये त्यांच्या वाहनांचे फ्युल, पेट्रोल येत आहे. ते सगळे मिळून ३८ कोटी आहेत. म्हणजे ३८ कोटी फक्त पगारावर खर्च होत नाही. ते फक्त आऊटपुट मॉडेल आहे म्हणून ते याच्यामध्ये घेतले नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, माझ्यापेक्षा आपले एज्युकेशन जास्त आहे. त्यात काही दुमत नाही. पण आपण परत परत सभागृहाची दिशाभूल करु नये. आपणही कॉमनसेन्स वापरु शकतो. मी एखादा महापालिकेचा स्टाफ काम करतो, तो ॲडमिनिस्ट्रेशनचा एक्सपेन्स झाला. मी बोलतो की, माणसे कमी पडतात, दोन माणसे बाहेरुन आणा. तर बोलतात की, हे ॲडमिनिस्ट्रेशनचे एक्सपेन्स नाही, असे होऊ शकते का? आणि आतापर्यंत तुम्ही जे दिले ते ॲड करुन दिले आहे. आज त्यांना ३५% चा रेषो क्रॉस होतो म्हणून सांगतात. आणि मॅडम, ३२% झाले तर आपले मा. आयुक्त महोदय आणि महापालिकेला गव्हर्नमेंट अवॉर्ड देतील की, यांचा ३२% च्या खाली आहे. आणि आजचे दुसरे प्रश्न आहेत त्यामध्ये मा. आयुक्त साहेबांचे म्हणणे आहे की, आपला खर्च वाढला म्हणून टॅक्स वाढवावे. म्हणजे नक्कीच होत नाही. आपण तर ३२% मध्ये बिलो आहोत. कुठलाही टॅक्स वाढविण्यापेक्षा लोकांना बोनस म्हणून कमी करुन दयायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, टॅक्स वाढ ही डेव्हलपमेंटसाठी आहे. आस्थापनेसाठी नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, तुम्ही त्या गोषवाऱ्यामध्ये असे म्हटले आहे की, खर्च वाढला आहे. म्हणून हा कर वाढणे गरजेचे आहे.

**मा. आयुक्त :-**

डेव्हलपमेंट खर्च वाढलेला आहे. नवीन रस्ते करायचे आहेत, नवीन गटार करायचे आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, दरवेळी या महापालिकेमध्ये ठाणे, नवी मुंबई आणि मुंबई महापालिकेची उदाहरणे दिली जातात. त्यांच्यापेक्षाही आपला खर्च आज कमी आहे. त्यांचा यापेक्षाही जास्त आहे. मग ते लोक वाढवत नाही आणि तुम्ही हा उल्लेख करत नाही की, आपला खर्च कमी आहे. विषय डायव्हर्ट न करता, मॅडम, तुम्हाला हे पटते का? की, आऊटसोर्सिंग केले, आता महापालिकेने मला विरोधी पक्षाचे वाहन दयायचे होते. त्यांच्याकडे अव्हेलेबल नाही ते बोलतात भाडयाने घ्या. तर ते भाडयाने घेतल्यावर ॲडमिनिस्टेशनचा एक्सपेन्स होणार नाही का? महापालिकेने विकत घेतली तर ॲडमिनिस्ट्रेशन होणार नाही का? महापालिकेने विकत घेतली तर ॲडमिनिस्ट्रेशन म्हणजे हे कुठे काय आहे. कुठे काही तुलना होत नाही. आणि कोणत्या महापालिकेत असे आहे? मला तुम्ही तीन महापालिकांचे आणून दया. काही हरकत नाही. मॅडम, त्यावर आपला निर्णय झाला पाहिजे की, पुर्तता केल्यानंतर या भरती करण्यात याव्या. अन्यथा परत तेच होईल की, आपल्यावर आक्षेप होतात. चॅलेंजींग होतात. मागच्या वेळी मी अनेक ठराव मांडले होते की, या सगळया भरत्या बेकायदेशीर आहेत. शेवटी, एकामध्ये उपायुक्तांवर गुन्हा दाखल झाला. श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांवर गुन्हा दाखल झाला. तो माणूस सस्पेन्ड झाला. तो आता आहे की नाही? त्यावेळी कोणी लक्ष दिले नाही. शेवटी, मा. आयुक्त साहेबांनी नंतर स्वतः भरती रद्द केली. ते सुप्रीम कोर्टात, हायकोर्टात गेले. महापालिकेचा खर्च झाला. जे बेकायदेशीर अधिकारी आहेत, त्यांना आज आपण सहनही करतो आहे. कारण कोर्टाने आदेश केले आहेत. शेवटी तुम्ही अपॉइन्टमेंट दिल्यानंतर त्याच्याकडे कुठलेतरी कागदपत्रे असतात. तो जाऊन आपल्याला कामावर लावतो. आपण एका बाजूला त्याला काढायला सांगतो, दुसऱ्या बाजूला तो कोर्टात जाऊन घेतो. या सगळया चुकांमध्ये हे होते आहे. दुसरे महत्वाचे असे आहे की, एखादा नवीन कायदा इम्प्लीमेंट झाल्यानंतर जुना कायदा ऑटोमॅटीक लॅप्स होता. म्हणजे आपण एखादे पॉलिसी डिसीजन ठरवले, त्यानंतर जुनी पॉलीसी लॅप्स होते. मागच्या वेळी तुम्ही ज्या भरती केली तेव्हा २००८ चा सेवाप्रवेश नियम लावला. मी आपल्या माहितीसाठी,

मग मॅडम, नियम काय आहे? तुम्हाला रुलिंग दयावी लागेल. तुम्ही त्यांना सांगा.

**मा. महापौर :-**

ते बघुन आपल्याला नियम काय आहे ते सांगतील.

**नरेंद्र मेहता :-**

You are the judge of the supreme court here. तुमचा निर्णय त्यांना बंधनकारक आहे.

**मा. महापौर :-**

मी त्यांना माझा निर्णय सांगते. ही डझन्ट नो दि नियम, ढगे साहेब, सो लेट हीम सी दि नियम ॲण्ड टेल अस दि नियम.

**नरेंद्र मेहता :-**

तोपर्यंत तुमचे असे म्हणणे आहे की, या प्रश्नाचे उत्तर तुम्ही मला पुढच्या वेळी नियम बघून देणार?

**मा. महापौर :-**

पूर्वी पण आपण असेच करायचो. अजूनपर्यंत तुम्ही पण मा. महापौर असताना एकापण मा. महासभेत आपल्याला उत्तर मिळाले आहे का ते मला सांगा. We will give them time. नियमाप्रमाणे होऊ द्या त्यांनापण बघू द्या की, त्यांचे कुठे चुकते आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ज्यावेळी प्रश्न यायचे त्यावेळी मी महापालिकेत अभ्यास करुनच यायचो. मॅडम, तुमची चुक नाही. हे अधिकारी दरवेळी आपली दिशाभूल करतात. अंगाशी आल्यावर गोल-गोल उत्तर देतात. नंतर आपले हे प्रॉब्लेम होतात की, तुमच्याकडे उत्तर नसते. यांच्याकडेही उत्तर नसते. आता तुम्हाला हे पटले.

**मा. महापौर :-**

पूर्वीपासून यांना टाईट ठेवायला पाहिजे होते. कारण आपल्याला आजपर्यंत उत्तर दिलेले नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मी कितीवेळा बोलायचो. तुम्ही मला ऐकतच नव्हते. सगळे ठराव विरोधात फेटाळायचे. तुम्ही २००८ ला जेवढी भरती केली, प्रत्येक वेळेला ठराव आहे. आणि मग एकावर केस दाखल झाली. एकाला साहेबांनी निलंबीत केले. तुमचे सगळेच चॅलेंज झाले. त्यावेळी आम्ही बोललो तेव्हा कोणी ऐकले नाही. मा. आयुक्त साहेब, जोपर्यंत २००८ किंवा २००५ याबाबत सभागृहाचा निर्णय होत नाही तोपर्यंत आपण त्या भरती करु नये. Madam, only this is adjust the our person. माझा हा माणूस आहे, त्याला हा कायदा आहे म्हणुन त्याला हे लावायचे. मी मा. आयुक्तांवर आरोप करत नाही. पण आपल्या प्रशासनाचे खालचे अधिकारी त्याच भागाचे आहेत.

**मा. आयुक्त :-**

मा. विरोधी पक्षनेता यांना मी सांगू इच्छितो की, २००५ चे सेवाशर्ती नियम आहेत ते आजच्या दिवशी अस्तित्वात आहेत. २००८ चे नियम आम्ही शासनाकडे मंजुरीसाठी पाठवले आहेत. ते अजून मंजुर झाले नाहीत. म्हणजे आजच्या दिवशी २००५ चे नियम अस्तित्वात आहेत. त्याप्रमाणे आम्ही ही भरती प्रक्रिया करत आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

मी त्याला विरोध करत नाही. मग तुम्ही जे २००८ ला लावून केले, ते रद्द करणार का? कारण त्याचे क्रायटेरिया वेगळे आहेत.

**मा. आयुक्त :-**

आम्ही शासनाकडे पाठवले आहेत. शासन जेव्हा रद्द करणार ................

**नरेंद्र मेहता :-**

एखादा २००५ प्रमाणे दहावी पास पाहिजे आणि २००८ प्रमाणे आठवी पाहिजे. आता तुम्ही २००५ प्रमाणे भरता, मग आठवीचे अपॉइन्ट केले त्याला तुम्ही कॅन्सल करणार का?

**मा. आयुक्त :-**

शासन जेव्हा कॅन्सल करणार त्यावेळी आम्ही त्याच्यावर निर्णय घेऊ.

**नरेंद्र मेहता :-**

पण साहेब, तुम्ही दोन कायदे कसे लावता?

**मा. आयुक्त :-**

दोन कायदे नाहीत.

**नरेंद्र मेहता :-**

Commissioner may be changed. But .......

**मा. आयुक्त :-**

आपण करेक्ट आहात.

**नरेंद्र मेहता :-**

कायदा तोच असतो.

**मा. आयुक्त :-**

You are very right. आजच्या दिवशी २००५ चे नियम अस्तित्वात आहेत. २००८ चे नियम शासनाकडे मंजुरीसाठी पाठवलेले आहेत. शासनाने मंजुर केले तर तशाप्रमाणे कार्यवाही होईल. मंजुर केले नाही तर याप्रमाणे कार्यवाही होईल.

**नरेंद्र मेहता :-**

मग २००८ च्या भरती बेकायदेशीर आहेत असे तुम्ही सांगा.

**मा. आयुक्त :-**

शासनाने अजून निर्णय कुठे घेतला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मग साहेब, तुम्ही २००८ ला भरती कशी केली? एखादे वेळी तुम्ही नवीन आले असणार, पण दुसऱ्या अधिकाऱ्यांनी प्रस्तावित कसे केले? ऑडीटर, ॲडमिन यांच्यावर कारवाई करा. सभागृहाची दिशाभूल केली.

**मा. आयुक्त :-**

साहेब, २००८ चे नियम अजून मंजूर झाले नाहीत, नामंजुर पण झाले नाहीत.

**नरेंद्र मेहता :-**

याच्यावरुन तुमचे असे स्पष्ट म्हणणे दिसते की, २००८ चा शासनाचा नियम मंजुर झाल्यानंतर तो इम्प्लीमेंट होईल.

**मा. आयुक्त :-**

पोस्ट सॅन्क्शनसाठी शासनाकडे पाठवली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे. ते मंजुर झाल्यानंरत तुम्ही २००८ इम्प्लीमेंट करणार? मग आतापर्यंत तुम्ही मंजुर झाल्याशिवाय इम्प्लीमेंट केले. That is illegal.

**मा. महापौर :-**

मी तुम्हाला सांगितले की, मी त्यांना सांगितले आहे की, नियमाप्रमाणे जे बसेल ते होईल आणि आपला अर्धा तास झालेला आहे. आपण दुसरा विषय घेऊ.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, मी तुम्हाला तेच सांगितले. ते बघतील, करतील I am ready for that. मी आता काही बोलत नाही. पण तोपर्यंत त्या भरती करु नये. आम्हाला पुढच्या मिटींगला उत्तर दया की, हा नियम आहे. मॅडम, मी इकडे व्यक्तीगत बोलत नाही. दोन्ही कायदे वेगवेगळे आहेत. आपल्या इकडचे स्थानिक लोक राहतात, तरी तुम्ही कधी २००८, कधी २००५, ज्यांना सोयीचे पाहिजे तसे का? Commissioner may be different. पण ज्यांनी प्रस्ताव पुट अप केला ते अधिकारी तेच आहेत ना?

**मा. महापौर :-**

जे नियमाप्रमाणे होईल.

**नरेंद्र मेहता :-**

मग आम्हाला पुढच्या मिटींगचे सांगा. तोपर्यंत भरती करणार नाही का? आम्हाला नियम सांगा की, हा नियम आहे. तुम्ही न्याय दिला नाही तर आम्ही पुढे जाऊ. मॅडम, तुमच्याकडे यायचे कारणच हे की, आम्हाला तिकडे न्याय मिळाला नाही. आपणही तेच उत्तर दिले तर न्याय मागायला मग अजून पुढे जायचे का? We have came to justice. तुमच्याकडून आम्हाला, या शहराला न्याय मिळेल. मॅडम, आपल्याकडे सफाई कामगार काम करत होते. आता आपण पूर्ण काम ठेका पध्दतीने दिलेले आहे. आपला स्टाफ आता रिक्त झाला आहे. आम्ही मा. आयुक्त महोदयांना ही विनंती केली कुठलाही स्टाफ, हे साफसफाईवाले माझे काही नातेवाईक नाहीत, कोणी नाहीत. सभागृहाची एक भावना असते, आपण तो मानधनाचापण विषय आणला आहे की, जे स्थानिक लोक महापालिकेत काम करतात त्यांनाच ते प्राधान्य मिळावे. हे जेवढे सफाई कामगार आहेत, कोण शिपाई म्हणून, कोण क्लार्क म्हणून, सफाई कामगार करतच नाहीत. या वेगवेगळया खात्यात काम, कोणीतरी कम्प्युटर ऑपरेटरसुध्दा आहेत. आम्ही मा. आयुक्तांना निवेदन केले की, एखादे खर्च वाढवायचा नाही, Because, he is drawing the salary. तो सॅलरी घेतो आहे. तर त्या क्रायटेरियामध्ये बसत असेल, जे शिक्षण असेल, अनुभव असेल, मग आपल्याच लोकांना त्याच्यावर घ्या. मग त्याचा तुमचा खर्चही वाढणार नाही आणि आपले लोक आजपर्यंत ते क्लेरिकल कामच करतात. सफाई कामगार म्हणून भरती झाले आहेत. क्लेरिकल काम आहे, त्याचा पंधरा वर्षांचा एक्सपेरिअन्स आहे, मग त्यांना घ्यायला हरकत काय होती? मा. आयुक्तांचे टेक्निकली बरोबर आहे की, आपण ओपन बीड करायची. ज्याला जो एक्सपेरियन्स असेल, जो पास होईल त्याला दयावे. पण सभागृहाची दरवेळी भावना असते की, आपले जे कर्मचारी पंधरा वर्षापासून काम करत

आहेत, त्यांनाच ती संधी दयावी. आपण सफाई कामगारचा पगार देतो, तो क्लेरिकल काम करतो. हा एक मुद्दा होता. मा. आयुक्त महोदय, याच्यावर आपले काम म्हणणे आहे.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर साहेब, मला असे वाटते की, विषय झालेला आहे. आणि आपण सांगितल्याप्रमाणे, नियमाप्रमाणे कामे होतील नियमाबाह्य कामे होणार नाहीत आणि भरती करायची तर मला वाटते की, कायदयानुसारच होणार. त्यासाठी सदर विषय बंद करुन दुसरा पुढचा विषय चालू करावा.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आपल्याला सुध्दा हे पटलेले नाही की, २००८ आणि २००५. No doubt, तुम्हाला ही पूर्ण माहिती घ्यायची असेल. आणि कुठलातरी कायदा इम्प्लीमेंट करा असे आमचे म्हणणे आहे. २००५ करायचा असेल तर २००८ ची इलिगल झाली. २००८ करायचे असेल तर २००८ पासून करा. २००५ लावता येणार नाही. त्यासाठी तुम्हाला वेळ पाहिजे. मला त्यांच्याकडून सॅटीस्फॅक्टरी आन्सर मिळाले नाही, म्हणून आज सभागृहापुढे, नाहीत हा प्रश्न घेऊन यायचा प्रश्नच नव्हता. आणि ॲडमिनिस्ट्रेशन एक्सपेन्स हीसुध्दा चुकीची माहिती आहे. कुठल्याही महापालिकेत एखादा कॉन्ट्रॅक्टर घेतला म्हणजे ॲडमिनिस्ट्रेशन एक्सपेन्स निघाला का?

**मा. आयुक्त :-**

साहेब, जे लोक सफाई कामगार म्हणून नियुक्त केले होते. ते आजच्या दिवशी सुध्दा सफाई कामगाराचाच पगार घेत आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

पण काम कुठले करतात?

**मा. आयुक्त :-**

आज आम्ही जी भरती काढली आहे, ती क्लार्क, ज्यु. इंजिनिअर, सर्व्हेअर अशा प्रकारची भरती आहे. मग जेव्हा आम्ही भरती काढतो, त्याचा अर्थ असा आहे की, ही नवीन भरती आहे. नवीन भरती म्हणजे नव्याने अर्ज करावे लागतात. आणि त्याप्रमाणे स्पर्धात्मक परिक्षा होणार. स्पर्धात्मक परिक्षेमध्ये ज्यांना जास्त गुण मिळणार, त्यांची नियुक्ती होणार. म्हणजे जे सफाई कामगार आहेत, त्यांना कोणतेही बंधन नाही. ते पण याच्यामध्ये अप्लाय करु शकतात.

**नरेंद्र मेहता :-**

I respect, whatever you have said. तुम्ही जे म्हटले ते मी ॲग्री करतो. पण सभागृहाची एक भावना असते की, जो आपल्याकडे पंधरावर्षापासून क्लेरिकल म्हणून, सफाई कामगाराचा पगार घेतो. आता तुम्ही दुसरा विषय बघा. तुम्ही दहा मिनिटानंतर मला वेगळे उत्तर देणार. I Can bet you आत्ता मानधनाचा विषय आहे. तुम्ही त्याला बोलणार की, याला क्रायटेरिया लावू नका. यांना तुम्ही डायरेक्ट अपॉइन्ट करा असे ठराव आज येतील. त्यावेळी मी तुम्हाला विचारले, जो कम्प्युटर ऑपरेटरचा विषय आहे, मॅडम, मा. आयुक्तांचे असे म्हणणे आहे की, आपण क्रायटेरियाप्रमाणे जाऊ. आत्ता आपण दुसरा विषय मांडलेला आहे की, आपल्याकडे जे मानधनावर कम्प्युटर ऑपरेटर आहेत, आत्ता तुमचा ठराव येईल की, तुम्ही यांनाचा कायम करुन घ्या. म्हणजे आपण एका बाजूला बोलतो की, आमचे स्थानिक कर्मचारी आहेत, त्यांना तुम्ही प्राधान्य द्या. मा. आयुक्त साहेब म्हणतात की, त्यांना. म्हणजे नक्की आपलेच कुठे तरी बॅलेन्सींग होत नाही. एका विषयाला वेगळे उत्तर, दुसऱ्या विषयाला वेगळे उत्तर.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही याच्यामध्ये सहमत असायला पाहिजे. मा. आयुक्त साहेबांनी ती भूमिका समजून घ्यायला पाहिजे की, ज्यांनी कठिण प्रसंगामध्ये या महापालिकेच्या हितासाठी, म्हणजे सफाई कामगारांचा पगार घेऊन कम्प्युटर ऑपरेटर म्हणून काम करतात, सफाई कामगारांचा पगार घेऊन क्लार्क म्हणून काम करतात. रजिस्टरवर ते सफाई कामगार आहेत. त्यांचे क्वालीफिकेशन आहे. पण त्यांनी आपल्या इंटरव्ह्युच्या वेळी इंटरव्ह्यु दिला नाही, किंवा हा जो एक भाग आहे तो वेगळा आहे. या सभागृहाची भावना असायला पाहिजे. बसलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही ती भावना असायला पाहिजे की, आपण नोकरीमध्ये जेव्हा ज्यांना प्राधान्य द्यायचे असेल तर ज्यांच्याकडे तो एक्सपेरियन्स आहे, ज्यांनी अनेक वर्षे या महापालिकेची सेवा केली, नियम कुठे बसवायचा, साहेब आय.ए.एस. आहे. त्यामुळे सोपे आहे. ते कठिण नाही. पण तुमची मानसिकता झाली पाहिजे की, पूर्ण सभागृहाची भावना आहे. याच्यात विरोध होण्याचे कारण नाही.

**मा. महापौर :-**

मी मा. आयुक्त साहेबांना तेच बोलले की, जे नियमाप्रमाणे बसते ते त्यांनी करुन घ्यायचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम नियम बसवायचे झाले तर याच व्यासपिठावरुन वेगवेगळे नियम होतात ते आपल्याला माहित आहे. आपण म्हणतो की, ते सद्भावनेने बसवा. नियमाचा किस काढायला गेले तर निर्णय लागत नाही.

आपल्याला माणसे मिळणार नाहीत. अजून २००८ ची मान्यता नाही. अजून माणसे तुम्ही ठेवणार नाही का? प्रस्ताव पाठवला म्हणजे भरती झाली नाही. मग झालेली भरती बेकायदेशीर आहे का? आपले असे म्हणणे आहे की, जे झालेले आहे ते तुम्ही बरोबर घ्या आणि ज्यांना संधी देता येईल त्यांना संधी द्या. जे लवकर घेता येईल, जर तुम्हाला २००८ ची शाश्वती आहे की, या प्रस्तावाला मान्यता मिळेलच. मग व्हॅकेंट कशाला ठेवता? जी जुनी माणसे आहेत, त्यांनी तुम्ही ॲडजेस्ट करुन घ्या. त्यांना द्या. नाकारले तर परत बघू. असा तरी निर्णय घ्या. म्हणजे ज्यांनी खरोखरच घाम गाळलेला आहे, त्यांना मा. आयुक्तांनी न्याय दिला, मा. महापौरांनी न्याय दिला किंवा या सभागृहाने न्याय दिला अशी तरी भुमिका होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. रोहिदास पाटील साहेब, तुमच्या मताशी आम्ही पण सहमत आहोत आणि मा. महापौर मॅडम पण सहमत आहेत. शहराचे मा. आमदार, मा. खासदार सगळे सहमत आहेत आणि हा विषय मा. आमदार साहेबांनी ऑलरेडी त्यांना सांगितलेला आहे. जे काही नियमाप्रमाणे आणि तुम्ही जसे सांगितले की, भावना याप्रमाणे मा. महापौर मॅडमनी मा. आयुक्त साहेबांना सांगितलेले आहे. त्याप्रमाणे निर्णय घेतीलच. पण हा परत परत गोलगोल फिरुन फायदा नाही. तुमची भावना तुम्ही सांगितली आहे. आमची भावना पण तीच आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभागृह नेता, हा विषय गोलगोल फिरवण्याचा आमच्या पक्षाचा विषयच नाही. तुमच्यासमोर सगळ्यांची सहानुभूती व्हावी म्हणून हा विषय आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आत्ता मॅडमनी सांगितले की, तुमच्या सहानुभूतीशी आम्ही पण सहमत आहोत. आमची पण तीच सहानुभूती आहे. सगळे इकडचे स्थानिक रहिवाशी आहेत. त्या लोकांनी घाम गाळलेला आहे. सगळ्यांची भावना तीच आहे. परंतु तुम्ही तोच तोच विषय रिपीट करुन सभागृहाचा वेळ घालवता. मॅडमनी सांगितले आहे की, आम्ही मा. आयुक्त साहेबांना सांगू आणि त्याप्रमाणे परत तुम्ही तसे नाही बोलायला पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम सभागृहात पटलावर एखादा विषय तुम्ही आणला किंवा आम्ही आणला Because it was to take the good decision त्यामध्ये निर्णय व्हावा. व्यक्तीगत काही आणलेला नाही. ते मा. आयुक्तांचे नातेवाईक नाहीत आणि जे येणार आहेत ते ही नातेवाईक नाहीत. He is taking the natural load आज तीन विषय होते. ॲडमिनिस्ट्रेशन एक्सपेन्समध्ये ते खर्च ॲड, या लोकांनी भरती काढली म्हणून ते बोलतात की, एक्सपेन्स होत नाही. दुसरा तुम्ही २००८ इम्प्लीमेंट केल्यानंतर परत रिव्हर्स २००५ जाऊ शकत नाही. हे दोन विषय होते. तिसरा विषय होता की, तुम्हाला आपल्या लोकांना प्राधान्य द्यायचे असेल तर Its well and good. डिसीजन तुमचा आहे. आत्ता कायद्यात नक्कीच हे आहे की, आपण ते क्रायटेरियाप्रमाणे भरायला पाहिजे. मा. आयुक्त साहेबांना जेवढे जमते तेवढे करतील. पण या दोन विषयात ते आम्हाला गोलगोल फिरवतात २००८ की २००५? We have to cancle the 2005 recruitment आणि जो ॲडमिनिस्ट्रेशन एक्सपेन्स आहे, मला तुम्ही सांगा की, तो खर्च वेगळा कसा होऊ शकतो? आणि समाधानकारक उत्तर पाहिजे म्हणून आपल्याकडे सभागृहामध्ये आम्ही आलो आहोत. नाहीतर मा. आयुक्त साहेबांना मी तीन महिन्यापूर्वीच भेटलो होतो. आम्हाला समाधानकारक उत्तर मिळाले नाही. मग सभागृहामधून काहीतरी निर्णय व्हावा हे चुकीचे चालले आहे.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांनी तिथे समाधानकारक उत्तर दिले नाही तर इथे काय? जे तुम्हाला पहिले दिले तेच उत्तर देतील.

**नरेंद्र मेहता :-**

मग निर्णय घ्यायला सभागृह सक्षम आहे.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, तुमच्याकडून अपेक्षा आहे. आपण त्यांना समजावून सांगायचे आहे.

**मा. महापौर :-**

हेच तुम्ही मला पण सांगितले असते. दोन मिनिटे तुम्ही माझ्या बरोबर चर्चा केली असती तर आपण आजच समाधानकारक उत्तर दिले असते.

**नरेंद्र मेहता :-**

यापुढे आमचे जे काही प्रश्न असतील त्याबाबत आम्ही तुमच्याशी चर्चा करु. पण मॅडम, एक समजून घ्या. तुम्हाला या दोन्ही गोष्टी पटलेल्या आहेत असे मला तुमच्या चेहऱ्यावरुन वाटते. ॲडमिनिस्ट्रेशन वेगळे होऊ शकत नाही. दुसरे २००८ इम्प्लीमेंट झाल्यानंतर २००५ होऊ शकत नाही. यावर जो निर्णय घेणार तो असा घ्या की, परत परत कोर्टात नको. २००८ वाले परत कोर्टात जातील. आणि आपण कोर्टाची काऊन्सीलरची एका वेळेची फी दोन-तीन लाख रुपये घेतात. ते आपण भरतो. कोणी खिशातून भरत नाही. मग आपण हे सहन करायचे का?

**मा. महापौर :-**

दुसऱ्या वेळी तुम्ही प्रश्नोत्तरे घ्यायच्या अगोदर तुम्ही माझ्या बरोबर डिस्कस केले तर I think we will give you very satisfactory answer over here.

**नरेंद्र मेहता :-**

I answer you next time I will discus with u & I hope you will make me satisfied.

**मा. महापौर :-**

आपको यहाँ सॅटीस्फॅक्टरी आन्सर मिल जाएगा सिर्फ आप पहले डिस्कस करो।

**नरेंद्र मेहता :-**

या विषयावर मी तुमच्याकडे येतो. त्यावर आम्हाला न्याय मिळवून द्या.

**मा. महापौर :-**

दुसरा विषय घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रश्न क्र.२, श्री. नरेंद्र मेहता यांचाच प्रश्न आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, सभागृहनेता आणि मा. महापौर मॅडम, आपल्याही निदर्शनास हा विषय आणून देतो. म्हणजे आपल्याला बाकी चर्चा ईझी होईल. मॅडम हे जे ॲमिनिटी स्पेस आहे, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आराखड्यामध्ये आपण अनेक रिझर्व्हेशनची प्रोव्हीजन केलेली आहे, मग गार्डन, प्लेग्राऊंड, मार्केट, हॉस्पीटल काही असू द्या. ज्या लेआऊट वीस हजार मीटरपक्षा जास्त आहेत, आणि त्यामध्ये तिकडच्या रहिवाश्यांसाठी कुठलेही रिझर्व्हेशन नाही. तर त्यामध्ये महापालिका त्या विकासकाला ५ टक्के जागा ॲमिनिटी स्पेस म्हणून जागा सोडायला सांगतो . त्याचा एफ.एस.आय. आपण त्याला दुसरीकडे देतो. पण त्यामध्ये मा. आयुक्त महोदयांनी निर्णय घ्यायचा आहे की, आपण त्यामध्ये काय बांधावे किंवा सभागृहाने हा निर्णय घ्यायचा आहे. जसे आज तुम्ही मध्ये दोन विषय आणले आहेत, रामनगरचे ॲमिनिटी स्पेस आणि हे, याप्रकारची इमारत आपल्याला बांधता येते आणि टी.डी.आर. च्या माध्यमातून आपल्याला फ्री ऑफ कॉस्ट इमारत उपलब्ध होते. या लिस्टमध्ये आपल्याकडे कॉपी असतील, अनेक ॲमिनिटी स्पेस आपल्या ताब्यात, एकूण १५ ॲमिनिटी स्पेस आहेत. माझा प्रश्न होता, ज्यावेळी आपण त्यांना कॉम्पन्सेट केलेले आहे, तर त्यांनी परवानगी देताना तेवढ्याच जागेचा सातबारा त्यांनी आपल्या नावावर करुन दिला पाहिजे. जे त्यांनी केलेले आहे. मग हजार मीटर असू द्या, शंभर मीटर असू द्या किंवा दहा हजार मीटर असू द्या. दुसरा विषय त्यामध्ये असा होता की, आपण ती जागा ताब्यात का घेतली नाही? जसे बाकी रिझर्व्हेशनमध्ये आपले बोर्ड आणि बाऊंन्ड्री असतात, त्या ठिकाणी आपण त्याला कॉम्पन्सेट केल्यानंतर आपण बोर्ड आणि बाऊंन्ड्री लागली पाहिजे. त्या अनेक ॲमिनिटी स्पेसमध्ये अजूनपर्यंत नाही. उदाहरण, आज श्री. भगवती शर्मा आणि श्री. जयंत पाटील नाहीत. सॉलिटर कॉम्पन्सेट पुनम गार्डनच्या इकडे एक ॲमिनिटी स्पेस मागच्या लेआऊटमध्ये मंजूर झाले होते. त्यामध्ये बिल्डरला ओ.सी. नाही म्हणून त्याने ते ॲन्क्रोचमेंट केले. त्याचे गार्डन आणि एस.टी.पी. प्लान्ट वगैरे बांधून घेतले. ज्यावेळी विषय आणलेला, श्री. जयंत पाटील फोटो घेवून आलेले की, हे काय चालले आहे. त्यावेळी अधिकाऱ्यांनी त्यांना नोटीस दिली होती की, तुमचे काम बंद करा. पहिले आमची जागा आम्हांला ताब्यात द्या. या जागा नंतर जो ओ.सी. ला येतो किंवा काम पूर्ण झाल्यानंतर नियमाप्रमाणे येतो. त्याला आपण सगळे कायदे लावून ते करतो. पण जो येतच नाही तो आपल्याला जागाही देत नाही. तर या जेवढ्या जागा आहेत, याच्यामध्ये जी उत्तरे दिली आहेत, बऱ्याचशा जणांचा सातबारा अजून आपल्या नावावर झालेला नाही किंवा आपण फिझीकल पझेशन घेतलेले नाही. कागदावर आपल्याकडे आहेत. पण फिजीकल पझेशन आपण का घेतले नाही याचा खुलासा करावा. आपण वाट बघत आहोत की, तिकडे एन्क्रोचमेन्ट व्हावी.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. नगरसेवक श्री. नरेंद्र मेहता साहेबांनी जो प्रश्न विचारला होता त्याचे विस्तृत उत्तर दिलेले आहे. त्या सर्व जागेपैकी त्यांचा विषय आहे की, जागेवर अतिक्रमण होण्याची वाट पाहता का? जागेवर अतिक्रमण होण्याची वाट पाहत नाही. आम्ही लवकरात लवकर जागा ताब्यात घेण्यासाठी अगोदरपासूनच प्रयत्नशील आहेत आणि अल्पावधीत त्या जागा ताब्यात येतील.

**नरेंद्र मेहता :-**

इकडे प्रयत्नशील चालत नाही. घ्यायला पाहिजे.

**सत्यवान धनेगावे :-**

पण ती प्रोसीजर चोवीस तासातील नाही.

**नरेंद्र मेहता :-**

Here we are not to doing the, आम्ही प्रयत्नशील आहोत. आम्ही मेहनत करतो आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

केस टू केस आम्ही त्यात प्रयत्नशील आहोत. याबाबत सन्मा. आयुक्त साहेबांकडे दोन-तीन वेळेस मिटींगपण आल्या आणि आमच्या यामध्ये वैयक्तिक पाठपुरावा आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे. मला एवढेच उत्तर अपेक्षित आहे की, या जागा कधीपर्यंत ताब्यात घेणार ते आपण आम्हांला सांगावे.

**सत्यवान धनेगावे :-**

ती डेट निश्चित नाही. परंतु आम्ही लवकरात लवकर घेणार आहोत. त्यांना बेनिफिटस् न देता ताब्यात घेतली आणि त्यांना बेनिफिट दिले अशी एकही केस नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, प्लान पास झाला म्हणजे बेनिफिट दिले.

**सत्यवान धनेगावे :-**

नाही. त्या जागेचा एफ.एस.आय. देत नाही तोपर्यंत ते बेनिफिट नाही.

**नरेंद्र मेहता :-**

प्लान सॅन्क्शन केला म्हणून ॲमिनिटी स्पेस आला.

**सत्यवान धनेगावे :-**

प्लान सॅन्क्शन हा बेनिफिट होऊ शकत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मग काय होते?

**सत्यवान धनेगावे :-**

वीस हजारच्या आतले प्लॉट असतील त्यांचे प्लान आपण विदाऊट ॲमिनिटी करतो. मग तो बेनिफिट होतो का?

**नरेंद्र मेहता :-**

मी त्याची लिस्ट मागीतलीच नाही. आपण मला तीच दिली आहे ज्या ॲमिनिटी स्पेस आहेत. मॅडम, प्रश्न तेवढाच आहे की, ॲमिनिटी स्पेस किती आहेत? आपण हे सांगितले की, ॲमिनिटी स्पेस हा सब्जेक्ट केव्हा येतो, ज्यावेळी एखादे लेआऊट मंजूर झाले आणि ॲमिनिटी स्पेस आली. आली म्हणजे महानगरपालिका नक्की करते. It is not in the layout. प्लानमध्ये नाही. मला ॲमिनिटी स्पेसची लिस्ट दिल्यानंतर ताब्यात का घेत नाही. नाहीतर मी तुम्हाला सिंपल उदाहरण विचारले, त्याने पुनम गार्डनला एस.टी.पी. बांधले.

**सत्यवान धनेगावे :-**

पुनम गार्डनमध्ये एस.टी.पी. बांधलेले आहे. तिथे बाकीपण फॅसिलिटी आहेत, त्या ताब्यात घेऊनच आम्ही त्यांनी एफ.एस.आय. देणार आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

एस.टी.पी. तोडणार का?

**सत्यवान धनेगावे :-**

एस.टी.पी. ॲमिनिटीमध्ये घेतलेला आहे, तोडणार कसा?

**नरेंद्र मेहता :-**

ॲमिनिटी कसा होईल? राजीव जाधव साहेबांनी त्यांना एन्क्रोचमेंट केले म्हणून ते पत्र रेकॉर्डला असतील की, तुम्ही आमच्या जागेवर एस.टी.पी. बांधलेला आहे. इलिगल बांधकाम केले आहे. त्यांचे पूर्ण कॉम्पलेक्सचे काम बंद करायला लावलेले की, पहिले आमची जागा आम्हाला ताब्यात दया. हे इलिगल काढा. मग आता परत मा. आयुक्त साहेब बोलतील की, त्या मा. आयुक्तांचा निर्णय वेगळा, या आयुक्तांचा वेगळा, असे होऊ शकत नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

जेव्हा-जेव्हा जे निर्णय घेतले ते निर्णय पुढे फॉलो अप करत जातात.

**नरेंद्र मेहता :-**

शेवटी त्याने एन्क्रोचमेंट केले. आपण त्याला काम बंद करायला सांगितले. त्याने त्याचे कामही पूर्ण केले. तो घरी गेला. आपली जागा गेली.

**सत्यवान धनेगावे :-**

जागा ताब्यात घेताना रिक्वायर एरिया, झालेले बांधकाम, या सगळया बाबी तपासून घेऊनच त्यांना त्यांचे बेनिफिट देता येईल.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, ताब्यात काय. २२५० मीटर आरक्षण त्यामध्ये ॲमिनिटी स्पेसचे होते, ते तुमच्या ताब्यात आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

आम्ही ते तपासून घेणार.

**नरेंद्र मेहता :-**

कधी घेणार? पाच वर्षापासून त्या कॉम्पलेक्समध्ये लोक राहतात. महापालिकेने रस्ते केले, स्ट्रीट लाईट केले, सगळे काही केले, टॅक्सही लागला. अजून तुम्हाला वेळ बघायची आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

ॲमिनीटी स्पेसच्या व्यतिरिक्त क्लास-४ चे क्वॉटर्स वगैरे आहेत, ते बांधकाम चालू आहे. हे सर्व झाल्यानंतर आम्ही ताब्यात घेणार आहोत.

**प्र. नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराची वेळ संपलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे. पुढे कंटीन्यु करा.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, मला एक महत्वाचा विषय सभागृहामध्ये चर्चा करायचा आहे आणि त्यानंतर एक अभिनंदनाचा ठरावही मांडायचा आहे. याच महिन्याची चार तारीख या शहरासाठी एक ऐतिहासिक दिवस होता. एम.आय.डी.सी.च्या माध्यमातून या शहराला २० द.ल.लि. पाणी उपलब्ध झालेले आहे. त्याला मा. उदयोगमंत्री श्री. राणे साहेबांनी अंतिम मंजुरी दिलेली आहे. त्याची पार्श्वभूमी अशी, सातत्याने प्रयत्न मा. पालकमंत्री श्री. गणेश नाईक साहेब, माजी आमदार श्री. मुझफ्फर हूसैन साहेब, या शहराचे मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसा साहेब यांनी केलेला प्रयत्न, सातत्याने प्रयास आणि प्रयत्नाने आपल्याला हे २० एम.एल.डी. पाणी उपलब्ध झालेले आहे. मा. मंत्री श्री. सुनिल तटकरे साहेबांकडे सातत्याने बैठका घेत होते. नवी मुंबई महानगरपालिकेला उपलब्ध असलेले एम.आय.डी.सी.च्या माध्यमातून ज्यादा पाणी, त्या पाण्यातून आपल्याला एक थोडासा वाटा त्यांनी आपल्याला, मा. मंत्री श्री. सुनिल तटकरे साहेबांच्या आग्रहावर आपल्याला मंजुर करुन दिला. त्यानंतर सातत्याने प्रयत्न करत, मॅरेथॉन बैठका घेऊन, या विषयावर पाठपुरावा केला गेला. प्रशासनही त्या विषयावर पाठपुरावा करत होते. माजी आमदार, आजी आमदार दोघेही पाठपुरावा करत होते. त्यामुळे या विषयाला यश आलेले आहे. त्या विषयावर मला सभागृहामध्ये एक अभिनंदनाचा ठराव वाचायचा आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, अभिनंदनाचा ठराव करण्यापूर्वी सन्मा. सदस्यांनी ज्यांची नावे घेतली त्यामध्ये मा. आमदार श्री. प्रताप सरनाईक यांनीही गेल्यावेळेस लक्षवेधीमध्ये ही सुचना मांडली होती त्यामुळे त्यांचेही नाव याच्यात घेण्यात यावे अशी मी आपणास विनंती करतो. धन्यवाद.

**जुबेर इनामदार :-**

दि. १६/०३/२०१२ रोजी प्रथमतः मा. ना. श्री. सुनिल तटकरे साहेब जलसंपदा व पाटबंधारे मंत्री, मा. ना. श्री.गणेश नाईक पालकमंत्री, ठाणे जिल्हा, मा. खासदार डॉ. संजीव नाईक, मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेंन्डोंन्सा तसेच महापालिकेच्या प्रशासनाच्या वतीने मा.आयुक्त व महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळाचे अधिकारी ह्यांच्या समवेत संयुक्त बैठक मिरा-भाईंदर शहराला भासणारी पाणी टंचाईचा प्रश्न सोडविणेस घेण्यात आली होती, त्याच धर्तीवर दि.०४/१२/२०१२ रोजी मा.उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहाँ नज़र हुसेन, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या नेतृत्वाखाली शिष्ठमंडळाने मा. ना. श्री. नारायणरावजी राणे, मंत्री, उद्योग, महाराष्ट्र राज्य यांची भेट घेतली. बैठकीच्या चर्चेमध्ये दि.१९/०३/२०१२ रोजी कॉंग्रेसचे माजी आमदार मा.श्री. मुझफ्फर हुसेन व मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माजी महापौर मा. श्री. तुळशीदास म्हात्रे व संबंधीत कॉंग्रेस पक्षाचे शिष्ठमंडळ व अधिकारी वर्ग सह मिरा भाईंदर महानगरपालिकेला महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळातर्फे होत असलेल्या पाणी पुरवठ्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी सदर बैठकीमध्ये शिष्ठमंडळाने मा. ना.श्री. नारायणरावजी. राणे, मंत्री, उद्योग, ह्यांचेकडे महामंडळाच्या माध्यमातुन १०० द.ल.लि. प्रति दिन एवढा वाढीव पाणी पुरवठा करावा, अशी मागणी केली होती. मंत्री महोदयांनी मिरा-भाईंदर शहराला अतिरिक्त ३० द.ल.लि. एवढे पाणी सद्यस्थितीत देण्याचे आश्वासन दिले.मात्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे सद्यस्थितीत असलेल्या पाणी साठ्याअभावी व झालेल्या सदर बैठकीच्या अनुषंगाने शिष्ठमंडळाने किमान २० द.ल.लि. पाणी पुरवठा तातडीने उपलब्ध करुन देण्याचा आग्रह मा. मंत्री महोदय, श्री. नारायणराव राणे साहेबांकडे केला.

मागणीच्या अभावी व तांत्रिक बाबींचे अवलोकन करुन मा.ना.श्री. नारायणराव राणे साहेब मंत्री, उद्योग, बंदरे, रोजगार व स्वयंरोजगार, महाराष्ट्र राज्य ह्यांनी आदेश दिले की, मिरा-भाईंदर शहरासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातुन मागणी केलेल्या १००द.ल.लि. पाणी पुरवठ्याच्या आधारावर तात्काळ अतिरिक्त २० द.ल.लि. प्रति दिन एवढे पाणी देण्यात यावे. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासनाला पाणी घेण्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री उभारण्याचे निर्देशही मा. मंत्री महोदय यांनी दिले.

या शहराची तहान भागविण्याकरीता अतिरिक्त २० द.ल.लि. पाणी पुरवठा तातडीने उपलब्ध करुन घेण्यास कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अथक प्रयत्नांना यश आले. मा.मंत्री महोदय श्री.नारायणराव राणे साहेब, ह्यांनी मिरा-भाईंदर शहरासाठी अतिरिक्त पाणी मंजूर केले म्हणून सर्व मिरा-भाईंदर रहिवाशांच्या वतीने मनःपुर्वक आभार व्यक्त करीत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

याला माझे अनुमोदन आहे. त्याच्यामध्ये मा. खासदार श्री. संजीव नाईक सुध्दा मिटींगमध्ये उपस्थित होते, तर त्यांचे ही नाव आपण टाका.

**रोहिदास पाटील :-**

आता जो अभिनंदनाचा ठराव मांडला, कॉंग्रेस, राष्ट्रवादी पक्षाचा विषय नाही असे आमचे मत आहे. पण त्यांनी तो विषय मांडल्याबद्दल त्यांचे ही मी अभिनंदन करतो. ठरावाला विरोध करण्याचा कोणीही सभागृह प्रयत्न करणार नाही. असेही आम्हांला वाटते. अखेर, व्यक्तिगत मते असू शकतील. मी ठराव करतेवेळी याच्यात दुरुस्ती करतो. सत्ता तुमच्याकडे असे जर तुम्हाला वाटते की, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीकडे, आणि त्यांच्या त्या बळावर त्यांनी २० एम.एल.डी. पाणी वाढवून दयायचे निर्देश दिलेले आहेत. कधी पूर्ण होतील याचाही खुलासा होणे गरजेचे आहे. त्याच्यांहीपेक्षा आता शहर जे भोगते आहे, जी पाणी टंचाई सुरु आहे, वाढीव पाणी लवकरच मिळेल असे याचे लक्षण नाही. १४ % जी पाणी टंचाई झालेली आहे, ती जलसंपदा अधिकाऱ्यांबरोबर त्या मंत्रालयाबरोबर आणि पाणी पुरवठा ग्रामविकास मंत्रालयाबरोबर बोलणी करुन आपली जी १४ % कपात केलेली आहे, त्यात पहिल्यांदा सुट मिळावी असेही अभिनंदनाच्या ठरावामध्ये दुरुस्ती करा. जर उदयापासून त्यांची सुट मिळाली तर प्यायला थोडे तरी पाणी मिळेल. आणि जेव्हा येईल तेव्हा सगळयांना मिळेल. तुमचा पक्ष आहे म्हणून ठराव, अभिनंदन. तुम्हाला दुरुस्ती करावी लागते की, यांचे नाव घ्या, त्यांचे नाव घ्या. चुकून एखादे राहिले असेल तेही नाव घ्या. पण हे काम लवकर हाईल. बोर्डवर पाणी येणार नाही. बोर्ड, होर्डींग लावून १०० एम.एल.डी, ५० एम.एल.डी., ४० एम.एल.डी. ३० एम.एल.डी. आणि आता २० एम.एल.डी. मा. आयुक्त साहेब, याचे कोणतेतरी लेखी पत्र आपल्याकडे पोहोचले असेल. तर मॅडम त्याचा खुलासा करावा की, आजच्या आपल्या टपालामध्ये हे पत्र इनवर्ड झालेले आहे. आणि जसा तुम्हाला लिहायचा तसा ठराव लिहा.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. आणि थोडीशी माहिती देऊ इच्छितो. आज हा जो अभिनंदन ठराव मांडण्यात आला किंवा जी घोषणा करण्यात आलेली आहे, ती कागदोपत्रांच्या आधारावर करण्यात आलेली आहे. त्याचे आपल्याकडे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला आदेश आहेत. आणि त्याच दिवशी श्री. नारायण राणे साहेबांनी, ज्या दिवशी आम्ही चार तारखेला त्यांची भेट घेतली आणि विनंती केली त्याच दिवशी रात्री आठ वाजचा फॅक्सच्या माध्यमातून महापालिकेला हे पत्र पाठविण्यात आले. फक्त होर्डिंग, बॅनरचा विषय नाही. हा आपल्या शहराचा विषय आहे. मा. आयुक्त महोदय या विषयावर लवकरात लवकर जी तांत्रिक कारवाई करायची आहे, आपल्याला साकेतकडे जे टॅपिंग करायचे आहे त्या अनषंगाने ज्या काही तांत्रिक बाबी पूर्ण करायच्या आहे, त्याची पूर्तता करायची आहे त्यावर तुम्ही जातीने लक्ष दया. तुम्हाला मा. महासभेच्या माध्यमातून जी मान्यता लागेल, मला वाटत नाही की, कोणी तुम्हाला विरोध करेल, या शहराला पाण्याची गरज आहे. म्हणून तो विषय तातडीने हाताळा. जेणेकरुन या शहराला लवकरात लवकर पाणी उपलब्ध होईल.

**मा. महापौर :-**

मलापण एक सांगायचे आहे की, मी आणि मा. आमदार साहेब, आम्ही दोघांनी श्री. तटकरे साहेबांना पत्र लिहीलेले आहे की, जी १४ % कपात चालू आहे ती रद्द करायची आहे आणि त्यांनी ते प्रधान सचिवांना पण सांगितले आहे की, त्याच्यावर ते लोक लवकरात लवकर करतील. श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेला ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. जी सुचना आली आहे ती मी फेटाळत आहे. आणि मा. खासदार श्री. संजीव नाईक साहेब हे त्या मिटींगमध्ये उपस्थित होते म्हणून त्यांचे नाव समाविष्ट करायचे आहे.

**प्रविण पाटील :-**

मग तो ठराव सर्वानुमते करु नका. आमचा त्याला विरोध आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ०९ :-**

दि. १६/०३/२०१२ रोजी प्रथमतः मा. ना. श्री. सुनिल तटकरे साहेब जलसंपदा व पाटबंधारे मंत्री, मा. ना. श्री.गणेश नाईक पालकमंत्री, ठाणे जिल्हा, मा. खासदार डॉ. संजीव नाईक, मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेंन्डोंन्सा तसेच महापालिकेच्या प्रशासनाच्या वतीने मा.आयुक्त व महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळाचे अधिकारी ह्यांच्या समवेत संयुक्त बैठक मिरा-भाईंदर शहराला भासणारी पाणी टंचाईचा प्रश्न सोडविणेस घेण्यात आली होती, त्याच धर्तीवर दि.०४/१२/२०१२ रोजी मा.उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहॉं नज़र हुसेन, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या नेतृत्वाखाली शिष्ठमंडळाने मा. ना. श्री. नारायणरावजी राणे, मंत्री, उद्योग, महाराष्ट्र राज्य यांची भेट घेतली. बैठकीच्या चर्चेमध्ये दि.१९/०३/२०१२ रोजी कॉंग्रेसचे माजी आमदार

मा.श्री. मुझफ्फर हुसेन व मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माजी महापौर मा. श्री. तुळशीदास म्हात्रे व संबंधीत काँग्रेस पक्षाचे शिष्ठमंडळ व अधिकारी वर्ग सह मिरा भाईंदर महानगरपालिकेला महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळातर्फे होत असलेल्या पाणी पुरवठ्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी सदर बैठकीमध्ये शिष्ठमंडळाने मा. ना.श्री. नारायणरावजी राणे, मंत्री, उद्योग, ह्यांचेकडे महामंडळाच्या माध्यमातुन १०० द.ल.लि. प्रति दिन एवढा वाढीव पाणी पुरवठा करावा, अशी मागणी केली होती. मंत्री महोदयांनी मिरा-भाईंदर शहराला अतिरिक्त ३० द.ल.लि. एवढे पाणी सद्यस्थितीत देण्याचे आश्वासन दिले.मात्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे सद्यस्थितीत असलेल्या पाणी साठ्याअभावी व झालेल्या सदर बैठकीच्या अनुषंगाने शिष्ठमंडळाने किमान २० द.ल.लि. पाणी पुरवठा तातडीने उपलब्ध करुन देण्याचा आग्रह मा. मंत्री महोदय, श्री. नारायणराव राणे साहेबांकडे केला.

मागणीच्या अभावी व तांत्रिक बाबींचे अवलोकन करुन मा.ना.श्री. नारायणराव राणे साहेब मंत्री, उद्योग, बंदरे, रोजगार व स्वयंरोजगार, महाराष्ट्र राज्य ह्यांनी आदेश दिले की, मिरा-भाईंदर शहरासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातुन मागणी केलेल्या १००द.ल.लि. पाणी पुरवठ्याच्या आधारावर तात्काळ अतिरिक्त २० द.ल.लि. प्रति दिन एवढे पाणी देण्यात यावे. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासनाला पाणी घेण्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री उभारण्याचे निर्देशही मा. मंत्री महोदय यांनी दिले.

या शहराची तहान भागविण्याकरीता अतिरिक्त २० द.ल.लि. पाणी पुरवठा तातडीने उपलब्ध करुन घेण्यास कॉग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अथक प्रयत्नांना यश आले. मा.मंत्री महोदय श्री.नारायणराव राणे साहेब, ह्यांनी मिरा-भाईंदर शहरासाठी अतिरिक्त पाणी मंजूर केले म्हणून सर्व मिरा-भाईंदर रहिवाशांच्या वतीने मनःपुर्वक आभार व्यक्त करीत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०६, दि. ३०/१२/२०११ व दि. ३१/०३/२०१२ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो, जर आमचा फेटाळत असाल तर आम्ही शिवसेनचे सदस्य सभात्याग करत आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम हा नक्कीच पॉलिसी डिसीजन नाही. एक मानसन्मानाने मांडलेला तो ठराव आहे. त्यामध्ये दोन्ही मा. आमदार आपल्या शहराचे आहे. म्हणजे ठराव घेणे कितपत योग्य आहे.

**मा. महापौर :-**

श्री. मेहता साहेब, बसून घ्या.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मगाशी जो ठराव झाला, त्याला तुम्ही सर्वानुमते बोलतात पण आमचा सभागृहामध्ये त्याला विरोध आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दि. ३०/१२/२०११ व दि. ३१/०३/२०१२ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, आमच्याही सुचनांचा विचार केला गेला पाहिजे. आमची संमती नसताना सर्वानुमते हा शब्द तुम्ही काढून टाकावा.

**नरेंद्र मेहता :-**

मतदान घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. मेहता साहेब, विषय असा आहे की, ज्या मिटींगला हा डिसीजन झाला त्या मिटींगमध्ये जे उपस्थित होते त्यांचेच नाव घेतलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

मी त्या मिटींगला उपस्थित नव्हते. त्यांनी याच्यात माझेपण नाव घेतलेले नाही. तर मी पण सुचना मांडू?

**मा. महापौर :-**

आम्ही तुमचा विरोध नोंदवून घेतो.

**राजेंद्र जैन :-**

जनता को जब पानी मिलेगा तब हम उनका डबल अभिनंदन करेंगे। जब जनता को पानी मिलेगा जनता खुद अभिनंदन करेगी। एक कागजी प्रस्ताव कितने किंमती है, यह जनता जानती है।

**मा. महापौर :-**

जनता बाद मे करेगी वो बात अलग है। पहले अपना भी फर्ज बनता है। उनका अभिनंदन करना है।

(संभागृहात गोंधळ)

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, त्या मिटींगमध्ये गैरहजर होते असे कारण पुढे करत, ज्या विधीमंडळात लक्षवेधी सुचनेद्वारे या सुचना करण्यात आल्या त्याचे काही नाही का? फक्त मिटींगमध्ये गैरहजर आहेत म्हणून तुम्ही आमच्या सुचना फेटाळून लावता.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, एका मिटींगमध्ये एवढया मोठया पाण्याच्या प्रश्नावर निर्णय झाला आहे का?

**प्रशांत दळवी :-**

त्याच्यावरुन लावायचा असेल तर सर्वानुमते ठराव मंजुर करु नका. आमचा विरोध आहे.

**मा. महापौर :-**

पण मी पण नव्हते तर मी बोलत नाही की, माझे नाव समाविष्ट करा.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

त्यांचे नाव समाविष्ट न करण्यामागे काय कारण आहे?

**प्रविण पाटील :-**

आमचा त्या विषयाला विरोध नाही, त्या ठरावाला विरोध आहे.

**निलम ढवण :-**

वेळोवेळी विषय झाल्यानंतर शेवटी शत्ताधारी शेवटची एक मिटींग घेऊन त्यामध्ये निर्णय होतो. याचा अर्थ असा नाही की, सत्ताधारी आहेत म्हणून त्यांचीच नावे घेतली जावी. वेळोवेळी आमच्या आमदारांनीही त्या विषयावर आवाज उठवलेला आहे.

**मा. महापौर :-**

जे त्या मिटींगमध्ये उपस्थित होते त्यांची नावे घेतलेली आहे.

**निलम ढवण :-**

शेवटी सत्ताधाऱ्यांचीच मिटींग झाली.

**मा. महापौर :-**

जे गेले त्यांची नावे होती. मी नव्हती तर माझे पण नाव नाही.

**निलम ढवण :-**

मिटींगचा प्रश्न नाही. त्यासाठी वेळोवेळी आमच्या मा. आमदारांनी देखील प्रयत्न केलेले आहेत. त्यामुळे त्या ठरावामध्ये आमच्या मा. आमदारांचे नाव नमुद केले गेलेच पाहिजे.

**प्रविण पाटील :-**

आमचा ठरावाला विरोध आहे. विषयाला विरोध नाही.

**मा. महापौर :-**

तुमचा विरोध नोंदवला आहे. आता पुढचा विषय घ्या. सर्वांनी बसून घ्या. इतिवृत्तांताचा ठराव सर्वानुमते मंजुर केला आहे.

**प्रकरण क्र. ०६ :-**

दि. ३०/१२/२०११ व दि. ३१/०३/२०१२ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १० :-**

दि. ३०/१२/२०११ व दि. ३१/०३/२०१२ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध वस्तुंचे, मालमत्तेचे संरक्षणार्थ "सुरक्षा रक्षक" पुरवठा करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांतील महापालिकेच्या मालकीच्या ज्या ज्या मालमत्ता आहेत यामध्ये उद्याने, पाण्याच्या टाक्या, स्मशानभुमी, वॉर्ड ऑफीसेस, अग्निशमन, हॉस्पीटल्स, मुख्य कार्यालय तसेच आरक्षित जागा व इतर मालमत्ता यांचे संरक्षण करणे, या व्यतिरिक्त प्रासंगिक अल्प कालावधीसाठी किंवा मर्यादित कालावधीसाठी आवश्यकते प्रमाणे विविध विभागात उपक्रम तथा कार्यक्रमासाठी सुरक्षा रक्षक नेमले जातात.

सध्या महापालिकेमध्ये मे. सैनिक इंटेलिजीन्स अँन्ड सेक्युरीटी प्रा. लि. यांची सुरक्षा व्यवस्था असून ह्या कंपनीने महापालिकेस पुरविलेली सेवा विचारात घेता आजतागायत कुठेही अनूचित प्रकार घडलेला नसून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही. वेळोवेळी महापालिकेने मागणी केल्याप्रमाणे सुरक्षा रक्षकांचा पुरवठा केलेला आहे. यामुळे मा. स्थायी समितीने मे. सैनिक इंटेलिजीन्स अँन्ड सेक्युरीटी प्रा. लि. यांना तत्पर सेवा पुरवठा करणे तसेच आहे त्याच दराने किमान वेतन कायद्यानुसार पुढे सेवा पुरविण्याबाबत एक वर्षाची मुदत वाढ ठराव क्र. ४१ दि. १६/०७/२०११ नुसार दिलेली होती.

सदरची एजन्सी "किमान वेतन कायद्यानुसार" यापूढेही सेवा पुरविण्यास तयार असून गोषवाऱ्याप्रमाणे गार्ड बोर्डकडून आवश्यक त्या प्रकारे पुरेसे सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन देत नसल्याचा पूर्वानुभव पहाता तसेच गार्ड बोर्डकडील सुरक्षा रक्षकांचे वेतनही जास्त असल्याने मे. सैनिक इंटेलिजीन्स अँन्ड सेक्युरीटी प्रा.लि. यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार मे. सैनिक इंटेलिजीन्स अँन्ड सेक्युरीटी प्रा.लि. यांना पुढील तीन वर्षासाठी किमान वेतन कायद्यानुसार मुदतवाढ देणेस व त्यानुसार देयके प्रदान करणेस आजची सभा मंजूरी देत आहे.

तसेच सन २०१२-१३ या वित्तीय वर्षातील अंदाजपत्रकातील पृष्ठ क्र. ३१ "आरोग्य व सोयी" या प्रधान लेखा शिर्षाखालील उपशीर्ष "साफ- सफाई व सोयी" मधून अ. क्र. १ मधील "स्थायी आस्थापना" या लेखा शिर्षातील उर्वरित तरतूदीमधून पुर्नविनियोजन करुन सुरक्षा रक्षकांची देयके प्रदानास देखील आजची सभा मंजूरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

प्रकरण क्र. ०७, मे यह सुचना है की, निविदा मे विविध विभागों मे नियुक्त मनुष्यबल के हाजरी को बायोमेट्रीक मशीनद्वार सत्यापीत कराने की प्रथा शुरु की जाए। अब तक जो सिस्टम था जिसके अंदर ठेकेदार का आदमी अटेंडन्स देता था। उसके बल पर इनका पेमेंट दिया जाता था। उसको रोका जाए। उनके हाजरी का सत्यापन बायामेट्रीक से किया जाए। यह सुचना में देता हूँ।

**नरेंद्र मेहता :-**

या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

मी सुचना फेटाळत आहे आणि ठराव सर्वानुमते मंजुर करत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आपण फेटाळा, आपला अधिकार आहे. पण सुचना काही नव्हंती, फक्त एवढे होते की, जी अटेंडन्स आहे ती जागेवर होत नाही. तर बायोमेट्रीक लावा. आम्ही वेगळे काही मांडलेले नाही. ती अटेंडन्स व्हावी म्हणून तुम्हाला नको आहे का? अटेंडन्सप्रमाणे पगार मिळावा हे आपल्याला नको आहे का? म्हणजे कुठलीही सुचना आपण फेटाळता. आम्ही विरोध केला आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. मेहता साहेब, हजेरी जी आहे ती बायोमेट्रीकप्रमाणेच होते. मला वाटते की, प्रशासन पण तेच काम करते.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही फिरुन आलो. अभ्यास करुन आलो. गार्डन असेल किंवा एखादे स्टेशन असेल किंवा स्मशानभूमी असेल, जे काही असतील त्या ठिकाणी बायोमॅट्रीक नाही. ते डायरेक्ट तिकडे जातात. आणि तिकडून घरी निघून जातात.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, दुसरा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ०७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध वस्तुंचे, मालमत्तेचे संरक्षणार्थ "सुरक्षा रक्षक" पुरवठा करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ११ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महापालिकेच्या मालकीच्या ज्या ज्या मालमत्ता आहेत यामध्ये उद्याने, पाण्याच्या टाक्या, स्मशानभुमी, वॉर्ड ऑफीसेस, अग्निशमन, हॉस्पीटल्स, मुख्य कार्यालय तसेच आरक्षित जागा व इतर मालमत्ता यांचे संरक्षण करणे, या व्यतिरिक्त प्रासंगिक अल्प कालावधीसाठी किंवा मर्यादित कालावधीसाठी आवश्यकते प्रमाणे विविध विभागात उपक्रम तथा कार्यक्रमासाठी सुरक्षा रक्षक नेमले जातात.

सध्या महापालिकेमध्ये मे. सैनिक इंटेलिजीन्स अँन्ड सेक्युरीटी प्रा. लि. यांची सुरक्षा व्यवस्था असून ह्या कंपनीने महापालिकेस पुरविलेली सेवा विचारात घेता आजतागायत कुठेही अनूचित प्रकार घडलेला नसून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही. वेळोवेळी महापालिकेने मागणी केल्याप्रमाणे सुरक्षा रक्षकांचा पुरवठा केलेला आहे. यामुळे मा. स्थायी समितीने मे. सैनिक इंटेलिजीन्स अँन्ड सेक्युरीटी प्रा. लि. यांना तत्पर सेवा पुरवठा करणे तसेच आहे त्याच दराने किमान वेतन कायद्यानुसार पुढे सेवा पुरविण्याबाबत एक वर्षाची मुदत वाढ ठराव क्र. ४१ दि. १६/०७/२०११ नुसार दिलेली होती.

सदरची एजन्सी "किमान वेतन कायद्यानुसार" यापूढेही सेवा पुरविण्यास तयार असून गोषवाऱ्याप्रमाणे गार्ड बोर्डकडून आवश्यक त्या प्रकारे पुरेसे सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन देत नसल्याचा पूर्वानुभव पहाता तसेच गार्ड बोर्डकडील सुरक्षा रक्षकांचे वेतनही जास्त असल्याने मे. सैनिक इंटेलिजीन्स अँन्ड सेक्युरीटी प्रा.लि. यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार मे. सैनिक इंटेलिजीन्स अँन्ड सेक्युरीटी प्रा.लि. यांना पुढील तीन वर्षासाठी किमान वेतन कायद्यानुसार मुदतवाढ देणेस व त्यानुसार देयके प्रदान करणेस आजची सभा मंजूरी देत आहे.

तसेच सन २०१२-१३ या वित्तीय वर्षातील अंदाजपत्रकातील पृष्ठ क्र. ३१ "आरोग्य व सोयी" या प्रधान लेखा शिर्षाखालील उपशीर्ष "साफ- सफाई व सोयी" मधून अ. क्र. १ मधील "स्थायी आस्थापना" या लेखा शिर्षातील उर्वरित तरतूदीमधून पुर्नविनियोजन करुन सुरक्षा रक्षकांची देयके प्रदानास देखील आजची सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील          अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८, भाईंदर (प.) नियोजित टेंभा हॉस्पीटल खाजगी कंपनी अथवा खाजगी ट्रस्ट मार्फत चालविण्यास मंजुरी मिळणेकामी मा. उच्च न्यायालयात Civil Application दाखल करण्यास मान्यता देणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) येथे टेंभा हॉस्पीटल इमारत बांधकाम मा. उच्च न्यायालय जनहीत याचिका क्र. ३८/२००६ मधील निर्णयाच्या अनुषंगाने मा. महासभा दि. १६/०४/२००७ ठराव क्र. ०३ अन्वये हाती घेण्यात आलेले आहे. सदर इमारतीचे काम सद्यस्थितीत प्रशासनामार्फत थांबविण्यात आलेले आहे.

सदर हॉस्पीटल इमारत बांधकाम पूर्ण होऊन सर्व सोयीने कर्मचारी वर्ग नेमून हॉस्पीटल सुरु करण्यास होणारा खर्च पाहता व सद्याची महानगरपालिकेवर खुप मोठा आर्थिक स्थिती पाहता व सदर हॉस्पीटल महानगरपालिकेने चालविण्यास महानगरपालिकेवर खुप मोठा आर्थिक व प्रशासकीय भार पडणार आहे.

सदर हॉस्पीटल राज्य शासनाकडे हस्तांतर केल्यास अथवा खाजगी ट्रस्ट मार्फत चालविण्यास सोयी पुरविणे शक्य होईल. सदर धोरण निश्चित करण्यात येत असून याबाबत Civil Application मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, जो काही गोषवारा दिला आहे तो आपणही वाचला असेल. त्यामध्ये हॉस्पीटल चालवायला नक्की काय खर्च येणार आहे? महापालिकेची क्षमता आहे किंवा नाही? आपण त्यामध्ये एकुण काय सुविधा देणार आहोत? आपल्याला कशासाठी गव्हर्नमेंटकडे जायचे आहे किंवा कशासाठी ट्रस्टकडे जायचे आहे? याचा कुठे ही उल्लेख आलेला नाही की, आपल्याला या-या सुविधा त्यामध्ये दयायच्या आहेत. त्यासाठी एवढा खर्च पडणार आहे. मग सभागृहाने तो निर्णय घ्यायचा आहे की, गव्हर्नमेंटला दयायचे की, ट्रस्टला. इकडे काही दिले नाही. तुम्ही डायरेक्टली बोलता की, ट्रस्टला दया किंवा बी.ओ.टी. वर दया. याच्यात कुठेही काही उल्लेख नाही. मिरा भाईंदर शहराची एवढी मोठी वास्तु आहे. आज या शहरामध्ये आपले एकही हॉस्पीटल नाही. मा. महापौर मॅडम, आपल्या नजरेस आणून देतो, मी एम.एम.आर.डी.ए. चा सदस्य असताना श्री. विलासराव देशमुख त्यावेळी मा. पिठासीन अधिकारी होते. असाच सेम विषय बँद्रा-कुर्ला कॉम्पलेक्समध्ये एका हॉस्पीटलला चार एफ.एस.आय. दयायचे होते. त्यावेळी अधिकाऱ्यांनी सुचना मांडली की, साहेब त्यामध्ये आपले १० % ते २० % आरक्षण ठेवा. श्री. विलासराव देशमुख यांचे शब्द आहेत की, कुठलेही हॉस्पीटल एकदा चालू झाल्यानंतर काहीं देत नाही. कुठलेही आरक्षण मिळत नाही. म्हणून ती कंडीशन काढा आणि गव्हर्नमेंटला जास्त फायदा काय मिळेल ते बघा. बी.ओ.टी. दिल्यानंतर मॅडम तुम्हाला आणि मला रोज त्या कामावर लागावे लागेल की, यांचे ॲडमिशन होत नाही, त्याचे होत नाही. इकडे डॉक्टर भेटला नाही, तिकडे भेटला नाही. आणि महापालिकेची वास्तु आहे तर कुठेतरी आम्ही एवढया मोठया अपेक्षेने बघतो की, या शहराचे एक हॉस्पीटल होईल. याच्यात काहीतरी सांगा की, आपण नक्की काय सुविधा देणार आहात. शंभर बेड चालवणार, पन्नास बेड चालवणार. एवढा खर्च अपेक्षित आहे. दहा रुपये होईल, दहा करोड होईल, पाच करोड होईल. मग आम्ही निर्णय घेऊ की, महापालिका चालवू शकते की, आपल्याला हे गव्हर्नमेंटला दयायला पाहिजे किंवा खाजगी. काही दिले नाही. तुम्ही डायरेक्टली म्हणता, निर्णय कसा घ्यायचा. हाच विषय मागच्या वेळेस ज्यावेळी बी.ओ.टी. वर आला होता, तेव्हा काँग्रेसने हाच विरोध केला होता की, बी.ओ.टी. वर दयायची गरज नाही आणि ठरावामध्ये बदल केला होता. त्यावेळी तर हॉस्पीटलसुध्दा आपल्याला बी.ओ.टीवर बांधून मिळत होते. इमारत सुध्दा हे पंधरा-वीस करोड खर्च करण्याची आवश्यकता नव्हती. आता प्रशासनाने आम्हाला खुलासा करावा. आम्ही तुमच्या ठरावाला सहमत करु शकतो. पण खुलासा करा की, नक्की किती खर्च अपेक्षित आहे? त्यामध्ये आपण काय सुविधा पुरवणार आहोत?

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, मला वाटते आपण ठराव केलेला आहे, तो धोरण ठरवायचा आहे. आपल्याला सिव्हील ॲप्लीकेशन सूट करण्याचे.................

**नरेंद्र मेहता :-**

धोरण ठरवायला..................

**जुबेर इनामदार :-**

त्यानंतर त्यामध्ये ऑब्जेक्शन सजेशन हा एक पार्ट असणार आहे. लोकांकडून आपल्याला मागणी करावी लागेल की, करायचे की नाही. नाही तर परत हा विषय मा. महासभेसमोर येईल. त्या मा. महासभेमध्ये ते कसे ठरवायचे, कोणाला दयायचे तो अधिकार मा. महासभेला आहे. आज आपण हा ठराव या कारणासाठी केला की, आपण हे हॉस्पीटल चालवू शकणार नाही. आमची आर्थिक बाब तेवढी ताकदवान नाही. त्याकरीता आपल्याला ते करायचे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्याला फक्त सिव्हील ॲप्लीकेशन फाईन करण्याबाबत आपली मंजुरी मागितलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आम्ही ठरावाला अपोझ करतो असे सांगत नाही. शहराला हॉस्पीटल झाले पाहिजे. आपल्या पालिकेची ताकद नाही तर कोणीतरी चालवले पाहिजे. शेवटी इकडे प्रस्तावामध्ये झीरो आहे की, किती खर्च अपेक्षित आहे? आपण त्यामध्ये काय करणार आहे?

**मा. महापौर :-**

ते आपण नंतर जेव्हा देणार तेव्हा डिस्कस करु.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, यु आर डिसायडींग दी पॉलीसी. त्यामध्ये महापालिका चालवणार नाही असे स्पष्ट होते. तुम्ही पॉलिसी नक्की करता की, गव्हर्नमेंट किंवा प्रायव्हेट पर्सन. उदया आपल्याला वाटले की, आपण महापालिकेने चालवावे. जर तुम्ही पूर्ण गोषवारा दिला की, एवढा खर्च आहे, एवढे बेड आहेत, हे उपचार आपण त्यामध्ये

करणार आहोत तर निर्णय होईल. तुम्ही डायरेक्ट पॉलीसी करता की, गव्हर्नमेंट किंवा हे. दुसरे आपल्या माहितीसाठी सांगतो, हे प्रशासनाने आपल्या निदर्शनास आणून दिले नाही की, या विषयावर मा. आमदार श्री. प्रताप सरनाईक साहेबांनी या हॉस्पीटल संदर्भात एक बैठक लावली होती. त्यावेळी आपले तत्कालीन आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक, आपले अधिकारी श्री. शिवाजी बारकुंड होते. श्री. खांबित साहेब पण होते असे मला वाटते. मा. मंत्री महोदय श्री. सुरेश शेट्टी यांनी त्यामध्ये हे सांगितले की, आपली इमारत रेडी झाली की, आपण आम्हाला कळवा. आम्ही पूर्ण हॉस्पीटल ताब्यात घेऊ. आणि गव्हर्नमेंटच्या खर्चाने चालवू आणि त्याला सिव्हील हॉस्पीटलचा दर्जा देऊ. मॅडम या शहरात सिव्हील हॉस्पीटल झाले म्हणजे या शहरातील नागरिकांना त्याचा खूप मोठा फायदा होणार आहे. आता, तुम्ही डायरेक्ट सगळे म्हटले की, घेतले नाही तर प्रायव्हेट व्यक्तीला दया.

**जुबेर इनामदार :-**

ठरावामध्ये राज्य शासन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

किंवा काय आहे?

**जुबेर इनामदार :-**

किंवा खाजगी ट्रस्ट.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, इन केस गव्हर्नमेंटने नकार दिला. देन वी कॅन टेक द हेल्दी डिसीजन. तो घेऊ. तुम्ही गव्हर्नमेंटला पाठवा. हे परत सभागृहात येणार नाही. तुम्ही गव्हर्नमेंटला पाठवा. आमचा विरोध नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर साहेब, प्रशासनाने खरोखर त्यांना काय अडचणी आहेत, आज कुठपर्यंत काम आले आहे, काय करु इच्छितात. याचे पाच-दहा मिनिटाचे निटनेटके निवेदन त्यांना करु दया. या दहा ओळीच्या गोषवाऱ्यामध्ये एवढा मोठा विषय पूर्ण होणार नाही. हा विरोध, विरोधाभास याच्यामध्ये पक्षाचे काही धोरणच नाही. पहिल्यांदा काय आहे हे तर समजू दया. म्हणजे तुम्हालाही समजेल, आम्हालाही समजेल. नाहीतर, मॅडम तुमच्या गोड स्वभावाचा अधिकारी फायदा घेतील किंवा समाजाचे नुकसान होईल. आम्ही कोणालाच कमी लेखत नाही. आम्ही मान दयायला तयार आहोत. प्रशासनाने जो प्रस्ताव आणला आहे, त्यांना चालविण्यामध्ये अडचणी आहेत किंवा त्यांचा दुरदृष्टीकोन काय आहे? सभागृहाला समजू दया.

**एस.एस.पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आणि मा. महासभेला मी असे अवगत करतो की, आपण जर महानगरपालिकेतर्फे हे चालवले आस्थापनेची १९७ पदे मंजुर झालेली आहेत. आणि नव्याने अजून ११३ पदे मंजूर करुन घ्यायला हवीत. तशी टोटल आपल्याला ३१३ पदे मंजूर करावी लागतील. ऑलरेडी आपला आस्थापनेचा खर्च वाढलेला आहे म्हणून चर्चा आताच झाली. जवळपास वार्षिक पंधरा कोटी खर्च आपल्याला आस्थापनेवर करावा लागेल. आणि वीस-पंचवीस कोटीची मशिनरी खरेदी करावी लागेल. जवळपास पंधरा ते वीस वेगवेगळे डिपार्टमेंट चालू करावे लागणार. जसे, गायनॉक्लॉजी, पिरियाटिशन सर्जरी, मेडिसीन, स्कीन, ऑप्थोर्नोजी, डेंटल, कॅज्युअल्टी असे वेगवेगळे डिपार्टमेंट चालू करावे लागणार. फार मोठा हेवी खर्च होईल म्हणून आपला पहिला प्रेफरन्स शासनाला राहील. शासनानंतर ट्रस्टला राहील. ट्रस्टनंतर मग एन.जी.ओ. ला राहील. आपण तसाच ठराव घेतलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, श्री. पानपट्टे साहेब जे बोलले त्या सगळया गोष्टी यांना माहिती आहेत. सभागृहात कोणालाही माहिती नाही. तुम्हाला किंवा मला माहिती नाही की, नक्की काय करणार आहे? आता दिशाभूल कशी करतात बघा. मागच्या सहा महिन्याअगोदर तुम्ही तुमचा स्टाफ पॅटर्न मान्य करुन घेतला. त्यावेळी सांगितले की, आम्ही चालवायचे आम्हाला तुम्ही त्या दिशेने घेऊन गेले की, स्टाफ पॅटर्न मंजुर करा. आम्ही मंजुर केले. तुम्ही गव्हर्नमेंटला पाठवले. आता बोलतात की, ते नाही. म्हणजे नक्की त्यावेळेला अधिकाऱ्यांचे डोके चालत नव्हते की, आता चालत नाही?

**एस.एस.पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, त्यावेळी मा. महासभेने निर्णय घेतला.

**नरेंद्र मेहता :-**

आपण तो विषय आणला होता की, हॉस्पीटल चालू व्हायच्या अगोदर स्टाफ पॅटर्न तयार करु. कॉंग्रेसने डॉ. पडवळ यांना त्यावेळी निलंबीत केले कारण हॉस्पीटल तयार नाही.

**जुबेर इनामदार :-**

का केले?

**नरेंद्र मेहता :-**

कारण त्यांनी स्टाफ पॅटर्न आणला. आमच्या बजेटमध्ये प्रोव्हीजन नाही. ३५ % पेक्षा जास्त खर्च आहे. एवढे कसे करणार आणि निलंबीत केले.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, श्री. नरेंद्र मेहता स्वतःच्या प्रश्नाचे उत्तर स्वतःच देत आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही काय निर्णय घेतला तो विषय नाही. मॅडम, ही शुल्ड बी सॅटीजफाईड फस्ट. ज्यावेळी स्टाफ पॅटर्न केला म्हणजे नक्की आपली काहीतरी मानसिकता असेल की, या उपचारापूर्वी एवढा खर्च अपेक्षित आहे. वॉट द एक्सपेन्स. आपल्या महापालिकेचा जो बजेट आहे, त्याप्रमाणे त्यांनी सांगावे की, या-या उपचाराला आपला एवढा वार्षिक खर्च होईल. त्यानंतर आपल्याला निर्णय घेता येईल. आपण म्हणजे सभागृह. आता याच्यामध्ये आपले सदस्य असू दया किंवा आमचे असू दया. या सर्वांना या विषयाबद्दल जास्त काही माहितीच नाही. किती लोकांनी अजून इमारत बघितली नाही. यांचे जे आता मौखिक बोलले की, डेंटल करणार, हे करणार, ते करणार म्हणून खर्च जास्त वाटतो म्हणून हे करा. असे करायचे का? ही शुल्ड गीव द प्रपोजल. आम्ही डिसीजन घेऊ. ते निर्णय कसा घेतील? त्यांनी आम्हाला माहितीच दिली नाही. फक्त बोलतात की, आम्हाला हे प्रायव्हेट करायचे की, बी.ओ.टी. याचा निर्णय दया. वेन यु आर गिवींग टू द गर्व्हमेंट बॅक. त्यामध्ये सिव्हील ॲप्लीकेशन करायची आवश्यकताच नाही. कारण ज्यांच्याकडून आपण घेतले त्यांनाच आपण परत देतो. मग त्याला सिव्हील ॲप्लीकेशनची गरजच लागत नाही. यू कॅन प्रोसीड डायरेक्टली.

**मा. आयुक्त :-**

मा. विरोधी पक्षनेते, मी आपल्याला या विषयाबद्दल थोडे स्पष्टीकरण करतो की, या विषयावर एक कोर्ट केस सुरु आहे. कोर्टाचे डायरेक्शन असे आहेत की, मिरा भाईंदर महानगरपालिकेने हॉस्पीटल बांधले पाहिजे. आणि याची पार्श्वभूमी अशी आहे की, जेव्हा कोर्टामध्ये ही केस गेली, तेव्हा पालिकेतून कोर्टाकडे असे ॲफिडेव्हिट झाले होते की, जे.एन.एन.यु.आर.एम. या योजनेखाली आम्हाला हॉस्पीटल बांधण्यासाठी फंन्डींग मिळणार आहे. म्हणून आम्ही हॉस्पीटल बांधतो. आमची बांधण्याची तयारी आहे. पण अशा प्रकारची कोणतीही फंन्डींग पालिकेला मिळाली नाही. जे.एन.एन.यु.आर.एम. खाली आमच्याकडे फक्त भूमिगत गटार योजना मंजुर झाली. आरोग्याची कोणतीही योजना मंजुर झाली नाही. म्हणून कोर्टामध्ये आता आमची कमिटमेंट आहे की, आम्ही हॉस्पीटल बांधणार, त्या कमिटमेंटला थोडेसे डिव्हीजन करायचे आहे म्हणून हा प्रस्ताव आणलेला आहे. कोर्टामध्ये असे सांगायचे आहे की, आता हे हॉस्पीटल मिरा भाईंदर महानगरपालिका चालवू शकत नाही. हॉस्पीटल चालविण्यासाठी आमची आर्थिक परिस्थिती एवढी सक्षम नाही. असे ॲफिडेव्हीट कोर्टासमोर मांडायचे आहे. त्यासाठी हा ठराव आणलेला आहे. आम्ही ॲफेडेव्हीट मांडताना कोर्टाला असे सांगणार की, आजच्या दिवशी आमची आर्थिक स्थिती एवढी सबळ नाही. म्हणून आम्ही हे हॉस्पीटल शासनाला हस्तांतर करण्यासाठी तयार आहोत. जर शासनाने नकार तर एका चेरिटेबल ट्रस्ट किंवा एन.जी.ओ. ला देण्यासाठी तयार आहोत असे आम्हाला कोर्टासमोर मांडायचे आहे. आणि त्याचे प्रमुख कारण असे आहे की, हॉस्पीटलची जी रनिंग कॉस्ट आहे, ती आपण जर पाहिली तर ती खूपच जास्त आहे. त्याच्यामध्ये आस्थापनेवर खर्च, बिल्डींगवर खर्च, साफसफाईवर खर्च, मशिनरीवर खर्च.............

**नरेंद्र मेहता :-**

अमाऊंट सांगा.

**मा. आयुक्त :-**

ॲप्रॉक्सीमेटली जे स्टँडर्ड आहेत, त्यामध्ये जी पर बेड कॉस्ट असते, कोणतेही हॉटेल, हॉस्पीटल रन करताना पर बेड कॉस्ट किंवा पर रुम कॉस्ट असते. ती हॉस्पीटलची पर बेड कॉस्ट जवळपास दिड लाख रुपये आहे.

**नरेंद्र मेहता :-**

इअरली ऑर मंथली?

**मा. आयुक्त :-**

मंथली आणि आम्ही जर असा अंदाज घेतला तर आपल्याला हॉस्पीटल चालविण्यासाठी जवळपास तीस किंवा पस्तीस कोटी खर्च होणार आहे. त्याच्यामध्ये सुरक्षा, आस्थापना, मशिनरी, एम.एम.सी., मशीनरीची मेंन्टनन्स, साफसफाई, मेडिसीन्स हे सगळे मिळून. आजच्या दिवशी माझ्याप्रमाणे पालिकेची स्थिती एवढी सक्षम नाही की, आम्ही तीस ते पस्तीस कोटी दरवर्षी याच्यावर खर्च करु शकणार. म्हणून आम्ही असा एक ठराव इथे आणलेला आहे की, आम्ही कोर्टासमोर असे ॲफिडेव्हीट करु की, आमची स्थिती एवढी सबळ नाही. आपण परवानगी दया. आम्ही हे हॉस्पीटल गव्हर्नमेंटकडे देऊ. यामुळे हा ठराव आम्ही आणलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, वी आर १०० % वॉट द डिसीजन तुम्ही जे घेतलेला आहे की, गव्हर्नमेंटला देऊ, त्याला आमचा विरोध नाही. आता साहेबांनी जे म्हटले की, दिड लाख रुपये, तर साहेबांना माहिती आहे की मी हॉटेल चालवतो. मी तीस तारखेला हॉस्पीटल उद्घाटन आहे. शंभर बेडचे हॉस्पीटल आहे. द रनिंग कॉस्ट

इज ३.५ करोर रुपीज इअरली. शंभर बेडच्या हॉस्पीटलला साडेतीन करोड रुपये इअरली आहेत. श्री. जुबेर साहेबांना माहिती असेल, माझ्या माहितीप्रमाणे उमराव मल्टीस्पेशलिस्ट हॉस्पीटल आहे. चौदा माळयाची इमारत आहे. माझ्या माहितीप्रमाणे त्यांचे ३६ करोड रुपये इअरली एक्सपेन्स आहे. मी दिड लाख धरले तरी शंभर बेडचे दिड करोड झाले. वर्षाला ॲप्रोक्सीमेटली पंधरा ते वीस करोड. पंधरा-वीस करोड असेल तर महापालिकेची कॅपेसिटी आहे. आपण एका नाल्याला वीस करोड खर्च करतो. जर गव्हर्नमेंट नकार देईल तर वीस करोड आमची कॅपेसिटी असू शकते. जर गव्हर्नमेंट नकार देईल तर प्रायव्हेटीझमला विरोध करण्याचे एकच कारण आहे, मॅडम आतापर्यंत आपण जेवढे बी.ओ.टी वर केलेले आहे, तुमचा आणि माझा अनुभव चांगलाच राहिला आहे. त्याची काही पुर्तता होत नाही. जो प्रत्येक माणूस येतो तो त्यामधून जास्तीत जास्त फायदा घ्यायला बघतो. आणि गव्हर्नमेंटने रिजेक्ट केले तर आपण पुढच्या एका मिटींगमध्ये आपण सगळे मिळून निर्णय घेऊ. आम्ही विरोध करत नाही पण शहरात चांगला मॅसेज जाईल.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, आज जर मिरा भाईंदरमध्ये बघितले तर प्रकर्षाने सरकारी हॉस्पीटल नसल्याची एक मोठी गैरसोय आज नागरिकांसाठी आहे. आणि गोरगरिब जनतेचा विचार करता सरकारी हॉस्पीटल असावे हे त्यांच्या सोयीनुसार क्रमप्राप्त आहे. आणि आपण जर ते खाजगीकरण केले किंवा ट्रस्टकडे दिले तर तशी मिरा भाईंदरमध्ये ट्रस्टची देखील हॉस्पीटल्स आहेत. आणि खाजगीकरण केल्यानंतर जी गोरगरिब जनता आहे, तर जशी आता खाजगी हॉस्पीटलमध्ये आर्थिकदृष्टया होरपळली जात आहेत. उदया जर हे हॉस्पीटल खाजगीकरण झाले तर तीच परिस्थिती गोरगरिबांसाठी निर्माण होईल. तर कृपया या सर्वातून पर्याय काढून आपण जे महानगरपालिकेमार्फत हॉस्पीटल सुरु करणार आहात ते गोरगरिबांसाठी एक सरकारी हॉस्पीटल म्हणून निर्माण व्हावे आणि त्यासाठी आपण सर्वतोपरी पर्याय काढून खाजगीकरण न करता ते सरकारी हॉस्पीटल म्हणून ठेवावे ही विनंती आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. मला वाटते विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. सिव्हील ॲप्लीकेशन फाइल करायचा विषय आहे. हा ठराव झालेला आहे. आपण पुढचा विषय घ्यावा.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

*मा. आयुक्त साहेब, आतापर्यंत या हॉस्पीटलला किती खर्च झाला ते आपण सांगू शकता का?*

**मा. आयुक्त :-**

साहेब, ते दोनशे बेडचे हॉस्पीटल आहे. ते दिड लाख, तीन कोटी दर महिन्याला होतो.

**दिपक खांबित :-**

आतापर्यंत तेरा कोटी बावीस लाख रुपये खर्च झाला आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण टेंडर कितीचे पास केले होते? मी सात करोडची मान्यता दिली होती.

**दिपक खांबित :-**

त्यानंतर मा. महासभेने एस्टीमेट पुन्हा रिवाइज केले. सर्वानुमते ठराव केला.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण एक वेळ ठराव केल्यानंतर त्या कोटेशनमध्ये त्यांनी बांधले पाहिजे. जर ५०% वाढीव झाले तर कसे चालणार.

**दिपक खांबित :-**

साहेब, २००८ प्रमाणे एस्टीमेट खर्च आठ कोटी रुपये होता. त्यावर ५५% अबव्ह टेंडर दिले. आणि ती जी कॉस्ट आली त्याला मा. महासभेची रिवाइज मंजुरी घेतली. डी.एस.आर. मध्ये फरक होता त्यामुळे आपण तो डिफरन्स वाढीव खर्चाला मा. महासभेची मंजुरी घेतली.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

साहेब, या हॉस्पीटलसाठी मी पंधरा वर्षापासून भांडत राहिलो आणि मी सभापती असताना ते हॉस्पीटल सॅन्क्शन करुन घेतलेले आहे. आणि या गरिब लोकांसाठी भाईंदरला हॉस्पीटल नसेल म्हणून भाईंदरला एक हॉस्पीटल व्हावे, पोस्टमॉर्टमसाठी आपल्याला बोरिवलीला जावे लागत होते, नाहीतर अंधेरीला जावे लागत होते. त्यासाठी किती वर्षापासून भांडत शेवटी मान्यता दिलेली आणि आज ती मान्यता तुम्ही सांगता की ट्रस्टला देऊ. ते कधीच होऊ शकत नाही. मी सांगतो की, शंभर बेडचे करु नका. पंचवीस बेडचे करा. आणि जशी आपली लहान केंद्र आहेत तसे लहान केंद्र ठेवू नये तोच खर्च एकाच केंद्रामध्ये करा. आणि आपल्याला जास्त खर्च करण्याची गरज नाही. पंचवीस बेड टाका. आणि बाहेरची जेवढी केंद्र आहेत ती बंद करा. त्याच डॉक्टरांना तिकडे बसवा. पण लहान गोरगरिबांचे उपचार स्वस्तामध्ये होतील.

**मा. महापौर :-**

दुसरा विषय घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही म्हटले आहे की, आपण राज्य शासनाकडे जाऊ. राज्य शासनाने नाही म्हटले तर ट्रस्टकडे.

**दिपीका अरोरा :-**

मुझे ऐसा बोलना है की, पहले हमे मोटीव्ह क्लीअर करना होगा कि, हम यह हॉस्पीटल क्यों चालू करनेवाले थे। अगर मोटीव्ह यह है कि गरिबों को और बी.ओ.पी. के लाइन के निचे जो लोग है, उन्हे सेवा देने के लिए, तो यह ठराव बिलकुल गलत होगा।

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, ती ओळ काढून घ्या. अन्यथा ठराव. आपण आदेश दयावा. तुम्ही खाजगी शब्द काढा. गव्हर्नमेंटने नकार दिला तर आपण निर्णय घेऊ.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपले डिसीजन काय आहे? याच्याबद्दल आपले काय मत आहे? तुम्ही पण तेच सांगितले.

**मा. आयुक्त :-**

शेवटी सभागृहाचेच निर्णय असतात. मी फक्त प्रस्तावित केलेले आहे. याच्यामध्ये आमचा पण उद्देश आहे की, राज्य सरकारने घेतले पाहिजे. पण जर काही कारणांमुळे उदया राज्य शासनाने घेतले नाही, वास्तु तयार आहे. ती वास्तु खराब होणार. म्हणून त्यामध्ये पुढची दिशा काय आहे ते ठरले पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, तुम्ही प्रशासनाची भुमिका ठेवली. त्यानंतर सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे. सभागृह सहमत आहे की, गव्हर्नमेंटकडे पाठवा. आपली ताकद नाही. पण आमची भिती ही आहे की, ट्रस्ट आल्यानंतर स्लममध्ये राहणाऱ्या सामान्य व्यक्तीला उपचार मिळणार नाही. त्यांच्याबरोबर तुम्ही किंवा आम्ही रोज भांडायला जाणार का? आमचा उद्देश तेवढाच आहे. तरी गव्हर्नमेंटने रिजेक्ट केले तर तुमची सत्ता आहे. तुमची मेजोरिटी आहे. तुम्ही विषय आणा आणि त्यावेळी निर्णय घ्या.

**मा. महापौर :-**

वी आर जस्ट आस्कींग मंजुरी.

**नरेंद्र मेहता :-**

हा ठराव गव्हर्नमेंटकडे गेला तर गव्हर्नमेंट बोलले की, याच्यात म्हटलेले आहे, आम्ही केले नाही तरी संस्था करणार. ते पण फेकणार.

**रोहिदास पाटील :-**

खाजगी शब्द त्यामधून वगळा.

**मा. महापौर :-**

खाजगी ट्रस्ट किंवा एन.जी.ओ. आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, आपण शासनाकडे हे का पाठवत नाही. आपला शासनावर विश्वास नाही आहे का?

**रोहिदास पाटील :-**

सरकारला निमित्त मिळेल. पण मॅडम, तुम्हाला आत्मविश्वास असायला पाहिजे.

**दिपीका अरोरा :-**

Madam, you are giving option to government to go for a easier route.

**नरेंद्र मेहता :-**

आणि तुम्हाला खाजगी संस्थेला दयायचे असेल तर गव्हर्नमेंटने नकार दिल्यानंतर तुम्ही विषय आणा. त्यावेळी चर्चा करुन घेऊ. आता तुम्ही क्वेशन मार्क दिला तर गव्हर्नमेंट पण हात झटकायचे काम करते. त्यांनाही खर्च नको असतो. त्यात प्रॉब्लेम काय आहे?

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, आपला शासनावर विश्वास नाही का? आपण हे धोरण शासनापुढे का ठेवत नाही?

**बर्नट डिमेलो :-**

मा. महापौर मॅडम, मला वाटते की, आपण ठराव मांडलेला आहे. राज्य शासन आणि खाजगी संस्था यांच्या स्वाधीन करण्याचा आपण जो विचार केला, ते शासनाने नाकारल्यानंतर. ज्यावेळी जे सर्व एन.जी.ओ. येतील त्यावेळी तुम्हालापण कल्पना येणार. सगळी जाहिरात दिली जाईल.

(सभागृहात गोंधळ)

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडम, एक मिनिट बोलायचे आहे. मगाशी मा. आयुक्त साहेबांनी सांगितले, हे हॉस्पीटल बांधण्याकरिता आपल्याला कोर्टाकडून परवानगी मिळाली होती. ते आदेश मिळाल्यामुळे आपल्याला कोर्टाकडूनच डिरेक्शन मिळेल की, आपल्याला कोणाकडून बांधायचे आहे, राज्यशासन, एन.जी.ओ. ही ऑर्डर

आपल्याला कोर्ट करेल, असे मला वाटते. तेव्हा तुम्ही ॲफीडेव्हीट करिता हा ठराव मंजुर करुन घेण्यात यावा ही विनंती आहे.

**गिता जैन :-**

मॅडम, एखादया वेळी जर खाजगी किंवा एन.जी.ओ. ने पास केले तर २०० चे २०० बेड आपल्याल मिळणार नाहीत. देन वी हॅव टू गो फॉर द परसेंटेज. आणि आजची आपली जनसंख्या बघताना आपल्याला २०० सुध्दा कमी पडणार आहेत. त्यात जर खाजगीने घेतले तर आपल्याला पन्नास, साठ किंवा शंभर देणार. ते आपल्याला पुरणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, आपल्याला आपल्या दोन्ही बाजू मांडायच्या आहेत. शासनाकडे ही पाठवायचे आहे. शासनाने स्वतः, आपण हस्तांतरीत केले किंवा त्यांनी चालवायला घ्यावे किंवा एन.जी.ओ. ने, धर्मादाय संस्थेने, हे आपले धोरण आहे. आणि ते चांगले धोरण याकरिता आहे, बऱ्याच धर्मादाय संस्था फुकट, म्हणजे येणाऱ्या गोरगरिब रोग्यांना फुकट उपचार देतात. त्यामध्ये औषध फुकट देतात. ते लोक शस्त्रक्रिया फुकट करतात. त्यामध्ये आपल्याला अशा बऱ्याच सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकतात. त्याकरिता हा विषय अशाच प्रकारे गेला पाहिजे ही माझी तुम्हाला विनंती आहे.

**रवि व्यास :-**

मॅडम, मिरा भाईंदर में एक लाख के करीब लोग स्लम मे रहते है। जिन लोगो की प्रायव्हेट हॉस्पीटल्स में ट्रीटमेंट लेने की केपॅसीटी नहीं है। मेरी यह सुचना है की, अगर हम लोग अपना हॉस्पीटल गव्हर्नमेंट को रन करते दे तो, गरीबों के लिए ज्यादा बेटर होगा। हमारे मा. आमदार श्री. गिल्बर्ट शेठ की हमेशा से राह भुमिका रही है की, गरिब जनता के लिए ज्यादा से ज्यादा फायदा दिया जाए।

**गिता जैन :-**

मॅडम, हम यह दे, इससे अच्छा हम इन्सीस्ट करे की, गव्हर्नमेंट ही चलाए। कोर्ट में यह इन्सीस्ट क्यों नहीं करते?

**मा. महापौर :-**

वो बाद की बात है। अब हम ठराव मंजुर कर लेते है।

**गिता जैन :-**

मॅडम, अगर आप ठराव मे यह डालेंगे नही तो कैसे जाएगा?

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, मा. मंत्री महोदयांचे मिनिटस् आहेत.

**मा. महापौर :-**

बसून घ्या. सर्व बोलत बसले तर एकाच विषयावर पूर्ण दिवस संपणार आहे.

**निलम ढवण :-**

मॅडम, खाजगी हा शब्द काढून प्रशासनासाठीच आग्रही राहावे अशी विनंती आहे.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव आहे?

**नरेंद्र मेहता :-**

आपला जो ठराव आहे, त्याला विरोध नाही. फक्त आपला जो एक शब्द आहे, सरकार किंवा खाजगी संस्था आमचे म्हणणे आहे की, तुम्ही खाजगी संस्था हा शब्द काढा. सरकारला पाठवा की, तुम्हीच करा. सरकारने नाकारले तर विषय आणून आपण निर्णय घेऊ. मी एक उदाहरण सांगतो, उमराव हॉस्पीटलमध्ये १०% आरक्षण आहे. माहिती घ्या की, किती लोकांना फायदा मिळाला. तुम्ही कधी बघितले की, आतापर्यंत तिकडे स्लमवाला गेला. प्रायव्हेट आल्यानंतर एखादा व्यक्ती जाऊ शकत नाही. आपल्याला ही विनंती आहे की, खाजगी हा शब्द काढा. सरकारला सांगा की, तुम्हीच सुरु करा.

**दिपिका अरोरा :-**

पक्ष का नाम लेकर..........

**मा. महापौर :-**

वहाँ पे जो बोला जाता है वह आपस मे बोला जाता है।

**दिपिका अरोरा :-**

बिलकुल ठिक बात बोल रहे है आप यही हम कह रहे है।

**मा. महापौर :-**

डु यु नो की १० टक्के उमराव हॉस्पीटल मे आयडेन्टी यु मस्ट बी इन एव्हर अबाऊट इज?

**दिपिका अरोरा :-**

यस व्हेरी टु दॅट इज व्हॉट आय एम सेईंग देन द वर्ड म्युनिसिपल हॉस्पीटल कम्स तो ऑटोमॅटीकली ॲडव्हारटाईजमेंट हो जाती है।

**जुबेर इनामदार :-**

मॅडम विषयांतर होते त्यांना सांगा ठराव करा पुढच्या विषयाला घ्या त्याचा जो निकाल लावायचा तो महासभा लावेल.

**मा. महापौर :-**

विरोधी पक्षनेते तुम्हाला ठराव करायचा आहे.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

सभागृह नेत्याशी समन्वय चर्चा चालु होती.

**ध्रुवकिशोर पाटील (सभागृह नेता) :-**

मै उनको रिक्वेस्ट कर रहा हुँ की, हमने जो ठराव किया है वह बराबर है। तो आप इसको एक्सेप्ट कर लो। मॅडम, एक काम करुया लंच टाईम मध्ये डिस्कस करुया.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम माझी विनंती आहे आपण हा प्रश्न राखून ठेवावा.

**मा. महापौर :-**

खाजगी शब्द काढुन आपण एन.जी.ओ. किंवा ट्रस्ट क्लीअर करु या.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

माझा बोलण्याचा उद्देश खाजगी व्यक्ती आय ॲम नॉट इन खाजगी संस्था म्हणजे सगळ्या खाजगीच असतात. गव्हर्नमेंटला एक ऑप्शन गेलं ना मग तुमच्याकडे सेकंड ऑप्शन आहे तुम्ही आमच्यावर कशाला बोजा टाकता प्रस्ताव रिजेक्ट करेल. सिव्हील हॉस्पीटलचा दर्जा गव्हर्नमेंटने चालु केलं तर आपल्याला मिळतील खाजगी संस्थेने केले तर ते मिळणार नाही आणि या शहरात दुसरे हॉस्पीटल बांधणार नाही. भविष्याचा विचार करा मा. आयुक्त महोदय, तुम्हाला काय वाटते गव्हर्नमेंटकडे दोन ऑप्शन गेल्यावर तो बोलेल सेकंड ऑप्शन सिलेक्ट करुन टाका. तुम्ही गव्हर्नमेंटला दोन ऑप्शन पाठवले तर गव्हर्नमेंट कुठले ऑप्शन वगळेल सांगा ना ते बोलतील ठीक आहे प्रायव्हेट करुन टाका.

**मा. आयुक्त :-**

साहेब, ह्याच्यावर मी कमेंट करु शकत नाही माझा एकच विषय आहे की, पालिका आर्थिक दृष्ट्या सक्षम नाही.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मी ॲग्री करतो ना, परंतु तुम्ही गव्हर्नमेंटला दोन ऑप्शन दिले की तुम्ही करा नाही तर आम्ही खाजगीला करतो तर ते काय बोलतील?

**मा. आयुक्त :-**

त्याच्यावर आम्ही काय करणार कारण ती गव्हर्नमेंटची भुमिका राहील.

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहेब, आपने जो प्रस्ताव रखे है। उसमे कॉर्पोरेट को देने का एनजीओ या खाजगी इसमे जो प्रशासन की भुमिका है वह थोडी उलझी हुई है। एक तो वो सुविधा देना चाहते है अगर सरकार लेती है ते सिव्हील हॉस्पीटल का दर्जा मिलता है तो मिरा भाईंदर के नागरीकोंको सुविधा मिलती है और खाजगी और एनजीओ कों देती है तो उनकी शर्ते अभीतक नक्की नही की है। किस बेसिसपर यह सेवा मिलेगी वो अब तक नक्की नही है। क्यो की एनजीओ अबतक हमने नक्की नही किया की क्या बेसिस है। इसलिए हमारे मेहता साहबने जो बोला है, पहले एक बार गव्हर्नमेंट को दिया जाए। वो नही होता है फिर आप आगे की प्रस्तावना विचार कर सकते है। पहले इसे भाईंदर मे सिव्हील हॉस्पीटल का दर्जा मिलना चाहीए, यह प्रयास किया जाना चाहीए।

**मा. आयुक्त :-**

साहब हमारा प्रायोरीटी फिक्स है की, फर्स्ट प्रायोरीटी इज गव्हर्नमेंट।

**गीता जैन :-**

सर व्हाय कान्ट? इफ दी ओनली प्रायलीटी

**मा. आयुक्त :-**

गव्हर्नमेंट सोर्स नो देन

**गीता जैन :-**

देन वी विल सी

**मा. आयुक्त :-**

ॲज ॲडमिनीस्ट्रेशन व्हिल गीव इन ऑल द थ्री ऑप्शन यु डिसाईड

**रोहिदास पाटील :-**

आमचे स्पष्ट मत आहे की राज्य शासनाकडे पाठवा.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, सर्व सभागृहाची दिशाभुल करुन कुठेतरी पळवाट काढु नका हॉस्पीटलचा गंभीर प्रश्न आहे काय प्रॉब्लेम आहे खाजगी शब्द काढुन शासनावर आपला विश्वास नाही का? एवढी चर्चा का करण्यात यावी. शासन आपलेच आहे तुमचा शासनावर विश्वास नाही का? एवढीच विनंती आहे की खाजगी शब्द काढुन शासनाला ह्या संदर्भात पाठपुरावा करावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मेहता साहेब आणि पाटील साहेब, विषय असा आहे की, खाजगी हॉस्पीटल आणि गव्हर्नमेंट हॉस्पीटलची तुलना आपण काय करतो. गव्हर्नमेंट हॉस्पीटल मध्ये सहजासहजी कोण जाऊ शकत नाही त्याची परिस्थीती अतिशय गंभीर आहे त्याच्यामुळे तिकडे करप्शन किंवा त्याची क्वालिटी एकदम थर्ड ग्रेडची आहे. माझी तुम्हाला विनंती आहे की.................

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

तुम्ही जो प्रस्ताव दिला आहे हे म्हणतात चालणारच नाही नक्की पहिलं करा.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, ह्याची संस्था वगैरे आहे का? किंवा ताब्यात घ्यायचा विचार आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम, माझी अशी विनंती आहे की, हा विषय आपण पोस्टपॉन्ड करु या.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

ठराव आहे.

**मा. महापौर :-**

तुम्हाला ठराव करायचा असेल तर करा

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, आपण दुसरा विषय घेता परंतु हा विषय आपण राखून ठेवला आहे का?

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) येथे टेंभा हॉस्पीटल इमारत बांधकाम मा. उच्च न्यायालय जनहीत याचिका क्र. ३८/२००६ मधील निर्णयाच्या अनुषंगाने मा. महासभा दि. १६/०४/२००७ ठराव क्र. ०३ अन्वये हाती घेण्यात आलेले आहे. सदर इमारतीचे काम पूर्ण होत आलेले आहे.

सदर हॉस्पीटल इमारत बांधकाम पूर्ण होऊन सर्व सोयीने कर्मचारी वर्ग नेमून हॉस्पीटल सुरु करण्यास होणारा खर्च पाहता व सध्याची महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता व सदर हॉस्पीटल महानगरपालिकेने चालविण्यास महानगरपालिकेवर खुप मोठा आर्थिक व प्रशासकीय भार पडेल.

सदर हॉस्पीटल खाजगी कंपनी अथवा खाजगी ट्रस्ट मार्फत चालविण्यास सोयी पुरविणे शक्य होईल. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर मा. उच्च न्यायालयात Civil Application दाखल करण्यास मान्यता देण्यास शिफारस केली आहे.

परंतु टेंभा हॉस्पीटल खाजगी संस्था किंवा खाजगी ट्रस्टला न देता महाराष्ट्र शासन राज्यशासना मार्फत चालविण्यात यावे.

या पुर्वी तत्कालीन आयुक्त मा. शिवमुर्ती नाईक, आरोग्य मंत्री मा. सुरेश शेट्टीजी व आमदार श्री. प्रताप सरनाईक यांच्या सामुहीक बैठकीत मा. आरोग्य मंत्री सुरेश शेट्टीयांनी आवश्वासन दिले आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हॉस्पीटलची इमारत पूर्ण झाल्यानंतर शासनाच्या ताब्यात दिल्यास शासनामार्फत पुर्ण हॉस्पीटलचा खर्च व देखभाल करण्यात येईल व तसेच सदर हॉस्पीटलला सीव्हील हॉस्पीटलचा दर्जा देण्यात येईल म्हणून सदर हॉस्पीटल महाराष्ट्र शासनातर्फे चालु करण्याचा प्रस्ताव शासनास पाठविण्यासाठी ही सभा मान्यता देत आहे असा ठराव मांडत आहे.

**प्रविण पाटील :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

मी दोन्ही ठराव घेत आहे ह्याचा निर्णय आपण नंतर घेऊ या.

**निलम ढवण :-**

मॅडम ठराव मांडला आहे मतदान करा.

**रोहीदास पाटील :-**

म्हणून आम्ही आग्रह करीत होतो की विचार करुन निर्णय घ्या.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव घेते हा पण ठराव घेते आपण एक डिसीजन घेऊ त्याचा आपण नंतर निर्णय घेऊ या.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, त्याचा निकाल लावायला लागेल.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

दुसरा विषय घ्या पण ह्याचा ठराव राखून ठेवा.

**मा. महापौर :-**

ह्याच्यावर आपण नंतर डिसीजन घेऊ या.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

निर्णय लंच नंतर घ्या पुढचा विषय घ्यायचा असेल तर आमची अनुमती आहे.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र.९, "मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी प्रवास व पुरक भत्ते विनियम २०११" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मा. महापौर मॅडम हे मान्य झालेलच आहे फायनल द्यायचे आहे. एका बाजुला अधिकाऱ्यांना प्रवास भत्ता हे सगळे द्यायचे खर्च वाढवायचा दुसऱ्या बाजुला जे सन्मा. सदस्य निवडुन आले त्यांना लेटरहेड, व्हिजीटींग कार्डही बंद केले गेले. ह्या सन्मा. सदस्याची एवढी वर्ष प्रथा होती की त्यांना सन्मान म्हणून त्यांना लेटर हेड आणि व्हिजीटींग कार्ड द्यायचो. मला तर भिती आहे की, भविष्यात पदाधिकाऱ्याच्या गाड्या नाही काढतील तर बरे आहे त्यांना गाड्या आणि प्रवास भत्ता द्यायचा आपल्याला प्रवास भत्ता तर नाहीच मानधन देखील खुप कमी आहे आणि लेटरहेड आणि व्हिजीटींग कार्ड देखील काढुन टाकले. आपल्याला ही विनंती आहे की, मा. आयुक्त महोदयांना रुलिंग द्यावे की, सन्मा. सदस्य जे निवडुन आले आहेत त्यांना लेटर हेड आणि व्हिजिटींग कार्ड हा त्यांचा सन्मान आहे हजार रुपयात काही फरक पडत नाही आपण बजेटला चार-पाच हजाराची बॅग देतो तर लेटरहेड आणि व्हिजिटींग कार्ड द्यायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

ते पण बंद झाले गेल्या वर्षापासून ते बंद आहे आणि प्रशिक्षण देखील बंद आहे.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

सभागृहाला असे वाटते का की, लेटरहेड आणि व्हीजीटींग कार्ड द्यायला पाहिजे आयकार्ड ह्यावेळेला सर्वात पहिले आलेले आहे.

**मा. महापौर :-**

कारण ते मी सांगितले.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

चांगली गोष्ट आहे आपण तो ही निर्णय द्यावा. मा. आयुक्त साहेब आपली भुमिका स्पष्ट करावी कायद्यात तरतुद नाही.

**भागवत मुरकुटे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो शासनाचे जे मुळ नियम आहेत सुरवातीला चार हजार भत्ता होता त्यामध्ये सर्व खर्च अभिप्रेत धरुनच तो चार हजार भत्ता मंजुर केला. पुढे त्याच्यात वाढ करुन तो सात हजार केलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

त्याच्यामध्ये इन्क्लूड आहे. मॅडम बघा, अधिकारी कसे गडबड करतात. मागच्या वेळेला जे अधिकारी होते त्याच्यावर गुन्हा दाखल व्हायला पाहिजे. त्यांना जसा पाहिजे तसा सोयीचा कायदा लावतात. विक्रम कुमार आले तर वेगळा कायदा, शिवमूर्ती नाईकचा वेगळा कायदा, तिसरे येतील तिसरा कायदा नक्की काय एक तरी डिसिजन व्हावे. हे उत्तर तुम्हाला पटते का? २००७ ला आम्हाला दिले.

**भागवत मुरकुटे :-**

मा. महासभेने जो पहिला ठराव घेतला होता ते महासभेच्या ठरावात अंतर्भूत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ॲग्री करतो ना मग मागच्या वेळेला तुम्ही लेटरहेड आणि व्हिजीटींग कार्ड का दिले नाही. आम्ही आहे ते भरुन देऊ पण जे गेले त्यांच्याकडून कसे वसूल करणार. मॅडम, विषय तो नाही विषय असा आहे की, अधिकारी दरवेळेला त्याच्या सोयीचा कायदा लावतात. त्यावेळेला दिले म्हणजे त्यावेळेला ह्या लोकांनी महापालिकेचे नुकसान नाही केले का? लेटरहेड, व्हिजिटींग कार्डमध्ये आपल्याला राजकारण करायचे आहे का? सर्व सन्मा. सदस्य मग ते कुठल्याही पक्षाचे असू दे त्याला मानसन्मान त्यांचा राखावा ही विनंती आहे.

सात हजारमध्ये मॅडम तुम्हाला माहित आहे. महापालिकेमध्ये यायला जायला चार वेळेला सभा तहकुब झाली सात हजार संपले. मी सभागृहाची भावना म्हणून बोलतो जे सन्मा. सदस्य नविन आले आहेत त्यांना व्हिजिटींग कार्ड आणि लेटरहेड त्यांना दयावे ही इच्छा असते. मा. महापौरांना गाडी आहे तो त्यांचा सन्मान आहे.

**प्रभात पाटील :-**

ती खाजगी वस्तू नाही त्याचा दुरुपयोग होईल. मला असे वाटते की, तो त्याचा सन्मान आहे. महापालिकेचे एकच एक लेटरहेड असणे हा महापालिकेच्या विविध पक्षाचा एकीकरणाचा भाग आहे. अतिरिक्त भाग सुध्दा होत नाही. कारण पेपरसाठी सर्वात कमी खर्च होतो. तुम्ही पुढाकार घ्यावा. आणि आज निर्णय देऊन टाका. सगळयांमध्ये तो स्थायीभाव असावा आणि असे करण्यात यावे.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर निधीमधून करा.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर, मा. आयुक्त साहेब प्रशिक्षणाचा जो प्रश्न आहे. नविन सदस्य निवडून आले आहेत. मी विनंती करते की, प्रशिक्षणासाठी जवळ किंवा लांब पाठवावे. आपण तज्ञ आहात. नविन सदस्यांना प्रशिक्षण आवश्यक आहे.

**मा. महापौर :-**

साहेबांनी ३ जानेवारीला ह्याच सभागृहात प्रशिक्षण ठेवले आहे. सर्वांना यायचे आहे.

**वंदना चक्रे :-**

ह्या सभागृहात नको. ह्या सभागृहात आले की महासभा होते. मा. आयुक्त महोदय, आपण तज्ञ आहात, एवढे शिकलेले आहात. ह्या सभागृहाला मिरा-भाईंदर शहाराला विकासाच्या कामाला आपण लाभलेले आहात तर आमची विनंती आहे की, आपण प्रशिक्षणासाठी बाहेर दौरा काढावा. साहेब उत्तर दया.

**मा. महापौर :-**

मी आयुक्त साहेबांशी बोलते आणि आपल्याला जे प्रशिक्षण बाहेर करायचे आहे ते मी त्यांना सांगते. सर्व नविन आहेत एक दुसऱ्यांची सगळयांना ओळख होईल. वी हॅव टू नो इच अदर. प्रशिक्षणामध्ये सर्व एकत्र असतात. तिकडे नो पार्टी, नो इंडिव्ह्युजवल काही नसते. मी पण मा. आयुक्त साहेबांना रिक्वेस्ट करेन ते प्रशिक्षण आपण करु या?

**प्रभात पाटील :-**

लेटर हेड आणि व्हिजिटींग कार्ड करायला सांगा.

**जुबेर इनामदार :-**

विषय निघाला म्हणून बोलतो, प्रशिक्षणाची आम्हाला आणि सचिवानाही गरज आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिकेचा महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिकेची माहिती त्यांनी सदस्यांना उपलब्ध करुन दिली नाही. आयुक्त महोदय, माझी तुम्हाला विनंती आहे. आमचे ज्येष्ठ सचिव पुन्या जिल्ह्यामध्ये हरिभाऊ होते त्यांना त्यांचे स्थान सन्मानाने परत दयावे सर्व सभागृहाची तशीच भावना असावी. सभागृहामध्ये मी तुम्हाला विनंती करतो.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आपले गटनेते भगवती शर्मा इथे नाही आहेत. हरिभाऊ ह्यांना सर्वजण मान सन्मान देतात. मागच्या एक वर्षात जे काही झाले. आपल्या पक्षामार्फत देखील त्यांची तक्रार आपण गव्हरमेंटकडे केली आहे की, सचिवाचे जे कामकाज आहे ते निर्णय एकदम ठाम नाहीच आहेत. त्याबद्दल निर्णय झाला आहे बाकी जे सभागृहाला वाटेल ते करावे. विषय मॅडम लेटर हेड आणि व्हिजिटींग कार्डसाठी आपण आपसात चर्चा करुन घ्या दिले तर बर नाही दिले तर निर्णय द्यावा.

**प्रभात पाटील :-**

ह्यांची भुमिका आहे की त्यांनी चेंज करायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

व्हिजिटींग कार्ड आणि लेटरहेड ह्याची मी त्यांना रिक्वेस्ट केली आहे. आपल्याला देतील. दुसऱ्या वेळेला आपण जी.आर पाठवून मानधन वाढवून घेऊ या. सात हजार पेक्षा दहा हजार करुन घ्या मग आपण व्हिजिटिंग कार्ड आणि लेटरहेड स्वतःच बनवून घेऊ या.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम नविन नगरसेवकांचे स्टॅम्प आणि प्रमाणपत्र त्यांना मिळाले नाही त्यांची शासनाकडे काय प्रोसिजर आहे ती लवकरात लवकर घ्यावी.

**मा. महापौर :-**

आपले नाव नोंदवण्यात येईल आणि आपण तहसीलदारकडे जाऊन घ्यायचे आहे. त्याची माहिती सचिव करुन देतील.

**वंदना चक्रे :-**

पूर्ण विषय राहिलेला नाही मी मध्ये स्पष्टीकरण करते त्याला किती वेळ लागणार.

**मा. महापौर :-**

तेथून आलेना की, सचिव साहेब आपल्याला सांगतिल ते आपण जाऊन घेऊन या.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, महत्वाचा विषय प्रवास भत्ता मान्य करण्याबाबत त्यावर ऑल रेडी मान्यता झालेली आहे. मा. आयुक्त साहेब, जे अधिकारी शहराच्या बाहेर प्रवास करतात त्यांना प्रवास भत्ता दिला पाहिजे. मिरा भाईंदरमध्ये आपण त्यांना २२,०००/- वेहिकलचे देतो. किंवा १७,०००/- जे काही असेल ते मॅडम आपण त्यांना देतो. जे अधिकारी बाहेर जात नाही त्यांना देखील प्रवासभत्ता देतो. माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, १५ ते २० अधिकारी असतील त्यांना आपण प्रवास भत्ता देतो. त्या जागेवर दोन किंवा तीन सामूहिक वेहीकल ठेवली तर कोणीही तिकडे घेऊन जाऊ शकतो. कधीही कोणीही गाडी वापरू शकतो. खांबित साहेब, बारकुंड साहेब, वडके मॅडम किंवा डॉ. पडवळ असू दया. ते अख्खा दिवस बाहेर फिरत नाही. २४ तास बाहेर नसतात, कार्यालयामध्ये असतात काही वेळेला जायचे असेल तर तीन-चार गाडया ठेवा म्हणजे त्या घेऊन जातील. आपण सर्वांना पेमेंट करतो जेव्हा ॲब्सेन्ट असतील ते देखील पेमेंट जाते. लोकल एरियामध्ये फिरण्यासाठी त्यांना प्रवास भत्ता साहेब आपली महापालिका एवढी नक्कीच श्रीमंत नाही. ते जात असतील तर आम्ही काय प्रवास भत्त्याला विरोध करीत नाही. पण ते जातच नाही. दहा तासामध्ये सात तास केबीनमध्ये किंवा महापालिका वास्तूमध्ये असतात त्यांना हा भत्ता नाही दिला तरी चालेल. आणि जर त्यांना जायचे असेल तर २-३ वेहिकल ठेवा जेव्हा साईडवर जायचे आहे तेव्हा ते जातील. तुम्हाला आणि मला माहित आहे की, कोणताही अधिकारी पूर्णदिवस साईडवर नसतात ही सभागृहाची सुचना आपल्याला पटत असेल तर ह्या सुचनेचा समावेश करण्यात यावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने मा. निवृत्त उपसचिव श्री. फ. ब. खान सो. यांचेकडून प्रारुप मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५९ अन्वये महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी प्रवास व "मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी प्रवास व पुरक भत्ते विनियमन २०११" तयार करुन घेण्यात आले आहेत. सदरचे प्रारुप नियमन दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरीकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द करुन प्राप्त झालेल्या सुचनांच्या अनुषंगाने सदर विनियमन मध्ये आवश्यक ते फेरबदल करण्यात आले आहेत. तरी सदरच्या प्रारुप विनियमन मसुद्यास ही सभा अंतिम मंजूरी देत असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम ती सूचना घेता का?

**मा. महापौर :-**

ते काय म्हणतात की हा जो भत्ता आहे तो लोकलसाठी नाही तर जेव्हा ते बाहेर आऊट ऑफ ट्रॅव्हल करतात त्यासाठी आहे. जेव्हा ते जातील फॉर दॅट इट इज.

**नरेंद्र मेहता :-**

एखादा व्यक्ती दोन दिवस दिल्लीला गेला ३-४ दिवस तिकडे त्याचा खर्च पडतोच आहे. वेहिकलचे भाडे आपण देतोच म्हणजे पर डे ५०० रु. ते पण देतो. म्हणजे लोकली जे अधिकारी आहेत त्यांना तो भत्ता दयायची आवश्यकता नाही. ज्याचे कामच नाही बाहेर जायचे माझा तो विषय आहे. मी त्याला विरोध करत नाही. ज्यांना जायचे आहे त्यांना कॉर्पोरेशनची २-३ वेहिकल असतील. सगळे अधिकारी महापालिका सोडून जात नाहीत. त्यासाठी सामूहिक वेहिकल ठेवावी. दे आर गोईंग आऊट वी आर पेईंग लोकली महिन्याला फिक्स केले आहेत ते पण देतो.

**मा. महापौर :-**

याच्यावर आपण विचार करु या. ठराव मी मंजुर करुन घेत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

यावर विचार करुन मा. आयुक्त साहेब, यावर पॉझिटिव्ह नेस मला खात्री आहे.

**प्रकरण क्र. ०९ :-**

"मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी प्रवास व पुरक भत्ते विनियम २०११" मसुद्यांस अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबत.

**ठराव क्र. १३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने मा. निवृत्त उपसचिव श्री. फ. ब. खान सो. यांचेकडून प्रारुप मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५९ अन्वये महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी प्रवास व "मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी प्रवास व पुरक भत्ते विनियमन २०११" तयार करुन घेण्यात आले आहेत. सदरचे प्रारुप नियमन दैनिक वृत्तपत्र तसेच शासन राजपत्रात नागरीकांच्या सुचना व हरकतींसाठी प्रसिध्द करुन प्राप्त झालेल्या सुचनांच्या अनुषंगाने सदर विनियमन मध्ये आवश्यक ते फेरबदल करण्यात आले आहेत. तरी सदरच्या प्रारुप विनियमन मसुद्यास ही सभा अंतिम मंजूरी देत असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये शासनाकडे कायम करणेकरीता पाठविण्यास मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

जेवणाचा ब्रेक देत आहे. ३ वाजता सगळयांनी इकडे जमायचे आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब सभेला सुरुवात करा.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०, पी.पी.पी. तत्वावरील चालविण्यांत येणाऱ्या परिवहन उपक्रमामधील प्रवासी तिकीट दरांत वाढ करणेबाबत, हा विषय मागे घेण्याबद्दल पत्र आलेले आहे.

**मा. महापौर :-**

विषय मागे घेतलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

कारण

**प्र. नगरसचिव :-**

शासनाकडे मंजुरीसाठी विषय दिला होता त्याच्यावर शासनाची मंजुरी आलेली आहे म्हणून हा विषय महासभेपुढे मागे घेतला आहे.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

कशाला मंजुरी आली आहे दरवाढीला?

**प्र. नगरसचिव :-**

तिकीट दरवाढीला

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

कधीपासुन

**प्र. नगरसचिव :-**

सप्टेंबर पासून माहे सप्टेंबर २०१२

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

प्रशासनाने विषय चुकून दिला होता का?

**प्र. नगरसचिव :-**

माझ्याकडे विषय आधीच दिलेला होता जो पेंडींग होता त्याप्रमाणे मी घेतला होता त्यानंतर हे पत्र प्राप्त झालेले आहे.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मॅडम आज जो विषय मागे घेतला आहे चुका होतात त्याबद्दल काय म्हणणे नाही आपल्या निदर्शनास आणून द्यायचे क्रिस्टल इन्फ्रास्ट्रक्चर ह्या नावाची कंपनी आपण बी ओ टी तत्वावर दिलेली आहे आणि आजही आपण तसाच गोषवारा सादर केलेला आहे आपण प्रत्यक्ष बघितले तर क्रिस्टल हे मिरा भाईंदरमध्ये अस्तित्वातच नाही जे ड्रायव्हर आणि कंडक्टर आहेत, तेच पैसे घेतात तेच पगार करतात आणि घरी घेऊन जातात हि परिस्थीती आहे क्रिस्टल कुठेही नाही जी परिस्थीती आहे ते आम्हाला अधिकाऱ्यांनी क्लिअर करावे.

**मा. महापौर :-**

आपण नंतर बोलुया.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मॅडम नंतर कसे बोलणार एवढा गंभीर विषय आहे.

**मा. महापौर :-**

हा विषय रद्द झालेला आहे तर हे नेहमीच होईल जर असा विषय कधी रद्द झाला तर सर्वच बोलत बसतील तुम्ही एकटे बोलणार असे नाही इकडुन बोलणार तिकडुन बोलणार मग ह्याच्यावर चर्चा होणार.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मॅडम विषय आलेला आहे आम्ही वेगळे कांही बोलत नाही.

**मा. महापौर :-**

मला ऑलरेडी लेटर प्राप्त झालेले आहे की रद्द झालेला आहे.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

आमचे तसे म्हणणे आहे की क्रिस्टल कंपनी ह्या शहरात नाही मग बस नक्की होण चालवतो कोण पैसे कोण घेऊन जातो? पैसे जातात कुठे क्रिस्टल कंपनी कुठेच नाही सावंत साहेबांनी खुलासा करावा आता बस कोण चालवते महापालिका चालवते की सामान्य माणुस चालवते कोण चालवते? मॅडम, आपण स्वतः आपण जेव्हा रिक्षाचे पैसे वाढले तेव्हा आपल्या वॉर्डमध्ये बावन जिनालय मध्ये आपण बस चालू केली त्यावेळेला आपण त्याचा पाच रुपये रेट ठरवला आणि आजही त्या रेटमध्ये बस चालतात त्याबद्दल आपले अभिनंदन, मॅडम, मला सांगा मुर्धा गाव त्यापेक्षा जवळ आहे तिकडे आठ रुपये भरतात आणि गाडीने दोन्ही स्टॉप किमी चेक केले त्याला पाच रुपये आणि त्यांना आठ रुपये मी महापौर असताना माझ्या वॉर्डमध्ये अशी स्पेशल सुट नव्हती.

**मा. महापौर :-**

मी माझ्या वॉर्डासाठी केले नाही मी संपूर्ण मिरा भाईंदर साठी केलेले आहे कोणी बोलावं मी माझ्या वॉर्डासाठी केलेले आहे ती माझ्या वॉर्डमध्ये जात नाही ती मिरा भाईंदरमध्ये रिंगरुट बस जाते इट इज नॉट फॉर माय बेनीफिट इट इज बेनिफिट ऑफ पिपल ऑफ मिरा भाईंदर इट इज नॉट फॉर माय वॉर्ड अलोन.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

अधिकारी आपली दिशाभुल करतात आपण मुर्ध्यापर्यंत गेलो तर कि मी जवळ आहेत आणि जैन मंदीर लांब आहे एकाला पाच रुपये आणि एकाला आठ रुपये ह्या विषयाबाबत मा. ढगे साहेबांकडे उत्तन रहिवासी आणि राई मुर्धातील रहिवास्यांनी रितसर तक्रार केली होती की, आमच्यावर अन्याय होतो आहे जे शासनाने जे रेट ठरवले आहेत त्याच्यापेक्षा जास्त पैसे घेतले जातात मग साहेबांनी एक कमिटी ठरवली त्याच्यात दोन्ही जण जाऊन जॉइन्टली सर्व्हे करुन आले की हा किती कि मी आहे त्या कि मी बद्दल सर्व माहिती असताना त्याच्या एक स्टॉप पुढचे भाडे घेतले जाते. आज उत्तनच्या रहिवाश्यांची फसवणुक केली जाते. राई, मुर्धा, मोरवा कुठल्या हिशोबाने एकाला पाच रुपये एकाच शहरातला नागरीक कुठली कंपनी बस चालवते मला क्लीअर करा ना आम्ही कोणाला पकडायचे ह्या शहरात क्रिस्टल नावाची कंपनीच नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, दिपक सावंत ह्या डिपार्टमेंटचे इनचार्ज आहेत तुम्ही त्यांना जाऊन भेटा.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

ते भेटले ते बोलले की कंपनी बंद झाली आहे. सावंत साहेबांना आम्ही भेटलो ते बोलले क्रीस्टल कंपनीवाले येत नाहीत. मॅडम हे तुम्हाला बरोबर वाटते का? ड्रायव्हर आणि कंडक्टरच पैसे घरी घेऊन जातात डिझेल तेच भरतात आणि गाडी पार्किंग करुन निघुन जातात.

**मा. महापौर :-**

दुसऱ्या महासभेत हा विषय रितसर अजेंड्यावर घेऊन ह्याच्यावर बोलू.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मॅडम, हे उत्तर झाले का? राई, मुर्धा मोरवा आणि उत्तन वाल्यांनी जास्त पैसे भरायचे का?

**मा. महापौर :-**

आपण दुसऱ्या महासभेत घेऊ.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मग तुम्ही सांगा त्यांना.

**मा. महापौर :-**

मी दुसऱ्या महासभेत घ्यायला सांगते आणि तुम्ही मला एक पत्र द्या की महासभेत हा विषय घ्यायचा आपण ह्याच्यावर डिस्कस करु.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

तिथपर्यंत त्यांनी ज्यादा पैसे द्यायचे का?

**मा. महापौर :-**

एवढे महिने दिले ना अजून १५-२० दिवस लागतील आपण करु या रितसर करु या आज कसे सांगते एवढे दिवस काही बोलले नाही. तुम्हाला एवढच होत तर यु शुड हॅव टोल्ड बिफोर

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मला तर दहा मिनिटा अगोदरच समजले की हे विषय तुम्ही मागे घेता आणि मला माहित नाही की तुम्ही एक तारखेची सभा दोनला, तिनला नाही लावणार आम्ही ऑगस्ट पासून वाट बघतो. आज लागेल, उद्या लागेल, परवा लागेल.

**मा. महापौर :-**

मा. गुजराल साहेब, वारले म्हणून ती सभा तहकुब केली नाहीतर एक तारखेला सभा झाली असती.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मॅडम नियमाप्रमाणे जे भाडे असेल ते घ्या.

**जुबेर इनामदार :-**

तिकीटापेक्षा जास्त पैसे घेतात असे आपल्याला म्हणायचे आहे जो विषय चर्चेला नाही त्याच्यावर निर्णय कसा देता येईल (सभागृहात गोंधळ)

**संदीप पाटील :-**

मा. महापौर मॅडम, राई मुर्धा, मोरव्याला किती लोकांना बसचा त्रास होतो. उत्तनवाल्यांना किती त्रास होता. कारण सकाळी बस मधुन लटकत जातात आणि मोरव्यापर्यंत आता बारा रुपये घेतात पहिले आठ रुपये घ्यायचे चार रुपये दरवाढ केलेली आहे प्रशासनाने केली, शासनाने केली त्याच्यामध्ये आपला ठराव...........

**मा. महापौर :-**

अजेंड्यावर आलेला विषय तुम्ही वाचलेला ना. मग एकदा तरी मला येऊन सांगायचे ना त्यांना हे रद्द केले पण आपण प्रश्नोत्तर केले असते किंवा लक्षवेधी घेतली असते. त्याच्यावर काही तरी डिस्कस केले असते.

**संदीप पाटील :-**

माझा बोलण्याचा तात्पर्य हे की, जर शासनाने मंजुरी दिली होती तर त्याचा गोषवारा काढायला पाहिजे होता.

**मा. महापौर :-**

हे रद्द झाल्याचे लेटर आलेले आहे.

**संदीप पाटील :-**

ते लेटर आज आलेले आहे मुर्धा ते उत्तनच्या लोकांचे किती हाल होतात.

**मा. महापौर :-**

आपण अजेंड्यावर रितसर घेऊ आणि करुया.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मॅडम आमची विनंती आहे की, प्रशासनाने नियमाप्रमाणे करावे अन्यथा प्रशासनाला विरोध राहिल आणि सांगावे लागेल की पैसे देऊ नका आपण त्याची नोंद घ्यावी त्याला जबाबदार अधिकारी राहतील.

**संदीप पाटील :-**

मा. महापौर मॅडम, पुढच्या महासभेला अजेंड्यामध्ये हा विषय नमुद करुन घ्या.

(सदरचा विषय मागे घेण्यात आला.)

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र.११, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ५० द.ल.ली. योजने अंतर्गत On line Booster पंप बसविण्याच्या कामास मान्यता मिळणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ५० द.ल.ली. योजने अंतर्गत सर्वे नं. ७७७, सुदाम नगर, कमला पार्क व गोडदेव येथील संप व पंप हाऊस अद्याप पूर्ण झालेली नाही. सदर काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत होते. सदरचे संप व पंप हाऊस पूर्ण न झाल्यामुळे वरील जलकुंभ गुरुत्ववाहिनीने भरण्यात येत आहे. सदर पाणी पुरवठा ४५ ते ४७ तासांवर सद्यस्थितीत होत आहे. पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा On line Boosting पंप बसवून करणे शक्य आहे.

सदर काम भाईंदर (पुर्व) रेल्वे फाटक येथे On line Boosting पंप बसवून Latest Technology नुसार व सद्यस्थितीत मिरा भाईंदर शहरास होणारा पाणी पुरवठा विचारात घेता वरील चार संपच्या ठिकाणी असलेल्या जलकुंभांना रेल्वे फाटक येथून On line Boosting पंपींग मशिनरीद्वारे पाणी पुरवठा करता येईल. सदरचे बुस्टींग पंपाद्वारे पाणी पुरवठा केल्यास वरील चारही ठिकाणी पंपींग मशिनरी बसविण्याची आवश्यकता नाही. केवळ एकाच ठिकाणी On line Booster पंप लावून पंपींग करून रेल्वे फाटक येथे मिळत असलेल्या पाण्याच्या दाब वाढवून वरील ठिकाणच्या इलेक्ट्रीक बिल तसेच निगा देखभाल व दुरुस्तीच्या खर्चात बचत होणार आहे. सदर पंप बसविल्यामुळे वरील भागातील पाणी पुरवठयात सुधारणा होणार असून पाणी पुरवठ्याचे तास कमी होणार आहेत.

सदर कामाकरिता <u>रु.४७०.०३</u> लक्ष एवढया रक्कमेचे अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे. तसेच याबाबत निविदा मागविण्यास व पुढील कार्यवाहीसाठी ही सभा मा. आयुक्त यांना प्राधिकृत करित आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

ठरावाच्या दोन गोष्टी आहेत ह्यांनी ठराव मांडला त्यांनी अनुमोदन दिले तुमच्या दृष्टीने तो ठराव झाला आम्ही पक्ष म्हणुन ह्याच्यावर भुमिका मांडु इच्छितो जेव्हा बुस्टर पंप लावतेवेळी आता असलेले पाणी वितरण करणार आहात त्याचा टेक्नीकल माणुस कोण आहे. सभागृह नेत्यांनी ठराव मांडला आहे. शंभर नगरसेवक बसले आहेत त्यांना विषय समजला का? आपण ही पाणीपुरवठा योजना एम जी पी सांगितले एम जी पी कडे आपले साडेतीन करोड संम्प आणि पंप ह्या सिस्टीमसाठी आम्ही त्यावेळेला विरोध करीत होतो ही योजना आपली साकार होणार नाही यशस्वी होणार नाही ती पूर्ण झालीच नाही त्याची आवश्यकता नाही असे सांगत होतो पण ते केले पंप आले, मशिन आल्या मशिन कुठे गेल्या त्याचे निवेदन सभागृहात कोणीतरी करायला पाहिजे साडेतीन कोटी रुपये मशीन आहेत मशिन आपल्या नावावर आल्या त्याचे पैसे आपल्या नावावर लागले. आम्ही त्यांना पत्र दिले होते की, ह्या मशिन कुठे गेल्या त्याचे उत्तर द्या किंवा ह्याचे पैसे महापालिकेकडे जमा करा. कशाचेही उत्तर आलेले नाही आपल्या पाणी खात्याच्या अधिकाऱ्याने ह्याच्यावर चर्चा करायला पाहिजे. चांगल्या गोष्टीला विरोध करायचाच नाही आम्ही चांगल्या कामासाठी सदैव तुमच्या पाठीशी राहू पण जे करतोय ते काय करतो ते समजायला पाहिजे जे आहे त्याचे ठिकाण नाही आहे जे वाटायला पाणी नाही आणि पून्हा आपण पंप लावतोय ते पंप कशासाठी लावतो त्याचा खुलासा करावा.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम माझा पण एक प्रश्न आहे त्याचा करारनामा झालेला आहे. आपण नविन आणणार आहात की काय करणार त्याचा खुलासा करावा

**सुरेश वाकोडे:-**

मा महापौराच्या परवानगीने बोलतो आपण ही जी सिस्टीम बूस्टर पंपाचा जो प्रस्ताव महासभेत ठेवला आहे हा प्रस्ताव फाटक येथे बूस्टर पंप लावायचा आज परिस्थीती काय आहे की, भाईदर वेस्ट भागामध्ये ४८ तासावर पाणी सोडत असतो तो पाणीपूरवठा तास कमी करण्याचा हा प्रयत्न आहे बाकी ठिकाणी आपण व्हॉल्व कंट्रोल करू शकतो पण इथे दोन्ही लाईन असताना व्हॉल्व ओपन असताना पाणी जे पूढे जाते तेच मिळते जर हा बूस्टर पंप बसवला येणारे जे पाणी आहे त्याचा प्रेशर २.५ किंवा २.६ असेल तो प्रेशर इन्क्रीज होईल त्यामूळे इ.एस.आर. भरायला कमी वेळेत इ.एस.आर. भरतील आणि शहरामधील पाणी पूरवठयाचा तास कमी होईल हा तास कमी करण्यासाठी हा बूस्टर पंप आहे जून्या टेक्नोलॉजी मध्ये संम्पानी पाणी घ्यायचो नंतर पंप करायचो आणि प्रेशर किल करायचे आता आपण २.६ मिटर म्हणजे २६ मिटरचा हेड आहे २६ मिटरला आपण ३२ मिटरचा हेड येणार त्याच्यात ६ मिटर फक्त हेड वाढवणार त्याच्यामध्ये सगळया टाक्यामध्ये पाणी पूरवठा करणार भाईदर वेस्टच्या ४ टाक्या आणि गोडदेवची टाकी हयामध्ये होणार त्यामुळे गोडदेव परिसर भाईदर वेस्टचे जे टाईमिंग आहेत ते कमी येतील आणि शहराला पाणी पूरवठा सूरळीत होऊ शकेल.

**रोहिदास पाटील :-**

बूस्टरचा डिस्चार्ज काय आहे आपल्याला किती एम.एल.डी. पाणी येते.

**सुरेश वाकोडे :-**

आपल्याला १२० एम.एल.डी. पाणी येते.

**रोहिदास पाटील :-**

१२० एम.एल.डी किती तासामध्ये बूस्टर फेकेल एकच बूस्टर काम करेल ना पाणी पाठवायचे काम एकच बूस्टर करेल ना? एका बूस्टरचा २४ हवर्समध्ये त्याचा डिस्चार्ज किती आहे १२० पेक्ष १३०,१४० एम.एल.डी.च्या डिस्चार्जचा जर बूस्टर असेल तरच सक्सेस होईल अन्यथा सभाग्रहाची तुम्ही मान्यता घ्याल पण त्याचा काही उपयोग होणार नाही मी त्याचा टेक्नीकल पर्सन आहे मला त्याची कॅपेसिटी किती आहे ते सांगा एका वेळेला असच असेल तर गुरूत्वाकर्षणाने भरायचे नाही बूस्टरने भरायचे आहे तर या बूस्टर पंपाचह क्षमता एवढी असली पाहिजे की २४ तासामध्ये १४० एम.एल.डी. पाणी फेकले पाहिजे. १२० एम.एल.डी. पाणी येते आणि २० एम.एल.डी. अजून येणर आहे त्याचा टेक्नीकल डाटा काय आहे ते सांगा ह्याची किंमत किती?

**सुरेश वाकोडे :-**

४ कोटी ७० लाख

**रोहिदास पाटील :-**

कोणत्या कंपनीचा आहे

**सुरेश वाकोडे :-**

साहेब हा प्रस्ताव आहे

**रोहिदास पाटील :-**

साहेब कोणाचे तरी इस्टीमेट घेतले असेलच ना की आपल्या मर्जीने चार कोटीचे किंमत काढली नाही जर्मन डिझाईन आहे, जापनिस्ट डिझाईन आहे, कोणती डिझाईन आहे?

**सुरेश वाकोडे :-**

असे पंप आपण कापूर बावडीला बसवले त्याचा परफोमन्स बघितला तो सक्सेस झाला कापूर बावडीला अशी ऑनलाईन बूस्टरची सिस्टीम बसवली एम.आय.डी.सी चा पंप होता तिथे ही सिस्टीम बसवली आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्या कापुरबावडीच्या पंपाचं डिस्चार्ज किती आहे?

**सुरेश वाकोडे :-**

३० एमएलडी तो भरतो.

**रोहिदास पाटील :-**

२४ तासामध्ये

**सुरेश वाकोडे :-**

२४ तासामध्ये

**रोहिदास पाटील :-**

ह्याचं डिस्चार्ज किती आहे?

**सुरेश वाकोडे :-**

आता इथ आपण बसवतो आपण त्याचा ४० एमएलडीचा डिस्चार्ज आहे.

**रोहिदास पाटील :-**

मग आपल्याला १४० एमएलडी चा जर बुस्टर पंप ला आहे ना तर सिस्टमचं फेल होईल ना मी तुम्हाला आग्रह करणार आता जसे आम्हाला पूर्वेला ७२ तासात पाणी येते तिथे ७२ तासाचे ४८ तासात कसे येणार? मी आग्रह केला मॅडम तुम्ही महापौर आहात म्हणून तुमचाही मान ठेवण्यासाठी तुम्हीही आग्रह करणार त्यांच्यावर हे ही प्रेशर करतील तेही प्रेशर करतील ते पाणी पोहोचेल कसे? एका ठिकाणाहून केंद्रीत होत असेल तर त्याची जे येणारं पाणी आहे ते तीनपट क्षमतेच्या.

**रवी व्यास :-**

लेकीन १२० एमएलडी पुरा भाईंदर वेस्ट मे थोडी आ रहा है जो आप बोल रहे हो।

**रोहिदास पाटील :-**

उन्होने जवाब दिया है की एकही सेक्शन को पानी पहूचेगा।

**रवी व्यास :-**

भाईंदर वेस्ट मे लगा रहे है।

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

तुमच्या बुस्टर पंपाने कुठे पाणी पोहोचेल अशी तुमची सिस्टम आहे.

**सुरेश वाकोडे :-**

बुस्टर पंपाने भाईंदर वेस्ट आणि गोडदेवला पाणी पुरवणार भाईंदर वेस्ट आणि गोडदेवची रिक्वायरमेंट आहे त्याप्रमाणेच आपण बुस्टर पंप बसवतो ॲडीशनल नाही बाकी ठिकाणी प्रेशर मेन्टेंन होते त्याठिकाणी प्रेशर मेंन्टेन होत नाही आपण मागुन कितीही पाणी वाढवायचा प्रयत्न केला.

**रोहिदास पाटील :-**

दोनच एरीया येतील.

**सुरेश वाकोडे :-**

दोनच एरीया येतील बाकी एरीया येत नाही.

**रोहिदास पाटील :-**

दोनच एरीया मध्ये आपण जी पाईपलाईन पास करतो ते किती कोटीचे काम आपण केले रेल्वेच्या खालून पाईपलाईन टाकतो. त्यावेळची तुमची टिप्पणी वाचा की भाईंदर पश्चिमचा पाणीपुरवठा सुधरवण्यासाठी रेल्वेकडे आपण इतके प्रयास केले आपला पुष्कळ पत्रव्यवहार झाले नंतर मान्यता मिळाली ते काम लेट झाले ते काम पूर्ण करायच्या आधी तुम्ही दुसरी मान्यता घेता त्याचे रिझल्ट घेतलेले नाही. आता अस्तित्वात असलेली ४०० ची पाईपलाईन बदलून आपण ६०० ची टाकणार आहोत ६०० ची पाईपलाईन टाकायचे काम मंजुर केलेले आहे ठेका दिलेला आहे. ज्या कंपनीला ठेका दिलेला आहे ज्या कंपनीला ठेका दिला आहे त्याचे काम चालू आहे त्याचे रिझल्ट घेतलेच नाही त्याच्याआधी तुम्ही अजून चार कोटीची मान्यता घेता.

**सुरेश वाकोडे :-**

जे काम चालु आहे ते रेल्वेखाली लाईन मोठी करण्याचे काम चालू आहे. लाईन मोठी केल्याने त्याच्यात पाण्याचे प्रेशर वाढवणे पाण्याचे प्रेशर वाढवण्यासाठी सिस्टीम कशी होती संम्प मध्ये पाणी घ्यायचे आणि ते नंतर पंप करायचे चार ठिकाणी पंपिंग मशीन बसवली.

**रोहिदास पाटील :-**

वाकोडे साहेब, ४०० ची लाईन ६०० ची केल्याबरोबर आता असलेली २.८,२.७,२.६ प्रेशर हे जर कंट्रोल केले नाही तर ते २.३ होईल.

**सुरेश वाकोडे :-**

तसे काही होणार नाही कारण ते ऑन लाईन बुस्टींग आहे ह्याचा रिसीव्ह हेड आहे रिसिव्ह हेडने आपण घेणार त्यामुळे काही डिस्टर्ब होणार नाही उलट काय होणार माहित आहे ही सिस्टम बसवल्यामुळे आपण चार संपला आपली पंपिंग मशिन बसवायची गरज पडणार नाही. चार ठिकाणच्या इलेक्ट्रीक बिलामध्ये बचत होणार आणि चारही ठिकाणी चार वॉचमन ठेवणार ते आस्थापनाचे असतात त्याची गरज पडणार नाही एका ठिकाणाहून आपण पूर्ण एरीया कंट्रोल करु शकु ही टेक्नीकली साऊंड सिस्टीम आहे हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंत्यानी सर्व चेक केले आहे आणि त्यानी ह्याला टेक्नीकल सॅक्शन दिलेले आहे त्यामुळे ह्या सिस्टीममुळे सुधारणाच होणार आहे वेस्टला पाणीपुरवठा कमी होणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाबरोबर आपण २० वर्षे झाले भांडत आहोत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मिरा भाईदरसाठी त्यांनी कधीही स्पष्ट हेतुने काम केलेलं नाही आपण त्याच्यावर अनेक आरोप केले आणि ते आरोप खरे ठरले. त्यांच्याकडुन काही पैसे परत मिळवले परंतु ते पैसे भांडुनच परत मिळवले हे डिझाइन देतील ते तुम्ही समजुन घ्या पाणी पुरवठा योजनेसाठी कोणाचाही विरोध राहणार नाही परंतु त्यांनी दिलेले डिझाईन असेल आणि तुमची खात्री पटली असेल तर रिस्पॉन्सीब्लीटी तुमची राहील आमच्या दृष्टीने त्याचे उचित शासन म्हणजे आम्हाला शक्यता कमी वाटते तुम्ही मोठी लाईन घेता तर त्याचे रिझल्ट तरी घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम मागच्या वेळेला आपण राष्ट्रीय कॉंग्रेसने ठराव केलेला होता सम्प आणि पम्पचा साडेतीन करोड खर्च आहे जी पाईपलाईन ईस्ट ते वेस्ट खाली टाकली तेही एम जी पी चे काम होते तेही आपण केले कारण त्यांना परवानगी मिळाली नाही माझ्या माहितीप्रमाणे आपल्याला त्याच्याकडुन साडेपाच कोटी वसुल करायचे होते आणि मागच्या ठरावामध्ये आपण नमुद केले होते आपल्याकडुन ठराव मांडला गेला होता मग ते पैसे दिले नाहीत तर त्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करा ते पंम्प आणि सम्प दोन्ही तर सडलेच जे अर्धवट काम आहे तेदेखील बेकार झाले आपल्याला अजून पैसे टाकायला लागतील ते काय करणार नाही पण महापालिकेचे आर्थिक नुकसान केले म्हणून आपण ठराव केला होता की, त्यांनी पैसे दिले नाहीत तर त्याच्यावर गुन्हा दाखल झाला का? हे आपल्या ठरावामध्ये नमुद आहे त्यांनी वारंवार काम केले नाही पाणी अति आवश्यक बाब असल्यामुळे महापालिकेने खर्च करा लोकांना त्रास होऊ देऊ नका मागच्या वेळेला अंडर रेल्वेच्या आपण जे मंजुर केले त्या ठरावामध्ये ॲक्ट आहे की, एम जी पी देत नाही तर त्याच्यावर गुन्हा दाखल करा आपले पैसे बाकी आहेत त्यानी पूर्ण काम केले नाही पम्प आणि सम्प आता आपल्याला भेटणार नाहीत. हे जे पैसे कधी देणार आणि त्याच्यावर तुम्ही काय कारवाई केली.

**सुरेश वाकोडे :-**

पैसे देण्याविषयी साहेब, त्याच्या एम.एस. साहेबांसोबत मिटींग झालेली आहे. चीफ इंजिनियर ऑफिसला मिटींग झालेली, आपल्या साहेबांकडे मिटींग झालेली आहे. त्यांनी हा प्रस्ताव गव्हरमेन्टकडे पाठवला आहे. जी ५० एम.एल.डी. योजना आहे. त्याच्यात आपले एम.एम.आर.डी. चे लोन होते.

**नरेंद्र मेहता :-**

ठीक आहे. आपल्याला ते कधी पर्यंत भेटेल. दोन महिने, सहा महिने, आठ महिने आपण सहा महिने धरु या.

**सुरेश वाकोडे :-**

त्याच्या अगोदर मिळेल.

**नरेंद्र मेहता :-**

सहा महिन्यात नाही भेटले तर तुम्ही ठरावाप्रमाणे गुन्हा दाखल करणार का?

**सुरेश वाकोडे :-**

साहेब, हा पुट अप झालेला प्रस्ताव आहे. त्यांची मिटींग झालेली आहे. मिटींगमध्ये त्यांनी मान्य केलेले आहे. आता फक्त वरच्या लेवलला मान्यता घेऊन आपल्याकडे देणार आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

ठीक आहे. मॅडम पाण्याचे हे पंप बसवले तरी भाईंदर ईस्टला आपल्याला अपूर्ण पाणी असणार आहे. मागच्या वेळेला सन्मा. जुबेर इनामदारांची लक्षवेधी होती तेव्हा मा. आयुक्तांनी निवेदन केले होते की आम्ही प्रस्ताव दिलेला आहे. ऑन लाईन बूस्टींग प्रमाणे १० ते १५% पाण्याची वाढ होईल त्याप्रमाणे टेम्परी सोल्युशन होईल. हे सत्य आहे. ज्या वेळेला सन्मा. जुबेर इनामदाराची लक्षवेधी होती तेव्हा हे आपले निवेदन होते. ह्याच्यात कुठेही एक लिटर पाणी आपले वाढत नाही.

**सुरेश वाकोडे :-**

पाणी जरी वाढत नाही तरी आपण हा तास कमी करु शकत नाही. आपण बाकी ठिकाणी पाणी देतो तिथे आपण ३६ ऑन पाणी देतो म्हणून व्हॉल्व बंद करुन ठेवतो हा २४ तास व्हॉल्व चालू ठेवुन तरी ते ४८ तास राहते.

**नरेंद्र मेहता :-**

त्यामध्ये तुम्ही सुधारणा करता आम्ही विरोध करत नाही. आणखी २४ तासावर आणण्यासाठी उपाययोजना करा आम्ही समर्थन देऊ. पण ओव्हरऑल शहराची परिस्थिती आहे जो पाण्याचा मुद्दा होता मघाशी ठराव मांडला गेला त्यावर तुमची योजना कधी सुरु करायची अजून प्रस्तावच नाही. मागच्या वेळेला आपण सांगितले की, ऑनलाईन त्यांच्याकडून परवानगी मागितलेली आहे. बूस्टींग करुन घ्या सकिंग सिस्टम मला तो टेक्नीकली शब्द माहित नाही. म्हणजे आपण ते सक करुन घेतले की पाण्याची कॅपेसिटी वाढेल. सोसायटीमध्ये ते पंप लावून पाणी सक करतात असे त्यामध्ये आपले निवेदन होते. मागच्या वेळेला जी लक्षवेधी आली होती की, पाणी वाढीव कसे मिळेल आता जो अभिनंदनाचा ठराव मांडला परंतु प्रशासन त्यावर झीरो वर्कींग आहे ना. चालू करायचा प्रस्तावच आपण दिलेला नाही तर चालू कधी होईल पूर्ण कधी होईल. मला असे वाटले की काम चालू आहे आणि बूस्टर लावल्यावर १० ते २० एम.एल.डी. पाणी वाढेल तुमचा तसा अभिप्राय होता.

**सुरेश वाकोडे :-**

साहेब, महासभेची मान्यता घ्यावी लागेल.

**नरेंद्र मेहता :-**

बूस्टरच लावायचे असतील तर दोन्ही समावेश करुन घ्या. तुम्ही १५ ते २० टक्के जे मंजुर करुन ३० एम.एल.डी. आणले आहे त्यातले जेवढे खेचता येईल १०-१५ एम.एल.डी. बाकी तुमचे लाईन वितरण हे तुम्ही नंतर करा त्यामध्ये सुचना घ्या की तेही बूस्टर त्यामध्ये बसवून शासनाने त्याला मान्यता दिली का?

**सुरेश वाकोडे :-**

मान्यता मिळाली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ॲग्रीमेन्ट झाले.

**सुरेश वाकोडे :-**

ॲग्रीमेन्ट करायचे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आता तर अभिनंदनाचा ठराव केला.

**सुरेश वाकोडे :-**

ॲग्रीमेन्ट ही रेग्यूलर प्रोसेस असते.

**जुबेर इनामदार :-**

मान्यता मिळाली. ॲग्रीमेन्ट होईल.

**नरेंद्र मेहता :-**

पाण्याचे कधीपर्यंत ॲग्रीमेन्ट होईल.

**सुरेश वाकोडे :-**

आठ दिवसामध्ये ॲग्रीमेन्ट होईल.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, ही सुचना त्यात समावेश केल्यावर दोन्ही कामे एकत्र होतील. वेस्टचा प्रॉब्लेम सॉल्व्ह होईल आणि पूर्ण शहराचे १०/१५ टक्के एम.एल.डी. पाणी वाढले तर तेही होईल. तर सुचना घ्या. दोन्हीला आम्ही आर्थिक प्रशासकीय मान्यता देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

इस्टीमेट तयार झाले नाही ना?

**सुरेश वाकोडे :-**

इस्टीमेट तयार केले. पुढच्या महासभेमध्ये ठेवतो.

**जुबेर इनामदार :-**

वाकोडे साहेब, २० एम.एल.डी. चा विषय आणताना ............

**मा. महापौर :-**

सन्मा. इनामदार साहेब चर्चा करत बसलेना तर पुढचे विषय व्हायचे आहेत तुम्ही बसा हा ठराव मी मंजुर करीत आहे. दुसरा विषय घ्या.

**शरद पाटील :-**

मॅडम, मला एक शंका विचारायची आहे.

**मा. महापौर :-**

एवढा वेळ दिला तेव्हा विचारले नाही. सगळे बोलत बसले तर विषय होणारच नाही. आपण हा विषय दुसऱ्या महासभेत घेणार आहोत. सन्मा. मेहता साहेब बोलले. तेव्हा तुम्ही विचारा.

**प्रकरण क्र. ११ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ५० द.ल.ली. योजने अंतर्गत On line Booster पंप बसविण्याच्या कामास मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. १४ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ५० द.ल.ली. योजने अंतर्गत सर्वे नं. ७७७, सुदाम नगर, कमला पार्क व गोडदेव येथील संप व पंप हाऊस अद्याप पूर्ण झालेली नाही. सदर काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत होते. सदरचे संप व पंप हाऊस पूर्ण न झाल्यामुळे वरील जलकुंभ गुरुत्ववाहिनीने भरण्यात येत आहे. सदर पाणी पुरवठा ४५ ते ४७ तासांवर सद्यस्थितीत होत आहे. पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा On line Boosting पंप बसवून करणे शक्य आहे.

सदर काम भाईंदर (पुर्व) रेल्वे फाटक येथे On line Boosting पंप बसवून Latest Technology नुसार व सद्यस्थितीत मिरा भाईंदर शहरास होणारा पाणी पुरवठा विचारात घेता वरील चार संपच्या ठिकाणी असलेल्या जलकुभांना रेल्वे फाटक येथून On line Boosting पंपीग मशिनरीद्वारे पाणी पुरवठा करता येईल. सदरचे बुस्टींग पंपाद्वारे पाणी पुरवठा केल्यास वरील चारही ठिकाणी पंपीग मशिनरी बसविण्याची आवश्यकता नाही. केवळ एकाच ठिकाणी On line Booster पंप लावून पंपीग करून रेल्वे फाटक येथे मिळत असलेल्या पाण्याच्या दाब वाढवून वरील ठिकाणच्या इलेक्ट्रीक बिल तसेच निगा देखभाल व दुरुस्तीच्या खर्चात बचत होणार आहे. सदर पंप बसविल्यामुळे वरील भागातील पाणी पुरवठयात सुधारणा होणार असून पाणी पुरवठ्याचे तास कमी होणार आहेत.

सदर कामाकरिता <u>रु.४७०.०३</u> लक्ष एवढया रक्कमेचे अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे. तसेच याबाबत निविदा मागविण्यास व पुढील कार्यवाहीसाठी ही सभा मा. आयुक्त यांना प्राधिकृत करित आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२, कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रकरण क्र. १२, मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या कामांची खालीलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | मिरारोड (पूर्व) येथील प्लिझंट पार्क ते एम.आय.डी.सी. उर्वरीत डीपी रस्ता तयार करणे व गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.३,९१,९६,८००/- |
| २. | भाईंदर (पू.) आकाश क्लासिक ते रामदेव पार्क ते राम नगर पर्यत रस्ता तयार करणे व एका बाजुर गटार बांधणे. व आकाशनिधी रामदेव पार्क गटार बांधणे | रू.२,८४,००,६५०/- |
| ३. | भाईंदर (पू.) इंद्रलोक येथील मनसा अपार्ट. ते श्रीराम टॉवर पर्यत रस्ता तयार करणे. | रू. ५६,७२,४००/- |
| ४. | भाईंदर (पू.) दिपक हॉस्पीटल येथील हर्ष प्लाझा ते ऑरेंज हॉस्पीटल पर्यतचा रस्ता तयार करणे. | रू. ९६,२६,०५०/- |
| ५. | भाईंदर (पू.) दिपक हॉस्पीटल रस्त्यावरील हर्ष प्लाझा ते पूजा गार्डन पर्यत रस्ता तयार करणे. | रू. ५२,४२,४५०/- |
| ६. | भाईंदर (पू.) कनकिया रोड येथील लक्ष्मी पार्क ते शालोम गार्डन इमारंती पर्यंत जाणारा रस्ता तयार करणे. | रू. ६२,१७,९००/- |
| ७. | भाईंदर (पू.) राज इनक्लेव्ह इमारत ते साईस्नेहा इमारती पर्यंत (ओल्ड अेज होम) येथील रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रू. ६३,२६,९५०/- |
| ८. | उत्तन येथे नाला बांधणे (मार्केट शिफ्ट करण्यासाठी ) | रू.१,००,००,०००/- |
| ९. | भाईंदर (पू.) राज इनक्लेव्ह इमारत ते साईस्नेहा इमारती पर्यंत (ओल्ड अेज होम) | रू. ९२,९४,७५०/- |

| | | |
|---|---|---|
| | रस्ता तयार करणे. | |
| १०. | प्लेझंट पार्क डॉन बॉस्को शाळा ते काशिमिरा रस्त्यास जोडणारा १८ मी. रूंदीचा डि.पी. रस्ता तयार करणे. | रू.१,७५,७१,०००/- |
| ११. | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता ते वासुदेव कॉम्प्लेक्स कडे जाणारा रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे, गटारे बांधणे. | रु.१,०६,५४,८५०/- |
| १२. | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता न्यू शुभम कॉम्प्लेक्स ते रामदेव पार्क पर्यंत क्रॉस रस्ता तयार करुन गटारे बांधणे. | रु.२,१२,४६,८५०/- |
| १३. | मिरारोड (पूर्व) सिध्दार्थ नगर ते एस.के.स्टोन कंपनी पर्यंत सी.सी. नाला बांधून स्लॅब टाकणे. | रू.१,१२,३०,२००/- |

वरील अंदाजपत्रकांना प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**वंदना चक्रे :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**सुहास रकवी :-**

मॅडम एक सुचना करायची आहे की, भाईंदर पश्चिम पोलिस स्टेशन ते एम.टी.एन.एल. पर्यंत ग्रामपंचायतच्या काळापासून तिकडे रस्ता झालेला नाही. आम्ही कमिश्नर साहेबांबरोबर बोललो होतो. तर तो रस्ता आणि बाजूला फुटपाथ तयार करणे ह्या कामासाठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यास मी विनंती करतो. त्याचप्रमाणे आपल्या महापालिकेमार्फत बांधकाम विभागामार्फत जे टेंडर काढले जातात तर ते टेंडर जे आहेत ते शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय / सी.एस.टी - ०७०६/९४/इमारत २/१६/११/२००६ नुसार काढले जात नाही. कारण मजुर सोसायट्या, सुशिक्षित बेरोजगार ह्यांची कामे गेल्यावर्षीपासून बंद झालेली आहेत तर ती काढावी त्याचप्रमाणे आपण जे टेंडर मागवतो त्या टेंडरमध्ये ज्या कंपन्या असतात त्यांना निर्देश दिल्याचे एक बजेट असते की तीन ते दहा कोटींपर्यंत काम करु शकतात त्यांना सुध्दा ह्यांनी असा क्रायटेरीया लावला आहे की त्यांनी १००% काम केले पाहिजे तर ते शक्य नाही तर त्या नियमानुसार टेंडर सॅक्शन करावी अशी मी विनंती करतो. ते तुम्ही मंजुर करा.

**मर्लिन डिसा :-**

मॅडमच्या परवानगीने बोलते, नंबर ६ भाईंदर पुर्व कनाकिया रोड येथील लक्ष्मी पार्क शालोम गार्डन इमारतीपर्यंत जाणारा रस्ता तयार करणे हा रस्ता पुढे पण करण्याची रिक्वेस्ट आहे. कारण तिकडे एक शाळा आहे. आणि त्याच्यासमोर एक कॉलेज पण आहे.

**प्रमोद सामंत :-**

मॅडम एक सुचना आहे त्या ठरावामध्ये मिरारोडमध्ये शितल नर्सरी ते बालाजी नाल्यापर्यंत मोठया प्रवाहाचे गटार बांधण्यात यावे अशी त्यामध्ये सुचना आहे.

**मा. महापौर :-**

ह्यांची सुचना घ्यावी आणि हा ठराव मी मंजुर करत आहे. सुचनेसह मंजुर करीत आहे.

**प्रकरण क्र. १२ :-**

कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. १५ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या कामांची खालीलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १४. | मिरारोड (पूर्व) येथील प्लिझंट पार्क ते एम.आय.डी.सी. उर्वरीत डीपी रस्ता तयार करणे व गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू.३,९१,९६,८००/- |
| १५. | भाईंदर (पू.) आकाश क्लासिक ते रामदेव पार्क ते राम नगर पर्यंत रस्ता तयार करणे व एका बाजुर गटार बांधणे. व आकाशनिधी रामदेव पार्क गटार बांधणे | रू.२,८४,००,६५०/- |
| १६. | भाईंदर (पू.) इंद्रलोक येथील मनसा अपार्ट. ते श्रीराम टॉवर पर्यंत रस्ता तयार करणे. | रू. ५६,७२,४००/- |
| १७. | भाईंदर (पू.) दिपक हॉस्पीटल येथील हर्ष प्लाझा ते ऑरेंज हॉस्पीटल पर्यंतचा रस्ता तयार करणे. | रू. ९६,२६,०५०/- |
| १८. | भाईंदर (पू.) दिपक हॉस्पीटल रस्त्यावरील हर्ष प्लाझा ते पूजा गार्डन पर्यंत रस्ता तयार करणे. | रू. ५२,४२,४५०/- |
| १९. | भाईंदर (पू.) कनकिया रोड येथील लक्ष्मी पार्क ते शालोम गार्डन इमारती पर्यंत जाणारा रस्ता तयार करणे. | रू. ६२,१७,९००/- |
| २०. | भाईंदर (पू.) राज इनक्लेव्ह इमारत ते साईस्नेहा इमारती पर्यंत (ओल्ड अेज होम) | रू. ६३,२६,९५०/- |

| | | |
|---|---|---|
| | येथील रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे. | |
| २१. | उत्तन येथे नाला बांधणे (मार्केट शिफ्ट करण्यासाठी ) | रू.१,००,००,०००/- |
| २२. | भाईंदर (पू.) राज इनक्लेव्ह इमारत ते साईस्नेहा इमारती पर्यंत (ओल्ड अेज होम) रस्ता तयार करणे. | रू. ९२,९४,७५०/- |
| २३. | प्लेझंट पार्क डॉन बॉस्को शाळा ते काशिमिरा रस्त्यास जोडणारा १८ मी. रूंदीचा डि.पी. रस्ता तयार करणे. | रू.१,७५,७१,०००/- |
| २४. | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता ते वासुदेव कॉम्प्लेक्स कडे जाणारा रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे, गटारे बांधणे. | रु.१,०६,५४,८५०/- |
| २५. | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता न्यू शुभम कॉम्प्लेक्स ते रामदेव पार्क पर्यंत क्रॉस रस्ता तयार करुन गटारे बांधणे. | रु.२,१२,४६,८५०/- |
| २६. | मिरारोड (पूर्व) सिध्दार्थ नगर ते एस.के.स्टोन कंपनी पर्यंत सी.सी. नाला बांधून स्लॅब टाकणे. | रू.१,१२,३०,२००/- |

वरील अंदाजपत्रकांना प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- सौ. वंदना चक्रे**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. सुहास रकवी ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

भाईंदर (पश्चिम) पोलीस स्टेशन ते एम.टी.एन.एल. पर्यंत ग्रामपंचायतच्या काळापासून तिकडे रस्ता झालेला नाही तर तो रस्ता आणि बाजूला फुटपाथ तयार करणे ह्या कामासाठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यास मी विनंती करतो. त्याचप्रमाणे आपल्या महापालिकेमार्फत बांधकाम विभागामार्फत जे टेंडर काढले जातात तर जे टेंडर आहेत ते शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन/निर्णय/सी.एस.टी.-०७०६/९४/इमारत २१६/११/२००६ नुसार काढले जात नाही. कारण मजूर सोसायट्या, सुशिक्षित बेरोजगार यांची कामे गेल्या वर्षीपासून बंद झाले आहेत. तर ती काढावी त्याचप्रमाणे आपण जे टेडर मागवतो त्या टेंडरमध्ये ज्या कंपन्या असतात त्यांना निर्देश दिलेल्या एक बजेट असते की, ३ ते १० कोटी पर्यंत काम करु शकतात. त्यांनासुध्दा ह्यांनी असा क्रायटेरीया लावला आहे की त्यांनी १००% काम केले पाहिजे. तर ते शक्य नाही तर त्या नियमानुसार टेंडर सॅक्शन करावी अशी मी सुचना करतो.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. मर्लिन डिसा ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

नंबर ६, भाईंदर (पूर्व) कनकिया रोड येथील लक्ष्मी पार्क, शालोम गार्डन इमारतीपर्यंत जाणारा रस्ता तयार करणे हा रस्ता पुढे पण करण्याची रिक्वेस्ट आहे. कारण तिकडे एक शाळा आहे. आणि त्याच्यासमोर एक कॉलेज पण आहे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. प्रमोद सामंत ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरारोडमध्ये शितल नर्सरी ते बालाजी नाल्यापर्यंत मोठ्या प्रवाहाचे गटार बांधण्यात यावे अशी माझी सुचना आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३, निविदांना मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |

| | | |
|---|---|---|
| १ | **मिरारोड (पूर्व) एस.के.स्टोन मेरी गोल्ड नं. २ ते बस स्टॉप नं. १५ पर्यंत नाला बांधणे.** | रु.४,२७,६६,२००/- |
| | १. मे. अे.पी.आय. सिव्हिल कॉन प्रा.लि. | १७.१ % जास्त दराने |
| | २. मे. जेकिन इंटरप्रायझेस | ९.१८ % कमी दराने |
| | ३. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. | १०.०० % जास्त दराने |
| | ४. मे. मिरा कन्स्ट्रक्शन | १५.९ % जास्त दराने |
| | **५. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स** | **१६.२ % कमी दराने** |
| | ६. मे. श्रीजी कंन्स्ट्रक्शन | १४.५ % जास्त दराने |
| | ७. मे. यश इंटरप्रायझेस | ११.११ % जास्त दराने |
| २ | **मिरारोड महेश इंडस्ट्रीयल इस्टेट येथे नाला बांधणे.** | रु.२,४७,९०,३००/- |
| | १. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | ९.१ % जास्त दराने |
| | **२. मे. जेकिन इंटरप्रायझेस** | **५.०० % कमी दराने** |
| | ३. मे. जिनाग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. | १८.०० % जास्त दराने |
| ३ | **काशीगाव पेट्रोल पंप (राष्ट्रीय महामार्ग) ते सिल्व्हर सरीता पाठीमागील आर.एन.ए. पर्यंतचा नाला बांधणे.** | रु. ६,७२,७५,४००/- |
| | १. मे. जेकिन इंटरप्रायझेस | ११.८% कमी दराने |
| | **२. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स** | **१५.३% कमी दराने** |
| | ३. मे. शयोना कॉर्पोरेशन | १२.९६% जास्त दराने |
| ४ | **मिराधाम अमिश पार्क ते पंजाब फाऊंड्री पर्यंत नाला बांधणे.** | रु. ७,०२,९४,८००/- |
| | १. मे. अे.पी.आय. सिव्हिल कॉन प्रा.लि. | १५.३% जास्त दराने |
| | **२. मे. जेकिन इंटरप्रायझेस** | **११.६% कमी दराने** |
| | ३. मे. शयोना कॉर्पोरेशन | १४.००% जास्त दराने |
| ५ | **काशिमीरा येथे मांडवी पाडा गोठा (माशाचा पाडा) ते पेट्रोल पंप पर्यंत नाला बांधणे.** | रु. ६,५१,३७,७००/- |
| | १. मे. अे.पी.आय. सिव्हिल कॉन प्रा.लि. | ८.२८ % जास्त दराने |
| | **२. मे. जेकिन इंटरप्रायझेस** | **१२.०० % कमी दराने** |
| | ३. मे. शयोना कॉर्पोरेशन | १४.०० % जास्त दराने |
| ६ | **मिरारोड (पूर्व) सरोगी ॲव्हेन्युर ते रोझ वुड पर्यंत (कनकिया) नाला बांधणे.** | रु. १,७७,६३,६००/- |
| | | १८.०० % जास्त दराने |
| | १. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | १८.०० % जास्त दराने |
| | २. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. | १४.०० % जास्त दराने |
| | ३. मे. एम.ई.प्रोजेक्ट्स् प्रा.लि. | ९.९५ % जास्त दराने |
| | **४. मे. महेश्वर बिल्डर्स** | |
| | (दरवाटाघाटी नंतर) | **२.०० % कमी दराने** |
| | ५. मे. मिरा कंन्स्ट्रक्शन | १५.५ % जास्त दराने |
| | ६. मे. नरेंन्द्र कंन्स्ट्रक्शन | १५.०० % जास्त दराने |
| | ७. मे. यश इंटरप्रायझेस | १०.११ % जास्त दराने |
| ७ | **मिरारोड (पूर्व) रश्मी प्राईम ते रामदेव पार्क क्रॉस रोड पर्यंत नाला बांधणे.** | रु. २,७०,९८,१००/- |
| | १. मे. चौधरी कंन्स्ट्रक्शन कंपनी | १२.०० % जास्त दराने |
| | २. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | १६.०० % जास्त दराने |
| | ३. मे. जगदंबा कंन्स्ट्रक्शन | १५.०० % जास्त दराने |
| | **४. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.** | ९.०० % जास्त दराने |
| | (दरवाटाघाटी नंतर) | **२.०० % कमी दराने** |
| | ५. मे. महेश्वर बिल्डर्स | १६.९५ % जास्त दराने |
| | ६. मे. मिरा कंन्स्ट्रक्शन | १५.१ % जास्त दराने |
| | ७. मे. नरेंन्द्र कंन्स्ट्रक्शन | १५.५ % जास्त दराने |
| | ८. मे. यश इंटरप्रायझेस | ११.११ % जास्त दराने |
| ८ | **मिरारोड सिनेमॅक्स ते रामदेव पार्क क्रॉस रोड पर्यंत (कनकिया) नाला बांधणे.** | रु. २,८६,००,६००/- |
| | १. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | ९.८१ % जास्त दराने |
| | **२. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.** | ९.०० % जास्त दराने |
| | (दरवाटाघाटी नंतर) | **२.०० % कमी दराने** |
| | ३. मे. महेश्वर बिल्डर्स | १७.९५ % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| | ४. मे. मिरा कन्स्ट्रक्शन<br>५. मे. नरेंन्द्र कन्स्ट्रक्शन<br>६. मे. यश इंटरप्रायझेस | ९.८१ % जास्त दराने<br>१४.५ % जास्त दराने<br>१२.०० % जास्त दराने |
| ९ | **रा.म.क्र. ८ वरील दिल्ली दरबार पासून पंजाब फाऊंड्री कडे जाणारा आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. इंद्रा कंस्ट्रक्शन कं**<br>२. मे. एसबी इंटरप्रायजेस<br>३. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>४. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. यश इंटरप्रायझेस<br>६. मे. रॅचकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं<br>८. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | रु. ४,६९,३२,३००/-<br><br>**१५.३९ % कमी दराने**<br>१४.८८ % कमी दराने<br>११.९९ % कमी दराने<br>०९.१ % कमी दराने<br>०७.२ % कमी दराने<br>०३.०८ % कमी दराने<br>०९.९९ % जास्त दराने<br>१२.०६ % जास्त दराने |
| १० | **रा.म.क्र. ८ वरील ग्रीन व्हिलेज येथील बस्त्याव डिसुजा वाडी ते वेस्टर्न पार्क सोसायटी ते दाचकुलपाडा रस्त्यालगत साई पॅलेस हॉटेल पर्यत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. एसबी इंटरप्रायजेस**<br>२. मे. के.आर. कंस्ट्रक्शन<br>३. मे. यश इंटरप्रायझेस<br>४. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>५. मे. इंद्रा कंस्ट्रक्शन कं<br>६. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>७. मे. रॅचकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>८. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>९. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं<br>१०. मे. शयोना कॉर्पोरेशन | रु.७,४८,६४,२००/-<br><br><br>**१५.८८ % कमी दराने**<br>१५.०३ % कमी दराने<br>१४.११ % कमी दराने<br>१२.०० % कमी दराने<br>१२.०० % कमी दराने<br>०९.०१ % कमी दराने<br>०३.०८ % कमी दराने<br>०६.०३ % जास्त दराने<br>०९.०० % जास्त दराने<br>०९.०८ % जास्त दराने |
| ११ | **मिरारोड (पूर्व) झंकार कंपनी पासून श्री एव्हेन्यू इमारत, रवि ग्रुप रोड पर्यत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>२. मे. आर.के.मधानी अण्ड कं.<br>३. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>४. मे. चिराग इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>६. मे. शयोना कॉर्पोरेशन<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं<br>८. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | रु.२०,२१,७०,७००/-<br><br>**२१.६० % कमी दराने**<br>१३.०६ % कमी दराने<br>११.०८ % कमी दराने<br>१०.०८ % कमी दराने<br>०५.०४ % कमी दराने<br>०.५ % कमी दराने<br>०४.९५ % जास्त दराने<br>०५.०४ % जास्त दराने |
| १२ | **मिरारोड (पूर्व) हटकेश येथिल सॅटेलाईट पार्क पासून घोडबंदर सबस्टेशन उघाडी खाडीकडे जाणारा आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. के.आर. कंस्ट्रक्शन**<br>२. मे. आर.के.मधानी अण्ड कं.<br>३. मे. चिराग इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. शयोना कॉर्पोरेशन<br>६. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं | रु.१३,३१,४६,४५०/-<br><br>**१३.५% कमी दराने**<br>१०.१९% कमी दराने<br>०७.८६% कमी दराने<br>०७.२% कमी दराने<br>०.५% कमी दराने<br>०५.०४ % जास्त दराने<br>०७.०२ % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| १३ | **भाईंदर (प.) बेकरी गल्ली ते स्मशानभूमी रस्त्याकडे व ४५.०० मी. डी.पी. रस्ता ते सुभाषचंद्र बोस मैदान नाल्यापर्यत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>२. मे. के.आर. कंस्ट्रक्शन<br>३. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. यश इंटरप्रायझेस<br>५. मे. शयोना कॉर्पोरेशन<br>६. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं | रु.८,७४,१०,७००/-<br>**१८.२% कमी दराने**<br>१४.००% कमी दराने<br>०९.०१% कमी दराने<br>०७.०२% कमी दराने<br>०३.०० % जास्त दराने<br>०६.०३ % जास्त दराने<br>०७.९२ % जास्त दराने |
| १४ | **मिरारोड (पूर्व) एन.एच. स्कूल सर्कल ते कार्पोरेशन बँक ते सेक्टर नं. ११ बिल्डीग नं. ३४ पर्यत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. के.आर. कंस्ट्रक्शन**<br>२. मे. महेश्वर बिल्डर्स<br>३. मे. यश इंटरप्रायझेस<br>४. एम.ई. प्रोजेक्टस्<br>५. ॲक्युट डिझाईन<br>६. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>७. मे. रॅचकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>८. जगदंबा कंस्ट्रक्शन कं. | रु. २,६६,७३,१००/-<br>**१७.१० % कमी दराने**<br>१४.७७ % कमी दराने<br>१२.०० % कमी दराने<br>०९.०१ % कमी दराने<br>०५.५८ % कमी दराने<br>०४.०५ % कमी दराने<br>०३.०८ % कमी दराने<br>०७.११ % जास्त दराने |
| १५ | **मिरारोड (पूर्व) निलम पार्क ते प्रिमीयम अपार्टमेंट ते १०० फुट रेल्वे समांतर रस्ता पर्यंत आर.सी.सी नाला बांधणे.**<br>**१. मे. महेश्वर बिल्डर्स**<br>२. मे. एम.ई.प्रोजेक्टस् प्रा.लि.<br>३. जगदंबा कंस्ट्रक्शन कं. | रु. ९०,८९,६००/-<br>**१६.४६ % कमी दराने**<br>०९.०१ % कमी दराने<br>०४.०५ % जास्त दराने |
| १६ | **मिरारोड (पूर्व) सेव्हेन इलेव्हन शाळेमागील राज इन्क्लेव्ह पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे**<br>**१. मे. यश इंटरप्रायझेस**<br>२. मे. के.आर. कंस्ट्रक्शन<br>३. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>५. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं | रु. ४,७७,९६,४००/-<br>**१८.११ % कमी दराने**<br>१६.०२ % कमी दराने<br>०९.०१ % कमी दराने<br>०३.३३ % कमी दराने<br>०८.०१ % जास्त दराने |
| १७ | **मिरारोड (पूर्व) गौरव इन्क्लेव्ह सर्कल ते मंगलनगर उघाडी पर्यंत दोन्ही बाजूस आर.सी.सी नाला बांधणे.**<br>**१. मे. यश इंटरप्रायझेस**<br>२. मे. के.आर. कंस्ट्रक्शन<br>३. मे. एसबी इंटरप्रायजेस<br>४. मे. एम.ई.प्रोजेक्टस् प्रा.लि.<br>५. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>६. जगदंबा कंस्ट्रक्शन कं. | रु. १,९३,७६,२००/-<br>**१६.११ % कमी दराने**<br>१४.०४ % कमी दराने<br>१२.५१ % कमी दराने<br>०९.०१ % कमी दराने<br>०३.३३ % कमी दराने<br>०५.०५ % जास्त दराने |
| १८ | भाईंदर (प.) फ्लाय ओव्हर ते नाझरेथ उघाडी पर्यंत नाला बांधणे.<br>**१. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>२. मे. आर.के.मधानी ॲण्ड कं.<br>३. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>४. मे. चिराग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. शायोना कॉर्पोरेशन<br>६. मे. आर ॲण्ड बी इंन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. | रु. २७,२१,२६,६००/-<br>**१८.६ % कमी दराने**<br>१६.२१ % कमी दराने<br>१४.४ % कमी दराने<br>१०.३५ % कमी दराने<br>१०.०४ % कमी दराने<br>७.०० % जास्त दराने |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ठेकेदारांनी सादर केलेल्या सर्वात कमी दराचे निविदा ह्या वाजवी आहेत. तरी अ.क्र.१ च्या कामी **मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स** यांची **१६.२ % कमी दराची** निविदा, अ.क्र.२ च्या कामी **मे. जेकिन इंटरप्रायझेस यांची ५.०० % कमी दराची निविदा** अ.क्र.३ च्या कामी **मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स** यांची १५.३ % कमी दराची निविदा अ.क्र.४ च्या कामी मे. **जेकिन इंटरप्रायझेस यांची ११.६ %** कमी दराची अ.क्र.५ च्या कामी **मे. जेकिन इंटरप्रायझेस यांची १२.०० % कमी दराची,**

अ.क्र.६ च्या कामी मे महेश्वरी बिल्डर्स यांची दर वाटाघाटीनंतर २.०० % कमी दराची निविदा, अ.क्र.७ च्या कामी मे. जिनांग इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांची दर वाटाघाटीनंतर २.०० % कमी दराची निविदा, अ.क्र.८ च्या कामी मे. जिनांग इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांची दर वाटाघाटीनंतर २.०० % कमी दराची निविदा, अ.क्र.९ च्या कामी यांची दर वाटाघाटीनंतर मे. इंद्रा कंस्ट्रक्शन कं. १५.३९ % कमी दराची निविदा, अ.क्र.१० च्या कामी मे. एसबी इंटरप्रायजेस यांची १५.८८ % कमी दराची निविदा, अ.क्र.११ च्या कामी मे. जेकिन इंटरप्रायजेस यांची २१.६० % कमी दराची निविदा, अ.क्र.१२ च्या कामी मे. के.आर. कंस्ट्रक्शन यांची १३.५ % कमी दराची निविदा, अ.क्र.१३ च्या कामी मे. जेकिन इंटरप्रायजेस यांची १८.२ % कमी दराची निविदा, अ.क्र.१४ च्या कामी मे. के.आर. कंन्स्ट्रक्शन यांची १७.१० % कमी दराची निविदा, अ.क्र.१५ च्या कामी मे. महेश्वर बिल्डर्स यांची १६.४६ % कमी दराची निविदा, अ.क्र.१६ च्या कामी मे. यश इंटरप्रायझेस यांची १८.११ % कमी दराची निविदा, अ.क्र.१७ च्या कामी मे. यश इंटरप्रायझेस यांची १६.११ % कमी दराची निविदा, अ.क्र.१८ च्या कामी मे. जेकिन इंटरप्रायजेस यांची १८.६ % कमी दराची निविदा, या सर्व निविदांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मंजूरी देण्यात येत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**राजेश वेतोस्कर :-**

मॅडम एक सुचना आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेत ई-टेंडरींगद्वारे ऑनलाईन निविदा स्विकारल्या जातात परंतु ऑनलाईन सादर केलेल्या कागदपत्राबाबत काही वेळेस प्रिंट मिळण्यास त्रास होतो वाद निर्माण होतात त्यामुळे ह्यापुढे निविदा स्विकारण्याच्या अंतीम तारखेच्या दिवशी व वेळेत संबंधीत ठेकेदारांनी हार्ड कॉपी सुध्दा महानगरपालिकेकडे सादर करण्याची अट निविदेत टाकावी अशी विनंती करतो.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, जर निविदा ऑनलाईन काढल्या जातात तर त्याची हार्डकॉपी सबमिट करावी. हार्डकॉपी नंतरही सबमिट करता येते. मग निविदा ऑनलाईन काढायचा काय अर्थ आहे. मला काय म्हणायचे आहे. ऑनलाईन आपण सिस्टम ठेवली आहे ना? मग ऑनलाईन सिस्टम ठेवली आहे मग हार्डकॉपी इकडे मागवता त्याचा अर्थ काय?

**जुबेर इनामदार :-**

त्याची माहिती प्राप्त करायची असली की, कधी कधी ऑनलाईन प्रिंट निघत नाही. म्हणून आहे तेच त्याने त्याचे टू कॉपी करुन सत्यप्रत करुन त्यांनी फक्त सादर करावी. मुंबईमध्ये आणि ठाण्यामध्ये हिच प्रथा आहे.

**प्रशांत दळवी :-**

त्यांना पिरियड दयाना. दोन दिवसात सादर करावी. त्याच दिवशी करावी मग तुम्ही ऑनलाईन न करता तुम्ही इकडे येवून टेंडर भरा.

**जुबेर इनामदार :-**

ऑनलाईन टेंडर त्यांनी तिकडेच भरावे त्याची जी सत्यप्रत असते त्याची जी टेक्नीकल प्रिंट असते ना त्याची सत्यप्रत लागते त्याची आकडेवारी नाही.

**प्रशांत दळवी :-**

आकडेवारी मी सांगत नाही. सन्मा. सदस्यांना मला एवढेच सांगायचे आहे की, ऑनलाईन एक साईडला ठेवता...................

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम आमच्या पक्षाची बैठक असते तेव्हा आम्ही एक धोरण ठरवले की, तुम्हाला त्रास देता काम नये. आमच्या पक्षाची जी भुमिका आहे ती माझ्या माध्यमातून किंवा आमचे वरिष्ठ आहेत त्याच्या माध्यमातून किंवा आमचे वरिष्ठ आहेत त्याच्या माध्यमातून आम्ही मांडत असतो. मान्यतेबद्दल विरोध नाही. आपण ही निविदा बघितल्यानंतर व्ही गॉट द २१% बिलो पासून २% बिलो आहे म्हणजे मेजर जे टेंडर आहे ते १६% ते २१% बिलो आहे आणि साधारणतः ही काम ५० करोडच्या आसपास असतील १६% म्हणजे ऑलमोस्ट ५ ते ७ करोडचा फायदा झाला आहे. १२० कोटीचे ॲव्हरेज आपण १६% जरी काढले तरी १८ करोड व्ही हॅव सेव ह्याच्यात तीन निविदा अशा आहेत की ज्याच्यामध्ये फक्त २ % बिलो आहे. ह्या निविदा भरायच्या अगोदर मा. आयुक्तांना आम्ही लेखी सांगितले ह्यामध्ये सगळे त्यांनी भरु दिले नाही ॲडजस्टमेंट झाले आहे म्हणुन मागे घेतील तर ह्या तीन निविदा परत काढण्यास आपल्याला काही अडचण आहे का? त्या तीन फेर निविदा मागवल्या तर ते १८ टक्के परत कमी उपलब्ध होईल ना बाकी सगळ्यांना आम्ही मान्यता देतो आहे. २१ टक्क्यांपासून १६ टक्के चांगले काम प्रशासनाने केले आहे. बिलो आणुन पण तीन निविदा अशा आहेत ज्याच्यामध्ये २ टक्के बिलो आहे आणि आता जो प्रशांतजींनी मुद्दा मांडला मॅडम ह्या महापालिकेमध्ये मॅन्युअल डॉक्युमेंट ऑन लाईन आणि मॅन्युअलमध्ये फरक आहे. ऑनलाईन दिले तर दिले नंतर काही करता येत नाही. मॅन्युअल नंतरपण डॉक्युमेंट घेता येतात म्हणून ऑनलाईन सिस्टम स्विकारली आहे त्याला अपडेट करताना आपण रिव्हर्स बॅक कुठे जातो. ह्या सगळ्या गोष्टी टाळण्यासाठी आपण सॉफ्टवेअर वर एवढे पैसे खर्च केले

आहेत. माझे सभागृहाला एवढेच निवेदन आहे की, ह्याच्यामध्ये तीन निविदा २ टक्के कमी दराने आले आहेत ते फेर आपण मागवले तर नक्कीच मला असे वाटते की ज्याठिकाणी १६ टक्के कमी झाले तेपण १६ ते २० टक्के मध्ये आपल्याला प्राप्त होईल महापालिकेचे करोडो रुपये वाचतील

**जुबेर इनामदार :-**

ई-टेंडरींगच्या माध्यमातून आलेली निविदा आहे त्याच्यामध्ये वाटाघाटी झाली असेल तर परत २ टक्के कमी केले. ई-टेंडरींगचे जो डी.एस.आय. चा रेट आहे त्याच्यापेक्षा वरच्या थरात केलेले नाही म्हणून या विषयावर चर्चा करण्यात काय उपयोग राहत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

परत मागे आणले तर १६ टक्के आले तर आपल्याला काय प्रॉब्लेम आहे बाकी तुमची १२० कोटीची कामामध्ये ११२ कोटी काम................

**जुबेर इनामदार :-**

शर्यतीमध्ये टेंडर भरले जातात आणि त्या प्रमाणात त्याची निविदा स्विकारली जाते.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम ती तीन्ही काम माझ्याच वॉर्डातली आहेत तर मला काही विरोध करायची आवश्यकता नाही. परंतु महापालिकेचा फायदा होतो म्हणून आम्ही बोलतो बाकी आपल्याला वाटेल तो निर्णय घ्या.

**रवि व्यास :-**

मॅडम, अगर अबव हो गया तो क्या करेंगे। सन्मा. मेहता साहब बोल रहे है तीन टेंडर रिकॉल किया जाए अगर कल २० टक्का अबव हो गया तो क्या करेंगे वो लॉस कौन बेअर करेगा।

**नरेंद्र मेहता :-**

म्हणून आम्ही सांगितले की ऑनलाईन भरा आम्हाला खात्री आहे की कमी दराने प्राप्त होतील. मॅडम आपले काम आहे सभागृहामध्ये हे आयुक्तांनीच केले असते आपल्या मान्यतेची आवश्यकता काय मा. आयुक्त आपल्याला बोलतील आम्ही नाही करणार ह्याच्यापेक्षा जास्त येईल तर काय करणार? आपण आपली भुमिका मांडत असतो आम्हाला जे पटले की बाकी १२० कोटीचे चांगले काम प्रशासनाने केले आहे की १६ ते २० टक्के बिलो आणि चार कामे अशी आहेत की, मा. आयुक्तांना आम्ही पहिलेच सांगितले की, ह्याकामामध्ये गडबड झाली आहे. त्यावेळी मा. आयुक्त बोलले साहेब मी बघतो त्याचे आन्सर भेटले नाही १६ टक्के बिलो आहे तुम्हाला काय प्रॉब्लेम आहे ११६ कोटीचे उदा. आपल्यासमोर आहे ना

**मा. महापौर :-**

फिनिश सेयिंग

**नरेंद्र मेहता :-**

यु आर नॉट एक्सेप्टींग दीज एक्सेप्टींग ऑर नॉट

**मा. महापौर :-**

आय एम नॉट एक्सेप्टींग इफ यु फिनिश सेयिंग

**नरेंद्र मेहता :-**

आता मला ठराव मांडायला लागेल.

**मा. महापौर :-**

अप टू यु

**नरेंद्र मेहता :-**

आज दिनांक १.१२.२०१२ च्या मा. महासभेत निविदांना मान्यता देणे बाबत गोषवाऱ्यामध्ये नमुद अनुक्रमांक १,३,४,९,१०,११ ते १७ व यांचा १२ टक्के ते २१ टक्के कमी दराने निविदा आहेत व खालील नमुद कामे.

| | |
|---|---|
| **अनुक्रमाक २ :** | मिरारोड महेश इंडस्ट्रीयल येथे नाला बांधणेसाठी मे. जॅकिम इन्टरप्राईजेस यांनी ५ टक्के कमी दराने. |
| **अनुक्रमाक ६ :** | मिरारोड (पुर्व) सरोगी ॲव्हेन्युर ते रोझवुड पार्क (कनकिया) पर्यंत नाला बांधणेसाठी मे. महेश बिल्डर्स यांना २ टक्के कमी दराने. |
| **अनुक्रमाक ७ :** | मिरारोड (पूर्व) रश्मी प्राईम ते रामदेव पार्क क्रॉस रोड पर्यंत नाला बांधणेसाठी मे. जिनांग इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांना २ टक्के कमी दराने. |
| **अनुक्रमाक ८ :** | मिरारोड सिनेमॅक्स ते रामदेव पार्क क्रॉस रोड पर्यंत (कनकिया) नाला बांधणेसाठी मे. जिनांग इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांना २ टक्के कमी दराने. |

ही कामे ५ टक्के व २ टक्के कमी दराने प्राप्त झालेली असल्याने सदर अनुक्रमांक २,६,७ व ८ ह्या कामांचा निविदांना मंजुरी न देता फेरनिविदा मागविल्यास अधिक कमी दराने निविदा प्राप्त होतील जेणेकारणे महानगरपालिकेस आर्थिक फायदा होईल.

सदर मा. महासभेत निविदा अनु. क्र. १,३,४,९,१०,११ ते १७ व यांना मान्यता देत असून निविदा अनु. क्र. २,६,७ व ८ यांना अमान्य करुन फेरनिविदा मागविण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**शरद पाटील :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र.१३ साठी दोन ठराव आले आहेत पहिला ठराव सुचक ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक बर्नड डिमेलो दुसरा ठराव सुचक नरेंद्र मेहता अनुमोदक शरद पाटील दोन ठराव आल्याने मतदान घ्यावे लागेल. पहिला मी सुचक नरेंद्र मेहता आणि अनुमोदक शरद पाटील ह्यांचा ठराव मतास टाकतो ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोण आहेत त्यानंतर पहिला ठराव सुचक ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक बर्नड डिमेलो ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**जुबेर इनामदार :-**

सुचना मुळ ठरावामध्ये समावेश करण्यात यावा.

**प्र. नगरसचिव :-**

मुळ ठरावामध्ये सन्मा. राजेश वेतोसकर ह्यांची सुचना आहे. त्या सुचनेवर देखील मतदान घेण्यात येईल कृपया ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत तटस्थ कोण नाहीत.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र.१३ सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४६ आणि विरोधात ४२ तटस्थ शुन्य इतकी मते पडलेली आहेत ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे .

**प्रकरण क्र. १३ :-**

निविदांना मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १६ :-**

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | **मिरारोड (पूर्व) एस.के.स्टोन मेरी गोल्ड नं. २ ते बस स्टॉप नं. १५ पर्यंत नाला बांधणे.**<br>१. मे. अे.पी.आय. सिव्हिल कॉन प्रा.लि.<br>२. मे. जेकिन इंटरप्रायझेस<br>३. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. मिरा कंन्स्ट्रक्शन<br>**५. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स**<br>६. मे. श्रीजी कंन्स्ट्रक्शन<br>७. मे. यश इंटरप्रायझेस | **रु.४,२७,६६,२००/-**<br>१७.१ % जास्त दराने<br>९.१८ % कमी दराने<br>१०.०० % जास्त दराने<br>१५.९ % जास्त दराने<br>**१६.२ % कमी दराने**<br>१४.५ % जास्त दराने<br>११.११ % जास्त दराने |
| २ | **मिरारोड महेश इंडस्ट्रीयल इस्टेट येथे नाला बांधणे.**<br>१. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>**२. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>३. मे. जिनाग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. | **रु.२,४७,९०,३००/-**<br>९.१ % जास्त दराने<br>**५.०० % कमी दराने**<br>१८.०० % जास्त दराने |
| ३ | **काशीगाव पेट्रोल पंप (राष्ट्रीय महामार्ग) ते सिल्व्हर सरीता पाठीमागील आर.एन.ए. पर्यंतचा नाला बांधणे.**<br>१. मे. जेकिन इंटरप्रायझेस<br>**२. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स**<br>३. मे. शयोना कॉर्पोरेशन | **रु. ६,७२,७५,४००/-**<br>११.८% कमी दराने<br>**१५.३% कमी दराने**<br>१२.९६% जास्त दराने |
| ४ | **मिराधाम अमिश पार्क ते पंजाब फाऊंड्री पर्यंत नाला बांधणे.**<br>१. मे. अे.पी.आय. सिव्हिल कॉन प्रा.लि.<br>**२. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>३. मे. शयोना कॉर्पोरेशन | **रु. ७,०२,९४,८००/-**<br>१५.३% जास्त दराने<br>**११.६% कमी दराने**<br>१४.००% जास्त दराने |
| ५ | **काशिमीरा येथे मांडवी पाडा गोठा (माशाचा पाडा) ते पेट्रोल पंप पर्यंत नाला बांधणे.**<br>१. मे. अे.पी.आय. सिव्हिल कॉन प्रा.लि.<br>**२. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>३. मे. शयोना कॉर्पोरेशन | **रु. ६,५१,३७,७००/-**<br>८.२८ % जास्त दराने<br>**१२.०० % कमी दराने**<br>१४.०० % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ६ | मिरारोड (पूर्व) सरोगी ॲव्हेन्युर ते रोझ वुड पर्यंत (कनकिया) नाला बांधणे.<br>१. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>२. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>३. मे. एम.ई.प्रोजेक्टस् प्रा.लि.<br>**४. मे. महेश्वर बिल्डर्स**<br>**(दरवाटाघाटी नंतर)**<br>५. मे. मिरा कंन्स्ट्रक्शन<br>६. मे. नरेंन्द्र कंन्स्ट्रक्शन<br>७. मे. यश इंटरप्रायझेस | रु. १,७७,६३,६००/-<br>१८.०० % जास्त दराने<br>१८.०० % जास्त दराने<br>१४.०० % जास्त दराने<br>९.९५ % जास्त दराने<br>**२.०० % कमी दराने**<br>१५.५ % जास्त दराने<br>१५.०० % जास्त दराने<br>१०.११ % जास्त दराने |
| ७ | मिरारोड (पूर्व) रश्मी प्राईम ते रामदेव पार्क क्रॉस रोड पर्यंत नाला बांधणे.<br>१. मे. चौधरी कंन्स्ट्रक्शन कंपनी<br>२. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>३. मे. जगदंबा कंन्स्ट्रक्शन<br>**४. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.**<br>**(दरवाटाघाटी नंतर)**<br>५. मे. महेश्वर बिल्डर्स<br>६. मे. मिरा कंन्स्ट्रक्शन<br>७. मे. नरेंन्द्र कंन्स्ट्रक्शन<br>८. मे. यश इंटरप्रायझेस | रु. २,७०,९८,१००/-<br>१२.०० % जास्त दराने<br>१६.०० % जास्त दराने<br>१५.०० % जास्त दराने<br>९.०० % जास्त दराने<br>**२.०० % कमी दराने**<br>१६.९५ % जास्त दराने<br>१५.१ % जास्त दराने<br>१५.५ % जास्त दराने<br>११.११ % जास्त दराने |
| ८ | मिरारोड सिनेमॅक्स ते रामदेव पार्क क्रॉस रोड पर्यंत (कनकिया) नाला बांधणे.<br>१. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>**२. मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.**<br>**(दरवाटाघाटी नंतर)**<br>३. मे. महेश्वर बिल्डर्स<br>४. मे. मिरा कंन्स्ट्रक्शन<br>५. मे. नरेंन्द्र कंन्स्ट्रक्शन<br>६. मे. यश इंटरप्रायझेस | रु. २,८६,००,६००/-<br>९.८१ % जास्त दराने<br>९.०० % जास्त दराने<br>**२.०० % कमी दराने**<br>१७.९५ % जास्त दराने<br>९.८१ % जास्त दराने<br>१४.५ % जास्त दराने<br>१२.०० % जास्त दराने |
| ९ | **रा.म.क्र. ८ वरील दिल्ली दरबार पासून पंजाब फाऊंड्री कडे जाणारा आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. इंद्रा कंस्ट्रक्शन कं**<br>२. मे. एसबी इंटरप्रायजेस<br>३. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>४. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. यश इंटरप्रायझेस<br>६. मे. रॅचकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं<br>८. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | **रु. ४,६९,३२,३००/-**<br>**१५.३९ % कमी दराने**<br>१४.८८ % कमी दराने<br>११.९९ % कमी दराने<br>०९.१ % कमी दराने<br>०७.२ % कमी दराने<br>०३.०८ % कमी दराने<br>०९.९९ % जास्त दराने<br>१२.०६ % जास्त दराने |
| १० | **रा.म.क्र. ८ वरील ग्रीन व्हिलेज येथील बस्त्याव डिसुजा वाडी ते वेस्टर्न पार्क सोसायटी ते दाचकुलपाडा रस्त्यालगत साई पॅलेस हॉटेल पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. एसबी इंटरप्रायजेस**<br>२. मे. के.आर. कंस्ट्रक्शन<br>३. मे. यश इंटरप्रायझेस<br>४. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>५. मे. इंद्रा कंस्ट्रक्शन कं<br>६. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>७. मे. रॅचकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>८. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>९. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं<br>१०. मे. शयोना कॉर्पोरेशन | **रु.७,४८,६४,२००/-**<br>**१५.८८ % कमी दराने**<br>१५.०३ % कमी दराने<br>१४.११ % कमी दराने<br>१२.०० % कमी दराने<br>१२.०० % कमी दराने<br>०९.०१ % कमी दराने<br>०३.०८ % कमी दराने<br>०६.०३ % जास्त दराने<br>०९.०० % जास्त दराने<br>०९.०८ % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ११ | **मिरारोड (पूर्व) झंकार कंपनी पासून श्री एव्हेन्यू इमारत, रवि ग्रुप रोड पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>२. मे. आर.के.मधानी अण्ड कं.<br>३. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>४. मे. चिराग इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>६. मे. शयोना कॉर्पोरेशन<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं<br>८. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | **रु.२०,२१,७०,७००/-**<br><br>**२१.६० % कमी दराने**<br>१३.०६ % कमी दराने<br>११.०८ % कमी दराने<br>१०.०८ % कमी दराने<br>०५.०४ % कमी दराने<br>०.५ % कमी दराने<br>०४.९५ % जास्त दराने<br>०५.०४ % जास्त दराने |
| १२ | **मिरारोड (पूर्व) हटकेश येथिल सॅटेलाईट पार्क पासून घोडबंदर सबस्टेशन उघाडी खाडीकडे जाणारा आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. के.आर. कंस्ट्रक्शन**<br>२. मे. आर.के.मधानी अण्ड कं.<br>३. मे. चिराग इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. शयोना कॉर्पोरेशन<br>६. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं | **रु.१३,३१,४६,४५०/-**<br><br>**१३.५% कमी दराने**<br>१०.१९% कमी दराने<br>०७.८६% कमी दराने<br>०७.२% कमी दराने<br>०.५% कमी दराने<br>०५.०४ % जास्त दराने<br>०७.०२ % जास्त दराने |
| १३ | **भाईंदर (प.) बेकरी गल्ली ते स्मशानभूमी रस्त्याकडे व ४५.०० मी. डी.पी. रस्ता ते सुभाषचंद्र बोस मैदान नाल्यापर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>२. मे. के.आर. कंस्ट्रक्शन<br>३. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. यश इंटरप्रायझेस<br>५. मे. शयोना कॉर्पोरेशन<br>६. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>७. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं | **रु.८,७४,१०,७००/-**<br><br><br>**१८.२% कमी दराने**<br>१४.००% कमी दराने<br>०९.०१% कमी दराने<br>०७.०२% कमी दराने<br>०३.०० % जास्त दराने<br>०६.०३ % जास्त दराने<br>०७.९२ % जास्त दराने |
| १४ | **मिरारोड (पूर्व) एन.एच. स्कूल सर्कल ते कार्पोरेशन बँक ते सेक्टर नं. ११ बिल्डीग नं. ३४ पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे.**<br>**१. मे. के.आर. कंस्ट्रक्शन**<br>२. मे. महेश्वर बिल्डर्स<br>३. मे. यश इंटरप्रायझेस<br>४. एम.ई. प्रोजेक्टस्<br>५. ॲक्युट डिझाईन<br>६. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>७. मे. रॅचकॉन इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>८. जगदंबा कंस्ट्रक्शन कं. | **रु. २,६६,७३,१००/-**<br><br>**१७.१० % कमी दराने**<br>१४.७७ % कमी दराने<br>१२.०० % कमी दराने<br>०९.०१ % कमी दराने<br>०५.५८ % कमी दराने<br>०४.०५ % कमी दराने<br>०३.०८ % कमी दराने<br>०७.११ % जास्त दराने |
| १५ | **मिरारोड (पूर्व) निलम पार्क ते प्रिमीयम अपार्टमेंट ते १०० फुट रेल्वे समांतर रस्ता पर्यंत आर.सी.सी नाला बांधणे.**<br>**१. मे. महेश्वर बिल्डर्स**<br>२. मे. एम.ई.प्रोजेक्टस् प्रा.लि.<br>३. जगदंबा कंस्ट्रक्शन कं. | **रु. ९०,८९,६००/-**<br><br>**१६.४६ % कमी दराने**<br>०९.०१ % कमी दराने<br>०४.०५ % जास्त दराने |
| १६ | **मिरारोड (पूर्व) सेव्हेन इलेव्हन शाळेमागील राज इन्क्लेव्ह पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे**<br>**१. मे. यश इंटरप्रायझेस**<br>२. मे. के.आर. कंस्ट्रक्शन<br>३. मे. आर.एण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>५. मे. किंजल कंस्ट्रक्शन कं | **रु. ४,७७,९६,४००/-**<br><br>**१८.११ % कमी दराने**<br>१६.०२ % कमी दराने<br>०९.०१ % कमी दराने<br>०३.३३ % कमी दराने<br>०८.०१ % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| १७ | **मिरारोड (पूर्व) गौरव इन्क्लेव्ह सर्कल ते मंगलनगर उघाडी पर्यंत दोन्ही बाजूस आर.सी.सी नाला बांधणे.**<br>**१. मे. यश इंटरप्रायझेस**<br>२. मे. के.आर. कंस्ट्रक्शन<br>३. मे. एसबी इंटरप्रायजेस<br>४. मे. एम.ई.प्रोजेक्ट्स् प्रा.लि.<br>५. मे. बुकॉन इंजिनिअरर्स अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>६. जगदंबा कंस्ट्रक्शन कं. | **रु. १,९३,७६,२००/-**<br>**१६.११ % कमी दराने**<br>१४.०४ % कमी दराने<br>१२.५१ % कमी दराने<br>०९.०१ % कमी दराने<br>०३.३३ % कमी दराने<br>०५.०५ % जास्त दराने |
| १८ | **भाईदर (प.) फ्लाय ओव्हर ते नाझरेथ उघाडी पर्यंत नाला बांधणे.**<br><br>**१. मे. जेकिन इंटरप्रायझेस**<br>२. मे. आर.के.मधानी ॲण्ड कं.<br>३. मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स<br>४. मे. चिराग इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि.<br>५. मे. शायोना कॉर्पोरेशन<br>६. मे. आर ॲण्ड बी इंन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. | **रु. २७,२१,२६,६००/-**<br><br>**१८.६ % कमी दराने**<br>१६.२१ % कमी दराने<br>१४.४ % कमी दराने<br>१०.३५ % कमी दराने<br>१०.०४ % कमी दराने<br>७.०० % जास्त दराने |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ठेकेदारांनी सादर केलेल्या सर्वात कमी दराचे निविदा ह्या वाजवी आहेत. तरी अ.क्र.१ च्या कामी **मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स** यांची **१६.२ % कमी दराची** निविदा, अ.क्र.२ च्या कामी **मे. जेकिन इंटरप्रायझेस यांची ५.०० % कमी दराची निविदा** अ.क्र.३ च्या कामी **मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स** यांची १५.३ % कमी दराची निविदा अ.क्र.४ च्या कामी मे. **जेकिन इंटरप्रायझेस यांची ११.६ %** कमी दराची अ.क्र.५ च्या कामी **मे. जेकिन इंटरप्रायझेस यांची १२.०० % कमी दराची,** अ.क्र.६ च्या कामी मे महेश्वरी बिल्डर्स यांची दर वाटाघाटीनंतर २.०० % कमी दराची निविदा, अ.क्र.७ च्या कामी मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांची दर वाटाघाटीनंतर २.०० % कमी दराची निविदा, अ.क्र.८ च्या कामी मे. जिनांग इंन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांची दर वाटाघाटीनंतर २.०० % कमी दराची निविदा, अ.क्र.९ च्या कामी यांची दर वाटाघाटीनंतर मे. इंद्रा कंस्ट्रक्शन कं. १५.३९ % कमी दराची निविदा, अ.क्र.१० च्या कामी मे. एसबी इंटरप्रायजेस यांची १५.८८ % कमी दराची निविदा, अ.क्र.११ च्या कामी मे. जेकिन इंटरप्रायजेस यांची २१.६० % कमी दराची निविदा, अ.क्र.१२ च्या कामी मे. के.आर. कंस्ट्रक्शन यांची १३.५ % कमी दराची निविदा, अ.क्र.१३ च्या कामी मे. जेकिन इंटरप्रायजेस यांची १८.२ % कमी दराची निविदा, अ.क्र.१४ च्या कामी मे. के.आर. कंन्स्ट्रक्शन यांची १७.१० % कमी दराची निविदा, अ.क्र.१५ च्या कामी मे. महेश्वर बिल्डर्स यांची १६.४६ % कमी दराची निविदा, अ.क्र.१६ च्या कामी मे. यश इंटरप्रायझेस यांची १८.११ % कमी दराची निविदा, अ.क्र.१७ च्या कामी मे. यश इंटरप्रायझेस यांची १६.११ % कमी दराची निविदा, अ.क्र.१८ च्या कामी मे. जेकिन इंटरप्रायजेस यांची १८.६ % कमी दराची निविदा, या सर्व निविदांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. राजेश वेतोसकर ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

मिरा भाईदर महानगरपालिकेमार्फत E-Tendering द्वारे Online निविदा स्विकारल्या जातात, परंतु Online सादर केलेल्या कागदपत्रांबाबत काही वेळेस प्रिंट मिळत नाही व वाद निर्माण होतात, त्यामुळे यापुढे निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेच्या दिवशी व वेळेत संबंधित ठेकेदारांनी हार्ड कॉपी सुध्दा महानगरपालिकेकडे सादर करण्याची अट निविदेत टाकावी.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | |
| २ | अशोक तिवारी | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | ३ | मयेकर सरस्वती रजनीकांत | |
| ४ | ॲड. रवि व्यास | ४ | सिंग मदन उदितनारायण | |
| ५ | पाटील वंदना विकास | ५ | पाटील रोहिदास शंकर | |
| ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ६ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ७ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ८ | मेंडोन्सा स्टिवन जॉन | ८ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ९ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ९ | मेहता डिंपल विनोद | |
| १० | डॉ. आसिफ गुलाब शेख | १० | केळुसकर प्रशांत नारायण | निरंक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | गोविंद हेलन जॉर्जी | ११ | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| १२ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | १२ | रावल भगवती जयशंकर | |
| १३ | लियाकत ग. शेख | १३ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १४ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | १४ | शरद केशव पाटील | |
| १५ | खण्डेलवाल सुरेश | १५ | मेघना दिपक रावल | |
| १६ | नरेश तुकाराम पाटील | १६ | जैन गिता भरत | |
| १७ | शबनम लियाकत शेख | १७ | जैन रमेश धरमचंद | |
| १८ | अनिता जयवंत पाटील | १८ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १९ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | १९ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| २० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा. | २० | सुजाता रविकांत शिंदे | |
| २१ | भावसार शिल्पा कमलेश | २१ | मेहता नरेंद्र लालचंद | |
| २२ | वंदना रामदास चक्रे | २२ | जैन सिमा महेंद्र | |
| २३ | भोईर कमलेश यशवंत | २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २४ | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | २४ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २५ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २५ | जैन दिनेश तेजराज | |
| २६ | पिसाळ मनिषा नामदेव | २६ | अरोरा दिपिका पंकज | |
| २७ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २७ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २८ | पाटील सुनिता कैलास | २८ | अनिल बाबुराव भोसले | |
| २९ | वेतोसकर राजेश शंकर | २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| ३० | प्रभात प्रकाश पाटील | ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| ३१ | बगाजी शर्मिला विल्सन | ३१ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | |
| ३२ | झिनत रऊफ कुरेशी | ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| ३३ | सिंद्दीक मोहम्मद फरिद कुरेशी | ३३ | तारा विनायक घरत | |
| ३४ | पुजारी कांचना शेखर | ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | |
| ३५ | काझी रशीदा जमील | ३५ | शुभांगी महिन कोटियन | |
| ३६ | इनामदार जुबेर | ३६ | जयमाला किशोर पाटील | |
| ३७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३७ | संदिप मोहन पाटील | |
| ३८ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ३८ | परमार अनिता भरत | |
| ३९ | डिसा मर्लिन मर्विन | ३९ | पाटील प्रणाली संदिप | |
| ४० | भट दिप्ती शेखर | ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ४१ | विराणी रेखा अनिल | ४१ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ४२ | सामंत प्रमोद जयराम | ४२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४४ | भोईर भावना राजू | | | |
| ४५ | भोईर राजू यशवंत | | | |
| ४६ | मुन्ना सिंग | | | |

**ठराव सुचनेसह बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र.८ घ्या.

**लियाकत शेख :-**

प्रकरण क्र.८ विषयी मला काही बोलायचे आहे. मा. सभागृह नेते ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावास माझी सुचना आहे. सर्वप्रथम हॉस्पीटल चालविण्यासाठी राज्यशासनाला प्राधान्य देण्यात यावे. आणि यदाकदाचित राज्यशासनाने अंग काढले किंवा त्यांनी नकार दिला काही कारणास्तव त्यांनी रिफ्युज केलं तर गोरगरीब लोकांना सेवा पुरविणाऱ्या सेवाभावी संस्था किवा धर्मादाय संस्था ह्यांना प्राधान्य देण्यात यावे अशी मी सुचना करतो.

**हंसुकुमार पांडे :-**

सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. ध्रुवकिशोर पाटील ह्यांच्या ठरावामध्ये सुचना घेण्यात यावी. दोन ठराव आलेले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम मुळ ठरावामधुन खाजगी संस्था हा शब्द काढावा लागेल.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र.८ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन जुबेर इनामदार आणि त्या ठरावाला सुचना देखील आलेली आहे. सुचक लियाकत शेख आणि अनुमोदक हंसुकुमार पांडे ह्यांची आणि दुसरा ठराव सुचक नरेंद्र मेहता अनुमोदक प्रविण पाटील मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) येथे टेंभा हॉस्पीटल इमारत बांधकाम मा. उच्च न्यायालय जनहीत याचिका क्र. ३८/२००६ मधील निर्णयाच्या अनुषंगाने मा. महासभा दि. १६/०४/२००७ ठराव क्र. ०३ अन्वये हाती घेण्यात आलेले आहे. सदर इमारतीचे काम पूर्ण होत आलेले आहे.

सदर हॉस्पीटल इमारत बांधकाम पूर्ण होऊन सर्व सोयीने कर्मचारी वर्ग नेमून हॉस्पीटल सुरु करण्यास होणारा खर्च पाहता व सध्याची महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता व सदर हॉस्पीटल महानगरपालिकेने चालविण्यास महानगरपालिकेवर खुप मोठा आर्थिक व प्रशासकीय भार पडेल.

सदर हॉस्पीटल खाजगी कंपनी अथवा खाजगी ट्रस्ट मार्फत चालविण्यास सोयी पुरविणे शक्य होईल. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर मा. उच्च न्यायालयात Civil Application दाखल करण्यास मान्यता देण्यास शिफारस केली आहे.

परंतु टेंभा हॉस्पीटल खाजगी संस्था किंवा खाजगी ट्रस्टला न देता महाराष्ट्र शासन राज्यशासना मार्फत चालविण्यात यावे.

या पुर्वी तत्कालीन आयुक्त मा. शिवमुर्ती नाईक, आरोग्य मंत्री मा. सुरेश शेट्टीजी व आमदार श्री. प्रताप सरनाईक यांच्या सामुहीक बैठकीत मा. आरोग्य मंत्री सुरेश शेट्टीयांनी आवश्वासन दिले आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हॉस्पीटलची इमारत पूर्ण झाल्यानंतर शासनाच्या ताब्यात दिल्यास शासनामार्फत पुर्ण हॉस्पीटलचा खर्च व देखभाल करण्यात येईल व तसेच सदर हॉस्पीटलला सीव्हील हॉस्पीटलचा दर्जा देण्यात येईल म्हणून सदर हॉस्पीटल महाराष्ट्र शासनातर्फे चालु करण्याचा प्रस्ताव शासनास पाठविण्यासाठी ही सभा मान्यता देत आहे असा ठराव मांडत आहे. ह्या ठरावाच्या बाजुने मतदान करायचे आहेत, त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) येथे टेंभा हॉस्पीटल इमारत बांधकाम मा. उच्च न्यायालय जनहीत याचिका क्र. ३८/२००६ मधील निर्णयाच्या अनुषंगाने मा. महासभा दि. १६/०४/२००७ ठराव क्र. ०३ अन्वये हाती घेण्यात आलेले आहे. सदर इमारतीचे काम सद्यस्थितीत प्रशासनामार्फत थांबविण्यात आलेले आहे.

सदर हॉस्पीटल इमारत बांधकाम पूर्ण होऊन सर्व सोयीने कर्मचारी वर्ग नेमून हॉस्पीटल सुरु करण्यास होणारा खर्च पाहता व सद्याची महानगरपालिकेवर खुप मोठा आर्थिक स्थिती पाहता व सदर हॉस्पीटल महानगरपालिकेने चालविण्यास महानगरपालिकेवर खुप मोठा आर्थिक व प्रशासकीय भार पडणार आहे.
सदर हॉस्पीटल राज्य शासनाकडे हस्तांतर केल्यास अथवा खाजगी ट्रस्ट मार्फत चालविण्यास सोयी पुरविणे शक्य होईल. सदर धोरण निश्चित करण्यात येत असून याबाबत Civil Application मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. ह्या ठरावात सुचना देखील आहे ठराव आणि सुचनेच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

प्रकरण क्र.८ सुचक ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४६ आणि विरोधात ४२ तटस्थ शुन्य इतकी मते पडलेली आहेत ठराव सुचनेसह मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८ :-**

भाईंदर (प.) नियोजित टेंभा हॉस्पीटल खाजगी कंपनी अथवा खाजगी ट्रस्ट मार्फत चालविण्यास मंजुरी मिळणेकामी मा. उच्च न्यायालयात Civil Application दाखल करण्यास मान्यता देणे.

**ठराव क्र. १२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) येथे टेंभा हॉस्पीटल इमारत बांधकाम मा. उच्च न्यायालय जनहीत याचिका क्र. ३८/२००६ मधील निर्णयाच्या अनुषंगाने मा. महासभा दि. १६/०४/२००७ ठराव क्र. ०३ अन्वये हाती घेण्यात आलेले आहे. सदर इमारतीचे काम सद्यस्थितीत प्रशासनामार्फत थांबविण्यात आलेले आहे.

सदर हॉस्पीटल इमारत बांधकाम पूर्ण होऊन सर्व सोयीने कर्मचारी वर्ग नेमून हॉस्पीटल सुरु करण्यास होणारा खर्च पाहता व सद्याची महानगरपालिकेवर खुप मोठा आर्थिक स्थिती पाहता व सदर हॉस्पीटल महानगरपालिकेने चालविण्यास महानगरपालिकेवर खुप मोठा आर्थिक व प्रशासकीय भार पडणार आहे.

सदर हॉस्पीटल राज्य शासनाकडे हस्तांतर केल्यास अथवा खाजगी ट्रस्ट मार्फत चालविण्यास सोयी पुरविणे शक्य होईल. सदर धोरण निश्चित करण्यात येत असून याबाबत Civil Application मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. लियाकत शेख व अनुमोदक श्री. हंसुकुमार पांडे ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

सर्वप्रथम राज्य शासनाला हॉस्पीटल चालविणेसाठी आग्रह धरणेत यावा आणि यदा कदाचित शासनाने अंग काढले तर गोरगरिब यांना सेवा पुरविणाऱ्या सेवाभावी संस्था, धर्मदाय संस्था यांना हॉस्पीटल चालविणेसाठी प्राधान्य देणेत यावे अशी माझी सुचना आहे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | निरंक |
| २ | अशोक तिवारी | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | अन्सेन्ला मेन्डोसा परेरा | ३ | मयेकर सरस्वती रजनीकांत | |
| ४ | ॲड. रवि व्यास | ४ | सिंग मदन उदितनारायण | |
| ५ | पाटील वंदना विकास | ५ | पाटील रोहिदास शंकर | |
| ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ६ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ७ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ८ | मेंडोन्सा स्टिवन जॉन | ८ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ९ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ९ | मेहता डिंपल विनोद | |
| १० | डॉ. आसिफ गुलाब शेख | १० | केळुसकर प्रशांत नारायण | |
| ११ | गोविंद हेलन जॉर्जी | ११ | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| १२ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | १२ | रावल भगवती जयशंकर | |
| १३ | लियाकत ग. शेख | १३ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १४ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | १४ | शरद केशव पाटील | |
| १५ | खण्डेलवाल सुरेश | १५ | मेघना दिपक रावल | |
| १६ | नरेश तुकाराम पाटील | १६ | जैन गिता भरत | |
| १७ | शबनम लियाकत शेख | १७ | जैन रमेश धरमचंद | |
| १८ | अनिता जयवंत पाटील | १८ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १९ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | १९ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| २० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | २० | सुजाता रविकांत शिंदे | |
| २१ | भावसार शिल्पा कमलेश | २१ | मेहता नरेंद्र लालचंद | |
| २२ | वंदना रामदास चक्रे | २२ | जैन सिमा महेंद्र | |
| २३ | भोईर कमलेश यशवंत | २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २४ | सुमबंड महरूत्रीसा हारूनरशीद | २४ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २५ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २५ | जैन दिनेश तेजराज | |
| २६ | पिसाळ मनिषा नामदेव | २६ | अरोरा दिपिका पंकज | |
| २७ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २७ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २८ | पाटील सुनिता कैलास | २८ | अनिल बाबुराव भोसले | |
| २९ | वेतोसकर राजेश शंकर | २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| ३० | प्रभात प्रकाश पाटील | ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| ३१ | बगाजी शर्मिला विल्सन | ३१ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | |
| ३२ | झिनत रऊफ कुरेशी | ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| ३३ | सिंद्धीक मोहम्मद फरिद कुरेशी | ३३ | तारा विनायक घरत | |
| ३४ | पुजारी कांचना शेखर | ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | |
| ३५ | काझी रशीदा जमील | ३५ | शुभांगी महिन कोटियन | |
| ३६ | इनामदार जुबेर | ३६ | जयमाला किशोर पाटील | |
| ३७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३७ | संदिप मोहन पाटील | |
| ३८ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ३८ | परमार अनिता भरत | |
| ३९ | डिसा मर्लिन मर्विन | ३९ | पाटील प्रणाली संदिप | |
| ४० | भट दिप्ती शेखर | ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ४१ | विराणी रेखा अनिल | ४१ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ४२ | सामंत प्रमोद जयराम | ४२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४४ | भोईर भावना राजू | | | | |
| ४५ | भोईर राजू यशवंत | | | | |
| ४६ | मुन्ना सिंग | | | | |

**ठराव सुचनेसह बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पूर्व) कनकीया जलकुंभ पासून रामदेव पार्क ते आयडीयल पार्क ते इंद्रलोक पर्यंत नविन जलवाहीनी अंथरणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**बर्नड डिमेलो :-**

वरील संदर्भिय विषयांनुसार मिरा-भाईंदर शहराची वाढ ही प्रामुख्याने भाईंदर (पुर्व) येथील मौजे गोडदेव, नवघर, गावांच्या हद्दीत झालेली आहे. सदर ठिकाणी प्रामुख्याने मोठी गृहसंकुले उभारण्यात आलेली आहेत. भाईंदर (पुर्व) येथील प्रभाग क्र ३१ हा प्रामुख्याने नव्याने विकसीत झालेला परिसर असून लोकसंख्या वाढीचे प्रमाण हे अधिकच जास्त आहे. सदर परिसरातील नागरीकांना पाणी पुरवठा हा कनाकिया जलकुंभाव्दारे होत आहे. सदर परिसरात काही ठिकाणी पाणी पुरवठा कमी दाबाने होत असल्याबाबत लोकप्रतिनिधी व नागरीक यांचेकडील तक्रारींचे प्रमाण वाढले आहे. तसेच सदर परिसरात काही ठिकाणी महानगरपालिकेच्या मुख्य जलवाहिन्यासुद्धा अस्तित्वात नाही.

त्यानुसार सदर परिसराची प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून कनाकिया जलकुंभापासुन इंद्रलोक, रामदेव पार्क, आडीयल पार्क, श्रीराम नगर, वागड नगर, कनाकिया पार्क परिसरात विविध व्यासाच्या जलवाहिनी अंथरल्यास परिसरातील पाणी पुरवठयाची समस्या दूर होऊ शकेल. तसेच नागरिकांना उदभवलेली कमी दाबाने व कमी प्रमाणात होणाऱ्या पाणी पुरवठयाची समस्या दूर होऊ शकते. सदर कामासाठी रू.१,४०,०६,३००/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

तरी मिरा-भाईदर महानगरपालिका हदिदतील भाईदर पुर्व कनाकिया जलकुंभापासुन रामदेव पार्क ते आयडीयल पार्क इंद्रलोक पर्यंत नविन जलवाहिनी अंथरणे (अंदाजित खर्च रू.१,४०,०६,३००/-) कामासाठी होणाऱ्या खर्चास व निविदा मार्गविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**वंदना चक्रे :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

पिठासीन अधिकाऱ्याच्या परवानगीने बोलते, विरोधी पक्षनेत्याचा वाद आहे आणि एवढ्या मोठ्या रकमेचे अंदाजपत्रक तिथे वापरले जाते. मा. पिठासीन अधिकारी साहेब मला आपल्याला सांगायचे आहे की, आपण ह्या जलवाहिन्या अंथरतो आहे. एकप्रकारे नागरीकांची सोय करतो की, ह्या जलवाहिन्यामधुन शहरातील अगदी नव्याने निर्माण झालेल्या वसाहतीपर्यंत पाणी जाईल ह्या शहरातील शेवटचा घटक जिथे आहे तिथे पाणी मिळेल परंतु मी आपल्या निर्दशनाला आणून देते की ०४/१०/२०११ पासून ह्या शहरात पाणी कनेक्शन बंद आहे. ह्या जलवाहीन्या अंथरुन तुम्ही तिकडच्या नागरीकांचे फक्त समाधान करणार की घास दाखवून काय करणार ह्याच्यापूढे तुम्ही काय करणार? विरोधी पक्षनेते माझे आपल्याला सुध्दा म्हणणे आहे की, आपण ह्या जलवाहीन्या अंथरतो पण त्याचे पुढचे प्रयोजन काय? शहरातील वाढती लोकसंख्या विचारात घेता नविन नविन गृहसंकुले उभी राहतात लोक तिथे फार मोठ्या प्रमाणात शहरामध्ये रहायला येतात मध्यंतरी दोन बातम्या वर्तमान पत्रातून प्रसिध्द झाल्या टँकर घोटाळा आपल्याकडुन ४०० न्यायचे आणि बाहेर ६०० ला विकायचे पेपरला बातमी आली त्यानंतर मध्यंतरी अशी बातमी आली की पेणकरपाडा महाजनवाडीत कोणत्यातरी बिल्डरनी मुख्य जलवाहीनीला अनाधिकृत कनेक्शन केले हे सगळे का होते कारण जिथे पाणी जायला पाहिजे. नागरीकाची तहान भागली पाहिजे त्याला प्रमाणामध्ये पाणी मिळायला पाहिजे त्याला पिण्याच्या पाण्याची सोय व्हायला पाहिजे हे होत नाही म्हणुन चोऱ्या होतात. ह्या विषयाला अनुसरुन आपण करोडोनी खर्च करतो तेव्हा जिथे आवश्यक आहे ज्याची कागदपुर्तता आहे ज्याच्याकडे सर्वकाही पेपर्स आहेत आणि ज्यांना पाण्याची गरज आहे त्या लोकांसाठी आपण पाणीपुरवठा विषयक धोरण ठरवायला पाहिजे पाणी कनेक्शन चालु व्हायला पाहिजे ह्यासाठी तो विषय घ्या मी म्हणत नाही की, आजच त्याचे उत्तर द्या परंतु तो विषय पुढच्या वेळेला सभागृहात चर्चेला घ्यावा आणि ह्याविषयाचा ठोस निर्णय घ्यावे अशी माझी अपेक्षा आहे ह्या विषयाचे गांभिय लक्षात घ्यावा अशी माझी अपेक्षा आहे ह्या विषयाचे गांभिय लक्षात घ्यावे हि विनंती.

**पिठासीन अधिकारी :-**

वाकोडे साहेब मॅडमची सुचना नोट करुन घ्या आणि बर्नड डिमेलो नगरसेवक आणि वंदना चक्रे यांनी जो ठराव मांडलेला आहे हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आलेला आहे.

**प्रकरण क्र. १४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पूर्व) कनकीया जलकुंभ पासून रामदेव पार्क ते आयडीयल पार्क ते इंद्रलोक पर्यंत नविन जलवाहीनी अंथरणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. १७ :-**

वरील संदर्भिय विषयानुसार मिरा-भाईंदर शहराची वाढ ही प्रामुख्याने भाईंदर (पुर्व) येथील मौजे गोडदेव, नवघर, गावांच्या हद्दीत झालेली आहे. सदर ठिकाणी प्रामुख्याने मोठी गृहसंकुले उभारण्यात आलेली आहेत. भाईंदर (पुर्व) येथील प्रभाग क्र ३१ हा प्रामुख्याने नव्याने विकसीत झालेला परिसर असून लोकसंख्या वाढीचे प्रमाण हे अधिकच जास्त आहे. सदर परिसरातील नागरीकांना पाणी पुरवठा हा कनाकिया जलकुंभाव्दारे होत आहे. सदर परिसरात काही ठिकाणी पाणी पुरवठा कमी दाबाने होत असल्याबाबत लोकप्रतिनिधी व नागरीक यांचेकडील तक्रारींचे प्रमाण वाढले आहे. तसेच सदर परिसरात काही ठिकाणी महानगरपालिकेच्या मुख्य जलवाहिन्यासुद्धा अस्तित्वात नाही.

त्यानुसार सदर परिसरांची प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून कनाकिया जलकुंभापासुन इंद्रलोक, रामदेव पार्क, आडीयल पार्क, श्रीराम नगर, वागड नगर, कनाकिया पार्क परिसरात विविध व्यासाच्या जलवाहिनी अंथरल्यास परिसरातील पाणी पुरवठयाची समस्या दूर होऊ शकेल. तसेच नागरिकांना उदभवलेली कमी दाबाने व कमी प्रमाणात होणाऱ्या पाणी पुरवठयाची समस्या दूर होऊ शकते. सदर कामासाठी रू.१,४०,०६,३००/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

तरी मिरा-भाईदर महानगरपालिका हदिदतील भाईदर पुर्व कनाकिया जलकुंभापासुन रामदेव पार्क ते आयडीयल पार्क इंद्रलोक पर्यंत नविन जलवाहिनी अंथरणे (अंदाजित खर्च रू.१,४०,०६,३००/-) कामासाठी होणाऱ्या खर्चास व निविदा मागविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो            अनुमोदक :- श्रीम. वंदना चक्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र.१५, कमला पार्क येथील उंच सलोह जलकुंभाची (क्षमता १.७५ द.ल.ली.) IIT मुंबई यांनी दिलेल्या अहवालानूसार दुरुस्ती करणेबाबत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, आम्ही ठराव मंजुर करतो विरोध करीत नाही २००२-०३ ला आपल्याला ५० एम एल डी आपल्याला हस्तांतर झाले आणि ९ वर्षामध्ये ह्याच्यात दुरुस्ती निघाली कुठल्याही पाण्याच्या टाकीला ९ वर्षामध्ये दुरुस्ती निघत नाही. ज्या स्ट्रक्चर इंजिनिअरने रिपोर्ट दिला किंवा ज्यांच्या सुपरव्हिजनमध्ये हे काम झाले आहे त्यांनी तो खुलासा करावा की, नक्की त्याची लाईफ किती होती की ९ वर्षामध्ये पाण्याच्या टाक्या खराब व्हायला लागल्या २००३ ला ती स्कीम हॅन्ड ओव्हर झाली आहे आज हे निघाले तर बाकी टाक्यामध्ये उद्या निघेल तर त्यांनी गॅरंटी किती दिलेली आणि जबाबदारी कोणाची आहे त्याबद्दल खुलासा केला तर क्लीअर होईल मान्यता द्यायला काय हरकत नाही कारण आपल्याला ते करावच लागेल.

**सुरेश वाकोडे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की कमलापार्कची टाकी ५० एमएलडी बांधलेली नाही तर ती जुनी ८६ सालची सालची टाकी आहे. त्याची पाहणी केली आहे.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिके अंतर्गत डोंगरी संतुलन टाकी, चेना, वर्सोवा, गोडदेव, कमला पार्क, मोर्वा व उत्तन येथील उंच सलोह जलकुंभ १९८६ साली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण टप्पा-१ या योजने अंतर्गत बांधलेले आहेत. सदर जलकुंभ जुने झाले असून त्यांचे Structural Audit करुन मिळणेबाबत. IIT मुंबई यांना दि. १५/०२/२०१२ रोजी कळविण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने IIT मुंबई यांचे अधिकारी व कर्मचारी यांनी दि. १७/०२/२०१२ रोजी प्रत्यक्षात कार्यक्षेत्रावरती सर्व उंच सलोह जलकुंभांची व संतुलन टाकीची पाहणी केली दि. ०९/०३/२०१२ रोजी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावरती RCC Structure च्या आवश्यत्या सर्व चाचण्या घेण्यात आल्या. सदर चाचणीच्या अनुषंगाने IIT मुंबई, यांनी अहवाल सादर केलेला आहे.

सदर अहवालानुसार कमला पार्क येथील ESR Structurally सुरक्षित असून उघडले पडलेले Beam, Slab, Staircase व कंटेनर इत्यादी उपागांची दुरुस्ती IIT मुंबई ने नमुद केलेल्या सुचना नुसार

करणे आवश्यक आहे. तसेच सद्यस्थितीत टाकीचे स्टील उघडे पडून गंजलेले आहे. त्यामुळे तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे अन्यथा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यानुसार सदर दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रकीय खर्च रु. ६१,४४,६६९/- एवढे येत असून सदर काम पाण्याची टाकी / इमारत बांधकाम या लेखाशिर्ष अंतर्गत रु. १५०.०० लक्ष तरतुद असून सदर तरतुदी अंतर्गत दुरुस्तीसाठी येणारा खर्च रु. ६१,४४,६६९/- ला मंजूरी मिळून दुरुस्ती करणेकामी हि सभा मंजुरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

पिठासीन अधिकाऱ्याच्या परवानगीने बोलतो, वाकोडे साहेब, सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये जी पाण्याची टाकी आहे ती मागील दहा वर्षापासून तशीच अर्धवट पडलेली आहे.

**पिठासीन अधिकारी :-**

५० एमएलडी योजने अंतर्गत जेवढी कामे राहीली आहेत त्याच्यामध्येच आहे तो विषय आपण नेक्स्ट मिटींगमध्ये घेतलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

चालेल.

**पिठासीन अधिकारी :-**

सन्मा. बर्नड डिमेलो आणि सन्मा. जुबेर इनामदार ह्यांनी जो ठराव मांडला आहे तो सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १५ :-**

कमला पार्क येथील उंच सलोह जलकुंभाची (क्षमता १.७५ द.ल.ली.) IIT मुंबई यांनी दिलेल्या अहवालानूसार दुरुस्ती करणेबाबत.

**ठराव क्र. १८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिके अंतर्गत डोंगरी संतुलन टाकी, चेना, वर्सोवा, गोडदेव, कमला पार्क, मोर्वा व उत्तन येथील उंच सलोह जलकुंभ १९८६ साली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण टप्पा-१ या योजने अंतर्गत बांधलेले आहेत. सदर जलकुंभ जुने झाले असून त्यांचे Structural Audit करुन मिळणेबाबत. IIT मुंबई यांना दि. १५/०२/२०१२ रोजी कळविण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने IIT मुंबई यांचे अधिकारी व कर्मचारी यांनी दि. १७/०२/२०१२ रोजी प्रत्यक्षात कार्यक्षेत्रावरती सर्व उंच सलोह जलकुंभांची व संतुलन टाकीची पाहणी केली दि. ०९/०३/२०१२ रोजी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावरती RCC Structure च्या आवश्यत्या सर्व चाचण्या घेण्यात आल्या. सदर चाचणीच्या अनुषंगाने IIT मुंबई, यांनी अहवाल सादर केलेला आहे.

सदर अहवालानुसार कमला पार्क येथील ESR Structurally सुरक्षित असून उघडले पडलेले Beam, Slab, Staircase व कंटेनर इत्यादी उपागांची दुरुस्ती IIT मुंबई ने नमुद केलेल्या सुचना नुसार करणे आवश्यक आहे. तसेच सद्यस्थितीत टाकीचे स्टील उघडे पडून गंजलेले आहे. त्यामुळे तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे अन्यथा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यानुसार सदर दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रकीय खर्च रु. ६१,४४,६६९/- एवढे येत असून सदर काम पाण्याची टाकी / इमारत बांधकाम या लेखाशिर्ष अंतर्गत रु. १५०.०० लक्ष तरतुद असून सदर तरतुदी अंतर्गत दुरुस्तीसाठी येणारा खर्च रु. ६१,४४,६६९/- ला मंजूरी मिळून दुरुस्ती करणेकामी हि सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र.१६, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४८क नुसार रस्ता कर लागु करणेबाबत मंजुरी मिळणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत रु. १९०० कोटींचे प्रकल्प सादर केलेले आहेत. त्यामध्ये ५०%शासन व उर्वरीत ५०% रक्कम महानगरपालिकेस उभी करावी लागणार आहे. जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत एम. ओ. यु. मध्ये उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची हमी महानगरपालिकेने दिलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम १४८क नुसार रस्ता कर लावण्याची तरतूद असून तरतूदी नुसार "रस्ता कर" १०%पर्यंत लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे, असे त्यांनी गोषवारामध्ये सुचवीले आहे.

०१ एप्रिल, २०१० पासून महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत असलेला "जकात कर" रद्द करुन त्याऐवजी "स्थानिक संस्था कर" लागू करणेचे निर्देश राज्य शासनाचे महानगरपालिकेस दिलेले आहेत. त्याप्रमाणे २०१०-२०११ मध्ये ११९.४३ कोटी सन २०१२-१३ मध्ये १५१.८ कोटी आणि चालू वर्षाच्या ८ महिन्यांच्या अवधीमध्ये ८९.४१ कोटी इतके उत्पन्न महापालिकेला झालेले आहे. तसेच मा. महासभा दि. ३०/०७/२०१० प्रकरण क्रमांक. २७ ठराव क्र. ३२ प्रमाणे मा. महासभेने मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील बाब क्र. ३३, परिशिष्ठ ४ मधील ६ अन्वयेच्या तरतूदीनुसार मालक किंवा पट्टाधारक यांनी सुविधा विकसीत करुन हस्तांतरीत केल्यास हस्तांतरीत केलेल्या क्षेत्रा इतके विकास हक्क प्रमाणपत्र जमीनधारक किंवा पट्टाधारक यांना देता येते. या तरतूदीनुसार रस्ता किंवा आरक्षणे ही एकाच मालकाची असल्यास, या तरतूदीचा अवलंब करता येतो. तथापि, रस्ता व बांधकाम योग्य आरक्षणे यांचा मालकी हक्क विविध धारकांकडे/ विकासकाकडे/उपविकासकाकडे/अधिकारपत्राधारकाकडे असल्यास या तरतूदीचा वापर करता येत नाही. तसेच विकास नियंत्रण नियमावलीमधील बाब क्र. ९(IV) (A) नुसार नियोजित रस्ते हे मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये रस्ते व बांधकाम योग्य आरक्षणे विकसीत करावयाचे असल्यास, अशा सोईसुविधांचे अंदाजपत्रक महानगरपालिकेकडून तयार करुन संभाव्य खर्चाचा आढावा घेण्यास द्यावा व सुविधेसाठी होणा-या संभाव्या किमान खर्चावर आधारीत त्या-त्या नियोजन प्रभागातील बाजारमुल्य तक्त्यातील दरानुसार विकास हक्क प्रमाणपत्र खर्चाचे प्रमाणात क्षेत्राचे स्वरुपात देण्यात येईल, या अटीवर जाहीर निविदा मागवून स्पर्धात्मक जो विकासक/कंत्राटदार कमीत कमी विकास हक्क प्रमाणपत्र घेण्याचे बोली निविदा पध्दतीनुसार सादर करेल, त्यास या सुविधा विकसीत करण्यासाठी कार्यादेश देता येवू शकेल. या पध्दतीनुसार सुविधा विकसीत केल्यास महानगरपालिकेचा खर्च होणार नाही. तसेच सुविधा विकासासाठी कर्ज उपलब्ध करुन घेण्याची आवश्यकता भासणार नाही. सुविधा / विकास कामे ही महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार कार्यप्रणाली व संहितेप्रमाणे होवू शकतात. तसेच या विकसीत होणा-या सोईसुविधांची गुणवत्ता तपासणी व इतर बाबी ह्या महानगरपालिकेच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार होणे आवश्यक राहील. या अनुषंगाने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बाब क्र. ९(IV)(A) व बाब क्र. ३३ परीशिष्ठ ४(६) मधील मिरा भाईंदर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये प्रस्तावित फेरबदल आवश्यक वैद्यानिक कार्यवाही पूर्ण करुन अंतिम मंजूरी करीता पत्र क्र. मनपा/नर/३१६६/२०१०-२०११ दि. २९/११/२०१० व स्मरण पत्र. मनपा/नर/१८६०/२०११-२०१२ दि. १६/०९/२०११ अन्वये शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे.CZMP नकाशानुसार बहुतांश क्षेत्र सी.आर.झेड. ने बाधीत होत आहे. त्यामुळे विकासावर निर्बंध आलेले आहे. महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन, चौक, पाली, डोंगरी व तारोडी या पाच गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA)ची नियुक्ती झालेली आहे. तसेच मिरा-भाईंदर शहरामध्ये (JNNURM) अंतर्गत भुयारी गटार योजनेचे काम राबविले जात आहे. आजमितीस सरासरी ६०% काम पूर्ण झालेले आहे व ब-याच रस्त्यांवर आजही मलःनिसःरण वाहिनी अंथरण्याचे काम सुरु आहे. तद्नंतर सदरच्या जलवाहिनीला इमारतींना जोडण्याचे कामही करावयाचे शिल्लक आहे. त्या कारणास रस्त्यांची ब-याच प्रमाणात मोडतोड होणार आहे. सन २०११-१२ या वर्षापासुन ८% भुयारी गटार योजनेकरीता कर शहरवासीयांना मालमत्ता करामध्ये लागू केलेला आहे. स्थानिक उपकर विभागामार्फत मिळणारे उत्पन्न व विकास योजनेमध्ये खाजगी माध्यमातून रस्ते विकसीत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी अंतिम टप्प्यात आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करताना प्रशासनाने दिलेला रस्ता कर लागू करण्याचा दिलेला प्रकरण क्र. १६ चा विषय फेटाळत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम विषय फेटाळल्यावर जास्त बोलायचे नाही. आज आपण चांगला निर्णय घेतला आहे. प्रशासनाने आपल्याला जो गोषवारा सादर केलेला आहे. त्याप्रमाणे सभागृहाने भावुक होऊन करवाढीचा निर्णय घेतला असता तर ते चुकीचे झाले असते. प्रशासनाचे म्हणणे आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिका जेएनयुआरएम अंतर्गत १९०० कोटी प्रकल्प सादर केले आहेत त्यामध्ये ५० टक्के आपल्याला खर्च होणार आहे. मला सांगा रस्त्यामध्ये जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत किती पैसे आले अधिकाऱ्याने सांगावे मॅडम एक रुपया आला नाही, दिलेला नाही आणि देणारही नाही आम्हाला दाखवतात की ५० टक्के पैसे लागणार आहे हे परत फेड करण्यासाठी हा रस्ता लाभ कर लावायला लागणार आहे हे तुम्हाला आम्हाला जुन्या सदस्यांना माहित आहे म्हणुन तो निर्णय आपण घेत आहोत नाही तर ह्याच्या निर्णयाप्रमाणे टॅक्स वाढवला असता नंतर माहित पडेल की जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत लोनच नाही.

**बर्नड डिमेलो :-**

त्यासाठीच फेटाळला.

**नरेंद्र मेहता :-**

उदाहरण द्यायची गरज काय जे जे.एन.एन.यु.आर.एम. चे पैसे भरायचे आहेत म्हणून आम्हाला रस्ता लाभ कर पाहिजे दुसऱ्या ठिकाणी मॅडम म्हटले आहे की मिरा भाईंदर महानगरपालिका जकात ऐवजी एलबीटी लावण्यात आले आहे कमी उत्पन्न होईल असे नाकारता येत नाही मला सांगा तीन वर्षात किती कमी आले. डे बाय डे वी हॅव इन्क्रीज आपल्या डिमांडपेक्षाही जास्त आले आहे. हे सभागृहाला माहित आहे. मॅडम आमचे म्हणणे आहे की, प्रशासनाने आपल्याला गोषवारा दिला. आपल्याला ते पटले म्हणून आपण आज आम्हाला या ठिकाणी मिटींगसाठी बोलावले. आत्ता ही सर्व माहिती चुकीची आहे.

**मा. महापौर :-**

सी दे वॉट समथिंग सो दे आर गिविंग अस सम रिजन फॉर ईट.

**रोहिदास पाटील :-**

पण रिजन चुकीचे नाही द्यायला पाहिजे हा गोषवारा शासनाकडेपण जातो ही त्यांची रिस्पॉन्सीबिलीटी आहे की, ते सभागृहात देतेवेळी काय कारण देतात. सहा दिवसापूर्वी माझ्या हातात पत्र दिलेले आहे. माझ्या नावाचे लेखी पत्र आहे की, या एलबीटीमध्ये उत्पन्न मी अशी एक शंका व्यक्त केली होती. इथे व्यापाऱ्यांना टॅक्स विचारत होते. व्यापाऱ्यांचे एक शिष्ट मंडळ माझ्याकडे आले होते. मी लेखी पत्र दिलेले की, व्यापाऱ्यांमध्ये असा एक समज होतो किंवा त्यांची हॅरेसमेंट होते हे कागद द्या, ते कागद द्या. आजपर्यंत या शहरामध्ये व्यापाऱ्यांनी या कामामध्ये आपल्याला सहकार्य केलेले आहे. त्यांना भिती वाटली नाही पाहिजे. अशा पध्दतीने आपल्या कर्मचाऱ्यांची वर्तणुक रहावी असे मा. आयुक्तांना पत्र दिले होते. मा. आयुक्तांनी मला पत्र दिलेले आहे की, याच्यामध्ये कोणी व्यापारी नाराज नाही आपले उत्पन्न वाढते आहे असे माझ्याकडे लेखी पत्र आहे आणि इकडे आपण स्पष्ट देतो की, आपला लॉस आहे किंवा काय आहे? ही चुकीची माहिती आहे हा विषय गंभीर आहे.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

हे दोन मुद्दे झाले मॅडम, मागच्या वेळी आपण एक ठराव केलेला परत आपल्याच तर्फे आपण रस्ता लाभकर लावला होता. मग ठराव मांडला गेला की, रस्ता कर या मिरा भाईंदर शहरात लागु नाही कारण आपण टीडीआर देऊन रस्ता बनवणार आहोत ते तुम्ही रद्द केल्याशिवाय डायरेक्ट नविन कसे होईल? बीकॉज यु हॅज चेंज द पॉलिसी रस्ता लाभकर लावता येणार नाही. कारण आपण टीडीआर देणार आहोत तुम्हाला तो ठराव रद्द करायला पाहिजे पॉलिसीवर पॉलिसी होत नाही जुनी पॉलिसी चेंज करायची तेही प्रशासनाने कुठे गोषवाऱ्यात जे म्हणायचे ते म्हटलेच नाही की, यापूर्वी असे लावले होते नंतर सभागृहाने हा निर्णय घेतलेला म्हणून याची आवश्यकता नाही हे म्हटलेच नाही भलतेच मुद्दे लावून ते म्हणतात दुसरा भाग हा झाला की, खरोखर एखाद्या उत्पन्नाची गरज आहे, आपले श्री. दिपक सावंत साहेब आत्ता हेड ऑफ दि डिपार्टमेंट आहेत. ते ऑडीट रिपोर्ट बघा याच्यात त्यांनी महापालिकेवर स्पष्ट आरोप केले आहेत, तुम्ही कित्येक लोकांना बिले पाठवलेली नाहीत. हे तुमचे पैसे बाकी आहेत. तिथपर्यंत तुम्ही गेलेच नाहीत. धिस ईज द ऑडीट रिपोर्ट हे पैसे ते वसुल करत नाहीत. दुसरे एनए ओपन लँन्डचे, मॅडम साधारण आय कॅन चॅलेंज इन द हाऊस, मोर दॅन ॲन्ड ट्वेन्टी क्रोर रुपीस, ईट इज अ बॅलेंस आता कमिश्नर साहेबांकडे जो कोणी, कुठल्याही परवानगीला गेला की, हे पैसे भर, ते पैसे भर, हे आण, ते आण, सगळे लावून घेतो. आणि जो जातच नाही त्याला कुठलेच कायदे लागु नाहीत. त्यांना ओपन लँन्डचे विचारा. वीस करोड बाकी आहेत, ते वसुल केले तर कितीतरी कामे करता येतील. ते तर कोणी वसुल करतच नाहीत. तुम्ही श्री. दिपक सावंत साहेबांना उभे करा आम्हाला खुलासा करावा ऑडीटमध्ये त्यांच्याबद्दल एवढ्या चुका आहेत कितीतरी क्वेरी काढल्या आहेत. त्यामध्ये कुठलेही काम नाही. बिले पाठवली नाहीत, कर आकारणी केली नाही, २००८-०९ पासून कर आकारणी नाही, हे ऑडीट रिपोर्ट आहेत. तुमचेच रिपोर्ट आहेत. ज्याला कर लागत नाही, त्याने बिनधास्त राहायचे आणि ज्याला आहे त्यांनी डबल, ट्रिपल टॅक्स भरत रहायचे. ही खरी माहिती त्यांनी सभागृहासमोर क्लीअर करावी. ऑडीटचे जे मुद्दे आहेत ते त्यांनी का केले नाहीत, ते क्लीअर करावे आत्ता टॅक्सचे पॉलीसी डिसीजन आणि अधिकारीच नाही आपण विषय पेंडींग ठेवायला पाहिजे होता.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, आपण विषय फेटाळला. श्री. दिपक सावंत, कर निर्धारक आहेत. ते जागेवर नाहीत आणि प्रत्येक विषयावर आपण त्या ठरावामध्ये उल्लेख केला आहे की, आपल्याला एलबीटी मधुन किती उत्पन्न आहे. आपला उत्तनपासून परिसर एम.एम.आर.डी.ए. च्या ................

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

अधिकाऱ्यांनी जी चुकीची माहिती दिली ती ॲक्सेप्ट करायची?

**जुबेर इनामदार :-**

त्यांनी चुक केली म्हणून आम्ही त्यांचा गोषवारा फेटाळत आहोत.

**मा. महापौर :-**

आपसात बोलू नका श्री. दिपक सावंत साहेब नाहीत आणि आपण ऑलरेडी हा विषय फेटाळला आहे.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

त्याबद्दल शहराच्या वतीने आणि पक्षाच्या वतीने आपले मनःपूर्वक आभार. मला एक सांगा असेच अधिकारी खोटी माहिती देणार आणि तुम्ही आम्हाला अशीच खोटी माहिती सादर करत राहणार, आम्ही काय करायचे? असेच अभ्यास करुन यायचे का? सगळ्या खोट्या माहिती द्यायच्या आणि जे खरे आहे ते देतच नाही. जे.एन.एन.यु.आर.एम. आणि आपल्या रस्त्याचे काही घेणे-देणेच नाही. त्यांनी ते उदाहरण दिले आहे. एलबीटी चे कमी उत्पन्न, आत्ता उत्पन्नामध्ये वाढ झाली आहे तरी कमी या शहराचे जे काही पॉलिसी डिसीजन आहेत ते या सभागृहामध्ये होतात. सर्व निवडुन आलेले सदस्य या शहराचा निर्णय घेत असतात आणि अधिकारी याप्रकारे खोटी माहिती देऊन आपल्याकडुन खोटे काम करुन घेत असेल तर आम्ही हे सहन करायचे का? तुम्ही अधिकाऱ्यांना बोलता की, ठिक आहे, ते केले असेल, आम्ही फेटाळला असे नाही. आम्हाला चुकीची माहिती देऊन आमची दिशाभुल कशाला? आपल्याला पटत असेल तर आपण घ्या. पण आम्ही खोटी माहिती कशाला घ्यावी? त्यांच्यावर कारवाई करायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हे सगळे सगळ्यांना समजण्यासाठीच आम्ही सांगतो. आमचा दुसरा कोणता उद्देश नाही. निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर आम्ही पंधरा दिवसांनी पत्र दिले की, या सभागृहामध्ये पुष्कळ नविन चेहरे आलेले आहेत, जे शिकलेले आहेत महापालिका ॲक्टचे त्यांना ज्ञान व्हावे म्हणुन महापालिकेतर्फे आपण कायद्याचे पुस्तक दरवर्षी देतो.

**मा. महापौर :-**

आपण ३ जानेवरीला प्रशिक्षण ठेवले आहे त्यामध्ये आपण सर्व उपलब्ध करुन देऊ.

**रोहिदास पाटील :-**

ते द्यायला पाहिजे आम्ही तीन पत्र दिली त्याला काही उत्तर नाही.

**प्र. नगरसचिव :-**

पुस्तके लवकरच मिळतील ऑर्डर दिलेली आहे.

**मा. महापौर :-**

माझ्या माहितीप्रमाणे असेसमेंटची ऑर्डर दिलेली आहे.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

माझे होते की, त्यांनी आम्हाला सभागृहाला चुकीची माहिती दिली, ही खरोखरच गंभीर बाब आहे. आपण इझी घेतले तर त्याला काही महत्व नाही पण महत्वाचे घेतले तर खुप मोठी बाब आहे. लोकप्रतिनिधी बरोबर फसवणुक करणे झाले असाच त्याचा मिनिंग झाला. व्हॉट दे आर सेईंग दॅट इज अ पेपर, विच इज अ पॉलिसी डिसीजन या शहराला लागु होणार आहे. आपण हा कायदा करतो आहे. आपण कागदपत्र वाटत नाही. वी आर डुईंग कायदा आपण ॲक्ट करतो आणि त्यामध्ये अशी खोटी माहिती दिली आणि आपण निर्णय घ्यायचा का? श्री. दिपक सावंत साहेब आल्यानंतर खुलासा करायला सांगा.

**प्रकरण क्र. १६ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४८क नुसार रस्ता कर लागु करणेबाबत मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ९९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत रु. १९०० कोटींचे प्रकल्प सादर केलेले आहेत. त्यामध्ये ५०%शासन व उर्वरीत ५०% रक्कम महानगरपालिकेस उभी करावी लागणार आहे. जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) अंतर्गत एम. ओ. यु. मध्ये उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची हमी महानगरपालिकेने दिलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम १४८क नुसार रस्ता कर लावण्याची तरतूद असून तरतूदी नुसार "रस्ता कर" १०%पर्यंत लागू करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे, असे त्यांनी गोषवारामध्ये सुचवीले आहे.

०१ एप्रिल, २०१० पासून महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत असलेला "जकात कर" रद्द करुन त्याऐवजी "स्थानिक संस्था कर" लागू करणेचे निर्देश राज्य शासनाचे महानगरपालिकेस दिलेले आहेत. त्याप्रमाणे २०१०-२०११ मध्ये ११९.४३ कोटी सन २०१२-१३ मध्ये १५१.८ कोटी आणि चालू वर्षाच्या ८ महिन्यांच्या अवधीमध्ये ८९.४१ कोटी इतके उत्पन्न महापालिकेला झालेले आहे. तसेच मा. महासभा दि. ३०/०७/२०१० प्रकरण क्रमांक. २७ ठराव क्र. ३२ प्रमाणे मा. महासभेने मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील बाब क्र. ३३, परिशिष्ठ ४ मधील ६ अन्वयेच्या तरतूदीनुसार मालक किंवा पट्टाधारक यांनी सुविधा विकसीत करुन हस्तांतरीत केल्यास हस्तांतरीत केलेल्या क्षेत्रा इतके विकास हक्क प्रमाणपत्र जमीनधारक किंवा पट्टाधारक यांना देता येते. या तरतूदीनुसार रस्ता किंवा आरक्षणे ही एकाच मालकाची असल्यास, या तरतूदीचा अवलंब करता येतो. तथापि, रस्ता व बांधकाम योग्य आरक्षणे यांचा मालकी हक्क विविध धारकांकडे/ विकासकाकडे/उपविकासकाकडे/अधिकारपत्राधारकाकडे असल्यास या

तरतूदीचा वापर करता येत नाही. तसेच विकास नियंत्रण नियमावलीमधील बाब क्र. ९(IV) (A) नुसार नियोजित रस्ते हे मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये रस्ते व बांधकाम योग्य आरक्षणे विकसीत करावयाचे असल्यास, अशा सोईसुविधांचे अंदाजपत्रक महानगरपालिकेकडून तयार करुन संभाव्य खर्चाचा आढावा घेण्यास द्यावा व सुविधेसाठी होणा-या संभाव्या किमान खर्चावर आधारीत त्या-त्या नियोजन प्रभागातील बाजारमुल्य तक्त्यातील दरानुसार विकास हक्क प्रमाणपत्र खर्चाचे प्रमाणात क्षेत्राचे स्वरुपात देण्यात येईल, या अटीवर जाहीर निविदा मागवून स्पर्धात्मक जो विकासक/कंत्राटदार कमीत कमी विकास हक्क प्रमाणपत्र घेण्याचे बोली निविदा पध्दतीनुसार सादर करेल, त्यास या सुविधा विकसीत करण्यासाठी कार्यादेश देता येवू शकेल. या पध्दतीनुसार सुविधा विकसीत केल्यास महानगरपालिकेचा खर्च होणार नाही. तसेच सुविधा विकासासाठी कर्ज उपलब्ध करुन घेण्याची आवश्यकता भासणार नाही. सुविधा / विकास कामे ही महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार कार्यप्रणाली व संहितेप्रमाणे होवू शकतात. तसेच या विकसीत होणा-या सोईसुविधांची गुणवत्ता तपासणी व इतर बाबी ह्या महानगरपालिकेच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार होणे आवश्यक राहील. या अनुषंगाने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बाब क्र. ९(IV)(A) व बाब क्र. ३३ परीशिष्ठ ४(६) मधील मिरा भाईंदर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये प्रस्तावित फेरबदल आवश्यक वैद्यानिक कार्यवाही पूर्ण करुन अंतिम मंजूरी करीता पत्र क्र. मनपा/नर/३१६६/२०१०-२०११ दि. २९/११/२०१० व स्मरण पत्र. मनपा/नर/१८६०/२०११-२०१२ दि. १६/०९/२०११ अन्वये शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे.CZMP नकाशानुसार बहुतांश क्षेत्र सी.आर.झेड. ने बाधीत होत आहे. त्यामुळे विकासावर निर्बंध आलेले आहे. महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन, चौक, पाली, डोंगरी व तारोडी या पाच गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA)ची नियुक्ती झालेली आहे. तसेच मिरा-भाईंदर शहरामध्ये (JNNURM) अंतर्गत भुयारी गटार योजनेचे काम राबविले जात आहे. आजमितीस सरासरी ६०% काम पूर्ण झालेले आहे व ब-याच रस्त्यांवर आजही मलःनिसःरण वाहिनी अंथरण्याचे काम सुरु आहे. तद्नंतर सदरच्या जलवाहिनीला इमारतींना जोडण्याचे कामही करावयाचे शिल्लक आहे. त्या कारणास रस्त्यांची ब-याच प्रमाणात मोडतोड होणार आहे. सन २०११-१२ या वर्षापासुन ८% भुयारी गटार योजनेकरीता कर शहरवासीयांना मालमत्ता करामध्ये लागू केलेला आहे. स्थानिक उपकर विभागामार्फत मिळणारे उत्पन्न व विकास योजनेमध्ये खाजगी माध्यमातून रस्ते विकसीत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी अंतिम टप्प्यात आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करताना प्रशासनाने दिलेला रस्ता कर लागू करण्याचा दिलेला प्रकरण क्र. १६ चा विषय फेटाळत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

***प्र. नगरसचिव :-***

प्रकरण क्र.१७, महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

***ध्रुवकिशोर पाटील :-***

महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटना यांनी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान मिळणेची मागणी केलेली असुन शासकिय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्याबाबत राज्य शासनाचे धोरण नाही. मात्र यापूर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६१/ नवि-२४, दि.२७/११/२००२ अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.३१/१०/२००२ रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत महानगरपालिका कर्मचाऱ्यांना पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

**"महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."**

शासनाचे दि. २७/११/२००२ रोजीच्या पत्रातील उक्त नमुद निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित असुन गेल्यावर्षी मा. महासभा दि. २२/१२/२०११, ठराव क्र. ६७ अन्वये महानगरपालिकेच्या वर्ग- २ ते ४ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रत्येकी रु.५,८३०/- महापालिका शिक्षकांना रु.५,८३०/- व रोजंदारी कर्मचारी व सुवर्ण जयंती मध्ये ठोक वेतनावर काम करणारे व मानधनावरील कार्यरत संगणक चालक यांना रु. ३६३०/-, अस्थायी बालवाडी शिक्षकांना रु.११००/- याप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकूण तरतुद रु. १.१३ लाख इतकी होती. त्या तरतुदीतून रु. ९८.११ लाख सानुग्रह अनुदान मंजूरीस कार्योत्तर मंजूरी दिलेली आहे.

सन २०११-१२ या वर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमीत्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटनांनी पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | म्युनिसिपल लेबर युनियन | रु. १०,०००/- - |
| २) | मिरा भाईंदर कामगार सेना | रु. १०,०००/- |
| ३) | श्रमजीवी, वाराई, माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार संघटना | रु. १२,०००/- |

त्याअनुषंगाने महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणेसाठी दि. ०७/११/२०१२ रोजी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली व मा. उप-महापौर व मा. आयुक्त सो., यांचे उपस्थितीत महानगरपालिकेतील सर्व पक्षीय गटनेते व महानगरपालिकेतील अधिकारी यांची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत महानगरपालिकेतील स्थायी/अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना खालील प्रमाणे दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणेत आला आहे.

सन २०१२-१३ च्या अदांजपत्रकात सानुग्रह अनुदान वाटपाकरीता तरतुद लेखाशिर्ष "संकिर्ण" "फ"(१६) मध्ये रु. १२०.०० लाख आहे. व शिक्षण मंडळ (महसुली) सानुग्रह अनुदानापोटी तरतुद रु. १५.०० लाख मिळून रक्कम रु. १३५.०० लाख तरतुदीतून महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्गांची संख्या दि. ३१/०३/२०१२ रोजी सहा महिन्यांपेक्षा अधिक सेवा झालेली आहे, अशा कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना मा. महापौर यांचे मान्यतेनुसार खालील प्रमाणे सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २०११-१२ | प्रती कर्मचारी सानुग्रह अनुदान रक्कम | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मनपा वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील अधिकारी/कर्मचारी (स्थायी) | १४४८ | ७,८००/- | १,१२,९४,४००/- |
| २. | मनपा प्राथमिक शिक्षक कर्मचारी (स्थायी) | १९३ | ७,५००/- | १४,४७,५००/- |
| ३. | संगणक चालक/लघुलेखक (अस्थायी) | ७७ | ५,०००/- | ३,८५,०००/- |
| ४. | बालवाडी शिक्षक (अस्थायी) | ०५ | ४,०००/- | २०,०००/- |
| ५. | आर. सी. एच. कर्मचारी (अस्थायी) | २९ | ५,०००/- | १,४५,०००/- |
| ६. | क्षयरोग नियंत्रण व आय.सी.टी.सी. कर्मचारी | २७ | ४,०००/- | १,०८,०००/- |
| | | | **एकुण** | **१,३३,९९,९००/-** |

वरील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे सन २०११-१२ या वर्षात नियमीत कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदानासाठी सन-२०१२-१३ च्या अंदाजपत्रकात एकूण रक्कम रु. १,३५,००,०००/- तरतुद आहे. त्या तरतुदीतून महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांसह शिक्षकास व मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांना एकुण रु. १,३३,९९,९००/- (अक्षरी रुपये एक कोटी तेहतीस लाख नव्यान्नव हजार नऊशे मात्र.) एवढ्या रकमेच्या सानुग्रह अनुदान वाटपासाठी झालेल्या खर्चास मा. महासभा कार्योत्तर मंजुरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, दोन मिनिटे बोलण्याची संधी मिळावी. मॅडम, आपण दरवर्षी अनुदान देतो. आपणही बऱ्याच काळापर्यंत या शहराच्या प्रतिनिधी आहात आपण गेल्यावर्षीचा तुलनात्मक तक्ता बघितला तर आपण तिकडे बालवाडीपर्यंत थांबलेले आहोत यावर्षी आपण नव्याने आरसीएच कर्मचारी आणि क्षयरोग नियंत्रण आणि बाकीच्या लोकांना त्याच्यामध्ये घेतलेले आहे. चांगली गोष्ट आहे. मागच्या वर्षीच्या सदनामध्ये आपणही होतात. बरेचशे जुने चेहरे आहेत. मी एक प्रश्न उपस्थित केला होता. या शहरामध्ये लिंक वर्कर्स काम

करतात. ज्यांना आपण नगरपालिका महिन्याला फक्त दोनशे रुपये देतो आणि शासन पाचशे रुपये देते. एखाद्या स्त्रीची इतकी क्रुर थट्टा कुठेही होत नसेल हा फार गंभीर विषय आहे. तरीदेखील या शहरामध्ये काम करणाऱ्या एकशे अठ्ठावीस पैकी एकशे अठ्ठावीस या महिला आहेत. ज्या महिनाभर काम करतात आणि फक्त सातशे रुपये घेत आहेत. एखाद्या स्त्रीची इतकी अवहेलना किंवा क्रुर थट्टा कुठे होत नसेल मागच्या वेळी हा विषय घेतला तेव्हा संपुर्ण वृत्तपत्रांनी देखील त्याला चांगली प्रसिध्दी दिली होती. परंतु, तत्कालीन आयुक्त आणि महापौर यांनी सांगितले की, तो विषय आम्ही पटलावर आणु आणि त्यांच्या बाबतीत योग्य तो निर्णय घेऊ. कर्मधर्म संयोगाने पुढे मा. महासभा झाल्या नाहीत. आजच्या या विषयाला धरुन मला आपणांस एवढेच सांगायचे आहे की, आपण जेव्हा याच्यामध्ये आरसीएच कर्मचाऱ्यांचा उल्लेख करतो तेसुध्दा शासनाने दिलेल्या तुमच्या मानधनावरच किंवा जे अनुदान येते त्याच्यावर चालतात त्यानंतर ते क्षयरोग नियंत्रण जे लोक आहेत, तेसुध्दा शासनाच्या अनुदानावरच चालतात. या ज्या लिंक वर्कर्स आहेत, या शहरातील नागरीक आहेत, हे लक्षात घ्या. या कुठूनही अपॉईंट केलेले लोक नाहीत. या शहरातील महिला आहेत. ज्या सातशे रुपयांवर काम करतात माझी पहिल्यांदा तुम्हाला विनंती आहे की, एक करोड पस्तीस लाखांमधील जी उर्वरीत रक्कम आहे, ती ज्या प्रमाणामध्ये होईल ती त्यांना सानुग्रह अनुदान द्यावे. तुमच्याकडुन एक महिला महापौर आहेत इथे सुध्दा ५० टक्के पेक्षा जास्त महिला आहेत. एका महिलेने दुसऱ्या महिलांना न्याय दिल्यासारखे होईल. म्हणून माझी त्याच्यामध्ये विनंती आहे की, तुम्ही त्याच्यामध्ये माझी तशी सुचना ॲड करा की, जी उर्वरीत रक्कम आहे ती जेवढ्या लिंक वर्कर्स आहेत, त्यांनासुध्दा आपण एक भाऊबीज भेट म्हणुन द्यावी आणि मा. महापौर आपल्याला विनंती आहे की, या ज्या लिंक वर्कर्स घरोघरी जाऊन उन्हात, पावसात, थंडीत जाऊन जी आपल्यासाठी माहिती अपडेट करतात आपल्या शहरासाठी, लोकांच्या हितासाठी, लोकांच्या आरोग्यासाठी त्यांचा विषय एकदा पटलावर घ्या मी तुम्हाला तसे पत्र दिले आहे आणि त्यांचा योग्य तो ...........

**मा. महापौर :-**

इतर महापालिका त्यांना किती देतात?

**प्रभात पाटील :-**

आपली महापालिका दोनशे देते.

**मा. महापौर :-**

इतर महापालिका?

**प्रभात पाटील :-**

त्यांचा डेटा माझ्याकडे आहे तुम्हीपण मागवा. तुम्हीपण माहिती घ्या पण आपल्या शहरामध्ये एखाद्या स्त्रियांची अशी अवहेलना व्हायला नको हाच माझा याच्यामागचा उद्देश होता आपण तो विषय घ्या. मा. महासभेमध्ये त्याचे धोरण ठरु द्या. एवढी मी तुम्हाला विनंती करते.

**मा. महापौर :-**

सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १७ :-**

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. २० :-**

महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटना यांनी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान मिळणेची मागणी केलेली असुन शासकिय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्याबाबत राज्य शासनाचे धोरण नाही. मात्र यापूर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६१/ नवि-२४, दि.२७/११/२००२ अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.३१/१०/२००२ रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत महानगरपालिका कर्मचाऱ्यांना पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

**"महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."**

शासनाचे दि. २७/११/२००२ रोजीच्या पत्रातील उक्त नमुद निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित असुन गेल्यावर्षी मा. महासभा दि. २२/१२/२०११, ठराव क्र. ६७ अन्वये महानगरपालिकेच्या वर्ग- २ ते ४ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रत्येकी रु.५,८३०/- महापालिका शिक्षकांना रु.५,८३०/- व रोजंदारी कर्मचारी व सुवर्ण जयंती मध्ये ठोक वेतनावर काम करणारे व मानधनावरील कार्यरत संगणक चालक यांना रु. ३६३०/-, अस्थायी बालवाडी शिक्षकांना

रु.११००/- याप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकुण तरतुद रु. १.१३ लाख इतकी होती. त्या तरतुदीतून रु. ९८.११ लाख सानुग्रह अनुदान मंजूरीस कार्योत्तर मंजूरी दिलेली आहे.

सन २०११-१२ या वर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमीत्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटनांनी पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | म्युनिसिपल लेबर युनियन | रु. १०,०००/- - |
| २) | मिरा भाईंदर कामगार सेना | रु. १०,०००/- |
| ३) | श्रमजीवी, वाराई, माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार संघटना | रु. १२,०००/- |

त्याअनुषंगाने महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणेसाठी दि. ०७/११/२०१२ रोजी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली व मा. उप-महापौर व मा. आयुक्त सो., यांचे उपस्थितीत महानगरपालिकेतील सर्व पक्षीय गटनेते व महानगरपालिकेतील अधिकारी यांची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत महानगरपालिकेतील स्थायी/अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना खालील प्रमाणे दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणेत आला आहे.

सन २०१२-१३ च्या अदांजपत्रकात सानुग्रह अनुदान वाटपाकरीता तरतुद लेखाशिर्ष "संकिर्ण" "फ"(१६) मध्ये रु. १२०.०० लाख आहे. व शिक्षण मंडळ (महसुली) सानुग्रह अनुदानापोटी तरतुद रु. १५.०० लाख मिळून रक्कम रु. १३५.०० लाख तरतुदीतून महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्गाची संख्या दि. ३१/०३/२०१२ रोजी सहा महिन्यांपेक्षा अधिक सेवा झालेली आहे, अशा कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना मा. महापौर यांचे मान्यतेनुसार खालील प्रमाणे सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २०११-१२ | प्रती कर्मचारी सानुग्रह अनुदान रक्कम | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मनपा वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील अधिकारी/कर्मचारी (स्थायी) | १४४८ | ७,८००/- | १,१२,९४,४००/- |
| २. | मनपा प्राथमिक शिक्षक कर्मचारी (स्थायी) | १९३ | ७,५००/- | १४,४७,५००/- |
| ३. | संगणक चालक/लघुलेखक (अस्थायी) | ७७ | ५,०००/- | ३,८५,०००/- |
| ४. | बालवाडी शिक्षक (अस्थायी) | ०५ | ४,०००/- | २०,०००/- |
| ५. | आर. सी. एच. कर्मचारी (अस्थायी) | २९ | ५,०००/- | १,४५,०००/- |
| ६. | क्षयरोग नियंत्रण व आय.सी.टी.सी. कर्मचारी | २७ | ४,०००/- | १,०८,०००/- |
| | | | **एकुण** | **१,३३,९९,९००/-** |

वरील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे सन २०११-१२ या वर्षात नियमीत कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदानासाठी सन-२०१२-१३ च्या अंदाजपत्रकात एकूण रक्कम रु. १,३५,००,०००/- तरतुद आहे. त्या तरतुदीतून महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांसह शिक्षकास व मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांना एकुण रु. १,३३,९९,९००/- (अक्षरी रुपये एक कोटी तेहतीस लाख नव्यान्नव हजार नऊशे मात्र.) एवढ्या रकमेच्या सानुग्रह अनुदान वाटपासाठी झालेल्या खर्चास मा. महासभा कार्योत्तर मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. प्रभात पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

उपरोक्त विषयामध्ये मंजूर ठरावात खालील उपसुचना घेण्यात यावी. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत लिंक वर्कर्स यांना रु. १,३५,००,०००/- ह्या मंजूर तरतुदीतील रु. १,३३,९९,९००/- एवढी रक्कम वजा जाता उर्वरीत १ लाख रु. एवढी रक्कम लिंक वर्कर्स ह्यांना सानुग्रह रक्कम वाटून देण्यात यावी.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १८, मिरारोड (पूर्व), रामनगर व जांगीड इन्क्लेव्ह येथील ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेत बांधलेली इमारती मधील जागा वापराबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**जुबेर इनामदार :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विकास नियंत्रण नियमावलीतील ॲमिनिटी ओपन स्पेस या तरतुदीन्वये मिरारोड (पूर्व) रामनगर येथे व मिरारोड (पूर्व) जांगीड इन्क्लेव्ह ह्या दोन इमारती मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेल्या आहेत. रामनगर येथील इमारत तळ अधिक दोन मजल्याची व जांगीड इन्क्लेव्ह येथील इमारत तळ अधिक चार मजल्याची आहे. सदर इमारतीची उपयोग सार्वजनिक वापरासाठी करावयाचा असून इमारतीमध्ये खालील वापर प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. **जांगीड इन्क्लेव्ह इमारत :**

तळमजला :- मुलांकरीता इनडोअर गेम
पहिला मजला :- लग्न व इतर कार्यक्रमांना भाड्याने देण्याकरीता
दुसरा मजला :- अभ्यासिका व वाचनालय
तिसरा मजला :- संगणक प्रशिक्षण केंद्र
चौथा मजला :- महानगरपालिका कामकाजासाठी राखीव
सदर इमारतीस **कै. श्री. विलासराव दगडोजीराव देशमुख**हे नाव देण्यात यावे.

भुतपूर्व मुख्यमंत्री कै. श्री. विलासराव देशमुख साहेबांचा या शहराच्या विकासामध्ये सिंहाचा वाटा आहे.

१. **प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन व नामकरण:-** दि.०५/१०/२००० रोजी महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन कै. श्री. विलासराव देशमुख साहेबांनी आपल्या शुभहस्ते करुन इमारतीचे **"स्व. इंदिरा गांधीभवन"** असे नामकरण केले.

२. **शहराकरीता ५० द.ल.लि. पाणी पुरवठा कार्यान्वित:-**सन-२००२ मध्ये कै. श्री. विलासराव देशमुख साहेब महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री असताना मिरा-भाईंदर शहराकरीता ५० द.ल.लि. पाणी पुरवठ्याची योजना कार्यान्वित झाली.

३. **शहराकरीता ३५ द.ल.लि. पाणी पुरवठ्यास मंजुरी:-** सन-२००२ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास प्राधिकरणाच्या माध्यमातुन ३५ द.ल.लि. पाणी पुरवठा या शहराकरीता मंजूर केला.

४. **नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत:-** कै. श्री. विलासराव देशमुख साहेबांच्या शिफारशीने दि. २८ फेब्रुवारी, २००२ रोजी मिरा-भाईंदर नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेमध्ये करण्यांत आले.

५. **शहरासाठी जे.एन.एन.यु.आर.एम. योजना:-** जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून मिरा-भाईंदर शहराकरीता १९५० कोटीच्या शहर विकास आराखड्यास मंजुरी प्राप्त केली, त्या अंतर्गत शहरामध्ये विविध ठिकाणी भुयारी गटारे बांधणेची कामे सुरु आहेत तसेच परिवहन सेवेतील ५० बसेसचा लाभही शहरातील जनतेला होत आहे व सदर योजनेच्या तिस-या टप्प्यामध्ये **मेट्रोरेल योजनाही** या शहरामध्ये कार्यरत होणार आहे.

६. **एम.एम.आर.डी.ए. कडून कर्ज:-** सन-२००८ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या माध्यमातुन ५० कोटीचे कर्ज शहरात भुमिगत गटार व डी.पी. रस्ते बांधणेकरीता मंजूर केले.

७. **दफन भुमी हस्तांतरीत:-** भाईंदर पश्चिम येथे भोरी समाजाकरीता शासनाकडून दफन भुमीकरीता भूखंड हस्तांतराला मंजुरी दिली.

८. **शहरासाठी पोलीस व न्यायव्यवस्था बळकटीकरण:-**मिरा-भाईंदर शहराकरीता खारीगांव, नवघर, भाईंदर पुर्व येथे त्या परिसराकरीता स्वतंत्र पोलीस ठाणेला मान्यता दिली व जिल्ह्यामध्ये कायदा व सुरक्षा राखण्याकरीता पोलीस अधिक्षक, अतिरिक्त पोलीस निरीक्षक व मिरा भाईंदर शहराकरीता सहाय्यक पोलीस अधिक्षक ही पदे निर्माण केली. तसेच शहरामध्ये पोलीस दलाचे बळकटीकरण करण्याकरीता सर्व्हे क्र. २३३ शासकीय भूखंड पोलीस ग्राऊंड, पोलीस रहिवाशी वसाहत व पोलीस विभागाच्या प्रशासकीस इमारतीसाठी पोलीस विभागाला हस्तांतरीत केले.

९. **न्यायदंडाधिकारी साठी जागा व पद मंजुरी:-** मिरा-भाईंदर शहराकरीता शासनाकडून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साठी जागा उपलब्ध करुन दिली. तसेच प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारीची पदे शहरासाठी मंजूर केली. उत्तन-चवळी येथे राष्ट्रीय ज्युडीशियल ॲकेडेमीची स्थापना व निर्मीती करुन मिरा-भाईंदर शहराला गर्विष्ठ होण्याची संधी दिली. मिरा-भाईंदरचे उत्तन व जवळच्या गोराई-मनोरी परिसराला पर्यटक परिसर असे घोषीत केले.

१०. **शैक्षणिक संस्थेला प्राधान्य:-**कै. श्री. विलासराव देशमुख साहेब महसूल मंत्री असताना मिरा-भाईंदर शहराच्या साक्षरतेच्या दृष्टीकोनातुन भाईंदर पुर्व, नवघर येथिल **"शंकर नारायण शैक्षणिक संस्थेला"** शासकीय जागा उपलब्ध करुन दिली.

११. **शहर विकास आराखडयाला मंजुरी:-** कै. विलासराव देशमुख साहेबांनी शहराच्या विकास आराखड्याला मंजुरी दिली. ज्यामुळे आज शहरामध्ये विविध ठिकाणी उद्याने, मैदाने, इस्पितळ, बाजार, शैक्षणिक संस्था व इतर संस्था कार्यान्वित असून आपले शहर विकसीत झाल्याचे दृश्य आम्हांस आज दिसत आहे व दैनंदिन त्याची गुणवत्ताही वाढत आहे. कै. विलासराव देशमुख साहेबांचा या शहरावरचे प्रेम आणि विकासीकरणाचा वाटा ह्याची तुलना एका इमारतीला नाव देऊन भागू शकत नाही, हे शहर त्यांचे योगदान कधीच विसरु शकणार नाही.

काँग्रेसचे नेते माजी आमदार मा. श्री. मुझफ्फर हुसेन साहेबांनी वर उल्लेखलेल्या प्रत्येक कामांची मागणी कै. विलासराव देशमुख साहेबांकडे केली व त्यांनी प्रत्येक विषयावर जातीने लक्ष देवून विलंब न करता मान्यता दिली.

अशा विकास पुरुषाला या शहरवासीयांकडून मन:पुर्वक आदरांजी व श्रध्दाजलीच्या रुपात सदरच्या इमारतीलाकै. **श्री. विलासराव दगडोजीराव देशमुख** हे नाव देण्यात येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

२. **रामनगर येथील इमारत :**

तळमजला :- १) वरिष्ठ नागरीकांसाठी योग व इतर कार्यक्रमाकरीता देणे (मागचा हॉल)
२) अभ्यासिका हॉल

पहिला मजला :- लग्नकार्य व इतर कार्यक्रमांसाठी भाड्याने देणेसाठी ठेवावे.

दुसरा मजला :- दुस-या मजल्यावर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय इमारतीमध्ये जागा कमी पडत असल्याने शिक्षण, परवाना, वाहन, भांडार, आरोग्य, जाहिरात इ. विभाग स्थलांतरीत करण्यात येत आहेत. मनपाच्या कार्यालयासाठी सदर जागा ठेवण्यात यावी.

सदर इमारतीत **"राष्ट्रसंत श्री. पदमसागर सुरीजी"** हे नाव देण्यात येत आहे.

मा. नोंदणी उपमहानिरीक्षक व मुंद्रांक उपनियंत्रक, कोकण विभाग, ठाणे यांनी ॲमीनीटी ओपन स्पेस धील जांगीड इन्क्लेव्ह व रामनगर ॲमिनीटी हॉल ची जागा उपलब्ध करुन देण्याबाबत (२०००.०० चौ. फूट ची दोन कार्यालये) कळविले आहे.

रामनगर येथील तळ मजल्यावरील २००० चौ. फूट जागा सह दुय्यम निबंधक ठाणे क्र. १० व १२ कार्यालयासाठी तसेच १००० चौ. फूट जागा उपनिबंधक (सहकारी संस्था) यांच्या कार्यालयांना शासकीय दराने भाडे घेऊन जागा उपलब्ध करुन देण्यात यावी.

वरीलप्रमाणे संबंधीत कार्यालयांना व वापर करण्याकरीता जागा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

बराचसा मोठा ठराव होता त्यामध्ये एक ओळ सांगितली आहे की, ५० टक्के एमएलडी या शहराला श्री. विलासराव देशमुख असताना दिले आहे. ते रद्द करावे ते युतीचे सरकार असताना या शहराला ते ५० टक्के एमएलडी पाणी मिळालेले आहे. ५० टक्के एमएलडी श्री. मनोहर जोशी मा. मुख्यमंत्री होते तेव्हा झालेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

श्री. नरेंद्र मेहताजी, ऐका तर खरे की, आम्ही त्याच्यामध्ये काय लिहीले आहे. ते मुख्यमंत्री असताना कार्यन्वीत झाले. शहरामध्ये ५० एमएलडी पाणी सुरु झाले एका दिवसामध्ये झाले नव्हते टप्प्याटप्प्याने झाले होते.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

या ठरावाला आमचा काही विरोध नाही पण मॅडम, आजचा जो विषय होता तो या ॲमिनीटीमध्ये कोणती सुविधा पुरवायची आहे. नामकरणाचा विषयच नव्हता आपण मला खुलासा करावा की, अजून हा

निर्णय होणार आहे की कोणती सुविधा नंतर नाव येईल की, नाव आणि हे सगळे एकत्रच होईल? मुलगा अजून जन्माला आला नाही आणि आपण नाव ठेवतो. हा विषय आहे की, धोरणात्मक निर्णय, यामध्ये काय-काय सुविधा द्यायच्या आहेत. त्यानंतर त्यामध्ये नामकरणाचा विषय आणा तुम्ही तुमचे बहुमत करा. आजचा तो विषयच नाही.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम, त्यांचा ठराव असेल तर त्यांना विचारुन घ्या. सभागृहाचा वेळ कशाला वाया घालवता?

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

श्री. विलासराव देशमुख हे देशासाठी सन्माननीय आहेत. त्यांच्या विरोधात आम्ही दुसरा ठराव नक्कीच मांडणार नाही. पण मॅडम, आजचा तो विषय आहे का? आपण आम्हाला खुलासा करावा.

**जुबेर इनामदार :-**

तुम्हाला वाटत असेल की, तो विषय नाही. तर तुम्ही तुमचा ठराव मांडा.

**नरेंद्र मेहता :-**

त्यामध्ये रेट ही ठरवून घ्या. या सगळया विषयांचे करता येईल का? काय भाड्याने द्यायचे, काय रकमेने द्यायचे तेही आज नक्की करायचे का? कारण आज तो विषयच नाही. आपण सन्मानाने द्या. आम्ही त्याला विरोध करणार नाही. आपल्याला विनंती आहे की, ज्या काही सुविधा आहेत त्या ठरवा आणि नामकरणाचा विषय आपण रितसर आणा. नाव द्यावे. आमची काही हरकत नाही. फक्त एकच सुचना होती की, मॅडम ही जी मुळ इमारत आहे, हे जे आरक्षण आहे, इट इज फॉर द सिनिअर सिटीझन. श्री. गिरीष प्रधान साहेबांचे लेआऊट प्लान या नावाने सॅन्क्शन आहे. आता देताना आपण सिनिअर सिटीझनला चार हजार फुट दिले. बाकीमध्ये रजिस्ट्रेशन ऑफीस, लग्नाला भाड्यावर, आणि म्युनिसीपाल्टी ऑफीस हे सगळे आपण एकामध्ये केले. ती इमारत आपण ज्यासाठी बांधली त्याचे अस्तित्वच संपले. आपण प्लान काय सॅन्क्शन केला आहे हे तरी बघा. आपण वरिष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी ते या शहरात बांधलेले आहे. आणि तसा प्लान सॅन्क्शन आहे. त्यामध्ये हे सगळे घालणे. पूर्वी पण मिरारोडला आपले जे हॉस्पीटल आहे, त्यामध्ये सांगितले की, वरच्या माळ्यावर प्रभाग कार्यालय करा. खाली हॉस्पीटल वर प्रभाग कार्यालय. म्हणजे ज्यासाठी राखीव ठेवले आहे, ज्यासाठी तुम्ही प्लान सॅन्क्शन केला, ज्यासाठी तुम्ही खर्च केला आहे, त्याचा काही उपयोगच राहिला नाही. त्या जी प्लस ४ च्या ऐवजी तुम्ही चार हजार फुट वरिष्ठ नागरिकांना देता आणि बाकी बोलता की, ऑफीस येईल. मला एक सांगा म्युनिसीपल कॉर्पोरेशनच्या ऑफिसमध्ये आम्हाला जागा कमी पडते. दुसरीकडे ज्या नोंदणीकृत संस्था आहेत त्यांना देतो. ते परत खाली करणार का? या सभागृहामध्ये कोणी सांगावे की, आमची तयारी आहे. ज्यावेळी सांगू त्यावेळी ते खाली करणार. भविष्यात आपल्याला जागा कमी पडली तर ते खाली करणारच नाहीत. आणि मार्केटमध्ये एवढी दुकाने आहेत. बाकी लोक करतात. त्यांनी भाड्याने घ्यावे. त्यांना महापालिकेची पाहिजे कारण त्यांना माहिती आहे की, आपल्याला खाली करण्याची आवश्यकता नाही. आता तुमचा एक विषय आहे, भाडे देत नाही म्हणून प्रायव्हेटीझन, असेच होते. आपण देतो ते भाडे आपल्याला गव्हर्नमेंटकडून मिळत नाही. रेशन ऑफीससुध्दा आपल्याकडून मागत होते. आपण त्यांना नकार दिला आणि सांगितले की, तुम्ही ब्रीजच्या खाली जाऊन करा. मॅडम, आपल्याकडे अशा एकुण पंधरा ॲमिनिटी स्पेस आहेत. तुम्ही पूर्ण इमारत महापालिकेच्या ऑफीससाठी वापरा. तुम्ही पूर्ण इमारत त्या नोंदणीकृत संस्थेला दया. पण वरिष्ठ नागरिकांना पीन ड्रॉप सायलेन्स पाहिजे, त्यात योगासाठी पाहिजे, त्यामध्ये लग्न चालू होईल. महापालिकेचे कामकाज चालू होईल.

**मा. महापौर :-**

ते वरिष्ठ नागरिक पूर्ण दिवस तिकडे राहणार नाहीत. योगा आणि जे काही होईल ते मॉर्निंगमध्ये होईल.

**नरेंद्र मेहता :-**

त्यामध्ये आपण जे ठरवले होते, इनडोअर क्लब हाऊससाठी तो प्लान सॅन्क्शन आहे. आपण प्लान काढून बघुन घ्या. आणि गटनेत्यांच्या बैठकीमध्येही ठरले होते की, कोणकोणत्या वास्तुमध्ये काय-काय बांधायचे आहे. त्यासाठी आपण ते राखीव करुन बांधले आहे. आणि या शहरात साधारण कमीत कमी दिड ते दोन लाखपेक्षाही जास्त वरिष्ठ नागरिक राहात आहेत. आपण प्रत्येक ठिकाणी बांधणार नाही. ते इनडोअर क्लब, कोणी दुपारी कॅरम खेळतील, चेस खेळतील किंवा योगा करतील, जीम करतील, त्यासाठी आपण राखीव ठेवलेले आहे. आपल्याकडे एवढया ॲमिनिटी स्पेस आहेत. त्यामध्ये आपल्याला बांधण्याचा खर्चपण लागणार नाही. तिकडे लग्न लागल्यानंतर, संध्याकाळी ते गेले आणि लग्नाचा कार्यक्रम चालू आहे. वॉट दे विल फिल, द मेंटली ट्रेस. एखादा त्यांना शिवीगाळी करुन जाईल.

**मा. महापौर :-**

आपल्याकडे एवढे जे स्पेस आहेत, ते बांधल्यानंतर आपण दुसऱ्यांना शिफ्ट करु. नंतर आपण पूर्ण त्यांनाच देऊ.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, बॅन्ड-बाजे, फटाके एवढे असतात की, प्रॅक्टीकली आपल्या ऑफीसलाही तो त्रास होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम, नगरभवनला पण तसेच आहे. वर हॉल आहे आणि खाली अभ्यासिका आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, श्री खांबित साहेब मागे आहेत. तलाव रोडला एक छोटा हॉल आहे. मा. आयुक्त साहेबांनी तिथे पुजेलापण बंदी केली. पुजा करायची नाही, जेवायचे नाही, कारण महापालिकेला डिस्टर्ब होते. आणि एका बाजुला तुम्ही परत तसाच ठराव करता. आता बंदी टाकली, त्यांना विचारा. म्हणजे एका बाजूला महापालिकेचे काम सुरु आहे. फटाके वाजवतात, नाचतात, बॅन्ड यावर तुमचा आणि आमचा कंट्रोल राहात नाही. रोज भांडणे करायची? तुम्ही आता बंदी टाकली आणि परत दुसरीकडे मंजुर करता.

**गिता जैन :-**

अभ्यास कसे करणार? तुम्ही दोन एकदम अपोझीट वस्तु ठेवत आहात. एका बिल्डींगमध्ये वाचनालय आहे ....

**मा. महापौर :-**

असेच सेम आपल्या नगरभवनलापण आहे. अजूनपर्यंत कधी कम्प्लेंट आलेल्या आहेत असे मला वाटत नाही.

**गिता जैन :-**

मॅडम, कम्प्लेंट आली नाही. पण आपण द्यायच्या वेळी ही सुविधा बरोबर करुनच द्यावी अशी माझी विनंती आहे.

**मा. महापौर :-**

ज्या ॲमिनिटी बांधायच्या आहेत, नंतर आपण शिफ्ट करु. सध्या त्या एरियातील लोकांना For the time being देऊ.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, चार हजार स्क्वेअर फिट जागा खूप कमी आहे. मला असे वाटते की, वरिष्ठ नागरिकांना कमीत कमी सात-आठ हजार फुट द्यावे.

**मा. महापौर :-**

आपण नंतर देऊ. हे दुसरे झाले तर आपण शिफ्ट करु. दे आर हॅपी विथ इट. त्यांना जेवढी जागा पाहिजे तेवढी मिळाली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मला नगररचना विभागाने सांगावे की, ज्या कामासाठी केले त्यामध्ये बदल करता येतो का?

**रवि व्यास :-**

मॅडम एक सुचना है। अगर जैसे यह बोल रहे है की, अभ्यासिका में मॅरेज के फंक्शन से अगर डिस्टर्बन्स होता है, तो अगर साऊंड प्रुफ दरवाजे और एअर कंडीशन अगर लगाये तो वहाँ पर जो लोग बैठेंगे, उनको भी ज्यादा सुविधा हो जाएगी। और प्रॉब्लेम भी सॉल्व हो जाएगी।

**प्रकरण क्र. १८ :-**

मिरारोड (पूर्व), रामनगर व जांगीड इन्क्लेव्ह येथील ॲमिनिटी ओपन स्पेसच्या जागेत बांधलेली इमारती मधील जागा वापराबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. २१ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विकास नियंत्रण नियमावलीतील ॲमिनिटी ओपन स्पेस या तरतुदीन्वये मिरारोड (पूर्व) रामनगर येथे व मिरारोड (पूर्व) जांगीड इन्क्लेव्ह ह्या दोन इमारती मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेल्या आहेत. रामनगर येथील इमारत तळ अधिक दोन मजल्याची व जांगीड इन्क्लेव्ह येथील इमारत तळ अधिक चार मजल्याची आहे. सदर इमारतीची उपयोग सार्वजनिक वापरासाठी करावयाचा असून इमारतीमध्ये खालील वापर प्रस्तावित करण्यात येत आहे.

३. <u>जांगीड इन्क्लेव्ह इमारत :</u>

तळमजला :- मुलांकरीता इनडोअर गेम
पहिला मजला :- लग्न व इतर कार्यक्रमांना भाड्याने देण्याकरीता
दुसरा मजला :- अभ्यासिका व वाचनालय
तिसरा मजला :- संगणक प्रशिक्षण केंद्र
चौथा मजला :- महानगरपालिका कामकाजासाठी राखीव
सदर इमारतीस **<u>कै. श्री. विलासराव दगडोजीराव देशमुख</u>**हे नाव देण्यात यावे.

भुतपूर्व मुख्यमंत्री कै. श्री. विलासराव देशमुख साहेबांचा या शहराच्या विकासामध्ये सिंहाचा वाटा आहे.

१. **<u>प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन व नामकरण:-</u>** दि.०५/१०/२००० रोजी महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन कै. श्री. विलासराव देशमुख साहेबांनी आपल्या शुभहस्ते करुन इमारतीचे **"स्व. इंदिरा गांधीभवन"** असे नामकरण केले.

२. **<u>शहराकरीता ५० द.ल.लि. पाणी पुरवठा कार्यान्वित:-</u>**सन-२००२ मध्ये कै. श्री. विलासराव देशमुख साहेब महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री असताना मिरा-भाईंदर शहराकरीता ५० द.ल.लि. पाणी पुरवठ्याची योजना कार्यान्वित झाली.

३. **<u>शहराकरीता ३५ द.ल.लि. पाणी पुरवठ्यास मंजुरी:-</u>** सन-२००२ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास प्राधिकरणाच्या माध्यमातुन ३५ द.ल.लि. पाणी पुरवठा या शहराकरीता मंजूर केला.

४. **<u>नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत:-</u>** कै. श्री. विलासराव देशमुख साहेबांच्या शिफारशीने दि. २८ फेब्रुवारी, २००२ रोजी मिरा-भाईंदर नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेमध्ये करण्यांत आले.

५. **<u>शहरासाठी जे.एन.एन.यु.आर.एम. योजना:-</u>** जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून मिरा-भाईंदर शहराकरीता १९५० कोटीच्या शहर विकास आराखड्यास मंजुरी प्राप्त केली, त्या अंतर्गत शहरामध्ये विविध ठिकाणी भुयारी गटारे बांधणेची कामे सुरु आहेत तसेच परिवहन सेवेतील ५० बसेसचा लाभही शहरातील जनतेला होत आहे व सदर योजनेच्या तिस-या टप्प्यामध्ये **मेट्रोरेल योजना**ही या शहरामध्ये कार्यरत होणार आहे.

६. **<u>एम.एम.आर.डी.ए. कडून कर्ज:-</u>** सन-२००८ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या माध्यमातुन ५० कोटीचे कर्ज शहरात भुमिगत गटार व डी.पी. रस्ते बांधणेकरीता मंजूर केले.

७. **<u>दफन भुमी हस्तांतरीत:-</u>** भाईंदर पश्चिम येथे भोरी समाजाकरीता शासनाकडून दफन भुमीकरीता भूखंड हस्तांतराला मंजुरी दिली.

८. **<u>शहरासाठी पोलीस व न्यायव्यवस्था बळकटीकरण:-</u>**मिरा-भाईंदर शहराकरीता खारीगांव, नवघर, भाईंदर पुर्व येथे त्या परिसराकरीता स्वतंत्र पोलीस ठाणेला मान्यता दिली व जिल्ह्यामध्ये कायदा व सुरक्षा राखण्याकरीता पोलीस अधिक्षक, अतिरिक्त पोलीस निरीक्षक व मिरा भाईंदर शहराकरीता सहाय्यक पोलीस अधिक्षक ही पदे निर्माण केली. तसेच शहरामध्ये पोलीस दलाचे बळकटीकरण करण्याकरीता सर्व्हे क्र. २३३ शासकीय भूखंड पोलीस ग्राऊंड, पोलीस रहिवाशी वसाहत व पोलीस विभागाच्या प्रशासकीस इमारतीसाठी पोलीस विभागाला हस्तांतरीत केले.

९. **<u>न्यायदंडाधिकारी साठी जागा व पद मंजुरी:-</u>** मिरा-भाईंदर शहराकरीता शासनाकडून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साठी जागा उपलब्ध करुन दिली. तसेच प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारीची पदे शहरासाठी मंजूर केली. उत्तन-चवळी येथे राष्ट्रीय ज्युडीशियल ॲकेडेमीची स्थापना व निर्मीती करुन मिरा-भाईंदर शहराला गर्विष्ठ होण्याची संधी दिली. मिरा-भाईंदरचे उत्तन व जवळच्या गोराई-मनोरी परिसराला पर्यटक परिसर असे घोषीत केले.

१०. **<u>शैक्षणिक संस्थेला प्राधान्य:-</u>**कै. श्री. विलासराव देशमुख साहेब महसूल मंत्री असताना मिरा-भाईंदर शहराच्या साक्षरतेच्या दृष्टीकोनातुन भाईंदर पुर्व, नवघर येथिल **"शंकर नारायण शैक्षणिक संस्थेला"** शासकीय जागा उपलब्ध करुन दिली.

११. **<u>शहर विकास आराखडयाला मंजुरी:-</u>** कै. विलासराव देशमुख साहेबांनी शहराच्या विकास आराखड्याला मंजुरी दिली. ज्यामुळे आज शहरामध्ये विविध ठिकाणी उद्याने, मैदाने, इस्पितळ, बाजार, शैक्षणिक संस्था व इतर संस्था कार्यान्वित असून आपले शहर विकसीत झाल्याचे दृश्य आम्हांस आज दिसत आहे व दैनंदिन त्याची गुणवत्ताही वाढत आहे. कै. विलासराव देशमुख साहेबांचा या शहरावरचे प्रेम आणि विकासीकरणाचा वाटा ह्याची तुलना एका इमारतीला नाव देऊन भागू शकत नाही, हे शहर त्यांचे योगदान कधीच विसरु शकणार नाही.

काँग्रेसचे नेते माजी आमदार मा. श्री. मुझफ्फर हुसेन साहेबांनी वर उल्लेखलेल्या प्रत्येक कामांची मागणी कै. विलासराव देशमुख साहेबांकडे केली व त्यांनी प्रत्येक विषयावर जातीने लक्ष देवून विलंब न करता मान्यता दिली.

अशा विकास पुरुषाला या शहरवासीयांकडून मनःपुर्वक आदरांजी व श्रध्दाजलीच्या रुपात सदरच्या इमारतीलाकै. **श्री. विलासराव दगडोजीराव देशमुख** हे नाव देण्यात येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

४. **रामनगर येथील इमारत :**

तळमजला :- १) वरिष्ठ नागरीकांसाठी योग व इतर कार्यक्रमाकरीता देणे (मागचा हॉल)
२) अभ्यासिका हॉल

पहिला मजला :- लग्नकार्य व इतर कार्यक्रमांसाठी भाड्याने देणेसाठी ठेवावे.

दुसरा मजला :- दुस-या मजल्यावर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय इमारतीमध्ये जागा कमी पडत असल्याने शिक्षण, परवाना, वाहन, भांडार, आरोग्य, जाहिरात इ. विभाग स्थलांतरीत करण्यात येत आहेत. मनपाच्या कार्यालयासाठी सदर जागा ठेवण्यात यावी.

सदर इमारतीत **"राष्ट्रसंत श्री. पदमसागर सुरीजी"** हे नाव देण्यात येत आहे.
मा. नोंदणी उपमहानिरीक्षक व मुंद्रांक उपनियंत्रक, कोकण विभाग, ठाणे यांनी ॲमीनीटी ओपन स्पेस धील जांगीड इन्क्लेव्ह व रामनगर ॲमिनीटी हॉल ची जागा उपलब्ध करुन देण्याबाबत (२०००.०० चौ. फूट ची दोन कार्यालये) कळविले आहे.

रामनगर येथील तळ मजल्यावरील २००० चौ. फूट जागा सह दुय्यम निबंधक ठाणे क्र. १० व १२ कार्यालयासाठी तसेच १००० चौ. फूट जागा उपनिबंधक (सहकारी संस्था) यांच्या कार्यालयांना शासकीय दराने भाडे घेऊन जागा उपलब्ध करुन देण्यात यावी.
वरीलप्रमाणे संबंधीत कार्यालयांना व वापर करण्याकरीता जागा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री जुबेर इनामदार. अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १९, मानधनावरील संगणक चालक / लघुलेखक यांच्या मुदतवाढीबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला असुन संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृतांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने मा. महासभा दि. २०/०६/२००६, ठराव क्र. २९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणुक करण्यात आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकामार्फत त्यांना वेळोवळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. लघुलेखक/संगणक चालक पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे दि. २६/०७/२००६ रोजी मंजुरीसाठी पाठविला असता नगरविकास विभागाने पत्र क्र. मिभामपा-११०६/१३९०/नवि-२८, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, दि. २९/०९/२००६ च्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मानधन तत्वावर संगणक चालक नेमण्याबाबत आणि आस्थापनेवर संगणक चालक/लघुलेखकाची पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करता येत नाही. त्यामुळे संगणक चालकाचे काम मंजुर पदावर कार्यरत कर्मचारी किंवा बाहयमार्गाने (**Outsourcing**) करुन घेणे अपेक्षित आहे असे नमुद केले आहे. तद्नंतर मा. महासभा दि. २०/०३/२०१०, ठराव क्र. ६५ अन्वये मंजुरी दिल्यानुसार संगणक चालकाच्या पदनिर्मितीचा फेर प्रस्ताव शासनास दि. १८/०८/२०१० रोजी पाठविला होता. परंतु त्यास अद्याप मंजुरी प्राप्त नाही.

१) मा. महासभा दि.२२/१२/२०१०, ठराव क्र.६८ नुसार महापालिकेत मानधनावरील कार्यरत संगणक चालक यांना रु.६५००/- तसेच लघुलेखक यांना रु. ७५००/- प्रती महिना या ठोक मानधनावर मा. महासभा दि. २९/०९/२०११, ठराव क्र. ६१ अन्वये संगणक चालक/लघुलेखक यांना दि. ०१/११/२०११ पासुन पूढे ११ महिन्यांसाठी मुदतवाढ दिलेली आहे. सदरची मुदत वाढ दि. ३०/०९/२०१२ रोजी संपत आहे.

२) महानगरपालिकेच्या आस्थापनेवर संगणक चालक/लघुलेखकची पदे मंजूर नाहीत. तसेच शासनाच्या प्रचलित धोरणानुसार बाह्य मार्गाने संगणक चालकाचे काम करुन घेण्याचे निर्देश आहेत.

३) सद्यःस्थितीत संगणक चालक/लघुलेखक यांचा पदनिर्मिती प्रस्ताव शासनाजवळ प्रलंबीत असुन शासनाने महानगरपालिकेस दि. २३/०८/२०११ रोजीचे पत्रानुसार संगणक चालक व लघुलेखक यांचे

प्रस्तावावर कार्यवाही करणेकरीता महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ अंतीम करुन शासनास पाठविणे आवश्यक आहे असे कळविले आहे.

महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ हे हरकती सुचनांवर सुनावणी झाल्यावर अंतिम मंजुरीसाठी दि. १४/०९/२०१० रोजीच्या मा. महासभेपुढे मान्यतेस्तव ठेवले असता सदर विषय प्रथम गटनेत्याचे बैठकित चर्चा करुन मा. महासभेत घेणेबाबत तत्कालीन मा. महापौर सो., यांनी सुचना दिल्या. त्या नंतर गटनेत्याची मा. महापौर सो., यांनी दोन वेळा बैठका बोलविल्या. परंतु त्या बैठकित अंतिम निर्णय न झाल्यामुळे अद्याप महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ यांना मा. महासभेची अंतिम मान्यता मिळालेली नाही. मा. महासभेची अंतिम मान्यता न मिळाल्यामुळे सेवाशर्ती नियम शासनास पाठविता आलेले नाहीत. मा. महासभेने सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ यास मान्यता दिल्यानंतर शासनाचे दि. २३/०८/२०११ चे पत्रावर कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. सद्यःस्थितीत महानगरपालिकेच्या विविध विभागात ८० संगणक चालक कार्यरत असुन ०३ लघुलेखक सचिव विभागात कार्यरत आहेत. महानगरपालिका अंदाजपत्रक सन २०१२-१३ मध्ये अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षामध्ये रु. ७०.०० लाख इतकी तरतूद करणेत आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस अपुरा कर्मचारी वर्ग व वाढत्या कामाचा आवाका पहाता संगणक चालक तसेच लघुलेखक यांना एक दिवसाचा तांत्रीक खंड देऊन **पुढील अकरा महिन्यांकरीता** मुदतवाढ देणेस ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

तसेच ठोक मानधनावरील कार्यरत ८० संगणक चालक व ३ लघुलेखक ह्यांच्या प्रति महा मानधनामध्ये २० टक्के वाढ करण्यांत यावी व लागणारी अतिरीक्त तरतुद सन २०११-१२ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील "आरोग्य व सोयी अनु.०१ स्थायी आस्थापना" या लेखाशिर्षामधून पूर्नविनीयोजीत करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

Again there is a mistake. मॅडम, तुम्ही समजून घ्या. तुम्ही सिरिअसली घ्या. तुम्हाला खरे माहिती पडेल. आपण गेल्या इतक्या वर्षापासून प्रयत्न करतो आहे की, या कर्मचाऱ्यांना आपण कायम करुन घ्यावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

शासनाकडे प्रलंबीत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

या कायम करण्याच्या प्रयत्नामध्ये सर्वांची भावना आहे. आजपर्यंत त्याला कोणीही विरोध केलेला नाही. आणि ते या आशेवर या मा. महासभेत काम करतात की, आम्ही आज नाहीतर उद्या या महापालिकेत परमनंट होऊ. आज असे झाले की, ते बाहेर नोकरी करतील तर नऊ ते दहा हजार रुपये पगार मिळेल. इकडे साडेसहा हजारामध्ये या अपेक्षेने काम करतात की, आज नाहीतर उद्या परमनंट होऊ आणि आपण त्यांना करतच नाही. त्यांना आपण हे सांगितले की, तुम्ही परमनंट होऊ शकत नाही. ज्यांना राहायचे त्यांनी राहा. तर कमीत कमी त्यांना दुसरीकडे यापेक्षा जास्त पगारामध्ये जॉब मिळतील. मॅडम, हे सात-आठ वर्षापासून काम करतात त्यांना साडेसहा हजार रुपये पगार आणि आता आपण दहा कम्प्युटर ऑपरेटर घेतले, म्हणजे एक वर्षपण झाले नाही, त्यांना साडेनऊ हजार रुपये. आता मला सांगा, दे आर वर्किंग फ्रॉम टेन इयर्स. त्यांना साडेसहा हजार. आपल्याला नवीन गरज पडली, त्यांना साडेनऊ हजार रुपये देतो. हा कुठला न्याय आहे? एकाच महापालिकेमध्ये सिनिअर कम्प्युटर ऑपरेटरला साडेसहा हजार ............

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. मेहता साहेब, गोषवाऱ्यामध्ये संपूर्ण डिटेल दिलेली आहे. आपण राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवला. परंतु त्यांनी मंजुर केला नाही.

**नरेंद्र मेहता :-**

विषय तो नाही. तुम्ही नवीन साडेनऊ हजारामध्ये अपॉइंट केले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण त्यांना २० टक्के वाढ केली.

**नरेंद्र मेहता :-**

तरी किती झाले? आठ हजार झाले. दहा वर्षापासून काम करतात. नवीन केले त्यांना साडेनऊ हजार, त्यांना समान दर्जा तरी द्या. एका व्यक्तीला एकाच पालिकेत जो नवीन आला त्याला साडेनऊ हजार आणि जुना दहा वर्षापासून आहे त्याला साडेसहा हजार.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सकाळीसुध्दा श्री. नरेंद्र मेहता यांनी एक प्रश्न उपस्थित केला होता. तो या विषयाशी तंतोतंत जुळतो की, इथे बरेचदा, आता मला वाटते की, एक महिन्यापूर्वी ज्या सुचना काढल्या की, सेवाभरती करायची आहे. त्याच्यामध्ये मला वाटते सहा-सात गोणी भरुन अर्ज आले आहेत. ८,५३० इतके अर्ज आले आहेत. या आठ हजार पाचशे तीसमध्ये आपल्या संगणक चालकांचे पण अर्ज आहेत. मॅडम, एक गोष्ट

लक्षात घ्या की, त्यांना आता श्युअरिटी वाटत नाही. ती मुले दहा-दहा वर्षापासून काम करतात. आज त्या मुली दोन-दोन मुलांच्या आया झाल्या. लग्नापूर्वी त्या मुली इथे आलेल्या आहेत. आशेवर काम केले. प्रामाणिकपणे काम केले. आपली आई श्रीम. मायरा मॅडम असताना पहिल्यांदा ठेक्याने मानधनावर त्यांना कामावर घेतले गेले. आज तुम्ही त्यांची मुलगी म्हणून इथे बसलेले आहात. मॅडमनी सुरुवात केली, तुम्ही शेवट करावा अशी माझी इच्छा आहे. तर तिथे त्यांनी सुध्दा ॲप्लीकेशन केले आहेत. मॅडम या आठ हजार पाचशे तीस ॲप्लीकेशनमध्ये आपले जेवढे कर्मचारी आहेत, त्यांना घेण्याची आपण मा. आयुक्तांना सक्ती करावी की, ते इथे इतकी वर्षे प्रामाणिकपणे काम करत आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे नेहमीच या महापालिकेमध्ये भरत्या होतात. टप्याटप्याने त्या लोकांचे नियोजन करा. आणि जशी जशी सेवा तुम्ही या महापालिकेत घेणार आहात, त्या-त्या प्रकारे त्यांचा विनियोग करा. तिसरी गोष्ट अशी आहे की, याच्यामध्ये आणखीन एक नमुद केले आहे की, आपला सेवाशर्ती नियम पेंडींग आहे. आणि तो जर झाला, ते पाठवलेले आहेत. मा. महासभेमध्ये त्यांची मंजुरी व्हायची आहे. त्याची जर मंजुरी झाली तर बरीचशी पदे मंजुर होऊ शकतात आणि त्या मंजुर पदांवर आपण या लोकांची नेमणुक करु शकतो. पण आपली मानसिकता तशी असली पाहिजे की, आपण आपल्या स्थानिक लोकांना आणि जे कॅपेबल आहेत, जे अनुभवी आहेत, जे इतकी वर्षे मिरा भाईंदरची प्रदिर्घ सेवा करतात, त्यांना सेवेत सामावून घेण्यासोबत धोरण आपण आखले तर निश्चितपणे आपण त्यांना न्याय देऊ शकतो. आपण त्यांना फक्त सानुग्रह अनुदान देणार, प्रत्येक अकरा महिन्यांनी त्यांना मुदतवाढ देणार आणि प्रत्येक वेळेला त्यांच्या तोंडाला आपण पाने पुसणार तर ते आता जास्त काळ होऊ नये अशी अपेक्षा आहे.

**मा. महापौर :-**

मॅडम, आपण त्यांना परमनंट करायचे ते नंतर करु. परंतु, त्यांचा जो पगार आहे आणि जसे त्यांनी सांगितले की, जे नवीन आले आहेत, त्यांना आपण साडेनऊ हजार देत आहोत. आणि जे जुने आहेत त्यांना साडेसहा. तर मी मा. आयुक्त साहेबांना विनंती करते की, आपण सर्वांना सारखा पगार साडेनऊ हजार रुपये द्यायचा. आपण काहीतरी कुठेतरी सुरुवात करु.

**रोहिदास पाटील :-**

त्यांना साडेनऊ मंजुर आहे. आपण सगळ्यांना सारखाच द्या.

**नरेंद्र मेहता :-**

त्या ठरावामध्ये तशी सुचना समाविष्ट करुन घ्या.

**प्रभात पाटील :-**

दुसरी गोष्ट, सेवाभरती नियमांची गटनेत्यांची मिटींग अपूरी राहिली आहे. तो विषय पुन्हा आणा. ती पदे जर मंजुर झाली तर आपल्याला काही लोकांचा विनियोग किंवा त्यांचा समावेश त्याच्यामध्ये करता येईल किंवा काही लोक ऑटोमॅटीकली त्याच्यामध्ये निघून जातील. आता मा. आयुक्त साहेबांनी जी भरती लावली आहे, त्यामध्ये पण काही लोकांनी ॲप्लीकेशन केले आहे. आपले जे कर्मचारी आहेत त्यांना प्राधान्याने अग्रक्रम देण्यात यावा अशीसुध्दा तुम्हाला या अनुषंगाने विनंती आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, शासनाचे एक पत्र मी तुम्हाला देतो. नाशिक महापालिकेमध्ये शासनाने हा निर्णय आताच बिफोर वन इयर दिलेला आहे की, जे काही ठेका पध्दतीने आहेत, त्यांना समाविष्ट करुन घ्या. असा शासनाचा निर्णय आताच एक वर्षापूर्वीचा आहे.

**मा. महापौर :-**

माझ्या दालनात सर्व सभागृह नेता, विरोधी पक्षनेता आणि सर्व गटनेते, आपण मिळून एक, वी विल सिट ॲन्ड डिसाईड आणि मग आपण करु.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, सर्वोच्च न्यायालयाने तसे निर्देश दिले आहेत. विधी मॅडम त्या विषयावर बहुतेक जास्त माहिती देऊ शकतील. सर्वोच्च न्यायालयाचे त्याच्यावर आपल्याला डायरेक्शन आहेत.

**मा. महापौर :-**

त्या मिटींगमध्ये आपण विधी मॅडमना पण घेऊ आणि नियमाप्रमाणे जे आहे ते आपण करु.

**नरेंद्र मेहता :-**

त्यामध्ये एक अजून विनंती आहे. आपला जो एक विषय मागच्या काळात राहिला होता की, सेवाप्रवेश नियम हे गटनेता बैठकीमध्ये बसून फायनल करु. सकाळीपण चुकीची माहिती दिली की, आम्ही गव्हर्नमेंटला ते सॅन्क्शनला पाठवले आहे. खरे म्हणजे पाठवलेच नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही सर्व घेऊन या. आपण तिथे डिस्कस करु. नंतर मा. महासभेत घेऊन या.

**राजेंद्र जैन :-**

मॅडम, यह जो मुद्दा है। वो मैंने विधी अधिकारी से पुछा था। उसका सही जवाब नही मिलता है की, अब दस लोगो को साडेनऊ हजार में लिया। पहले साडे छह हजार मिल रहा है। मैने उनसे कारण पुछा की, क्या कारण है? उन्होने कहाँ की, ऑनलाईन लिया होगा। इसिलिए ऐसा होगा। हम जब अपना टाईम

निकालकर पुछने जाते है, तो जवाब तो सही मिलना चाहिए। या बोलिए की, हमारे पास जवाब नहीं है। मैं इसके लिए लिगल डिपार्टमेंट मे जाऊंगा तो जवाब मिला की, यह ऑनलाइन लिया होगा, इसिलिए ऐसा होगा। तो हमें सही जवाब मिलना चाहिए।

**मा. महापौर :-**

दुसरा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १९ :-**

मानधनावरील संगणक चालक / लघुलेखक यांच्या मुदतवाढीबाबत.

**ठराव क्र. २२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला असुन संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृतांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने मा. महासभा दि. २०/०६/२००६, ठराव क्र. २९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणुक करण्यात आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकामार्फत त्यांना वेळोवळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. लघुलेखक/संगणक चालक पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे दि. २६/०७/२००६ रोजी मंजुरीसाठी पाठविला असता नगरविकास विभागाने पत्र क्र. मिभामपा-११०६/१३९०/नवि-२८, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, दि. २९/०९/२००६ च्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मानधन तत्वावर संगणक चालक नेमण्याबाबत आणि आस्थापनेवर संगणक चालक/लघुलेखकाची पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करता येत नाही. त्यामुळे संगणक चालकाचे काम मंजुर पदावर कार्यरत कर्मचारी किंवा बाहयमार्गाने **(Outsourcing)** करुन घेणे अपेक्षित आहे असे नमुद केले आहे. तद्नंतर मा. महासभा दि. २०/०३/२०१०, ठराव क्र. ६५ अन्वये मंजुरी दिल्यानुसार संगणक चालकाच्या पदनिर्मितीचा फेर प्रस्ताव शासनास दि. १८/०८/२०१० रोजी पाठविला होता. परंतु त्यास अद्याप मंजुरी प्राप्त नाही.

१) मा. महासभा दि.२२/१२/२०१०, ठराव क्र.६८ नुसार महापालिकेत मानधनावरील कार्यरत संगणक चालक यांना रु.६५००/- तसेच लघुलेखक यांना रु. ७५००/- प्रती महिना या ठोक मानधनावर मा. महासभा दि. २९/०९/२०११, ठराव क्र. ६१ अन्वये संगणक चालक/लघुलेखक यांना दि. ०१/११/२०११ पासुन पूढे ११ महिन्यांसाठी मुदतवाढ दिलेली आहे. सदरची मुदत वाढ दि. ३०/०९/२०१२ रोजी संपत आहे.

२) महानगरपालिकेच्या आस्थापनेवर संगणक चालक/लघुलेखकची पदे मंजूर नाहीत. तसेच शासनाच्या प्रचलित धोरणानुसार बाह्य मार्गाने संगणक चालकाचे काम करुन घेण्याचे निर्देश आहेत.

३) सद्यःस्थितीत संगणक चालक/लघुलेखक यांचा पदनिर्मिती प्रस्ताव शासनाजवळ प्रलंबीत असुन शासनाने महानगरपालिकेस दि. २३/०८/२०११ रोजीचे पत्रानुसार संगणक चालक व लघुलेखक यांचे प्रस्तावावर कार्यवाही करणेकरीता महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ अंतीम करुन शासनास पाठविणे आवश्यक आहे असे कळविले आहे.

महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ हे हरकती सुचनांवर सुनावणी झाल्यावर अंतिम मंजुरीसाठी दि. १४/०९/२०१० रोजीच्या मा. महासभेपुढे मान्यतेस्तव ठेवले असता सदर विषय प्रथम गटनेत्याचे बैठकित चर्चा करुन मा. महासभेत घेणेबाबत तत्कालीन मा. महापौर सो., यांनी सुचना दिल्या. त्या नंतर गटनेत्याची मा. महापौर सो., यांनी दोन वेळा बैठका बोलविल्या. परंतु त्या बैठकित अंतिम निर्णय न झाल्यामुळे अद्याप महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ यांना मा. महासभेची अंतिम मान्यता मिळालेली नाही. मा. महासभेची अंतिम मान्यता न मिळाल्यामुळे सेवाशर्ती नियम शासनास पाठविता आलेले नाहीत. मा. महासभेने सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२००८ यास मान्यता दिल्यानंतर शासनाचे दि. २३/०८/२०११ चे पत्रावर कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. सद्यःस्थितीत महानगरपालिकेच्या विविध विभागात ८० संगणक चालक कार्यरत असुन ०३ लघुलेखक सचिव विभागात कार्यरत आहेत. महानगरपालिका अंदाजपत्रक सन २०१२-१३ मध्ये अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षामध्ये रु. ७०.०० लाख इतकी तरतूद करणेत आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस अपुरा कर्मचारी वर्ग व वाढत्या कामाचा आवाका पहाता संगणक चालक तसेच लघुलेखक यांना एक दिवसाचा तांत्रीक खंड देऊन **पुढील अकरा महिन्यांकरीता** मुदतवाढ देणेस ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.
तसेच ठोक मानधनावरील कार्यरत ८० संगणक चालक व ३ लघुलेखक ह्यांच्या प्रति महा मानधनामध्ये २० टक्के वाढ करण्यांत यावी व लागणारी अतिरीक्त तरतुद सन २०११-१२ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील "आरोग्य व सोयी अनु.०१ स्थायी आस्थापना" या लेखाशिर्षामधून पूर्नविनीयोजीत करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. नगरसेविका सौ. प्रभात पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

१. संबंधीत संगणकचालकांचे (जुने संगणकचालक/नवे संगणकचालक) मानधन एकच असावे.
२. महानगरपालिकेमध्ये जेव्हा पण पदनिर्मिती होईल तेव्हा तेव्हा या कर्मचाऱ्यांचा प्राधान्याने विचार व्हावा.

३. सध्या आपल्याकडे मजुर/माळी/ लिपिक इ. जागांसाठी अर्ज मागितले आहेत त्यात ह्या संगणक चालकांनी अर्ज केले आहेत त्यातही त्यांचा अग्रक्रमाने विचार व्हावा.

**मा. महापौर यांनी दिलेले निर्देश**

सर्व संगणक चालक यांना सर्वानुमते दरमहा साडेनऊ हजार रुपये इतके मानधन व लघुलेखक यांना दरमहा साडेदहा हजार इतके मानधन देण्यात यावे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २०, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, भारतरत्न स्व. इंदिरा गांधी रुग्णालय व नगरभवन या इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सार्वजनिक इमारतींमधील अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण करणेचे शासनाचे आदेश आहेत. त्यानुसार प्रथम टप्प्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मुख्य कार्यालय, नगरभवन व भारतरत्न स्व. इंदिरा गांधी रुग्णालय मिरारोड या सार्वजनिक इमारतींच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण करण्यात आले आहे. सदर इमारतींमध्ये आवश्यक असलेली अग्निशमन यंत्रणा महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व राष्ट्रीय बांधकाम संहिता भाग – ४ मध्ये नमुद केलेली आहे.

सदर कामी कोटेशन मागविले असता, प्राप्त कोटेशन मधील नमुद कामांपैकी अत्यावश्यकच कामे करुन घेणेकरिता खालीलप्रमाणे अंदाजे खर्च येत आहे.

| मुख्य कार्यालय यंत्रणा बसविणे कामी | | अंदाजित खर्च (रु.) |
|---|---|---|
| १ | Wet hydrant System | 35,00,000/- |
| २ | Sprinkler System | 30,00,000/- |
| | | **65,00,000/-** |
| इंदिरा गांधी रुग्णालय मिरारोड | | |
| १ | Wet hydrant System | 20,00,000/- |
| २ | Fire Extinguishers | 2,00,000/- |
| | | **22,00,000/-** |
| नगरभवन | | |
| १ | Wet hydrant System | 30,00,000/- |
| २ | Fire Extinguishers | 2,00,000/- |
| | | **32,00,000/-** |
| | Total | **1,19,00,000/-** |

उपरोक्त इमारतीमध्ये प्रस्तावित अग्निशमन यंत्रणा उभारण्याकरीता रु. १,१९,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च "आग सुरक्षा निधी" या लेखाशिर्षामधून करण्यास मंजुरी देत आहे. तसेच उक्त तक्त्यात सुचविलेली अग्निशमन यंत्रणा त्या त्या इमारतीत उभारणेकामी महाराष्ट्र शासनाकडून लायसन्स प्राप्त लायसन्स अभिकरणाकडून करुन सदरचे काम करुन घेणे करीता जाहिर ई-टेंडरिंग पध्दतीने निविदा मागविणेस ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**जुंबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, भारतरत्न स्व. इंदिरा गांधी रुग्णालय व नगरभवन या इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. २३ :-**

सार्वजनिक इमारतींमधील अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण करणेचे शासनाचे आदेश आहेत. त्यानुसार प्रथम टप्प्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मुख्य कार्यालय, नगरभवन व भारतरत्न स्व. इंदिरा गांधी

रुग्णालय मिरारोड या सार्वजनिक इमारतींच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण करण्यात आले आहे. सदर इमारतींमध्ये आवश्यक असलेली अग्निशमन यंत्रणा महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व राष्ट्रीय बांधकाम संहिता भाग – ४ मध्ये नमुद केलेली आहे.

सदर कामी कोटेशन मागविले असता, प्राप्त कोटेशन मधील नमुद कामांपैकी अत्यावश्यकच कामे करुन घेणेकरिता खालीलप्रमाणे अंदाजे खर्च येत आहे.

| मुख्य कार्यालय यंत्रणा बसविणे कामी | | अंदाजित खर्च (रु.) |
|---|---|---|
| १ | Wet hydrant System | 35,00,000/- |
| २ | Sprinkler System | 30,00,000/- |
| | | **65,00,000/-** |
| इंदिरा गांधी रुग्णालय मिरारोड | | |
| १ | Wet hydrant System | 20,00,000/- |
| २ | Fire Extinguishers | 2,00,000/- |
| | | **22,00,000/-** |
| नगरभवन | | |
| १ | Wet hydrant System | 30,00,000/- |
| २ | Fire Extinguishers | 2,00,000/- |
| | | **32,00,000/-** |
| | Total | **1,19,00,000/-** |

उपरोक्त इमारतीमध्ये प्रस्तावित अग्निशमन यंत्रणा उभारण्याकरीता रु. १,१९,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च "आग सुरक्षा निधी" या लेखाशिर्षामधून करण्यास मंजुरी देत आहे. तसेच उक्त तक्त्यात सुचविलेली अग्निशमन यंत्रणा त्या त्या इमारतीत उभारणेकामी महाराष्ट्र शासनाकडून लायसन्स प्राप्त लायसन्स अभिकरणाकडून करुन सदरचे काम करुन घेणे करीता जाहिर ई-टेंडरिंग पध्दतीने निविदा मागविणेस ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री ध्रुवकिशोर पाटील      अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २१, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मार्केट इमारतीमधील गाळ्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या दहा मार्केट इमारती असून सदर मार्केटमध्ये बसणाऱ्या मासळी विक्रेत्याकडून रू. ३००/- प्रति महीना व मटन विक्रेत्याकडून रू. ६००/- भाडे आकारण्याबाबत मा. स्थायी समिती सभा दि.३०/०६/२००६ ठराव क्र. ४१ अन्वये निर्णय झाला होता. त्यानुसार सर्व संबधिताना रक्कम भरण्याबाबत वेळोवेळी बिले देण्यात आली होती. तथापी बऱ्याच विक्रेत्यांनी सदर भाडे भरलेले नव्हते. तसेच मासळी विक्रेत्याच्या संघाकडून महानगरपालिकेने ठरविलेले दर जास्त असल्याने सदर दर आकारणी दिनांकापासून कमी करावे तसेच बाजाराच्या स्वच्छतेची, साफसफाईची हमी स्वत घेवु असे कळविले होते. त्यानुसार सदर प्रस्तावावर विचार विनिमय करण्याकरीता प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मा. महासभा दि. २९/११/२००८ ठराव क्र. ७० अन्वये सदर मासळी विक्रेत्याकडून कर आकारणी दिनांकापासून रू. २०/- प्रतिमाह बाजारशुल्क / भाडे आकारण्याबाबत निर्णय होवुन मागील सर्व बिले निर्लेखित करण्यास देखिल मान्यता देण्यात आली. सदर मार्केट इमारतीची साफसफाई संबधित विक्रेत्यांनी करून लाईट बिल, पाणीबिल सदर विक्रेत्यांनीच भरावयाची होती.

सदर ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात येवुन संबधित विक्रेत्यांना बिले देण्यात आली. तथापी रू. २०/- प्रतिमाह भाडे देखिल भरण्यात आलेले नसून पाणीबिल व वीज बिल देखिल विक्रेत्यांमार्फत न भरल्याने वीज पूरवठा खंडित करण्यात आला आहे. सर्व मार्केटची दुरावस्था झाल्याने सर्व मार्केट इमारती बाबतचा मा. महासभा दि. २९/११/२००८ ठराव क्र. ७० रद्द करून सर्व मार्केट लिलावाद्वारे खाजगी ठेकेदाराकडे भाडे वसूलीसाठी दिल्यास विक्रेत्याकडून भाडे वसुल होऊन महानगरपालिकेस वीज बिल, पाणी बिल भरता येऊन आवश्यक दुरूस्त्या करून इमारती सुस्थितीत ठेवता येतील.

सद्यस्थितीत मार्केट इमारतीमध्ये बसणाऱ्या विक्रेत्यांना त्यांच्याकडील थकबाकी भरुन घेऊन प्राध्यान्याने सदर इमारती मध्ये गाळे देण्याबाबत नविन लिलावाच्या निविदा मध्ये अट टाकावी.

तरी सदर मार्केट इमारती योग्य अटीशर्ती ठरवून लिलावाव्दारे खाजगी ठेकेदारास भाडे वसुलीसाठी देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

याच्यामध्ये माझी सुचना आहे की, जे खारी मार्केट आहे, ते या ठरावामधून वगळावे. कारण त्या मार्केटबद्दल मा. आयुक्तांना मी भेटलो होतो की, त्याच्या जमिनिचा वाद आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही सुचना द्या.

**राजेश वेतोसकर :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या नवघर येथे मार्केट बनवलेले आहे. आणि त्या लोकांनी कमीत कमी सत्तर हजार रुपये इलेक्ट्रीक बील बाकी ठेवलेले आहे. आजपर्यंत पाणी बील पण भरलेले नाही आणि पालिकेचा एकही रुपया भरलेला नाही. मग अशा डिफॉल्टर लोकांना पुन्हा-पुन्हा ती जागा द्यायची का? अशा डिफॉल्टर लोकांना पुन्हा त्या ठिकाणी बसविण्यात येऊ नये अशी मी सुचना करतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. खारीगाव येथे जे मच्छीमार्केट आहे, त्या जागेबाबत वाद निर्माण झालेला आहे. एक तर श्री. सत्यनारायण मंदिर विश्वस्त मंडळ सांगते की, ही जागा आमची आहे. श्री. तुकाराम बारक्या पाटील यांनी आपल्यासह सातबाराचा उतारा दिलेला आहे. नकाशा दिलेला आहे. त्यामध्ये विधी अधिकारी यांचा रिपोर्टपण आहे की, ११० चौ.मी. ही जागा श्री. तुकाराम बारक्या पाटील यांची आहे. मग या मार्केटचे तुम्ही काय करणार? २००८ पासून या मार्केटचे लाईटबील, पाणी पुरवठा, साफसफाई आणि प्रतिमाह वीस रुपये हे सर्व घेणे बाकी आहे. मग या मार्केटचे आपण काय करणार? हे मार्केट तोडून त्यांना मोबदला देणार की, आपण करणार? त्याचे कसे करणार?

**दिपक खांबित :-**

खारीगाव मार्केटबद्दल तुम्ही काय सांगितले?

**प्रेमनाथ पाटील :-**

खारीगाव मार्केटबद्दल आपल्याकडे दोन पत्र आलेली आहेत. एक श्री. तुकाराम बारक्या पाटील यांचे आणि दुसरे खारीगाव सत्यनारायण मंदिर विश्वस्त मंडळाचे. दोघांनी या मार्केटवर दावा केलेला की, ही जागा आमची आहे. श्री. तुकाराम बारक्या पाटील यांनी आपल्या जागेचा सातबारा दिलेला आहे आणि जागेचा नकाशा दिलेला आहे. त्याची ११० चौ.मीटर जागा ही श्री. तुकाराम बारक्या पाटील यांची आहे आणि विधी अधिकारी यांचा तसा रिपोर्टपण दिलेला आहे की, श्री. तुकाराम बारक्या पाटील, यांच्या नावाची नोंद आहे. तसेच त्या पत्रासोबत त्यांनी हक्काचे फेरफारपत्र , एम.बी.राणे, सर्व्हेअर यांचे सर्वेप्लान सादर केलेले आहे. तरी या जागेचा त्या लोकांनी टी.डी.आर, एस.ए.आर. किंवा मोबदला, मार्केट व्हॅल्यु मागितली आहे. तर हे मार्केट आपण तोडणार की, त्यांना मार्केट व्हॅल्यु देणार की, टी.डी.आर देणार? आपण कसे करणार?

**दिपक खांबित :-**

जे नियमानुसार असेल ते देऊ.

**प्रेमनाथ पाटील :-**

देऊ म्हणजे कसे काय?

**दिपक खांबित :-**

आम्ही त्यांना पुढच्या महिन्यात बोलावून घेतो आणि त्यावर निर्णय घेतो आणि त्यानंतर मार्केटचे काम सुरु करतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

मार्केटचे काम आपल्याला सुरु करायचे नाही. साहेबांनी ते काम रद्दच केलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण आपली मालकी सिध्द करुन जी चौतीस लाखाची मंजुरी दिलेली आहे, तो आपला फंड बाकी आहे. त्या लोकांच्या सोयीच्या दृष्टीने मार्केट होणे गरजेचे आहे. त्याआधी जमीन मालक आपण महापालिका स्मशान, खारीगाव स्मशान, खारीपाडा स्मशान असा एक उतारा आहे. आणि तुकाराम बारक्या पाटील असा एक उतारा आहे. त्याची आपण निश्चित काय ती भुमिका घेऊ. एका टायटल क्लीअर झाले की, मग इमारत बांधायला सुरुवात करु. त्याआधी आपण ठेकेदाराकडे देऊ नये म्हणून मी सुचना मांडलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रथम आमदार श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसा यांच्याकडे ही तक्रार गेली होती. मच्छी विक्रेत्यांनी आणि खारीगाव विश्वस्त मंडळाने माझी तर दिशाभूल केली, आणि मा. आमदार साहेबांचीपण दिशाभूल केली. या लोकांनी याच्यावर खोट्या सह्या करुन साहेबांना फसवलेले आहे की, आम्ही खालील सह्या करणार खारी ग्रामस्थ महिला मासे विक्रेते आपणांस कळवू इच्छितो की, आमच्या मासळी बाजाराचे कोणत्याही प्रकारचे बांधकाम न करता ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत आम्ही त्या ठिकाणी मासळी विकत राहू. तरी आमच्या मासळी बाजार पूर्नबांधणीच्या कामास आमचा सक्त विरोध आहे याची आपण नोंद घ्यावी.

**मा. आयुक्त :-**

साहेब, आजच्या दिवशी तिकडे मार्केट भरते, हे आम्हाला मान्य करावे लागेल. आणि जर मार्केट भरत आहे आणि जागेचा काही वाद असेल, कारण याच्यावर सध्या कोणतीही कोर्टकेस नाही की, जागेबद्दल आमच्यावर कोणी केस केली असेल. आजच्या दिवशी मार्केट भरते. जेव्हा आम्ही नवीन मार्केटबद्दल निर्णय घेऊ की, कसे करायचे आहे, तेव्हा ही चर्चा करु. ज्यांचा जो वाद आहे, खाजगी लोक असतील, रिझर्व्हेशनची जागा असेल तर त्यांना मोबदला देऊ. नाहीतर जसे इतर मार्केट आम्ही करतो. तसे केले तर लगेच सुरु होईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, मी समजलो नाही.

**मा. आयुक्त :-**

आजच्या दिवशी जे मार्केट सुरु आहे ते तसेच सुरु राहणार. आणि माझ्या माहितीप्रमाणे कोणतीही कोर्टकेस या विषयावर आजच्या दिवशी नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

कोर्टकेस नाही. फक्त तुकाराम बारक्या पाटील आणि खारीगाव विश्वस्त मंडळ यांनी दावा दाखवला आहे की, ही जागा आमच्या मालकीची आहे.

**मा. आयुक्त :-**

पण ते आमच्या विरुध्द कोर्टात गेले नाहीत. आजच्या दिवशी ही जागा पालिकेच्या ताब्यात आहे. तिकडे पालिकेचे मार्केट भरते. आणि आम्ही तसा ठराव घेतो. त्याप्रमाणे तसेच मार्केट सुरु राहणार.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग त्यांची जी थकबाकी आहे, वॉटर बील, साफसफाई, इलेक्ट्रीक बील आणि २००८ पासून त्या लोकांनी आपल्याला थकबाकी दिलेली नाही. ती आपण त्यांच्याकडून वसुल करणार का?

**मा. आयुक्त :-**

करणारच. ते ठरावामध्ये आले आहे.

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडम, मिरारोडला स्टेशन जवळ मच्छी मार्केट आहे. पण मच्छी मार्केट असताना ते बाहेर लावतात आणि तिकडे जे मटन शॉप आहे, तिकडे आपला असा कायदा आहे की, काळ्या काचा लावल्या पाहिजेत. पण स्टेशनजवळ ते खुल्यामध्ये लावतात. तर आपण त्यांना सांगावे की, तिकडे पडदे लावा किंवा काळ्या काचा लावल्या पाहिजेत. पण स्टेशनजवळ ते खुल्यामध्ये लावतात. तर आपण त्यांना सांगावे की, तिकडे पडदे लावा किंवा काळ्या काचा लावा. त्याने लोकांना त्रास होणार नाही.

**दिपक खांबित :-**

२००८ पासून जी थकबाकी आहे ती आपण वसुल करणार.

**प्रमोद सामंत :-**

कोणाकडून?

**दिपक खांबित :-**

जे विक्रेते बसतात त्यांच्याकडून. आपल्याकडे त्यांची नावे आहेत.

**प्रमोद सामंत :-**

ती जागा कोणाची आहे?

**दिपक खांबित :-**

काही सरकारी जागा आहे, काही खाजगी आहे.

**प्रमोद सामंत :-**

खाजगी जागेत पण महापालिकेचे मार्केट लागते?

**प्रेमनाथ पाटील :-**

ते झालेले आहे. नगरपरिषद असताना ते बांधून घेतलेले होते.

**दिपक खांबित :-**

पूर्वी गाववाले मार्केटला सार्वजनिक प्रमाणात जागा द्यायच

**प्रेमनाथ पाटील :-**

आधी द्यायचे पण आता त्यांना मोबदला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही ते ठेका पध्दतीने देऊ नका. ते वगळा वाद मिटल्यानंतर ते द्या.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मार्केट इमारतीमधील गाळ्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे

**ठराव क्र. २४ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या दहा मार्केट इमारती असून सदर मार्केटमध्ये बसणाऱ्या मासळी विक्रेत्याकडून रू. ३००/- प्रति महीना व मटन विक्रेत्याकडून रू. ६००/- भाडे आकारण्याबाबत मा. स्थायी समिती सभा दि.३०/०६/२००६ ठराव क्र. ४१ अन्वये निर्णय झाला होता. त्यानुसार सर्व संबधिताना रक्कम भरण्याबाबत वेळोवेळी बिले देण्यात आली होती. तथापी बऱ्याच विक्रेत्यांनी सदर भाडे भरलेले नव्हते. तसेच मासळी विक्रेत्याच्या संघाकडून महानगरपालिकेने ठरविलेले दर जास्त असल्याने सदर दर आकारणी दिनांकापासून कमी करावे तसेच बाजाराच्या स्वच्छतेची, साफसफाईची हमी स्वत घेवु असे कळविले होते. त्यानुसार सदर प्रस्तावावर विचार विनिमय करण्याकरीता प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मा. महासभा दि. २९/११/२००८ ठराव क्र. ७० अन्वये सदर मासळी विक्रेत्याकडून कर आकारणी दिनांकापासून रू. २०/- प्रतिमाह बाजारशुल्क / भाडे आकारण्याबाबत निर्णय होवुन मागील सर्व बिले निर्लेखित करण्यास देखिल मान्यता देण्यात आली. सदर मार्केट इमारतीची साफसफाई संबधित विक्रेत्यांनी करून लाईट बिल, पाणीबिल सदर विक्रेत्यांनीच भरावयाची होती.

सदर ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात येवुन संबधित विक्रेत्यांना बिले देण्यात आली. तथापी रू. २०/- प्रतिमाह भाडे देखिल भरण्यात आलेले नसून पाणीबिल व वीज बिल देखिल विक्रेत्यांमार्फत न भरल्याने वीज पूरवठा खंडित करण्यात आला आहे. सर्व मार्केटची दुरावस्था झाल्याने सर्व मार्केट इमारती बाबातचा मा. महासभा दि. २९/११/२००८ ठराव क्र. ७० रद्द करून सर्व मार्केट लिलावाद्वारे खाजगी ठेकेदाराकडे भाडे वसूलीसाठी दिल्यास विक्रेत्याकडून भाडे वसुल होऊन महानगरपालिकेस वीज बिल, पाणी बिल भरता येऊन आवश्यक दुरूस्त्या करून इमारती सुस्थितीत ठेवता येतील.

सद्यस्थितीत मार्केट इमारतीमध्ये बसणाऱ्या विक्रेत्यांना त्यांच्याकडील थकबाकी भरुन घेऊन प्राध्यान्याने सदर इमारती मध्ये गाळे देण्याबाबत नविन लिलावाच्या निविदा मध्ये अट टाकावी.
तरी सदर मार्केट इमारती योग्य अटीशर्ती ठरवून लिलावाव्दारे खाजगी ठेकेदारास भाडे वसुलीसाठी देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २२, मिरा भाईंदर शहरासाठी विकास नियंत्रण नियमावलीचे T.D.R. GENERATING SECTOR व T.D.R. RECEIVING SECTOR साठी कलम ३७(१) नुसार विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल प्रस्ताव मा. नगर विकास विभागास पाठविणेस मान्यता देणेबाबत.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मार्केटबद्दल एक प्रश्न विचारायचा आहे.

**मा. महापौर :-**

आता ऑलरेडी मार्केटचे झाले. तुम्ही एवढे बोलले तेव्हा बोलायला पाहिजे होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेबांनी आता त्यांना एक वेगळे उत्तर दिले की, ज्या जागेचा वाद असेल त्या जागेमध्ये ठेकेदार वसुल करणार असे बोलले.

**मा. आयुक्त :-**

साहेब, मी असे म्हणालो की, जसा आम्ही हा ठराव घेतो, तो सगळ्या मार्केटसाठी घेतो. याच्यामधून आम्ही कोणतेही वगळणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

सदर विकास नियंत्रण नियमावली T.D.R. GENERATING SECTOR व T.D.R. RECEIVING SECTOR बाबत खालील प्रमाणे मंजूर तरतूद केलेली आहे.

(१)

| ORIGINATING ZONE | RECEIVING ZONE |
|---|---|
| I | I |
| II | IV, V-A, VI-A |
| III | IV, VI-A |
| IV | IV, VI |
| V | IV, VI-A |
| V-A | V-A, VI-A |
| VI | VI-A, VI |
| VI-A | VI-A |
| VII-A | VII-A, VII-B |
| VII-B | VII-B |
| VIII | VIII |

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सूचित केलेल्या खालीलप्रमाणेच्या तक्त्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये ORIGINATING ZONE व RECEIVING ZONE मध्ये फेरबदल करणेकरिता प्रकरण क्र. ५४, ठराव क्र. ५५, दि.११/०२/२०१० रोजीच्या महासभेने मान्यता दिलेली आहे.

| T.D.R. GENERATING SECTOR | T.D.R. RECEIVING SECTOR |
|---|---|
| I | I |
| II-A | IV, II-B |
| II-B | II-B, IV |
| III-A | III-A, IV, V, V-A, VI, VI-A, VII-A, VII-B |
| III-B | IV, V, V-A, VI, VI-A, VII-A, VII-B |
| IV | IV, V, V-A, VI, VI-A |
| V | IV, V, V-A, VI, VI-A |
| V-A | IV, V, V-A, VI, VI-A |
| VI | V, VI, VI-A |
| VI-A | V, VI, VI-A |
| VII-A | VII-A, VII-B |
| VII-B | VII-A, VII-B |
| VIII | VIII |

उपरोक्त प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने आवश्यक वैधानिक कार्यवाही पूर्ण केल्यानंतर सदर प्रस्तावास मा. महासभेने प्रकरण क्र. ४१, ठराव क्र. ४७, दि.२०/०८/२०१० रोजी *फेरबदलास अंतिम मंजूरी दिलेली आहे*.

तद्नंतर सदरचा प्रस्ताव अंतिम मंजूरीकरिता मा. शासनास पत्र क्र. मनपा/नर/३१५८/ २०१०-११, दि.२९/११/२०१० अन्वये सादर केलेला आहे. सदर प्रकरणात सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे यांचेकडील दि.१६/०३/२०११ रोजीच्या पत्रातील त्रुटींची पूर्तता करुन त्याबाबत महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/१५५/२०११-१२, दि.२१/०४/२०११ अन्वये कळविलेले आहे. तद्नंतर मा. शासनास महानगरपालिकेने पूनश्च पत्र क्र. मनपा/नर/१८५८/२०११-१२, दि.१६/०९/२०११ अन्वये विनंती पत्र दिलेले आहे.

सदर प्रकरणात श्री. दिपक जे. कपाडिया व इतर १० यांच्या विनंतीपत्रानुसार महानगरपालिकेने यापूर्वी मंजूर विकास योजनेत सेक्टर निहाय फेरबदलाबाबत मा. शासनास सादर केलेल्या प्रस्तावामध्ये सेक्टर II चे II-A व II-B असे दोन भाग केलेले असून II-A हा पूर्णतः Congested असून ब-याच प्रमाणात आरक्षण आहेत. तसेच II-B या सेक्टरमध्ये बरीच मोकळी जागा असल्यामुळे व त्या ठिकाणी II-A व II-B चा वापर होवू शकतो. त्यामुळे विकासाचा समतोल साधला जाईल, अशी महानगरपालिकेने कारणमिमांसा नमुद केलेली आहे. या सेक्टर II-A व II-B च्या मधील विभाजन हद्दीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. सेक्टर II-B चे उत्तर हद्दीलगत १८.०० मी. रुंद रस्त्याच्या उत्तरेकडील आणि ३०.०० मी. रुंद रस्ता यामधील मोकळी जागा सेक्टर II-A मध्ये सामाविष्ट केली आहे. सदर जमीन बहुतांशी मोकळी असल्यामुळे ती जागा II-A मधून

वगळून सेक्टर II-B या रिसीव्हींग झोनमध्ये समाविष्ट केल्यास तेथे विकासाचा समतोल साधता येईल", याप्रमाणे विनंती केलेली आहे.

श्री. दिपक जे. कपाडिया व इतर १० यांच्या दि.१२/०९/२०११ रोजीच्या विनंतीपत्रानुसार शासन नगरविकास विभाग यांचेकडे प्रस्तावित फेरबदलाबाबत दि.१४/०९/२०११ रोजी पत्रव्यवहार केला असता, तद्अनुषंगाने शासनाने दि.२२/०९/२०११ रोजी महानगरपालिका आयुक्त, संबंधीत अधिकारी व इतर अर्जदार यांचे समवेत बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीचे इतिवृत महानगरपालिकेस प्राप्त असुन इतिवृत्तात नमुद करणेत आले आहे कि,

**"अर्जदारांनी / विकासकानी सादर केलेला प्रस्ताव हा महानगरपालिकेचे मंजूर ठराव आणि याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे तरतूदीनुसार प्रसिध्द सूचना यामध्ये समाविष्ट नसल्याने पुन्हा नव्याने प्रसिध्दीकरण करावे लागेल. सदर प्रस्तावाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतूदीनुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव सादर केल्यास त्याबाबत नगररचना संचालनालयाचे अभिप्राय प्राप्त करुन घेवून गुणवत्तेनुरुप पुढील कार्यवाही शासनामार्फत करण्यात येईल".**

याबाबत आवश्यक ती कार्यवाही सत्वर पूर्ण करण्यात यावी, अशा सुचना प्राप्त आहेत.

तद्अनुषंगाने वरीलप्रमाणे फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये आवश्यक असलेल्या फेरबदलाच्या वैधानिक कार्यवाहीस, फेरबदलाच्या सुचना / हरकती घेणे, सुनावणी घेणे व अंतिम मंजूरीसह प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही विकासाला कधी विरोध करत नाही. पण मॅडम, रिसीव्हींग आणि नॉन रिसीव्हींग अशा दोन प्रकारे या शहरात आपण डिव्हीजन केलेले आहेत. नॉन रिसिव्हींग झोन आपण त्या ठिकाणी केले, ज्या ठिकाणी जमिनिची डेंन्सीटीपेक्षा जास्त लोकवस्ती आहे. त्या ठिकाणी आपण टी.डी.आर. अलाऊ करत नाही. कारण तिकडचे पॉप्युलेशन वाढल्यानंतर रस्ते छोटे होतील. पाण्याची योजना छोटी होणार. इतर सगळ्या सुखसुविधा छोट्या पडणार. आता त्यापेक्षा जास्त महत्वाचे असे आहे की, हा ठराव मागच्या वेळी सन्मा. माजी उपमहापौर श्री. स्टीवन मेन्डोंसा व सन्मा. सौ. नयना म्हात्रे यांच्या विषयाबद्दल एक अतिक्रमणचा ठराव होता. ज्यामध्ये इलेक्शनच्या काळात मोठ्या प्रमाणात यांना निलंबीत केले, त्यांना सस्पेंड केले अशा अनेक बातम्या आपणही पेपर मध्ये इतर बातमी वाचली, ज्या लोकांनी मदत केली. मॅडम यामध्ये असे म्हटले आहे कि, दिपक कपाडिया व इतर दहा लोकांनी शासनाकडे निवेदन केले आहे की, यामध्ये बदल करावा म्हणुन शासनाने आपल्याकडे हे पाठवलेले आहे. नक्कीच यामध्ये प्रशासन किंवा आपली काही भुमिका नाही. त्यासाठी आपण हे सादर केलेले आहे. मा. आयुक्त साहेबांना मला विचारायचे आहे की, हे दिपक कपाडिया आणि अन्य दहा जे आहेत, आम्ही चौकशी केली त्याप्रमाणे या सर्वांनी या क्षेत्रात अनधिकृत बांधकाम केलेले आहे. त्यांना नियमीत करण्यासाठी आपण हा प्रस्ताव आणलेला आहे आणि अनधिकृत बांधकामाला आम्ही ठरावाच्या माध्यमातून मदत केली तर आम्हाला तुम्ही १५३ खाली निलंबीत करु शकता. श्री. धनेगावे साहेब, दिपक कपाडिया व अन्य दहाची यादी तुमच्याकडे आहे. यांचे कोणाचेही इलिगल बांधकाम त्या झोनमध्ये नाही का?

**सत्यवान धनेगावे :-**

दिपक कपाडिया व इतर दहा लोकांनी जे शासनाकडे निवेदन केलेले आहे. त्यामध्ये अनधिकृत बांधकामाचा विषय नाही. त्यांनी झोन बदला संदर्भात शासनाकडे निवेदन दिलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मान्य आहे. मी बोलतो की, या दहा लोकांचे या झोनमध्ये इलिगल बांधकाम सध्या झालेले आहे की नाही ते मला सांगा.

**सत्यवान धनेगावे :-**

त्यांचे इलिगल बांधकाम आहे की, नाही हा आजचा विषयच नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, विषय तोच आहे. त्यासाठीच आला आहे, मा. आयुक्त, हे झाल्यानंतर जे इलिगल बांधकाम आहेत, त्यांना तुम्ही रेग्युलराइज करणार की नाही, हे मला सांगा. त्यांनी प्रस्तावच यासाठी केलेला आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

त्याप्रभागामध्ये किंवा अन्य ठिकाणी जे काही इलिगल बांधकाम आहेत, त्याची स्वतंत्र कारवाई होते.

**नरेंद्र मेहता :-**

मी आपल्याला विशेष पूर्ण शहराबद्दल बोलत नाही. दिपक कपाडीया व अन्य दहा या लोकांनी या रिसिव्हींग झोनमध्ये इलिगल बांधकाम केले आहे अशी आमची खात्री आहे. आणि आमच्याकडे पुरावे आहेत. या इलिगल बांधकामासाठी तुम्ही आम्हाला मध्यस्थी टाकून हा ठराव करत असाल तर आम्ही याच्यात भाग घेणार नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

मध्यस्थी टाकण्याचा प्रश्न नाही. प्रस्ताव मा. महासभेमध्ये रितसर आलेला आहे. निर्णय घ्यायचा आहे.

**नरेंद्र मेहता :-**

माझे तेच म्हणणे आहे की, जनरल असेल तर निर्णय घ्यायला काही हरकत नाही. पण इलिगल बांधकामाला रेग्युलराइज करण्यासाठी आम्ही निर्णय घेतो. पॉलिसी डिसीजन चेंज करतो. टेक्नीकली इट इज रॉंग.

**सत्यवान धनेगावे :-**

निर्णय आपण घ्यायचा आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मग तोच खुलासा तुम्ही केला पाहिजे की, या दहा लोकांचे इलिगल बांधकाम नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

आम्ही खुलासा केलेला आहे की, त्या दहा लोकांच्या अनधिकृत बांधकामासंदर्भात ..........

**नरेंद्र मेहता :-**

बांधकाम आहेत की नाहीत?

**सत्यवान धनेगावे :-**

मला माहिती नाही.

**नरेंद्र मेहता :-**

This is the answer, they are giving.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, या सभागृहामध्ये कित्येक नवीन सदस्य आहेत. त्यामधील मी एक नवीन सदस्य आहे. हे जे कोण दिपक कपाडिया आणि इतर दहा आहेत, त्यांच्या विषयी आम्हाला काही कल्पना नाही. या बाबतीत आम्हाला सखोल अभ्यास करावा लागेल. कृपया आमची विनंती राहील की, आपण हा ठराव राखून ठेवावा. धन्यवाद.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आम्हाला स्पष्ट उत्तर द्यावे की, बांधकाम आहेत की नाहीत? मग सांगा त्यांचे बांधकाम नाही. तुम्ही बोलता की, आहेत की नाहीत हे ही माहिती नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

अनधिकृत बांधकाम नियमीत करण्यासंदर्भात हा विषय नाही.

**नरेंद्र मेहता :-**

या रिसिव्हींग झोनमध्ये या लोकांचे इलिगल बांधकाम आहे की नाही? मी शहरातील बोलत नाही. ज्या कामासाठी विषय आणला आहे, ज्याचे झोनिंग बदलतो आहे, त्याच्याबद्दल मी बोलतो.

**सत्यवान धनेगावे :-**

या लोकांचे असे कोणत्याही बांधकामासंदर्भात प्रस्ताव या विभागाकडून ..........

**नरेंद्र मेहता :-**

साहेब तुम्ही बोलून मोकळे होता. आम्हाला पार्टी केल्यानंतर कोर्टच्या चक्कर माराव्या लागतात.

**सत्यवान धनेगावे :-**

आम्ही काय बोलतो तेही रेकॉर्डवर आहे.

**नरेंद्र मेहता :-**

यांचे बांधकाम आहे की, नाही तेवढेच मला सांगा.

**सत्यवान धनेगावे :-**

त्या लोकांचे अनधिकृत बांधकाम नियमित करण्याचे प्रस्ताव आमच्याकडे नाहीत.

**नरेंद्र मेहता :-**

मी विचारले की, ज्या रिसीव्हींग झोनमध्ये आपण बदल करतो तिकडे त्या दहा लोकांचे इलिगल बांधकाम आहे की, नाही ते मला सांगा. मा. आयुक्त महोदय, आपण क्लीअर करा.

**गिता जैन :-**

साहेब, माझी एक विनंती आहे की, तुम्ही दहा माणसांची नावे प्रसिध्द करा. त्यांची बांधकामे या विभागात आहेत की, नाहीत ते प्रसिध्द करा. मग आपण निर्णय घेऊ.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेबांनी त्याची माहिती घेतलेली आहे. सगळ्यांकडेच माहिती आहे.

**गिता जैन :-**

साहेब, सगळ्यांना माहिती पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

त्यांना सर्वेनंबर जोडा, हिस्सा नंबर जोडा, क्षेत्रफळ जोडा.

**सत्यवान धनेगावे :-**

श्री. पाटील साहेब, हा विषय सर्वेनंबर, हिस्सा नंबरचा नाही. हा नियोजन विभाग, प्रभाग दोनमधील बाऊन्ड्रीमध्ये बदल करण्याचा ३७ चा विषय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

हा विषय त्यांना लिगल करण्यासाठी आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मग तुम्ही दिपक कपाडिया व इतर १० हा शब्द म्हणायला नको होता. जनरल आणायला पाहिजे होते.

**सत्यवान धनेगावे :-**

असा आमचा गोषवारा आहे. पण ते बॅकग्राऊंड फॅक्टपण द्यायला पाहिजे. त्यांनी निवेदन दिले म्हणून शासनाने हे आदेश दिले की, तुम्ही ३७ ची प्रोसेस करा.

**गिता जैन :-**

साहेब, बॅकग्राऊंड फॅक्ट काय असणार? तिथे गरज आहे की नाही? ते झोन बदलण्याची गरज आहे की नाही? दॅट शुल्ड बी अ कॉमन. तुम्ही तिथे दहा माणसांचे नाव घेतले आहे. मग त्यांच्या अर्जावर तुम्ही करणार का? आपण शहराचे रिसिव्हींग झोन काय करायचे ते दहा माणसांनी ठरवायचे का?

**सत्यवान धनेगावे :-**

ते आपल्याला ठरवायचे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मग सभागृहाला क्लीअर करा की, तिकडे त्यांचे इलिगल बांधकाम आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

तो विषय नाही.

**नरेंद्र मेहता :-**

तोच विषय आहे. त्यांना आम्ही संमती कशी द्यायची?

**मा. आयुक्त :-**

साहेब, याच्यामध्ये आपण याची पार्श्वभूमी जर वाचली असेल की, १२ सप्टेंबर २०११ ला मा. राज्यमंत्री यांच्याकडे मिटींग झाली. मिटींगमध्ये जे लोक बसले होते त्यांची नावेपण याच्यामध्ये आहेत. मा. राज्यमंत्र्यांच्या मिटींगमध्ये असा निर्णय झाला की, आपण हे प्रस्ताव जनरल बॉडीपुढे घ्या. त्यांना मान्य असेल तर पाठवा मान्य नसेल तर विषय संपला. तो ३७(१) रिसिव्हींग झोन चेंजचा विषय आहे. त्याच्या बाऊंड्रीचा विषय आहे. याच्यामध्ये कोणाचे इलिगल बांधकाम आहे किंवा नाही याचे कमेंट आजच्या दिवशी इकडे करु शकत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मी पहिल्याच लाइनमध्ये बोललो की, मा. महापौर किंवा प्रशासन यांनी हा विषय स्वतः दिलेला नाही. तिकडून आणला म्हणून आपण हा दिलेला आहे. आता सभागृहाने निर्णय द्यायचा आहे, म्हणून मी तुम्हाला विचारले की, या दहा लोकांचे या ठिकाणी इलिगल बांधकाम आहे का? आणि त्या लोकांनी मा. राज्यमंत्र्यांना नक्कीच सांगितले नसेल की, आमचे इलिगल बांधकाम झाले आहे म्हणून बदल करा.

**मा. आयुक्त :-**

पण आता या विषयावर मला माहिती नाही. मला माहिती घ्यावी लागेल की, इलिगल बांधकाम आहे की नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, त्यांचे आहे. तुम्ही मला लेखी दिले आहे. तुमचे लेखी पत्र आहे की, असे असे इलिगल वाढीव बांधकाम झाले आहे, त्यांना आम्ही बांधकाम थांबवायला नोटिस दिलेली आहे. हे तुमचे पत्र आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

या विषयाच्या संदर्भामध्ये माहिती आमच्याकडे नाही.

**नरेंद्र मेहता :-**

Madam, he has given me in writing. I didn't brought right now. मी पाहिजे तर सभागृहात मागवून घेतो. माझे एकच म्हणणे आहे की, तुम्ही शहराच्या हितासाठी विषय आणला असेल तर आम्ही त्याला

विरोध करत नाही. पण त्या बिल्डरला आळा घालण्यासाठी हे दिले असेल तर आम्ही त्यामध्ये भाग घेणार नाही. कारण डायरेक्टली -इनडायरेक्टली टू सपोर्ट द इलिगल कंस्ट्रक्शन. आम्ही डिस्क्वालिफाय होऊ.

**मा. महापौर :-**

इफ यू हॅव अ प्रॉब्लेम, मग तुम्ही सुचना द्या किंवा ठराव करा.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आम्ही सभागृहात प्रत्येक वेळेला विरोध करण्यासाठी आलेले नाही. आम्ही हेच सांगितले की, तुम्ही करा आम्ही तयार आहोत. मला त्यांच्याकडून एवढीच माहिती पाहिजे की, या दहा लोकांच इलिगल बांधकाम नाही आमचा विषय संपला. तुम्ही सर्वानुमते मंजुर करा आम्ही विरोध करत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांनी सांगितले की, इलिगल नाही.

**नरेंद्र मेहता :-**

ते बोलतात की, विषय तो नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. धनेगावे साहेब, तुम्ही बोला की, इलिगल आहे की नाही?

**सत्यवान धनेगावे :-**

हा विषय ३७ फेरबदलाचा विषय आहे. लिगल-इलिगलचा विषयच नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, मी जनरल बोलतो. कोणाच्या बाजूने बोलत नाही. या ठरावाला आमचे समर्थन आहे. सर्वानुमते मंजुर करा. माझी चिंता एवढीच आहे की, ज्या लोकांनी मा. राज्यमंत्र्यांकडे दिला, त्यांनी तिकडे सांगितले नसेल की, आमचे इलिगल बांधकाम झाले आहे. नाहीतर मा. राज्यमंत्र्यांनी अंगावर घेतले नसते. त्यांनी प्रोसेसप्रमाणे सांगितले की, महापालिकेने निर्णय घ्यावा. आता सभागृहामध्ये आल्यानंतर सर्व एकच आहेत. कोणता पक्ष नाही. आम्ही तुमच्या आजूने निर्णय द्यायला तयार आहोत. पण आम्हाला ती माहिती तरी द्या की, त्या भागात या दहा लोकांचे, जिकडे आपण बदल करतो, तिकडे आहे का, तेवढेच सांगा. ते सांगायचे सोडून हा विषय नाही.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, हा विषय प्रशासनाने दिलेला आहे. प्रशासनच खुलासा करेल. विषय असा आहे की, व्यक्तीने प्रत्येक वेळी वेगवेगळी भुमिका घेऊ नये. याआधी जेव्हा जनरेटींग आणि रिसिव्हींग सेक्टरचा ठराव मांडला गेला त्याच्यामध्ये अनधिकृत बांधकाम नसेल असे कुठे दिलेले नाही. आणि कितीतरी असतीलच. हा विषय आम्ही अनधिकृत बांधकामाला अधिकृत करण्यासाठी आणलेला आहे, असा विषय नाही. त्याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे. राज्य शासनाचे इतिवृत्तांत पाठवले आहे या दहा लोकांनी अर्ज केला. त्या अनुषंगाने याच्यामध्ये त्यांचा समावेश करण्यात आला नाही. त्यांचा आम्ही समावेश करतो आणि शासनाकडे परत फेरप्रस्ताव पाठवतो. या अनुषंगाने त्यांना काय करायचे आहे, त्यांचे अनधिकृत बांधकाम अधिकृत करायचे आहे की, नाही तो त्यांचा भाग आहे. शहराचा विकास करण्याच्या दृष्टीकोनातून आमचे प्रयत्न चालू असतात. त्याला कोणी कुठलीही दिशा दिली तर योग्य नाही.

**मा. महापौर :-**

यु हॅव टू गिव सम सुचना?

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मी पहिले सांगितले की, तुम्ही नावे आणली नसती तर हे कुठले बांधकाम, व्ही आर नॅचुरल तुम्ही इकडे आम्हाला नावासह सांगता आणि ती नावे तुमच्याकडे रेकॉर्डला आहेत की, दिपक कपाडीया प्लस १०, त्यांनी हा प्रस्ताव दिला. आम्ही जो काही ठराव करणार तो त्यांना इललिगलला लिगल करण्यासाठी फायदेशीर होईल तर आम्ही त्याच्यामध्ये दोषी ठरतो तुम्ही जनरल आणला असता तर आमचा काही आरोपच नव्हता. मी प्रशासनाला विचारले तुम्ही सांगा की, बांधकाम नाही संपले आम्ही बोलणार की, त्यांनी सांगितले की, बांधकाम नाही म्हणून आम्ही ठराव केला तुम्ही अंगावर घ्यायला तयार नाहीत. सभागृहाच्या अंगावर टाकायला तयार आहात. तुम्ही सांगा की, एकही बांधकाम नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

यापूर्वीचा ३७ चा प्रस्ताव शासनाकडे सबमीट झाल्यानंतर त्या दहा लोकांनी निवेदन दिले त्यावर शासनाने सांगितले की, तुम्ही ३७ सबमिट करा वी विल कंसिडर द केस ऑन मेरीट.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

आय अग्री पण शासनाला तुम्ही ही पूर्ण माहिती दिलीच नाही तुम्ही एका लाईनमध्ये सांगा की, त्या दहा लोकांचे इललिगल बांधकाम नाही विषय संपला आम्ही बसतो.

**सत्यवान धनेगावे :-**

तो विषयच नाही.

**राजेंद्र जैन :-**

इस विषय मे एक एफ.एस आय का १.८ एफ.एस.आय. होगा यह जो ऑडीट रीपोर्ट आया है, इसमे मिरा भाईंदर का जो पानी का सप्लाय है उसमे मा. आयुक्त के लिए अशाप्रकारे व्यवस्था करावी की, पर पर्सन ३५ लिटर पानी पर डे मिले। और यह डेटा यह बोलता है की, मिरा भाईंदर मे २००१ मे ५९ टक्का पानी कम था। २००६ मे ६६ टक्का पानी कम था। और २००९ के अंदर ५६ टक्का पानी कम था। अब पानी बढने का प्रस्ताव आया है। लेकीन यह टीडीआर ऐसा करने से, पॉप्युलेशन किंतना बढेगा यह टाऊन प्लानिंग को बताना चाहीए।अब हमे जो पानी मिल रहा है वो ७४ लीटर प्रती पर्सन पर डे मिल रहा है और यह करने से जनसंख्या बढेगी। इसमे जनता का क्या फायदा? दुसरी बात श्री मेहता साहब ने और आपने जो बोला की, लिगल है या इललिगल है। अगर ऐसा है तो यह प्रस्ताव पास हो तो जिस दिन से यह प्रस्ताव पास हो उस दिन से जो सी सी मिले उसके बाद उसीपर यह टीडीआर वाला प्रस्ताव पास हो उसके पहले बने हुए पास कीए हुए, सीसी पर यह प्रस्ताव नही आएगा। तो जो लिगल इललिगल की बात है वो पिछे रह जाएगी।

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

तसे सांगा तरी हरकत नाही.

**मा. महापौर :-**

यु हॅव सम सुचना ऑर व्हॉटएव्हर टू गिव्ह.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मॅडम कधीतरी आम्हाला समाधानकारक उत्तर द्या म्हणजे आम्ही बसू दरवेळी बोलता की, सुचना मांडा आणि बसा. आम्हाला विरोध करायचा नाही तुम्ही असे तरी सांगितले की, हे अमेंड करु आम्ही सुचना मांडतो यापूर्वी ज्यांनी इललिगल बांधकाम केले त्याच्यावर कारवाई करणार त्यांना ही सुविधा लागु होणार नाही असे तरी सांगा तुम्ही तसेपण सांगत नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, विषय वेगळा आहे. असे कसे सांगणार? सांगु शकत नाही हा विषय ३७ चा आपला प्रस्ताव शासनाकडे गेल्यानंतर यामध्ये आवश्यक ती चौकशी होणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, त्या विषयाला विषयांतर होत आहे आज इथे तो विषयच नाही.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

आयदर यु शुल्ड से की, त्यांचे इललिगल काम नाही त्यांना तेही सांगायचे नसेल तर कमीत कमी हे सांगा की हे निर्णय झाला.

**मा. महापौर :-**

पण ते बोलतात की, हा विषयच नाही.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मॅडम, ज्या नावासह तुम्ही सांगता त्यांचे इललिगल बांधकाम आहे का? त्यांनी सांगावे की, नाही आहे. विषय संपला उद्या काही झाले तर आम्ही बोलणार की, अधिकाऱ्यांनी आम्हाला माहिती दिली नाही म्हणून आम्ही रिझॉल्युशन केले.

**जुबेर इनामदार :-**

श्री. धनेगावे साहेब, याच्यापूर्वी तुम्ही प्रस्ताव पाठवला होता तेव्हा किती अनधिकृत आहेत आणि किती अधीकृत आहेत याची माहिती शासनाला पाठवली होती?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम, ठराव झालेला आहे साहेबांना सांगा की, काही सुचना असेल तर सांगा.

**मा. महापौर :-**

मी हा ठराव सर्वानुमते मंजुर करते.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

थांबा असे होऊ शकत नाही.

**मा. महापौर :-**

म्हणुन मी तुम्हाला सांगते इफ यु हॅव सुचना यु गिव्ह यु वॉन्ट टू गो अगेंस्ट ईट ठराव रखो। इसका कुछ तो निर्णय हो जाएगा। इफ यु विल ओनली स्टँड, यु विल आस्क अदर्स आर अल्सो वेटींग हीयर आप ही निर्णय ले लिजिए।

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

मॅडम, तुमचे आणि माझे भांडण नाही तुम्ही अधिकाऱ्यांना का पाठीशी घालता त्यांना फक्त एक शब्द सांगायचा आहे आयदर मी सांगितले की, यापुढे जे बांधकाम जुने झाले त्यांना लिगल करण्यासाठी नाही तर तोही संपला तुम्हाला दोन्ही नाही.

**मा. महापौर :-**

पण ते सांगतात की, हा विषय नाही तुम्ही दोन वेगळे विषय एक करता.

**सत्यवान धनेगावे :-**

हा माझ्या आणि तुमच्या भांडणाचा हा विषय नाही हा प्रस्ताव आहे.

**नरेंद्र मेहता (विरोधी पक्ष नेता) :-**

पण तुम्ही गोल गोल का सांगता? स्पष्ट सांगा.

**सत्यवान धनेगावे :-**

गोषवारा स्पष्ट आहे गोषवाऱ्याला अनुसरुनच मी बोललो आहे.

**गिता जैन :-**

साहेब, मला एक उत्तर मिळेल का? तुम्ही हे जे झोन चेंज केले आहेत, ते फक्त दहा माणसांनी स्टडी केली. त्यांना वाटले की, चेंज करायचे म्हणून तुम्ही करता की, तुम्ही पण काहीतरी स्टडी केली आहे? आपल्याला हे फायदेशीर आहे, नाही? दुसरे जे बिल्डर्स आहेत, त्यांच्याकडून तुम्ही काही सुचना मागवली का? तुम्ही काही सुचना आहे? या दहा जणांच्या सुचनेवर तुम्ही झोन चेंज करणार का?

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, मिरा भाईंदर शहरातील डि.पी. प्लानमधील सेक्टर - २,३,५ हे नॉन रिसिव्हींग आहेत. यापूर्वी याच सभागृहाने सेक्टर-२,३,५ रिसिव्हींग करण्यासंदर्भातील प्रस्ताव दोन वेळेस ठराव करुन शासनाला सबमिट केला होता. त्यामध्ये या दहा लोकांनी ऑब्जेक्शन घेतल्यामुळे शासनाने या सुचना दिल्या होत्या. त्याबाबत स्टडी करुनच आम्ही गोषवारा दिला. आमची या गोषवाऱ्याला शिफारस आहे.

**नरेंद्र मेहता :-**

हे दहा लोक समाजसेवक आहेत का? त्यांनी शहराच्या हितासाठी दिले आहे का? कोणाच्या हितासाठी दिले?

**सत्यवान धनेगावे :-**

या शहरामध्ये प्रत्येकजण समाजसेवक आहेत हे आपल्यालाही माहिती आहे.

**नरेंद्र मेहता :-**

पण त्यांच्या हितासाठी दिले आहे ना?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम, विषय असा आहे की, त्या लोकांनी ऑब्जेक्शन घेतले. बाकीच्या लोकांनीपण ऑब्जेक्शन घ्यायला पाहिजे होते. त्यांनी पण शासनाला सांगितले पाहिजे की, आमचे पण बांधकाम आहे. आम्हाला पण इथे रिसिव्हींग झोन करुन द्या. मॅडम, ठराव झालेला आहे. Please proceed.

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योंजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

सदर विकास नियंत्रण नियमावली T.D.R. GENERATING SECTOR व T.D.R. RECEIVING SECTOR बाबत खालील प्रमाणे मंजूर तरतूद केलेली आहे.

(१)

| ORIGINATING ZONE | RECEIVING ZONE |
|---|---|
| I | I |
| II | IV, V-A, VI-A |
| III | IV, VI-A |
| IV | IV, VI |
| V | IV, VI-A |
| V-A | V-A, VI-A |
| VI | VI-A, VI |
| VI-A | VI-A |
| VII-A | VII-A, VII-B |
| VII-B | VII-B |
| VIII | VIII |

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सूचित केलेल्या खालीलप्रमाणेच्या तक्त्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये ORIGINATING ZONE व RECEIVING ZONE मध्ये फेरबदल करणेकरिता प्रकरण क्र. ५४, ठराव क्र. ५५, दि.११/०२/२०१० रोजीच्या महासभेने मान्यता दिलेली आहे.

| T.D.R. GENERATING SECTOR | T.D.R. RECEIVING SECTOR |
|---|---|
| I | I |
| II-A | IV, II-B |
| II-B | II-V, IV |
| III-A | III-A, IV, V, V-A, VI, VI-A, VII-A, VII-B |
| III-B | IV, V, V-A, VI, VI-A, VII-A, VII-B |
| IV | IV, V, V-A, VI, VI-A |

उपरोक्त प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने आवश्यक वैधानिक कार्यवाही पूर्ण केल्यानंतर सदर प्रस्तावास मा. महासभेने प्रकरण क्र. ४१, ठराव क्र. ४७, दि.२०/०८/२०१० रोजी फेरबदलास अंतिम मंजूरी दिलेली आहे.

तद्नंतर सदरचा प्रस्ताव अंतिम मंजूरीकरिता मा. शासनास पत्र क्र. मनपा/नर/३१५८/ २०१०-११, दि.२९/११/२०१० अन्वये सादर केलेला आहे. सदर प्रकरणात सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे यांचेकडील दि.१६/०३/२०११ रोजीच्या पत्रातील त्रुटींची पूर्तता करुन त्याबाबत महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/१५५/२०११-१२, दि.२१/०४/२०११ अन्वये कळविलेले आहे. तद्नंतर मा. शासनास महानगरपालिकेने पूनश्च पत्र क्र. मनपा/नर/१८५८/२०११-१२, दि.१६/०९/२०११ अन्वये विनंती पत्र दिलेले आहे.

सदर प्रकरणात श्री. दिपक जे. कपाडिया व इतर १० यांच्या विनंतीपत्रानुसार महानगरपालिकेने यापूर्वी मंजूर विकास योजनेत सेक्टर निहाय फेरबदलाबाबत मा. शासनास सादर केलेल्या प्रस्तावामध्ये सेक्टर II चे II-A व II-B असे दोन भाग केलेले असून II-A हा पूर्णतः Congested असून ब-याच प्रमाणात आरक्षण आहेत. तसेच II-B या सेक्टरमध्ये बरीच मोकळी जागा असल्यामुळे व त्या ठिकाणी II-A व II-B चा वापर होवू शकतो. त्यामुळे विकासाचा समतोल साधला जाईल, अशी महानगरपालिकेने कारणमिमांसा नमुद केलेली आहे. या सेक्टर II-A व II-B च्या मधील विभाजन हद्दीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. उत्तर हद्दीलगत १८.०० मी. रुंद रस्त्याच्या उत्तरेकडील आणि ३०.०० मी. रुंद रस्ता यामधील मोकळी जागा सेक्टर II-A मधून वगळून सेक्टर II-B या रिसीव्हींग झोनमध्ये समाविष्ट केल्यास तेथे विकासाचा समतोल साधता येईल, याप्रमाणे विनंती केलेली आहे.

श्री. दिपक जे. कपाडिया व इतर १० यांच्या दि.१२/०९/२०११ रोजीच्या विनंतीपत्रानुसार मा.आ.श्री. गिल्बर्ट मेंन्डोसा यांनी मा. राज्यमंत्री, नगरविकास विभाग यांचेकडे प्रस्तावित फेरबदलाबाबत दि.१४/०९/२०११ रोजी पत्रव्यवहार केला असता, तद्अनुषंगाने मा. राज्यमंत्री यांनी दि.२२/०९/२०११ रोजी महानगरपालिकेचे मा. आयुक्त, संबंधीत अधिकारी व इतर अर्जदार यांचे समवेत बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीचे इतिवृत महानगरपालिकेस प्राप्त असुन इतिवृत्तात नमुद करणेत आले आहे कि,

**"अर्जदारांनी / विकासकांनी सादर केलेला प्रस्ताव हा महानगरपालिकेचे मंजूर ठराव आणि याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे तरतूदीनुसार प्रसिध्द सूचना यामध्ये समाविष्ट नसल्याने पुन्हा नव्याने प्रसिध्दीकरण करावे लागेल. सदर प्रस्तावाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतूदीनुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव सादर केल्यास त्याबाबत नगररचना संचालनालयाचे अभिप्राय प्राप्त करुन घेवून गुणवत्तेनुरुप पुढील कार्यवाही शासनामार्फत करण्यात येईल".**

याबाबत आवश्यक ती कार्यवाही सत्वर पूर्ण करण्यात यावी, अशा सुचना मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांनी दिल्या आहेत.

तद्अनुषंगाने वरीलप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव कार्यवाही करण्यासाठी मा. महासभेच्या मंजुरीसाठी सादर केले आहे.

सदर प्रस्ताव हे मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहराच्या विकासाचे हित न बघता खाजगी विकासक दिपक कपाडिया व इतर १० यांच्या फायदासाठी सादर केलेला आहे. दिकप कपाडिया व इतर १० यांचे मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम या क्षेत्रात आहे. अनधिकृत बांधकामावर कारवाई न करता त्यांना वाचवण्यासाठी सदर प्रस्ताव सादर केला आहे.

विकासकाच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई न करता त्यांचा सदर प्रस्ताव मंजूर केल्यास महानगरपालिका सदस्यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ..........................................................अंतर्गत Disqualification (अपात्र) ची कारवाई होईल हे नकारता येणार नाही. तसेच सदर प्रस्ताव मध्ये फेरबदल केल्यास नियमित Density (लोकसंख्या) पेक्षाजास्त लोकसंख्येची त्या भागात मोठ्या प्रमाणात वाढ होईल जेणे कारणे त्या भागात भविष्यात रस्ते, पाणी, गटार, Sewerage व इतर सार्वजनिक सुखसुविधा अपूर्ण पडणार आहे. म्हणून नमुद विकासकांच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करावी व सदर प्रस्ताव नामंजुर करण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**संदिप पाटील :-**

माझे अनुमोदन आहे।

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, डिसक्वालिफीकेशनचा प्रस्ताव तुम्हालाच पाठवावा लागेल? कारण ठरावामध्ये डिसक्वालिफीकेशनचा विषय घेतला.

**नरेंद्र मेहता :-**

हे केल्याने भविष्यात आपल्यावर डिसक्वालिफिकेशनची कारवाई होऊ शकते हे नाकारता येत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, यांनी जो लास्ट पॅरा लिहिला आहे, तो तुम्ही जरा वाचा आणि एक्सप्लेन करा.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २२ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदक बर्नड डिमेलो आहेत. आणि दुसरा ठराव, सुचक श्री. नरेंद्र मेहता आणि अनुमोदक श्री. संदिप मोहन पाटील. दुसरा ठराव जो आलेला आहे त्यावर मतदान घेतो. या ठरावाच्या बाजूने जे सदस्य असतील त्यांनी हातवर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी नाहीत. सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, यांच्या ठरावाच्या बाजुने जे सदस्य असतील त्यांनी हातवर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी नाहीत.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. २२, सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४५, विरोधात ४२, तटस्थ ०, इतकी मते पडलेली आहेत. ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २२ :-**

मिरा भाईंदर शहरासाठी विकास नियंत्रण नियमावलीचे T.D.R. GENERATING SECTOR व T.D.R. RECEIVING SECTOR साठी कलम ३७(१) नुसार विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल प्रस्ताव मा. नगर विकास विभागास पाठविणेस मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. २५ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

सदर विकास नियंत्रण नियमावली T.D.R. GENERATING SECTOR व T.D.R. RECEIVING SECTOR बाबत खालील प्रमाणे मंजूर तरतूद केलेली आहे.

(१)

| ORIGINATING ZONE | RECEIVING ZONE |
|---|---|
| I | I |
| II | IV, V-A, VI-A |
| III | IV, VI-A |
| IV | IV, VI |
| V | IV, VI-A |
| V-A | V-A, VI-A |
| VI | VI-A, VI |
| VI-A | VI-A |
| VII-A | VII-A, VII-B |
| VII-B | VII-B |
| VIII | VIII |

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सूचित केलेल्या खालीलप्रमाणेच्या तक्त्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये ORIGINATING ZONE व RECEIVING ZONE मध्ये फेरबदल करणेकरिता प्रकरण क्र. ५४, ठराव क्र. ५५, दि.११/०२/२०१० रोजीच्या महासभेने मान्यता दिलेली आहे.

| T.D.R. GENERATING SECTOR | T.D.R. RECEIVING SECTOR |
|---|---|
| I | I |
| II-A | IV, II-B |
| II-B | II-B, IV |
| III-A | III-A, IV, V, V-A, VI, VI-A, VII-A, VII-B |
| III-B | IV, V, V-A, VI, VI-A, VII-A, VII-B |
| IV | IV, V, V-A, VI, VI-A |
| V | IV, V, V-A, VI, VI-A |
| V-A | IV, V, V-A, VI, VI-A |
| VI | V, VI, VI-A |
| VI-A | V, VI, VI-A |
| VII-A | VII-A, VII-B |
| VII-B | VII-A, VII-B |
| VIII | VIII |

उपरोक्त प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने आवश्यक वैधानिक कार्यवाही पूर्ण केल्यानंतर सदर प्रस्तावास मा. महासभेने प्रकरण क्र. ४१, ठराव क्र. ४७, दि.२०/०८/२०१० रोजी फेरबदलास अंतिम मंजूरी दिलेली आहे.

तद्नंतर सदरचा प्रस्ताव अंतिम मंजूरीकरिता मा. शासनास पत्र क्र. मनपा/नर/३१५८/ २०१०-११, दि.२९/११/२०१० अन्वये सादर केलेला आहे. सदर प्रकरणात सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे यांचेकडील दि.१६/०३/२०११ रोजीच्या पत्रातील त्रुटींची पूर्तता करुन त्याबाबत महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/१५५/२०११-१२, दि.२१/०४/२०११ अन्वये कळविलेले आहे. तद्नंतर मा. शासनास महानगरपालिकेने पूनश्च पत्र क्र. मनपा/नर/१८५८/२०११-१२, दि.१६/०९/२०११ अन्वये विनंती पत्र दिलेले आहे.

सदर प्रकरणात श्री. दिपक जे. कपाडिया व इतर १० यांच्या विनंतीपत्रानुसार महानगरपालिकेने यापूर्वी मंजूर विकास योजनेत सेक्टर निहाय फेरबदलाबाबत मा. शासनास सादर केलेल्या प्रस्तावामध्ये सेक्टर II चे II-A व II-B असे दोन भाग केलेले असून II-A हा पूर्णतः Congested असून ब-याच प्रमाणात आरक्षण आहेत. तसेच II-B या सेक्टरमध्ये बरीच मोकळी जागा असल्यामुळे व त्या ठिकाणी II-A व II-B चा वापर होवू शकतो. त्यामुळे विकासाचा समतोल साधला जाईल, अशी महानगरपालिकेने कारणमिमांसा नमुद केलेली आहे. या सेक्टर II-A व II-B च्या मधील विभाजन हद्दीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. सेक्टर II-B चे उत्तर हद्दीलगत १८.०० मी. रुंद रस्त्याच्या उत्तरेकडील आणि ३०.०० मी. रुंद रस्ता यामधील मोकळी जागा सेक्टर II-A मध्ये सामाविष्ट केली आहे. सदर जमीन बहुतांशी मोकळी असल्यामुळे ती जागा II-A मधून वगळून सेक्टर II-B या रिसीव्हींग झोनमध्ये समाविष्ट केल्यास तेथे विकासाचा समतोल साधता येईल", याप्रमाणे विनंती केलेली आहे.

श्री. दिपक जे. कपाडिया व इतर १० यांच्या दि.१२/०९/२०११ रोजीच्या विनंतीपत्रानुसार शासन नगरविकास विभाग यांचेकडे प्रस्तावित फेरबदलाबाबत दि.१४/०९/२०११ रोजी पत्रव्यवहार केला असता, तद्अनुषंगाने शासनाने दि.२२/०९/२०११ रोजी महानगरपालिका आयुक्त, संबंधीत अधिकारी व इतर अर्जदार यांचे समवेत बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीचे इतिवृत महानगरपालिकेस प्राप्त असुन इतिवृत्तात नमुद करणेत आले आहे कि,

**"अर्जदारांनी / विकासकानी सादर केलेला प्रस्ताव हा महानगरपालिकेचे मंजूर ठराव आणि याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे तरतूदीनुसार प्रसिध्द सूचना यामध्ये समाविष्ट नसल्याने पुन्हा नव्याने प्रसिध्दीकरण करावे लागेल. सदर प्रस्तावाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतूदीनुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव सादर केल्यास त्याबाबत नगररचना संचालनालयाचे अभिप्राय प्राप्त करुन घेवून गुणवत्तेनुरुप पुढील कार्यवाही शासनामार्फत करण्यात येईल".**

याबाबत आवश्यक ती कार्यवाही सत्वर पूर्ण करण्यात यावी, अशा सुचना प्राप्त आहेत.

तद्अनुषंगाने वरीलप्रमाणे फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये आवश्यक असलेल्या फेरबदलाच्या वैधानिक कार्यवाहीस, फेरबदलाच्या सुचना / हरकती घेणे, सुनावणी घेणे व अंतिम मंजूरीसह प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | |
| २ | अशोक तिवारी | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | ३ | मयेकर सरस्वती रजनीकांत | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ॲड. रवि व्यास | ४ | सिंग मदन उदितनारायण | निरंक |
| ५ | पाटील वंदना विकास | ५ | पाटील रोहिदास शंकर | |
| ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ६ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ७ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ८ | मेंडोन्सा स्टिवन जॉन | ८ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ९ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ९ | मेहता डिंपल विनोद | |
| १० | डॉ. आसिफ गुलाब शेख | १० | केळुसकर प्रशांत नारायण | |
| ११ | गोविंद हेलन जॉर्जी | ११ | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| १२ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | १२ | रावल भगवती जयशंकर | |
| १३ | लियाकत ग. शेख | १३ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १४ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | १४ | शरद केशव पाटील | |
| १५ | खण्डेलवाल सुरेश | १५ | मेघना दिपक रावल | |
| १६ | नरेश तुकाराम पाटील | १६ | जैन गिता भरत | |
| १७ | शबनम लियाकत शेख | १७ | जैन रमेश धरमचंद | |
| १८ | अनिता जयवंत पाटील | १८ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १९ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | १९ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| २० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | २० | सुजाता रविकांत शिंदे | |
| २१ | भावसार शिल्पा कमलेश | २१ | मेहता नरेंद्र लालचंद | |
| २२ | वंदना रामदास चक्रे | २२ | जैन सिमा महेंद्र | |
| २३ | भोईर कमलेश यशवंत | २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २४ | सुमबंड महरूत्रीसा हारूनरशीद | २४ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २५ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २५ | जैन दिनेश तेजराज | |
| २६ | पिसाळ मनिषा नामदेव | २६ | अरोरा दिपिका पंकज | |
| २७ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २७ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २८ | पाटील सुनिता कैलास | २८ | अनिल बाबुराव भोसले | |
| २९ | वेतोसकर राजेश शंकर | २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| ३० | प्रभात प्रकाश पाटील | ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| ३१ | बगाजी शर्मिला विल्सन | ३१ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | |
| ३२ | झिनत रऊफ कुरेशी | ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| ३३ | सिंद्धीक मोहम्मद फरिद कुरेशी | ३३ | तारा विनायक घरत | |
| ३४ | पुजारी कांचना शेखर | ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | |
| ३५ | काझी रशीदा जमील | ३५ | शुभांगी महिन कोटियन | |
| ३६ | इनामदार जुबेर | ३६ | जयमाला किशोर पाटील | |
| ३७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३७ | संदिप मोहन पाटील | |
| ३८ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ३८ | परमार अनिता भरत | |
| ३९ | डिसा मर्लिन मर्विन | ३९ | पाटील प्रणाली संदिप | |
| ४० | भट दिप्ती शेखर | ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ४१ | विराणी रेखा अनिल | ४१ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ४२ | सामंत प्रमोद जयराम | ४२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४४ | भोईर भावना राजू | | | |
| ४५ | भोईर राजू यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २३, इमारतीचे बांधकाम करताना किंवा त्यानंतर करावयाची डासप्रतिबंधक उपाययोजना उपविधी मंजूर करणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रशासनाने उपविधी मंजुर करण्याकरिता आपल्याकडे दिलेली आहे. परंतु, मिरा भाईंदर शहरामध्ये एवढे डास झालेले आहेत की, त्यांची जी टिम आहे, त्या टीमवर यांची काय उपविधी आहे? आणि यांचा काय कंट्रोल आहे? मॅडम, एवढ्या प्रमाणात डास वाढलेले आहेत की, लोक हैराण झालेले आहेत. रात्री झोपू शकत नाहीत. आणि डेंग्युचे प्रमाण एवढे वाढलेले आहे की, अनकंट्रोल. इव्हन, प्रत्येक गल्लीमध्ये डेंग्युचे दोन ते तीन पेशंट आढळलेले आहेत. याच्यावर यांचा अजिबात कंट्रोल नाही आणि या लोकांनी बांधकाम करणाऱ्यांवर उपविधी मंजुर करण्यासाठी आणलेली आहे. पण तुमचे स्वतःचें याच्यावर काय आहे? साहेब, तुम्ही सांगून मतलब नाही. तुम्ही स्वतः भाईंदरमध्ये फिरा, भाईंदरमध्ये तुम्ही राहा. तुम्ही आजच्या दिवस जी.सी.सी. क्लबमध्ये राहा. आम्ही तिकडे तुमची रुम बुक करतो. तुम्ही तिकडे बघा. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत केल्या जाणाऱ्या डास प्रतिबंधक उपाययोजना संदर्भात तयार करण्यात आलेल्या उपविधींवर चर्चा, विचारविनिमय, सुचना हरकती व दुरुस्ती करणे कामी प्रसिध्द करणेसाठी ही महासभा मंजूरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २३ :-**

इमारतीचे बांधकाम करताना किंवा त्यानंतर करावयाची डासप्रतिबंधक उपाययोजना उपविधी मंजूर करणेबाबत.

**ठराव क्र. २६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत केल्या जाणाऱ्या डास प्रतिबंधक उपाययोजना संदर्भात तयार करण्यात आलेल्या उपविधींवर चर्चा, विचारविनिमय, सुचना हरकती व दुरुस्ती करणे कामी प्रसिध्द करणेसाठी ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २४, बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (Multi Purpose Workers - MPW) संवर्गाची पदे निर्माण करणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रुग्णांना प्राथमिक वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी सद्या ११ नागरी आरोग्य केंद्र व १ रुग्णालय कार्यरत आहे. या आरोग्य केंद्रांमध्ये देण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवा सुविधांपैकी हिवताप रुग्णांचे निदान व उपचार ही एक महत्वाची सेवा आहे. हिवतापाबरोबर डेंग्यु, चिकनगुन्या हेही डासांमुळे उद्भणारे गंभीर आजार आहेत. वेगाने होणारे नागरीकरण व त्यामुळे मोठया प्रमाणात होत असलेली बांधकामे, सांडपाण्याचे नाले बांधण्याची कामे तसेच जीवनशैलीतील बदल, पाण्याचे अयोग्य नियोजन, चुकीच्या पद्धतीने पाणी साठवण्याच्या पद्धती इ. मुळे शहरामध्ये डासोत्पत्ती स्थाने प्रचंड प्रमाणावर वाढत आहेत. त्यामुळे हिवताप, डेंग्यु, चिकनगुन्या इ. आजार शहरामध्ये मोठया प्रमाणावर आढळून येत आहेत. सदर आजारांवर नियंत्रण राखण्यासाठी सर्व ताप रूग्णांचे रक्त नमुने घेऊन त्यांना उपचार देणे आवश्यक असते. सद्यस्थितीत रक्तनमुने तपासणीसाठी सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्यरत प्रयोगशाळा तंत्रज्ञांची मदत घेण्यात येते. तपासणीमध्ये दूषित रक्तनमुने आढळलेल्या रुग्णांना आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत 'समूळ उपचार' (Radical Treatment) देण्यात येतात.

त्याचप्रमाणे कार्यक्षेत्रात देखील प्रसविकांमार्फत त्यांच्या गृह भेटीच्या वेळी ताप रुग्णांचे रक्तनमुने घेऊन त्यांना उपचार देण्यात येतात. परंतु, प्रसविकांना त्यांच्याकडे असलेल्या माता व बाल आरोग्य विषयक कामांमुळे संपूर्ण कार्यक्षेत्रातून अतिशय अल्प प्रमाणात रक्तनमुने गोळा करणे शक्य होते. परंतु, राष्ट्रीय किटकजन्यरोग नियंत्रण कार्यक्रम, नागरी हिवताप योजनेनुसार हिवताप प्रतिबंधक योजनांमध्ये डास व डासअळी नियंत्रण या व्यतिरिक्त प्रत्यक्ष लोकसंख्या सर्व्हेक्षण अत्यंत महत्वाचे आहे. याअंतर्गत आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन रुग्णांची विचारपूस करुन आवश्यकतेप्रमाणे ताप रुग्णांचे रक्तनमूने हिवताप निदानासाठी घेतात. तसेच सदर रक्तनमूने तात्काळ प्रयोगशाळेत पाठवून तपासणीचा अहवाल प्राप्त करून

दूषित रक्तनमूने आलेल्या रुग्णांना समूळ उपचार देतात. यामूळे हिवताप रुग्णांना तात्काळ उपचार मिळतो. तसेच हिवताप प्रसार थांबविण्यासाठी सदर पध्दतीने केलेली कामे अत्यंत उपयोगी पडतात.

तरी उपरोक्त कामे करण्यासाठी 'बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी' (Multi Purpose Worker) आवश्यक आहेत. शासनपत्र अ.शा. पत्र क्र. तांत्रिक/कक्ष१०/साथरोग/१३०३३-३५/२०११ दि. ३०/०३/२०११, ११/०४/२०११ नुसार मिरा भाईदर महानगरपालिकेस २०,००० लोकसंख्येस १ या प्रमाणात प्रत्यक्ष सर्व्हेक्षणासाठी किमान ५० आरोग्य कर्मचारी आवश्यक असल्याबाबत कळविले आहे. जनगणना २०११ नुसार मिरा भाईदर महानगरपालिकेची लोकसंख्या ८.१४ लक्ष आहे. त्यानुसार ४१ बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी आवश्यक आहेत. सदर कर्मचारी खालील कामे करतील :

- प्रत्यक्ष सर्व्हेक्षण करून संशयित ताप रुग्णांचे रक्तनमूने घेणे.
- रक्तनमूने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविणे.
- अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे समुळ उपचार देणे.
- जलद ताप सर्व्हेक्षण करणे
- कंटेनर सर्व्हेक्षण (डासअळी साठी पाणीसाठे तपासणे)
- कोरडा दिवस पाळणे
- औषध फवारणीचे पर्यवेक्षण करणे
- आरोग्य शिक्षण देणे
- अहवाल तयार करणे
- वेळोवळी सोपविण्यात येणारी कामे करणे

*शासनाच्या निर्देशानुसार दरवर्षी १० टक्के लोकसंख्येचे रक्तनमूने घेणे आवश्यक आहे.* याबाबत कर्मचारी नसल्यामूळे हिवतापासाठी अल्प प्रमाणात रक्तनमूने गोळा करण्यात येतात. परंतू हिवताप नियंत्रणासाठी जास्तीत जास्त रुग्णांपर्यंत पोहचून त्यांचे रक्तनमूने प्राप्त झाल्यास हिवताप नियंत्रण शक्य होणार आहे व यासाठी बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. शासनाकडे स्थायी बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी या पदासाठी सहाव्या वेतन आयोगानुसार रु. ५,२०० - २०,२०० - २,४००/- वेतनश्रेणी लागू आहे. या वेतनश्रेणी नुसार
स्थायी पदांसाठी रु. ७५,३७,४४०/- वेतन खर्च अपेक्षित आहे :

| पद नाम | पद संख्या | वेतन श्रेणी | एकत्रित मासिक वेतन | एकत्रित वार्षिक वेतन खर्च |
|---|---|---|---|---|
| बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) | ४१ | ५,२००-२०,२०० ग्रेड पे २,४०० | ६,२८,१२०/- | ७५,३७,४४०/- |

उपरोक्त कर्मचाऱ्यांची नेमणूक सुरूवातीस तात्पूरत्या करारतत्वावर व रू. ७०००/- ठोक मासिक मानधनावर केल्यास रु. ३४.४४ लक्ष अपेक्षित आहे.

| पद नाम | पद संख्या | ठोक मासिक मानधन | एकत्रित मासिक मानधन | एकत्रित वार्षिक मानधन |
|---|---|---|---|---|
| बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) | ४१ | रु. ७,०००/- | २.८७ लक्ष | रू. ३४.४४ लक्ष |

सदर वेतन खर्च सार्वजनिक आरोग्य विभागात उपलब्ध असलेल्या "आर.सी.एच. फेस-२ वेतन/इतर" या लेखाशिर्षामधून करण्यास मंजूर देण्यात येत आहे.

अशा प्रकारे हिवताप नियंत्रणासाठी ४१ बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी यांच्या पदांचा प्रस्ताव शासनाकडे पदनिर्मितीसाठी पाठविणे व सदर प्रस्ताव शासनाकडून मंजूर होईपर्यंत संदर पदे करारतत्वावर व ठोक मानधनावर भरणेस व त्यासाठी येणाऱ्या वेतन खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**जुंबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

त्यामध्ये माझी सुचना आहे. आपण जोपर्यंत अपॉइंटमेंट किंवा रिक्रुटमेंट होत नाहीत तोपर्यंत आपण मानधनावर घेणार आहोत. ज्या दिवशी आपल्याला शासनाची मान्यता मिळेल, त्यावेळी नियमाप्रमाणे नवीन जाहिरातीप्रमाणे रिक्रुटमेंट करण्यात यावे. त्या लोकांनाच घेण्यात येऊ नये.

**मा. महापौर :-**

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २४ :-**

बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (Multi Purpose Workers - MPW) संवर्गाची पदे निर्माण करणेबाबत.

**ठराव क्र. २७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रुग्णांना प्राथमिक वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी सद्या ११ नागरी आरोग्य केंद्र व १ रुग्णालय कार्यरत आहे. या आरोग्य केंद्रांमध्ये देण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवा सुविधांपैकी हिवताप रुग्णांचे निदान व उपचार ही एक महत्वाची सेवा आहे. हिवतापाबरोबर डेंग्यु, चिकनगुन्या हेही डासांमुळे उद्‌भणारे गंभीर आजार आहेत. वेगाने होणारे नागरीकरण व त्यामुळे मोठया प्रमाणात होत असलेली बांधकामे, सांडपाण्याचे नाले बांधण्याची कामे तसेच जीवनशैलीतील बदल, पाण्याचे अयोग्य नियोजन, चुकीच्या पद्‌धतीने पाणी साठवण्याच्या पद्धती इ. मुळे शहरामध्ये डासोत्पत्ती स्थाने प्रचंड प्रमाणावर वाढत आहेत. त्यामुळे हिवताप, डेंग्यु, चिकनगुन्या इ. आजार शहरामध्ये मोठया प्रमाणावर आढळून येत आहेत. सदर आजारांवर नियंत्रण राखण्यासाठी सर्व ताप रूग्णांचे रक्त नमुने घेऊन त्यांना उपचार देणे आवश्यक असते. सद्यस्थितीत रक्तनमुने तपासणीसाठी सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्यरत प्रयोगशाळा तंत्रज्ञांची मदत घेण्यात येते. तपासणीमध्ये दूषित रक्तनमुने आढळलेल्या रुग्णांना आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत 'समूळ उपचार' (Radical Treatment) देण्यात येतात.

त्याचप्रमाणे कार्यक्षेत्रात देखील प्रसविकांमार्फत त्यांच्या गृह भेटीच्या वेळी ताप रुग्णांचे रक्तनमुने घेऊन त्यांना उपचार देण्यात येतात. परंतु, प्रसविकांना त्यांच्याकडे असलेल्या माता व बाल आरोग्य विषयक कामांमुळे संपूर्ण कार्यक्षेत्रातून अतिशय अल्प प्रमाणात रक्तनमुने गोळा करणे शक्य होते. परंतु, राष्ट्रीय किटकजन्यरोग नियंत्रण कार्यक्रम, नागरी हिवताप योजनेनुसार हिवताप प्रतिबंधक योजनांमध्ये डास व डासअळी नियंत्रण या व्यतिरिक्त प्रत्यक्ष लोकसंख्या सर्व्हेक्षण अत्यंत महत्वाचे आहे. याअंतर्गत आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन रुग्णांची विचारपूस करुन आवश्यकतेप्रमाणे ताप रुग्णांचे रक्तनमूने हिवताप निदानासाठी घेतात. तसेच सदर रक्तनमूने तात्काळ प्रयोगशाळेत पाठवून तपासणीचा अहवाल प्राप्त करून दूषित रक्तनमूने आलेल्या रुग्णांना समूळ उपचार देतात. यामुळे हिवताप रुग्णांना तात्काळ उपचार मिळतो. तसेच हिवताप प्रसार थांबविण्यासाठी सदर पध्दतीने केलेली कामे अत्यंत उपयोगी पडतात.

तरी उपरोक्त कामे करण्यासाठी 'बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी' (Multi Purpose Worker) आवश्यक आहेत. शासनपत्र अ.शा. पत्र क्र. तांत्रिक/कक्ष१०/साथरोग/१३०३३-३५/२०११ दि. ३०/०३/२०११, ११/०४/२०११ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेस २०,००० लोकसंख्येस १ या प्रमाणात प्रत्यक्ष सर्व्हेक्षणासाठी किमान ५० आरोग्य कर्मचारी आवश्यक असल्याबाबत कळविले आहे. जनगणना २०११ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या ८.१४ लक्ष आहे. त्यानुसार ४१ बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी आवश्यक आहेत. सदर कर्मचारी खालील कामे करतील :

- प्रत्यक्ष सर्व्हेक्षण करून संशयित ताप रुग्णांचे रक्तनमूने घेणे.
- रक्तनमूने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविणे.
- अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे समुळ उपचार देणे.
- जलद ताप सर्व्हेक्षण करणे
- कंटेनर सर्व्हेक्षण (डासअळी साठी पाणीसाठे तपासणे)
- कोरडा दिवस पाळणे
- औषध फवारणीचे पर्यवेक्षण करणे
- आरोग्य शिक्षण देणे
- अहवाल तयार करणे
- वेळोवळी सोपविण्यात येणारी कामे करणे

शासनाच्या निर्देशानुसार दरवर्षी १० टक्के लोकसंख्येचे रक्तनमूने घेणे आवश्यक आहे. याबाबत कर्मचारी नसल्यामूळे हिवतापासाठी अल्प प्रमाणात रक्तनमूने गोळा करण्यात येतात. परंतू हिवताप नियंत्रणासाठी जास्तीत जास्त रुग्णांपर्यंत पोहचून त्यांचे रक्तनमूने प्राप्त झाल्यास हिवताप नियंत्रण शक्य होणार आहे व यासाठी बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. शासनाकडे स्थायी बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी या पदासाठी सहाव्या वेतन आयोगानुसार रु. ५,२०० - २०,२०० - २,४००/- वेतनश्रेणी लागू आहे. या वेतनश्रेणी नुसार
स्थायी पदांसाठी रु. ७५,३७,४४०/- वेतन खर्च अपेक्षित आहे :

| पद नाम | पद संख्या | वेतन श्रेणी | एकत्रित मासिक वेतन | एकत्रित वार्षिक वेतन खर्च |
|---|---|---|---|---|
| बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) | ४१ | ५,२००-२०,२००<br>ग्रेड पे २,४०० | ६,२८,१२०/- | ७५,३७,४४०/- |

उपरोक्त कर्मचाऱ्यांची नेमणूक सुरुवातीस तात्पूरत्या करारतत्वावर व रू. ७०००/- ठोक मासिक मानधनावर केल्यास रु. ३४.४४ लक्ष अपेक्षित आहे.

| पद नाम | पद संख्या | ठोक मासिक मानधन | एकत्रित मासिक मानधन | एकत्रित वार्षिक मानधन |
|---|---|---|---|---|
| बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) | ४१ | रु. ७,०००/- | २.८७ लक्ष | रू. ३४.४४ लक्ष |

सदर वेतन खर्च सार्वजनिक आरोग्य विभागात उपलब्ध असलेल्या "आर.सी.एच. फेस-२ वेतन/इतर" या लेखाशिर्षामधून करण्यास मंजूर देण्यात येत आहे.

अशा प्रकारे हिवताप नियंत्रणासाठी ४१ बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी यांच्या पदांचा प्रस्ताव शासनाकडे पदनिर्मितीसाठी पाठविणे व सदर प्रस्ताव शासनाकडून मंजूर होईपर्यंत सदर पदे करारतत्वावर व ठोक मानधनावर भरणेस व त्यासाठी येणाऱ्या वेतन खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. नरेंद्र मेहता व अनुमोदक श्री. शरद पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

सदर बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (Multi Purpose Workers - MPW) संवर्गाची पदे निर्माण करण्यासाठी शासनाकडून मान्यता झाल्यानंतर नेमणूकीची प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी मानधनावर असलेल्यांना योग्यतेनुसार परस्पर यांची नियुक्ती करण्यात येऊ नये. नविन भरत्यांची प्रक्रिया पूर्ण करावी अशी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २५, भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. २४६ मैदान विकसित करुन मुलांना खेळण्यासाठी खुले करण्याकरीता खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत भाईंदर (पूर्व) येथे आरक्षण क्र. २४६, खेळाच्या मैदानासाठी आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र २०.००० चौ. मीटर एवढे असून टी.डी.आर तरतुदीच्या माध्यामातून सदर आरक्षणाची १४४८६.९८ चौ. मीटर एवढी जागा (७२.४३%) महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. सदर आरक्षणाचा विकास करून सदर भागातील रहिवाशी व मुलांना खेळण्यासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. सदर आरक्षणास कुंपणभिंत बांधून मुरुम व लाल मातीचा भराव करावा लागणार आहे. त्याकरींता रू. ७२,९६,९५०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सन २०१२-१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पात बगीचे/वाहनतळ/मैदाने/क्रिडा संकुल/इनडोअर गेम विकसित या लेखाशिर्षाखाली १.०० कोटी एवढी तरतुद उपलब्ध आहे. सदर कामाच्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच आरक्षण क्र. ३६५ मौजे काशी सर्व्हे क्र. ८७ हिस्सा नं.२ व ५ ही जागा मिरा भाईंदर विकास आरखड्यात खेळाच्या मैदानाकरीता व शाळेकरीता आरक्षीत आहे. सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असून ७/१२ उतारा सुध्दा महानगरपालिकेच्या नावाने झालेला आहे. तसेच सदर जागेत नगररचना विभागाने कम्युनिटी सेंटरचा प्लान मंजूर केलेला असून सदर ठिकाणी कम्युनिटी सेंटर बांधण्याकरींता तसेच जॉगींग ट्रॅक, खेळाचे मैदान व इतर सोयी उपलब्ध करुन देणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, प्रशासनातर्फे आरक्षण क्र. २४६ ला आर्थिक व प्रशासकीय मान्यता मागितलेली आहे. अधिकाऱ्यांना विचारा, या अगोदरच त्यांनी या सभागृहाकडून आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे. म्हणजे परत ही फेर आर्थिक व प्रशासकीय मान्यता कशासाठी? एकाच विषयावर दोन ठराव का? श्री. खांबित साहेब, बरोबर आहे. याला आपण २००९ साली आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे. मॅडम, त्यावेळी जागा आपल्याकडे पूर्ण ताब्यात नाही आणि सलग ॲडजॉइनिंग प्लॉट नाही. म्हणजे केले तरी तो डेव्हलप होणार नाही. त्यासाठी ते काम पेन्डींग ठेवले गेले. त्यानंतर आपल्याकडे अजून एक इंच जागेचीही वाढ झालेली नाही म्हणून त्यावेळी ते काम केले गेले नाही. त्याला ऑलरेडी आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली होती आणि आता कुठल्याप्रकारे आपण काय चेंजेस करणार की, ते काम पूर्ण होईल?

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. २००८ मध्ये सदर कामास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी दिली होती. त्यानंतर या कामाचे टेंडर काढले गेले.

**नरेंद्र मेहता :-**

वर्क ऑर्डरही दिली गेली होती.

**दिपक खांबित :-**

वर्क ऑर्डर दिली नाही. रेट जास्त आले म्हणून फेरनिविदा मागवली. फेरनिविदा मागविल्यानंतर पुन्हा टेंडर काढले. सेकंड टाईम टेंडर आल्यावर जेव्हा स्टँडिंग कमिटीपुढे ठेवले. तेव्हा स्टॅन्डींग कमिटीने या कामाच्या बाबतीत असा ठराव केला की, सदर कामाच्या जागेवर खाजगी विकासकामार्फत दोन बाजूस कुंपण भिंती बांधण्यात आल्याने व उर्वरित दोन बाजूस नाले बांधावयाचे असल्याने सदर निविदा रद्द करण्यांत यावी. असा ठराव झाल्याने आम्ही ती प्रोसेस .........

**नरेंद्र मेहता :-**

तो स्टँडींग ठराव किती तारखेचा आहे?

**दिपक खांबित :-**

दि. ०३/०२/२००९, ठराव क्र. ११५

**नरेंद्र मेहता :-**

सायमन म्हणून कॉन्ट्रॅक्टर आहे. त्याने ते कॉन्ट्रॅक्ट घेतले होते. त्याला वर्क ऑर्डर दिली होती. त्याने कामानंतर ते काम थांबवले. कारण ज्या उद्देशाने आपण खर्च करतो ते सिध्द होणार नाही. खर्च वाया जाणार. आता त्यामध्ये असे नवीन काय झाले की, आपण तो खर्च पुन्हा करतो. ऑलरेडी रिझॉल्युशन आहेतच आणि मा. महासभेने केलेले ठराव स्टँडींग रद्द करु शकते का ते आपण मला सांगा. मॅडम, जनरल बॉडी हॅज पास द रिझॉल्युशन. एकदा जनरल बॉडीने केल्यानंतर त्यामध्ये स्टँडींग बदल करु शकत नाही. आणि ऑलरेडी तो ठराव आहेच. त्यामध्ये नंतर काही बदल झाला नाही. आता तो परत आणला आहे.

**जुबेर इनामदार :-**

श्री. खांबित साहेब, त्यावेळी मा. स्थायी समितीने निविदा फेटाळल्या होत्या ना? म्हणजे मा. स्थायी समितीने निविदा फेटाळल्या म्हणून हा फेरप्रस्ताव तुम्ही मा. महासभेसमोर आणला ना? कधी २००८ मध्ये?

**दिपक खांबित :-**

२००९ मध्ये.

**जुबेर इनामदार :-**

तीन महिन्यानंतर नवीन ठराव होऊ शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

टेंडर कॅन्सल केले आहे.

**जुबेर इनामदार :-**

टेंडर कॅन्सल केले म्हणजे पूर्ण प्रक्रिया कॅन्सल झाली.

**नरेंद्र मेहता :-**

विषय तोच झाला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

स्टँडींगला निविदा मंजुर करण्यासाठी आलेल्या पण स्टँडींगला त्यांनी निविदा फेटाळलेल्या आहेत. त्यांनी ते काम फेटाळलेले नाही. निविदा फेटाळलेल्या आहेत.

**जुबेर इनामदार :-**

पूर्ण प्रक्रिया संपल्यानंतर त्या निविदा फेटाळल्या गेल्या.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, मी मा. महापौर असताना बारा-सोळा ठिकाणी असे उद्घाटन करण्यात आलेले आपल्या भाईंदर वेस्टचे १०१ नंबर. मला वाटते त्यावेळी आपणही उद्घाटनाला उपस्थित होतात. त्यावेळी ते एकदम मंजुर झाले होते. सर्वांचे उद्घाटन झाले. आणि अधिकारी त्याला विटनेस आहेत. पण काही कारणामुळे त्या जागा ताब्यात नाही म्हणून शेवटी तो विषय पेंन्डींग राहीला. आणि मा. महासभेने एखादा निर्णय घेतल्यानंतर स्टँडींग निविदा रिकॉल करु शकते. किंवा इतर काय सांगू शकते. असे बोलू शकत नाही की, त्या ठरावाला काही महत्व नाही. ते इम्प्लीमेंट नाही. असे होऊच शकत नाही. That resolution is still existing.

**जुबेर इनामदार :-**

करायचे की नाही?

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, आमचे म्हणणे आहे की, आपण हा विषय स्टडी करा. एका विषयामध्ये तीन-तीन निर्णय होत आहेत. आता एका बाजुला तुम्ही बोलता की, स्टँडींगने मान्य केले की, करायचे नाही. दुसऱ्या बाजुला परत विषय आणला. माझे म्हणणे आहे की, पहिला ठराव अजून एक्झीस्टींगमध्ये आहे. हे सगळे आपण स्टडी करुन आणा. आणि यापेक्षा तुम्ही पुढचा विषय बघितला तर तुम्हाला समजेल की, हे अधिकारी अभ्यास

करत नाहीत. फक्त काढतात आणि बोलतात की, हे करा. तुम्हाला माहिती आहे का की, पुढच्या विषयामध्ये मॅक्सस मॉल डेव्हलप करायला आर्थिक व प्रशासकीय मान्यता मागितली आहे. त्यांना माहितीच नाही की, आपण कोणते आरक्षण विकसीत करत आहोत. मॅक्सस मॉलचा जो प्लेग्राऊंड आहे त्याची तुमच्याकडून आर्थिक व प्रशासकीय आणि तुम्ही आम्हाला हे डेव्हलप करायला गोषवारा दिला आहे. मॅडम, हे स्टडी करा. विरोध करण्याची काही आवश्यकता नाही. त्यानंतर रितसर घ्या.

**जुबेर इनामदार :-**

४२ टक्के ताब्यात आलेला भुखंड आहे. त्याला आपल्याला मुलांकरिता खेळाचे मैदान तयार करायचेच आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ह्या गार्डन, प्ले ग्राऊंडमध्ये खूप त्रुटी आहेत. आपल्याला माहिती पडतील. त्यात काय प्रॉब्लेम झाला ते मी सांगतो. आतापर्यंत सार्वजनिक बांधकाम विभाग गार्डन विकसीत करत होते. यावेळी आपण तो फंड वृक्षप्राधिकरणला दिला आणि श्री. इरकर साहेब त्याचे इन्चार्ज आहेत. त्यांनी गार्डन बघितले नाही, प्लेग्राऊंड बघितले नाही. कुठे आहे, काय आहे, ताब्यात आले. वर टाऊन प्लानिंगमध्ये गेले, लिस्ट काढली. किती ताब्यात आले आणि दिले की, हे डेव्हलप करायचे मा. आयुक्त साहेबांचा त्यांच्यावर विश्वास होता की, हे स्टडी करुन आले असतील. मा. आयुक्त साहेबांनी त्याला मान्य केले. नंतर नजरेत आणून दिले. असे एक नाही. बाकी तुम्ही तीन-तीन, चार-चार जागेवर बांधकाम झाले. त्याची तुम्ही परत आर्थिक व प्रशासकीय मान्यता मागितली. म्हणजे हे असे दिसेल की, भ्रष्टाचार करतो कारण एकाच कामाला दोनदा मान्यता करतो. ईट्स अ हंम्बल रिक्वेस्ट टू यु. मा. आयुक्त साहेबांनी हे स्टडी करुन सगळे गार्डन, प्ले ग्राऊंड पुन्हा पुट अप करावे.

**जुबेर इनामदार :-**

हा विषय वेगळा आहे गार्डन प्लेग्राऊंड नंतर आहे हा एक स्वतंत्र विषय आहे आणि ७२ टक्के आपल्या ताब्यात आला आहे म्हणजे आपल्याला विकसीत केलाच पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

स्टँडींग अध्यक्ष श्री. दिनेश नलावडे होते त्यांनी अभ्यास करुन ते बोलले की, दोन नाले आहेत. या सगळ्या गोष्टी ताब्यात आल्या नाहीत म्हणून ते पेंडींग ठेवले निविदा मान्य केली नाही आत्ता असे काय बदलले आहे?

**जुबेर इनामदार :-**

निविदा नामंजुर झाल्या म्हणजे तो विषय त्या दिवशी संपला म्हणून याच्यामध्ये काय दुरुस्त्या असतील, त्याच्यामध्ये अजून काही त्रुट्या असतील त्या पूर्ण करुन घ्या ठराव झाला की, प्रशासनाला कमीत कमी काम करण्याची संधी मिळेल आज त्यांना काम करण्याची संधीच नाही.

**नरेंद्र मेहता :-**

हे आत्ता या विषयावर बोलले पुढचा गार्डनचा विषय आहे, त्याच्यावर तसे बोलणार नाही. त्यामध्ये भुमिका चेंज होईल. मॅडम आम्ही विरोध करीत नाही. देअर इज अ लेक ऑफ, या सगळ्या मिस्टेक्स त्याच्यामध्ये आहेत. आपल्याला विनंती आहे की, गार्डन, प्लेग्राऊंड बद्दल मा. आयुक्त साहेबांनी गांभिर्याने निर्णय घेऊन परत सादर करावे त्यानंतर कोणताही बदल झाला नाही. नालेपण तसेच आहेत जागापण ॲक्वीझीशन झालेली नाही तुम्ही एका बाजूला रद्द करता मग दोन वर्षे तुम्हाला वाटले नाही का की, विकास व्हायला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

साहेब, तुम्ही जे म्हणता त्याप्रमाणे ठेकेदाराला त्या टेंडरची वर्क ऑर्डर आपण कधी दिलीच नव्हती. टेंडर स्टँडींग कमिटीनेच असे बोलून रद्द केले होते.

**नरेंद्र मेहता :-**

स्टँडींगला जे काही पटले, त्यांच्या सद्बुध्दीने ते रद्द केले मग आत्ता काय बदलले की, आत्ता चेंज झाले आहे.

**दिपक खांबित :-**

तेव्हा ३३ टक्के जागा ताब्यात आली होती.

**नरेंद्र मेहता :-**

त्यावेळीपण जेवढी तुम्ही म्हटले तेवढीच जागा ताब्यात आली होती आजही तेवढीच जागा ताब्यात आहे आणि तुम्ही याला ऑलरेडी आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे. निविदा पेंडींग ठेवली आहे. मा. आयुक्त साहेब, आयदर तुम्ही चेक करा ते खर्च टाकून मोकळे झाले असतील.

दिपक खांबित :-

साहेब, २००८ साली सदतीस लाख एकोणपन्नासचे एस्टीमेट होते.

**नरेंद्र मेहता :-**

२४६ आरक्षण मा. महासभेने मान्य केले आहे ना?

**दिपक खांबित :-**

होय, केले होते.

**नरेंद्र मेहता :-**

मग आत्ता परत मान्यता कशाला पाहिजे?

**दिपक खांबित :-**

साहेब, त्याची अमाऊंट चेंज झाली आणि जी जागा आहे ती आत्ता ७२ टक्के ताब्यात आली आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर, हे आरक्षण आपल्याला विकसीत करायचे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, आपण हा विषय परत रितसर सादर करावा.

**मा. आयुक्त :-**

साहेब, याच्यामध्ये आपण आत्ता मागचा ठराव पहा. हा १०/१०/२००८ च्या मा. महासभेचा विषय आहे. त्यादिवशी जेव्हा हा विषय आला होता तेव्हा ३० टक्के जागा ताब्यात होती या ठरावामध्ये तसे नमुद आहे. आजच्या दिवशी ७२ टक्के जागा ताब्यात आहे. दुसरे, त्यादिवशी जे एस्टीमेट होते त्याची कॉस्ट ३७ लाख होती. आत्ता चार वर्षानंतर ती कॉस्ट ७२ लाखावर गेली आहे म्हणजे आर्थिक आणि प्रशासकीय दोन्ही बाबींमध्ये चेंज झाले आहे म्हणून हे परत आणले.

**नरेंद्र मेहता :-**

मग तुम्ही रिवाईज मांडायला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

मा. स्थायी समितीने तो विषय फेटाळ्यानंतर रिवाइज कसे मांडता येईल? पुर्ण प्रक्रीया संपल्यानंतर तो कसा रिवाइज करता येईल? प्रशासनाला तो विषय परत द्यावाच लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम विषय क्लीअर आहे मा. आयुक्त साहेबांनी खुलासा केलेला आहे ७२ टक्के जागा ताब्यात आलेली आहे आणि आपली आर्थिक व प्रशासकीय मंजुरीपण वाढलेली आहे त्यामुळे विषय क्लीअर आहे ठराव मांडलेला आहे आपण प्रोसिड.

**मा. महापौर :-**

यु वांट टू गिव्ह ठराव?

**नरेंद्र मेहता :-**

आय गिव्ह यु अ सिंम्पली एक्झाम्पल. मी मा. महापौर असताना माझी इच्छा होती की, ते मैदान विकसीत व्हावे मी हा विषय आणलेला सर्वानुमते झालेला म्हणजे त्याला काही विरोध नाही हे जे बोलतात की, ३० टक्के होते टाऊन प्लानिंग इकडे आहे त्यांना विचारा कुठलेही आरक्षण आपण ५१ टक्के पेक्षा अबाव्ह काम चालू केलेच नव्हते हे ३० टक्के परत खोटी माहिती आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, मी जीबीचे मिनिट्स वाचतो आपण सर्वांनी जे मिनिट्स मंजुर केले तेच मी वाचतो.

**नरेंद्र मेहता :-**

त्यावेळी मा. महापौर आम्ही असलो तरी बहुमत त्यांचे होते म्हणून ठराव तेच मांडायचे पण ईट वॉज नॉट ३० परसेंट आम्ही एकही ३० टक्के चे आरक्षण आणलेच नाही जे ५१ टक्के पेक्षा जास्त होते तेच आम्ही आणले श्री. खांबित साहेब तिकडे आहेत. इट वॉज सम एक्झीस्टींग हे आरक्षण मला माहिती आहे. या जागेमध्य कुठल्याही एक प्रकारची ही वाढ झाली नाही.

**मा. महापौर :-**

तुम्हाला काय ठराव करायचा आहे तो मला सांगा.

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत भाईंदर (पुर्व) येथे आरक्षण क्र. २४६, खेळाच्या मैदानासाठी आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र २०.००० चौ.मीटर एवढे असून टी.डी.आर तरतुदीच्या माध्यमातून सदर आरक्षणाची १४४८६.९८ चौ.मीटर एवढी जागा (७२.४३ %) महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. सदर आरक्षणाचा विकास करुन सदर भागातील रहिवाशी व मुलांना खेळण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी होत आहे. सदर आरक्षणास कुंपणभिंत बांधून मुरुम व लाल मातीचा भराव करावा लागणार आहे. त्याकरीता रु. ७२,९६,९५०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सन २०१२-१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पात बगीचे/वाहनतळ/मैदान/क्रिडा संकुल/इनडोअर गेम विकसीत या लेखाशिर्षाखाली १.०० कोटी एवढी तरतुद उपलब्ध आहे. सदर कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

सदर प्रस्तावीत आरक्षण १०० टक्के ताब्यात नसल्याने क्रिडांगण विकसीत करता येणार नाही. तसेच यापुर्वी शासनाकडे आरक्षणाचा विकासाबाबत तक्रार झाली आहे. शासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेला पत्राद्वारे कळविले आहे की १०० टक्के आरक्षण ताब्यात आल्यानंतरच निर्णय घ्यावा. सदर आरक्षण विकसीत करण्याकरीता यापूर्वी दि. १०/१०/२००८ रोजी मा. महासभेत ठराव क्र. ५१ पारित झालेला आहेत. एका विषयावर दोन ठराव होऊ शकत नाही. मा. आयुक्तांनी आरक्षण क्र. २४६ पूर्ण ताब्यात घेऊन प्रस्ताव फेरसादर करावा असा ठराव मांडत आहे.

**प्रशांत केळुस्कर :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र.२५ करीता दोन ठराव आलेले आहेत मतदान घेण्यात येत आहे. दुसरा ठराव जो आलेला आहे त्याचे सुचक श्री. नरेंद्र मेहता आणि अनुमोदन श्री. प्रशांत केळुस्कर आहेत या ठरावाच्या बाजुने ज्यांना मतदान करायचे आहे त्यांनी कृपया हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात ज्यांना मतदान करायचे आहेत त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ कोणी नाहीत. पहिला ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. जुबेर इनामदार यांचा आहे. या ठरावाच्या बाजुने ज्यांना मतदान करायचे आहे त्यांनी कृपया हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात ज्यांना मतदान करायचे आहेत त्यांनी हात वर करायचे आहे तटस्थ कोणी नाहीत.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. २५ सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४४ आणि विरोधात ४२ तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २५ :-**

भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. २४६ मैदान विकसित करुन मुलांना खेळण्यासाठी खुले करण्याकरीता खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.

**ठराव क्र. २८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत भाईंदर (पूर्व) येथे आरक्षण क्र. २४६, खेळाच्या मैदानासाठी आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र २०.००० चौ. मीटर एवढे असून टी.डी.आर तरतुदीच्या माध्यमातून सदर आरक्षणाची १४४८६.९८ चौ. मीटर एवढी जागा (७२.४३%) महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. सदर आरक्षणाचा विकास करून सदर भागातील रहिवाशी व मुलांना खेळण्यासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. सदर आरक्षणास कुंपणभिंत बांधून मुरुम व लाल मातीचा भराव करावा लागणार आहे. त्याकरीता रू. ७२,९६,९५०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सन २०१२-१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पात बगीचे/वाहनतळ/मैदाने/क्रिडा संकुल/इनडोअर गेम विकसित या लेखाशिर्षाखाली १.०० कोटी एवढी तरतुद उपलब्ध आहे. सदर कामाच्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच आरक्षण क्र. ३६५ मौजे काशी सर्व्हे क्र. ८७ हिस्सा नं.२ व ५ ही जागा मिरा भाईंदर विकास आरखड्यात खेळाच्या मैदानाकरीता व शाळेकरीता आरक्षीत आहे. सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असून ७/१२ उतारा सुध्दा महानगरपालिकेच्या नावाने झालेला आहे. तसेच सदर जागेत नगररचना विभागाने कम्युनिटी सेंटरचा प्लान मंजूर केलेला असून सदर ठिकाणी कम्युनिटी सेंटर बांधण्याकरीता तसेच जॉगींग ट्रॅक, खेळाचे मैदान व इतर सोयी उपलब्ध करुन देणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | |
| २ | अशोक तिवारी | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | ३ | मयेकर सरस्वती रजनीकांत | |
| ४ | ॲड. रवि व्यास | ४ | सिंग मदन उदितनारायण | |
| ५ | पाटील वंदना विकास | ५ | पाटील रोहिदास शंकर | |
| ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ६ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ७ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ८ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ८ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ९ | डॉ. आसिफ गुलाब शेख | ९ | मेहता डिंपल विनोद | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | गोविंद हेलन जॉर्जी | १० | केळुसकर प्रशांत नारायण | निरंक |
| ११ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | ११ | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| १२ | लियाकत ग. शेख | १२ | रावल भगवती जयशंकर | |
| १३ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | १३ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १४ | खण्डेलवाल सुरेश | १४ | शरद केशव पाटील | |
| १५ | नरेश तुकाराम पाटील | १५ | मेघना दिपक रावल | |
| १६ | शबनम लियाकत शेख | १६ | जैन गिता भरत | |
| १७ | अनिता जयवंत पाटील | १७ | जैन रमेश धरमचंद | |
| १८ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | १८ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १९ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | १९ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| २० | भावसार शिल्पा कमलेश | २० | सुजाता रविकांत शिंदे | |
| २१ | वंदना रामदास चक्रे | २१ | मेहता नरेंद्र लालचंद | |
| २२ | भोईर कमलेश यशवंत | २२ | जैन सिमा महेंद्र | |
| २३ | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २४ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २४ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २५ | पिसाळ मनिषा नामदेव | २५ | जैन दिनेश तेजराज | |
| २६ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २६ | अरोरा दिपिका पंकज | |
| २७ | पाटील सुनिता कैलास | २७ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २८ | वेतोसकर राजेश शंकर | २८ | अनिल बाबुराव भोसले | |
| २९ | प्रभात प्रकाश पाटील | २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| ३० | बगाजी शर्मिला विल्सन | ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| ३१ | झिनत रऊफ कुरेशी | ३१ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | |
| ३२ | सिद्धीक मोहम्मद फरिद कुरेशी | ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| ३३ | पुजारी कांचना शेखर | ३३ | तारा विनायक घरत | |
| ३४ | काझी रशीदा जमील | ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगांवकर | |
| ३५ | इनामदार जुबेर | ३५ | शुभांगी महिन कोटियन | |
| ३६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३६ | जयमाला किशोर पाटील | |
| ३७ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ३७ | संदिप मोहन पाटील | |
| ३८ | डिसा मर्लिन मर्विन | ३८ | परमार अनिता भरत | |
| ३९ | भट दिप्ती शेखर | ३९ | पाटील प्रणाली संदिप | |
| ४० | विराणी रेखा अनिल | ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ४१ | सामंत प्रमोद जयराम | ४१ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ४२ | जाधव मोहन महादेव | ४२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | |
| ४३ | भोईर भावना राजू | | | |
| ४४ | भोईर राजू यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २६, बगीचा/उद्यान आरक्षण क्र. ११७ व आरक्षण क्र. २२१ येथे Theme Park (Public Park) व खेळाचे मैदान विकसित करणेबाबत.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, इरकर साहेबांनी जर खुलासा केला तर आम्ही ह्याच्यात काही ठराव मांडत नाही. आरक्षण क्र. ९६ ह्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मागितली. आरक्षण क्र. ९६ कुठला ते आम्हाला सांगावे.

**नागेश इरकर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्याच्यात अनावधानाने प्रशासनाकडून चूक झालेली आहे. ती मान्य करण्यात येते. आणि ह्यामध्ये उदयानाचा जो विषय आहे. थीम पार्क डेव्हलप करण्याचा ११७ आणि २२१ त्याला मंजुरी देण्यात यावी आणि उर्वरित जे मैदान आहे ते प्रस्ताव प्रशासन पुन्हा सुधारणा करुन पुढच्या किंवा येत्या महासभेत आणणार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, हे तर ठिक आहे की, योगायोगाने ह्या विषयावर मा. आयुक्त साहेबांना भेटलो होतो आणि मा. आयुक्त साहेबांनी ह्यावर निर्णय घेतला की ही चूक झालेली आहे. हीच चुक झाली नसती आपण आर्थिक प्रशासकीय मान्यता दयायची. आरक्षण क्र. ९६ इज द फ्रंट ऑफ द मॅक्सेस मॉल. तुम्ही बी.ओ.टीवर दिले त्याचे भाडे येते आणि तुम्ही बोलता आर्थिक प्रशासकीय मान्यता दया. आता ह्याला अधिकाऱ्याला काहीच शिक्षा नाही. दुसरा हा एकच नाही १२२ सी हा कुठे आला. आपल्याला माहित आहे. नाही माहित. दुसरे म्हणजे ज्यांचा एवढा महत्वाचा विषय आहे आठ करोडचा ते अधिकारी इथे नाहीत. अगेन यु व्हील सी ते जाऊ दया ते बाहेर गेले आहेत असे चालणार का मॅडम? १२२ सी मध्ये ५१ नंबर ठरावामध्ये बघा. आर्थिक, प्रशासकीय मान्यता झाली आहे. अर्धे काम झाले, अर्ध काम बंद ठेवल आता तुम्ही पुन्हा आर्थिक, प्रशासकीय मान्यता मागता. १२२ सी कुठे आहे हे कोणाला माहित नाही. खांबित साहेब, माहित आहे ना कुठे आहे.

**दिपक खांबित :-**

नवघर रोड, यशवंत राव चव्हान उद्यान गुरुद्वाराच्या समोर.

**नरेंद्र मेहता :-**

ते प्ले ग्राऊंड आहे की गार्डन आहे. विकसीत झाले आहे ना?

**दिपक खांबित :-**

प्ले ग्राऊंड आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही कधी जागेवर गेले आहेत. पूर्ण भरुन झाले आहे. आता फक्त त्या साईडला मॅग्रोज टच राहिलेला आहे. आय हॅव व्हिजिटेड पर्सनली.

**राजेश वेतोस्कर :-**

साहेब, पूर्ण झालले नाही. अर्धेच पूर्ण झाले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

जे काय केले ते केले आहे ना? म्हणजे तुम्हाला आता हे दाखवायचे आहे का. मॅडम ऑलरेडी करुन घेतले आहे. खर्चाची मागणी मांगायची आणि माती भराव झालेला आहे मग पेमेन्ट कोणाला करायचे?

**राजेश वेतोस्कर :-**

मा. महापौर मॅडम, फक्त ६०% पूर्ण झालेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

बाकी मॅडम सी.आर.झेड आहे मॅग्रोज आहे ते करता येणार नाही. त्यासाठी ६०% झालेले आहे. ह्याच्यामध्ये २४६ रिझर्व्हेशन दोन मिनिटा अगोदर आपण ठराव केला परत आर्थिक, प्रशासकीय मान्यता मागता २४६ मध्ये आता ठराव केला.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम, प्रशासनाने, आपली चुक मान्य केली, तुम्ही त्यांना फाशी देता का? प्रशासनाने चूक मान्य केली तो विषय त्यांनी मागे घेतला. बाकी जे तीन पार्क आहेत त्याच्यावर ठराव करायचा आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्हाला असे वाटत नाही का त्या अधिकाऱ्याने जी जागा विकसीत करायची त्या जागेवर जाऊन यायला पाहिजे. तो मॅक्सेस मॉलच्या ग्राऊंडवर गेला असता तर प्रशासनानी दिलं असत का? म्हणजे घरी बसून दिलेले आहे. ह्याच्यातले बरेचसे आरक्षण ऑलरेडी आपण केलेले आहे. कुठली माहिती नाही असेच डायरेक ब्लाइन्डली द्यायचे का? हा तुमचा आणि आमचा थोडाफार अभ्यास आहे म्हणून नाहीतर आम्ही ह्याला आर्थिक, प्रशासकीय मान्यता ..........

**मा. महापौर :-**

ठराव अजून वाचलेला नाही.

**नरेंद्र मेहता :-**

अधिकारीच ठराव बनवून देत असतात त्यांना ती चूक माहित आहे म्हणून म्हटले ना, नाहीतर ते ही म्हणून दिल असत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ११७ गोडदेव व आरक्षण क्र. २२१ हे बगीच्यासाठी आरक्षित असून सदर उद्यानाचे क्षेत्रफळ अंदाजित अनुक्रमे १८००० चौ.मी. व १९६७६ चौ.मी. आहे व ते विकसित करण्यासाठी अनुक्रमे मे. समा लॅन्डस्केप आर्किटेक्ट व मे. सराह कन्सल्टन्सी या तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.

आरक्षण क्र. ११७ गोडदेव बगीचा/उद्यानासाठी आरक्षित असून बाजुला असलेल्या तलावाचेही सुशोभिकरण व रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे प्रस्तावति आहे.

**<u>आरक्षण क्र. ११७ (१८००० चौ.मी.)</u>** थीम पार्क प्राचीन वास्तुशास्त्रातील पंचतत्वावर (पृथ्वी, पाणी, वायू, सुर्य आणि आकाश) आधारीत प्रत्येक तत्वाच्या घटकांचा त्यांचे स्थान, रंग लक्षात घेऊन त्यांचा पार्कच्या डिझाईनमध्ये समावेश करण्यात आला आहे. सर्वांसाठी आवश्यक गोष्टींची उदा. नागरिकांसाठी माहिती केंद्र, शैक्षणिक फिल्मस् दाखविण्यासाठी व छोट्या कार्यक्रमासाठी एक ॲम्पी थिएटर, खाण्याची छोटी दुकाने, स्वच्छता गृहे, गांडुळ खत प्रकल्प आणि सौरदिवे असणार आहेत. सदर थिम पार्क विकसित करणेकरिता अंदाजीत खर्च रुपये दोन कोटी येणार आहे.

**<u>आरक्षण क्र. २२१</u>** (१९६७६ चौ.मी.) या जागेस दक्षिण आणि पूर्व या दोन्ही बाजुने रस्ता आहे. त्यात बायो डायव्हर्सिटी पार्क, कल्ब हाऊस, ॲम्पीथिएटर, नेट क्रिकेट, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, स्केटींग व खेळण्याची साधने, जॉगिंग ट्रॅक आणि सायकलिंग ट्रॅक व लॉन, स्टॉल व कॅफे असेल. त्यासाठी अंदाजित खर्च रुपये दोन कोटी चाळीस लाख येणार आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे उद्यानासाठी आरक्षित आरक्षण क्र. ११७ व २२१ विकसित करणेस व त्याचबरोबर उद्यानासाठी आरक्षित आरक्षण क्र. १०० (अंदाजित खर्च रु. १.५० कोटी) या भूखंडावर Theme Park विकसित करण्यास उक्त नमुद आरक्षणासाठी नेमण्यात आलेल्या तांत्रिक सल्लागारामार्फतच विकसित करण्यास व तसेच भविष्यात वेळोवेळी महानगरपालिकेच्या ताब्यात येणाऱ्या उद्यानासाठी आरक्षित असलेले भूखंड विकसित करण्यास अथवा Theme Park बनविणेसाठी येणाऱ्या खर्चास मा. महासभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

हा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २६ :-**

बगीचा/उद्यान आरक्षण क्र. ११७ व आरक्षण क्र. २२१ येथे Theme Park (Public Park) व खेळाचे मैदान विकसित करणेबाबत.

**ठराव क्र. २९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ११७ गोडदेव व आरक्षण क्र. २२१ हे बगीच्यासाठी आरक्षित असून सदर उद्यानाचे क्षेत्रफळ अंदाजित अनुक्रमे १८००० चौ.मी. व १९६७६ चौ.मी. आहे व ते विकसित करण्यासाठी अनुक्रमे मे. समा लॅन्डस्केप आर्किटेक्ट व मे. सराह कन्सल्टन्सी या तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.

आरक्षण क्र. ११७ गोडदेव बगीचा/उद्यानासाठी आरक्षित असून बाजुला असलेल्या तलावाचेही सुशोभिकरण व रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे प्रस्तावति आहे.

**<u>आरक्षण क्र. ११७ (१८००० चौ.मी.)</u>** थीम पार्क प्राचीन वास्तुशास्त्रातील पंचतत्वावर (पृथ्वी, पाणी, वायू, सुर्य आणि आकाश) आधारीत प्रत्येक तत्वाच्या घटकांचा त्यांचे स्थान, रंग लक्षात घेऊन त्यांचा पार्कच्या डिझाईनमध्ये समावेश करण्यात आला आहे. सर्वांसाठी आवश्यक गोष्टींची उदा. नागरिकांसाठी माहिती केंद्र, शैक्षणिक फिल्मस् दाखविण्यासाठी व छोट्या कार्यक्रमासाठी एक ॲम्पी थिएटर, खाण्याची छोटी दुकाने, स्वच्छता गृहे, गांडुळ खत प्रकल्प आणि सौरदिवे असणार आहेत. सदर थिम पार्क विकसित करणेकरिता अंदाजीत खर्च रुपये दोन कोटी येणार आहे.

**<u>आरक्षण क्र. २२१</u>** (१९६७६ चौ.मी.) या जागेस दक्षिण आणि पूर्व या दोन्ही बाजुने रस्ता आहे. त्यात बायो डायव्हर्सिटी पार्क, कल्ब हाऊस, ॲम्पीथिएटर, नेट क्रिकेट, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, स्केटींग व खेळण्याची साधने, जॉगिंग ट्रॅक आणि सायकलिंग ट्रॅक व लॉन, स्टॉल व कॅफे असेल. त्यासाठी अंदाजित खर्च रुपये दोन कोटी चाळीस लाख येणार आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे उद्यानासाठी आरक्षित आरक्षण क्र. ११७ व २२१ विकसित करणेस व त्याचबरोबर उद्यानासाठी आरक्षित आरक्षण क्र. १०० (अंदाजित खर्च रु. १.५० कोटी) या भूखंडावर Theme Park विकसित करण्यास उक्त नमुद आरक्षणासाठी नेमण्यात आलेल्या तांत्रिक सल्लागारामार्फतच विकसित करण्यास व तसेच भविष्यात वेळोवेळी महानगरपालिकेच्या ताब्यात येणाऱ्या उद्यानासाठी आरक्षित असलेले भूखंड विकसित करण्यास अथवा Theme Park बनविणेसाठी येणाऱ्या खर्चास मा. महासभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.**

दुःखवठा ठराव क्र. ३० :-

गेल्या अनेक वर्षापासुन भारतीय शास्त्रीय संगीताला आंतरराष्ट्रीय पातळीवर नवे आयाम मिळवून देणारे जगद्विख्यात सतारवादक भारतरत्न पंडित रविशंकर यांचे वयाच्या ९२ व्या वर्षीदि. १२/१२/२०१२ रोजी अमेरिकेत निधन झाले आणि रियाजाची वाट बघत असलेली सतारही कायमची अबोल झाली, त्यांना मनःपुर्वक श्रध्दांजली ! पंडीत रविशंकर यांच्या परिवाराच्या दुःखातआम्ही सर्व सन्मा. पदाधिकारी सहभागी आहोत, असा शोक प्रस्ताव मांडत आहोत.

सुचक :- जुबेर इनामदार अनुमोदक :- श्री. श्री ध्रुवकिशोर पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सही/-
महापौर
मिरा भाईदर महानगरपालिका

नरेंद्र मेहता :-

पुढची सभा लवकर घ्या.

मा. महापौर :-

सभा संपली असे जाहिर करते.

सभा संपल्याची वेळ - सायं. ६.०० वा.

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १६/०२/२०१३

### ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र.४८ :- श्रीम. सिमा जैन यांनी मा. स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३ अन्वये एका सदस्याची उर्वरीत कालावधीसाठी नेमणुक करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सदस्य श्रीम. सिमा महेंद्र जैन यांनी दि.२४/१२/२०१२ रोजी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर उर्वरीत कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ कलम २३ अन्वये नेमणुक करणे आवश्यक आहे.

सदर बाबत श्री. फ. ब. खान उपसचिव महाराष्ट्र शासन यांचे दि.२०/१०/२००८ चे पत्रानूसार कोणत्याही समितीच्या कोणत्याही कारणामुळे रिक्त होणाऱ्या जागेवर निवृत्त झालेला सदस्य ज्या मान्यता प्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा, गटाचा, आघाडीच्या किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यता प्राप्त पक्षाच्या नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षित आहे मात्र अशा वेळेस पुर्वीच्या तुलनेने पक्षाच्या/गटाच्या तौलनिक संख्येत बदल झालेला नसावा अशी तरतुद आहे.

तरी श्रीम. सिमा महेंद्र जैन ह्या भारतीय जनता पार्टी या पक्षाच्या गटाकडुन नियुक्त झालेल्या असल्यामुळे त्याच पक्षाच्या गटाकडुन मा. स्थायी समितीवर नविन सदस्याची नेमणुक करणे उचित ठरेल.

प्र. नगरसचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका

(१)

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०२ /२०१३

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ४९ :- मिरा भाईंदर शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ उभारण्याकरीता चर्चा करुन महासभेमध्ये निर्णय घेणे बाबत.

संदर्भ :- मा. महासभा ठराव क्र. ३ दि. १०/०४/२००८

उपरोक्त विषयानुसार सादर करण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रमुख रस्त्यांवर वाहने उभे राहत असतात सदर वाहनांकडुन पे ॲण्ड पार्क तत्वावर भाडे वसूल केल्यास महानगरपालिकेस त्यातुन चांगले उत्पन्न मिळु शकेल या उद्देशाने मा. महासभा ठराव क्र. ३ दि. १०/०४/२००८ अन्वये मिरा भाईंदर शहरातील ६ ठिकाणी पे ॲण्ड पार्कींग बाबत निर्णय पारीत झाला होता. त्यापैकी फक्त सद्यस्थितीत मिरारोड स्टेशन (आरक्षण क्र. १८४) परिसरात पे ॲण्ड पार्कींग चालू असून त्याप्रमाणे सदर क्षेत्रात उभ्या असलेल्या वाहनांकडुन पार्कींग शुल्क आकारण्यांत येत आहे. तसेच सदर ठरावामध्ये नव्याने पे ॲण्ड पार्कच्या जागा उपलब्ध झाल्यास त्याबद्दलचा निर्णय घेण्यास मा. आयुक्तांस प्राधिकृत करण्यांत आले आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिकेचे अधिक उत्पन्न वाढविणेकामी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नव्याने खालील नमुद २३ पे ॲण्ड पांर्कीग करीता पार्कीग क्षेत्र घोषित करुन त्याकरीता अभिकर्ता नेमणेकामी निविदा मागविणेत आल्या होत्या.

| S.No | Road Name |
|---|---|
| 1 | Dr. Babasaheb Ambedkar Marg |
| 2 | MTNL telephone exchange to IDBI Bank |
| 3 | Temba Hospital to Maxus Mall |
| 4 | LBT office to Smashan Bhoomi |
| 5 | Uttan Flyover Bridge |
| 6 | Phatak to Golden Nest Circle |
| 7 | Golden Nest Circel Police chowki to Pan thekadi Road |
| 8 | Samshan Road to Indralok at New Golden Nest |
| 9 | Deepak Hospital to Seven Square Academy |
| 10 | Shivar Garden to Sardar Patel High school |
| 11 | Sona Hotel to Ramdev Park |
| 12 | Kanakiya Roaed |
| 13 | S.K. Stone to Dhongri slum |
| 14 | GCC Club to Vidyanagari Housing Society |
| 15 | Jhankar Pasun to RNA |
| 16 | Pleasant Park to MIDC |
| 17 | Silver Park to Jhangid Complex |
| 18 | Srishti to Royal College Road |
| 19 | Srishti to Punam Sagar |
| 20 | Sheetal Nagar to Jhangid Circle |

| S.No | Road Name |
|---|---|
| 21 | S.K.Stone to Singapore Plaza |
| 22 | Lodha Road (Parallel to Railway Line) |
| 23 | Kashimira Flyover to Golden Nest Circle |

दि. ०५/०१/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समितीमध्ये निविदा प्रक्रीया रद्द करण्याचा ठराव करणेत आला असून सदर विषय चर्चेकरीता मा. महासभेपुढे ठेवावा असे नमुद करण्यांत आले.

तसेच पे ॲण्ड पार्कींग करीता नव्याने जागा उपलब्ध करुन घेणेस मा. आयुक्त सो. यांना मा. महासभेने संदर्भिय ठरावाने प्राधिकृत केले असल्याने उक्त २३ रस्ते पे ॲण्ड पार्क करीत घोषित करुन सदर क्षेत्रातील उभ्या असलेल्या वाहनांकडुन शुल्क वसूल केल्यास महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होणार असून सदर बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेस शिफारस असे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

ગોષવારો બાબત દિ. 23/7/93

ઠેક. સામે ર.૧૦૫૧.

23/7/93

ગોષવારા નોંધ રજીસ્ટર

ક્ર. 34

23/7/93

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १६।०२।२०१३

## //गोषवारा//

**प्रकरण क्र.५०** :- श्री. भारत जगताप, सहाय्यक नगररचनाकार यांना महानगरपालिका सेवेतून कमी/बडतर्फ करणेबाबत...

सहाय्यक नगररचनाकार श्री. भारत जगताप यांची कार्यालयीन आदेश क्र. मनपा/आस्था/४४०/२९८८/२००३-०४ दि.११/०७/२००३ रोजीच्या आदेशांन्वये सरळ सेवा निवडीद्वारे सहाय्यक तथा बिल्डिंग इन्स्पेक्टर या पदावर नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था/१५२३/१८२०/२००६-०७ दि.०२/१२/२००६ अन्वये श्री. भारत जगताप यांना सहाय्यक नगररचनाकार या पदावर पदोन्नती देण्यात आली.

सहाय्यक तथा बिल्डिंग इन्स्पेक्टर या पदावर सरळ सेवेने नियुक्ती होण्यासाठी उमेदवाराची किमान शैक्षणिक अर्हता ही महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील ३ वर्षाची पदवीका/पदवी उत्तीर्ण आवश्यक होती आणि त्या पृष्ठर्थ श्री. भारत जगताप यांनी ३ वर्षाची पदवीका उत्तीर्ण झाल्याबाबत गुणपत्रिकेची छायांकित प्रत सादर केली होती.

दि.०५/०५/२००३ रोजीच्या मुलाखतीच्या पत्रामध्ये मुद्दा क्र.२ अन्वये शैक्षणिक पात्रतेबाबत मूळ दाखला आणणेबाबत नमूद करण्यात आलेले आहे आणि तसेच दि.११/०७/२००३ रोजीच्या नियुक्ती आदेशातील अट क्र.३ अन्वये शैक्षणिक अर्हतेची मूळ प्रमाणपत्रे दाखल करण्याचे बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. त्यानंतर श्री. भारत जगताप यांना दि.२८/०१/२०१० रोजीच्या पत्रांन्वये कागदपत्र/प्रमाणपत्राच्या मूळप्रती मागणी करण्यात आली होती असे दि.०१/०२/२०१० रोजीच्या श्री. भारत जगताप यांचे प्राप्त लेखी निवेदनावरुन दिसून येते.

शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र पडताळणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना दि.०६/०६/२०१२ रोजीच्या लेखी पत्राद्वारे लेखी कळविण्यात आले होते, परंतु कार्यरत १५ अधिकारी/कर्मचारी यांच्यापैकी श्री. भारत जगताप यांचे वगळता इतर १४ अधिकारी/कर्मचाऱ्यांचा शैक्षणिक अर्हता पडताळणी अहवाल प्राप्त झालेला आहे.

सबब, श्री. भारत जगताप यांना कार्यालयीन नोटीस क्र. मनपा/आस्था/११२६/२०१२-१३ दि.१२/१२/२०१२ अन्वये शैक्षणिक अर्हता मूळ गुणपत्रिका व प्रमाणपत्र ७ दिवसाचे आत दाखल करणेबाबत लेखी कळविण्यात आलेले आहे. अन्यथा आपले दि.११/०७/२००३ रोजीचे मूळ नियुक्तीचे आदेश रद्द करुन सेवेतून कमी करण्यात येईल असे कळविण्यात आले होते. तरी सुद्धा श्री. भारत जगताप यांनी शैक्षणिक अर्हता मूळ गुणपत्रिका व प्रमाणपत्र दाखल केलेले नाहीत.

सर जे.जे. रुग्णालय, मुंबई वैद्यकीय मंडळाचे दि.२०/१२/२०१२ रोजीच्या प्रमाणपत्रानुसार श्री.भारत जगताप हे पुढील सेवा करणेस पुर्णपणे व कायमस्वरुपी अपात्र असल्याचे कळविले आहे.

सबब, श्री. भारत जगताप, सहाय्यक नगररचनाकार यांची सहाय्यक तथा बिल्डिंग इनस्पेक्टर या पदावर दि.११/०७/२००३ रोजीच्या आदेशान्वये केलेली नियुक्ती रद्द करुन कार्यालयाचे क्र.मनपा/आस्था/१२०७/२०१२-१३ दि.२९/१२/२०१२ रोजीच्या आदेशान्वये श्री. भारत जगताप यांना महानगरपालिका सेवेतून तात्काळ बडतर्फ/सेवेतून कमी करण्यात आले आहे.

श्री. भारत जगताप, सहाय्यक नगररचनाकार यांची वेतनश्रेणी ही सहाय्यक आयुक्त पदाच्या वेतन श्रेणीशी समान असल्यामुळे नियुक्ती प्राधिकरण म्हणून मा. सर्वसाधारण महासभेची आवश्यकता आहे.

तरी वर नमूद केलेल्या कारणास्तव श्री. भारत जगताप यांना सेवेतून कमी करणे/बडतर्फ करणे दि:२९/१२/२०१२ रोजीच्या आदेशानुसार केलेल्या कारवाईस मान्यता मिळणेस सादर...

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २६ / ०२ /२०१३

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ५१ :- राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानरगपालिका क्षेत्राकरीता पोलीस पथक निर्माण करणे व पोलीस स्टेशन स्थापन करणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन पदनिर्मितीचा प्रस्ताव मा. महासभा दि. ०१/०७/२००९, ठराव क्र. १८ अन्वये ठराव पारित केला होता. त्या अनुषंगाने दि. ०४/०७/२००९ रोजी शासनांस प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविला होता.

महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रात पोलीस पथक निर्माण करणे, व पोलीस स्टेशन स्थापन करणे बाबत अप्पर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखाली दि. १२/१०/२०१२ रोजी बैठक आयोजित केलेली होती. त्या अनुषंगाने सुधारीत फेर प्रस्ताव शासनास सादर करण्यास कळविले असुन त्या अनुषंगाने महानगरपालिकेने करावयाच्या ठरावाचा मसुदा पुढील प्रमाणे दिलेला आहे. ठराव मसुदा

१) राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी उपाय योजना करण्याकरीता शासन निर्णय दि. ०२ मार्च २००९ अन्वये निर्णय घेतला आहे. नागरी गुन्ह्यांची नोंदणी, तपासणी व खटला भरण्यासाठी स्थापन करावयाच्या विशेष कक्षासाठी खालील संवर्गातील पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर निर्माण करणे प्रस्तावित आहे.

**परिशिष्ठ-अ, नागरी पोलीस यंत्रणेसाठीचा आकृतीबंध**
**(महानगरपालिका क्षेत्रासाठी.)**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (असुधारीत) | ड-वर्ग मनपासाठी पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | सहा. पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक | ८०००-२७५-१३५०० | ०१ |
| २. | पोलीस निरीक्षक | ७४५०-२२५-११५०० | ०१ |
| ३. | पोलीस उप- निरीक्षक | ५५००-१७५-९००० | ०४ |
| ४. | सहा.पोलीस उप- निरीक्षक | ४५००-१२५-७००० | -- |
| ५. | पोलीस हवालदार | ४०००-१००-६००० | ०४ |
| ६. | सशस्त्र पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | २४ |
| ७. | महिला पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | १६ |
| ८. | पोलीस नाईक | ४०००-१००-६००० | ०३ |
| | एकुण | | ५३ |

## परिशिष्ठ-ब, नागरीगुन्ह्यांच्या नोंदणी, तपास व खटला भरणेकामी स्थापन करावयाच्या विशेष पोलीस स्टेशनसाठीचा आकृतीबंध.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (असुधारीत) | ड-वर्ग मनपासाठी पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | सहा. पोलीस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | ०१ |
| २. | पोलीस उप- निरीक्षक | ५५००-१७५-९००० | ०१ |
| ३. | सहा.पोलीस उप- निरीक्षक | ४५००-१२५-७००० | ०१ |
| ४. | पोलीस हवालदार (सशस्त्र) | ४०००-१००-६००० | ०४ |
| ५. | पोलीस शिपाई (सशस्त्र) | ३०५०-७५-३९५०/८०/४५९० | ०८ |
| ६. | कनिष्ठ लिपीक | ३०५०-७५-३९५०/८०/४५९० | ०१ |
| ७. | वाहन चालक | ४०००-१००-६००० | ०१ |
| | एकुण | | १७ |

उक्त पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर निर्माण केली जाणार आहेत. तथापी त्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती आगावू (Advance Payment) च्या स्वरुपात महानगरपालिकेने करावयाची आहे. ही बाब विचारात घेऊन ही सभा.

अ) उक्त शासन निर्णयात नमुद केलेल्या आणि महानगरपालिकेसाठी अनुज्ञेय असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते, निवृत्तीवेन अंशदान होणाऱ्या खर्चास व सदर खर्चाची रक्कम आगावू तिमाही हप्त्याच्या स्वरुपात राज्य शासनाकडे/संबंधित पोलीस आयुक्तालयाकडे भरण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच

ब) सदर अधिकारी व कर्मचारी यांना पुरविण्यात येणाऱ्या वाहन, कार्यालय व इतर सुविधांवर येणाऱ्या खर्चास व तो शासनाकडे/संबंधित विभागाच्या पोलीस आयुक्तांकडे आगावू स्वरुपात भरण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच

क) सदर कक्षाच्या निर्मितीमुळे होणाऱ्या खर्चाची पूर्तता करण्यासाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात नविन लेखाशिर्ष निर्माण करुन त्याखाली आवश्यक तरतुद प्रतिवर्षी करण्यासाठी ही सभा मंजूरी देत आहे. ''

---

सन-२०११-१२ महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ३२.०३ % इतका असुन "परिशिष्ठ-अ" नागरी पोलीस यंत्रणेसाठीचा आकृतीबंध एकुण ५३ पदे तसेच "परिशिष्ठ-ब" नागरी गुन्ह्यांच्या नोंदणी तपास व खटला भरणे कामी स्थापन करावयाच्या विशेष पोलीस स्टेशनचा आकृतीबंध एकुण १७ पदे अशी एकुण ७० पदे, पदनिर्मिती केल्यास आस्थापना खर्चात ००.३९ % वाढ होणार आहे.

उक्त सर्व बाबी विचारात घेता महानगरपालिकेच्या क्षेत्रात नागरी गुन्ह्यासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन, अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करणेसाठी पदनिर्मितीचा फेर प्रस्ताव शासनाचे मंजूरीसाठी पाठविणेस व प्रस्ताव मान्यतेनंतर येणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मान्यता आवश्यक असल्याने फेर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

०८.०२.१३

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि.०७/०२/२०१३ वेळ ०३=.५५
~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र....३६....

लिपीक
नगरसचिव विभाग.